# श्री महर्षी अण्णासाहेब पटवर्धन

यांच्या

# आठवणी

संपादक व लेखक

**श्री. प्रभाकर केशव ठोसर, नागपूर**

संग्राहक व प्रकाशक

**श्री. रामचंद्र धोंडो दातार,**

हायकोर्ट वकील, नागपूर

गुरुवार, कार्तिक शु. ११ शके १८९० | मूल्य तीन रुपये | दिनांक ३१ आक्टोबर १९६८

पुणें येथे पुस्तके मिळण्याचे ठिकाण :

श्री. वि. दि. घाणेकर,
‘ इंदिरानिवास ’,
१२१०–ब सदाशिवपेठ, टिळकवाडी, पुणें २.

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर

श्रीसद्गुरु
श्रीनरसिंव्हसरस्वती स्वामी महाराज
यांचे चरणीं

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| श्री. अण्णासाहेबांच्या आयुष्यांतील प्रमुख घटनांची जंत्री | | | (७) |
| साफल्य | | | (११) |
| प्रस्तावना | | | ३ |
| **आठवणी : पृष्ठें १५ ते १०६** | | | |
| श्री. न. वि. गाडगीळ | ... | ... | १५ |
| श्री. म. म. दत्तो वामन पोतदार | ... | ... | १७ |
| श्री. डॉ. शं. दा. पेंडसे | ... | ... | १८ |
| कै. र. पु. परांजपे | ... | ... | १८ |
| श्री. ग. वि. केतकर | ... | ... | १९ |
| श्री. महादेवशास्त्री दिवेकर | ... | ... | २१ |
| कै. बाबासाहेब खापर्डे | ... | ... | २५ |
| कै. शं. कृ. देवभक्त | ... | ... | २७ |
| श्री. गणेश विश्वनाथ बापट | ... | ... | ३५ |
| श्री. घनश्याम लक्ष्मीदास गुजराथी | ... | ... | ४७ |
| श्री. स. वि. बापट | ... | ... | ५९ |
| श्री. दत्तात्रेय कृष्ण कापसे | ... | ... | ६१ |
| श्री. गोविंदराव बापट | ... | ... | ६९ |
| श्री. यादव केशव वडोदकर | ... | ... | ७१ |
| श्री. हरी भगवान पाटील | ... | ... | ७३ |
| श्री. रा. द. कुलकर्णी | ... | ... | ७४ |
| श्री. जी. एन. खरे | ... | ... | ७५ |
| श्री. श्रीधर विष्णु दातार | ... | ... | ७६ |
| श्री. अ. द. लिमये | ... | ... | ७९ |
| श्री. शंकर सदाशिव दांडेकर | ... | ... | ८० |

श्री. महर्षी अण्णासाहेब यांची संक्षिप्त चरित्रे (केसरी, चित्रमय-जगत्, विवेक यांतून उद्धृत केलेली.) १०७

### परिशिष्टें : पृष्ठें १२५ ते १५८

१. महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या निर्याणानंतर झालेली भाषणे. ... ... १२५
२. महर्षी अण्णासाहेब यांचे हस्ताक्षरातील दोन अस्सल पत्रे ... १२७
३. कै. प्रो. दीक्षितकृत चरित्रातील आठवणी १३८
४. महर्षी अण्णासाहेब यांच्या एका स्फुट लेखाची नक्कल १३९
५. स्मरणमौक्तिक ... ... १४१
६. कै. सौ. मनोरमाबाई पटवर्धन यांचे निर्याण १५०
७. खेचरी मुद्रा ... ... १५३
८. शक्तिपात अर्थात् Transmission of Spiritual Power ... ... १५५

समारोप ... ... १५९

### मागाहून आलेल्या आठवणी : पृष्ठें १७५ ते २०६

श्री. शरच्चंद्र वामन रानडे, नागपूर ... ... १७५
श्री. यशवंत नारायण आठवले ... ... १७८
श्रीमती पार्वतीबाई दामले ... ... १८२
कै. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर ... ... १८९
श्री. गो. गो. गोखले ... ... १९२
कै. नथ्थू राघो पाटील (चरित्रात्मक लेख) ... २०१
श्रीविनायकाष्टक ... ... २०७
नामसूची ... ... २०९
क्षमस्व ... ... २२०

## श्री. अण्णासाहेबांच्या आयुष्यातील

# प्रमुख घटनांची जंत्री

( श्री. अण्णासाहेबांच्या आयुष्याचे, असे दिसून येईल की, प्रामुख्याने दोन भाग पडतात. सन १८८५ पर्यंत आणि नंतर निर्याणापर्यंत. सभोवारच्या वातावरणास अनुसरून त्यांनी सन १८८५ पर्यंत देशहितार्थ उद्योग केले. रानडेप्रभृति पुढाऱ्यांचा तो काल होता. परंतु त्यांच्या पद्धतीने कार्य न करता, काही निराळ्या मार्गाचे अवलंबन करून देशहित साधावे असा त्यांचा मानस असावा असे त्यांनी हाती घेतलेल्या सालारजंग आणि कारव्हेटनगर या प्रकरणांवरून दिसून येते. यद्यपि या दोन्ही प्रकरणांची तपशीलवार माहिती आम्हांस आढळली नाही, तरी हे दोनही उद्योग त्यांनी सार्वजनिक हितार्थच केले, कारण व्यक्तिगत स्वार्थाच्या लेशाचा लेशही त्यांचें ठायी नव्हता. सन १८८५ नंतर अगदी वेगळ्या तऱ्हेनेच त्यांचे आयुष्य गेले. त्यांच्या चरित्रातील घटनांवरून असे दिसून येते की, १८८५ पर्यंत त्यांना अचूक आणि अभिप्रेत असलेला मार्ग दाखविला गेला नव्हता, तो दाखविला गेला आणि त्यांची मूळची संताची वृत्ति जागृत होऊन, ते संतच झाले. या घटनांवरून असेही दिसून येईल की, त्यांनी देशहितार्थ उद्योग केले तरी ते प्रामुख्याने संतपुरुषच होते. श्री. गणेश विश्वनाथ बापट या वयोवृद्ध गृहस्थांच्या आठवणीवरून असे दिसते की, मद्रासहून परत आल्यानंतर ते राजकारणाची फारच थोडी चर्चा करीत, किंबहुना त्या चर्चेत फारच थोडा रस घेत

असत. या श्री. बापट आणि इतरांच्याही आठवणींवरून असे दिसून येईल की त्यांना राष्ट्रपुरुष ठरविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे त्यांच्या अनन्यसामान्य योग्यतेला एक प्रकारचें लघुत्व देण्यासारखे आहे. पुढे आम्ही जी जंत्री दिली आहे ती वरून त्यांची आध्यात्मिक उन्नति कशी क्रमाने होत गेली आणि "हें गृह श्रीचे निरंतरचे विश्रांतिस्थान कसे ठरले" ते दिसून येईल.)

## सन १८८५ पर्यंत झालेल्या घटना

जन्म, शके १७६९ वैशाख वद्य ४ ( चतुर्थी ) इ. स. १८४७ मे ४.

मातुश्री स्वानंदवासी झाली. १०–११–१८५८.

वडील स्वानंदवासी झाले. १–२–१८७४.

लग्न ( पत्नीचे नांव सौ. मनोरमा ) अजमासे सन १८५९–६०
( पत्नीचा मृत्यु ता. २९-७-१९०२ )

मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले सन १८६४.

बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. सन १८६८

मुंबईस प्रयाण, सन १८६८.

एल्‌एल. बी. ची परीक्षा उत्तीर्ण, सन १८७६.

वैशाख वद्य चतुर्थी शके १७९९ ( सन १८७७ ) पटवर्धन कुलदैवत श्रीगजानन यांची उपासना श्री. तात्यासाहेब कर्वे यांच्यापासून घेतली.

मद्रासला प्रयाण १२–१०–१८८०. जाण्यापूर्वी श्रीमहाराजांची भेट १०–१०–१८८०. "श्रींनी सांगितले की इकडे येण्यापूर्वी कंचीस गेल्याशिवाय येऊ नको." ( टीप नं. १ पहा )

मद्रासहून स्वदेशी आगमन, सन १८८४.

श्रीनरसिंव्ह सरस्वती स्वामी महाराज यांचे निर्याण सन १८८६ पौष १५ शके १८०७.

## सन १८८५ नंतर

( पुढे दिलेल्या टीपांवरून श्री. अण्णासाहेब सद्‌गुरुकृपेस पात्र होऊन त्यांस श्रीपूर्णप्रसाद कसा झाला त्याची कल्पना येईल. )

" कुंभे माघे गुरौ शुद्ध १० आर्द्रा नक्षत्र घटी ६ " श्रीसद्‌गुरुचे आज्ञेने 'मी कोण' याचा अनुभवसहित शोध करण्याचा प्रारंभ शके १८२२. (टीप नं. १ पहा.)

" श्रीनरसिंव्ह सरस्वती सद्‌गुरुदेव एव इति निश्चयो जातः " (टीप नंबर २ पहा.)

आषाढ वद्य १३।१४ शके १८२८ (१९-७-१९०६) गुरुवासर उजाडता शुक्रवार पहाटे ५॥ वाजता श्रीगुरूचरित्र, अध्याय १६ प्रमाणे " सकलदोषमुक्त श्रीगुरुकृपें "

रविवासर उजाडता सोमवासर (१२-९-१९०९) " हें गृह श्रींचे नित्य निरंतरचे विश्रांतिस्थान असें ठरलें. "

[२६-१-१९१२] " श्री श्री पूर्णप्रसाद शुक्रवार, शनिवार उजाडण्याचे पूर्वी ( मकरे २६ शुद्ध ८ माघे १८३३ ) "

ता. ९-३-१९१२ " श्रींकडून पूर्वी झालेला अनुग्रह आणि **श्रींचें गुरूत्व निरंतरचें स्थिर झाले** " ( टीप नं. ३ पहा ).

उजाडता सोमवार १४-४-१९१२ रविवासरे मम तथा च मामकानांच इत्यादि अस्माकं सर्वेषां देवताघटित जीव व त्याचे शरीर यांशी श्रींचे ऐक्य........झालें.

टीप नं. १

कुंभे माघे शु।। १० शके १८२२ तिथौ गुरुवासरे स्वात्मसौख्य ग्रंथस्य नित्यं एका ओवीं वाचनीया इति क्रमे तद्दिन क्रमागत उपासना कांडस्य (३९) ओवीं वाचय इति कर्णे प्रात: शब्द: जात: तदेव उपासना उपदेश: तथा च यन्मनसि ...प्रेरयति....स एव ग्रंथाक्षरेषु तिष्ठति ......सा "उपासना विष्णूमूर्ती" इत्यादी ओवी दृष्टांत: सोमवासरे ११-६-१९०६. श्रीराम नामलेखन वाचन इत्यादि ३ वेळा नित्य करणे म्हणून १८८४ यात आज्ञा ( उपदेश ), त्याचे प्रयोजन व विवरण आज, व त्याच प्रमाणे उ० विष्णुमूर्ति यांचे प्रयोजन व विवरण झाले. रामनाम ३ स्मरण, लेखन वाचन, इत्यादि उपदेशाने श्रीने भक्त श्रीकंची रामचंद्र ऐय्या यांच्या द्वारे दशेंद्रिय व्यापारसहित स्मृतीचे वैक्लव्यराहित्य दिलें. कारण मद्रासेस जाण्यापूर्वी ता. १०-१०-१८८० रविवासरे रात्रौ श्रींनी सांगितले की इकडे येण्यापूर्वी कंचीस गेल्याशिवाय येऊ नको. यामुळे श्रीकंची रामचंद्र ऐय्या यांची भेट झाली इत्यादि. मद्रासेकडे १२-१०-८० ला गेलो.

टीप नं. २

अंतर्बहिश्च्य व्याप्य नारायण: स्थित:" ।। इति श्रुतिवाक्यस्य साक्षात्परिचयोऽभूत् तथा च नारायण: श्रीनरसिंव्ह सरस्वती सद्गुरू देव एव इति निश्चयो जात: कस्मादेवं श्रीनरसिंव्हसरस्वती सद्गुरुदेवेन मह्यं उपासना दातव्या इति मनसि बहुकालीन वासना इत्यादि आसीत् तथा च शके १८२३.

टीप नं. ३

ता. ९-३-१९१२ फाल्गुन वद्य शके १८३३ रा. वागदरीकर यांणीं श्रीगुरुचरित्र वाचलें. "वास सरस्वतीचे तीरीं ।। सायंदेव साचारी ।। तयां गुरुतें निर्धारी ।। वस्त्रें भूषणें दिधलीं ।।" श्रीगुरुचरित्र अध्याय १४ या ओंवीकडे लक्ष गेलें. श्रीकडून पूर्वी झालेला अनुग्रह आणि श्रीचे गुरूत्व निरंतरचे स्थिर झाले.

# साफल्य

कै. महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या आठवणी व आख्यायिका संकलित करण्याचा आमचा जो मानस होता, तो श्रीनरसिंह सरस्वती स्वामीमहाराज यांच्या कृपेने व आशीर्वादाने सफल झाला, यास्तव आम्हास आनंद होत आहे. परंतु आम्हाबरोबरच जे इतर गृहस्थ या आनंदाचे भागीदार होऊ शकतात त्यांचा नामनिर्देश करणे आमचे कर्तव्य आहे. सदरील गृहस्थ पुढीलप्रमाणे:—


(१) श्री. हरी गणेश बापट, जबलपूर

(२) श्री. दामोदर दत्तात्रेय कान्हेरे, नागपूर

(३) श्री. विष्णु दिनकर घाणेकर, पुणे

(४) श्री. मनोहरपंत देऊसकर ( ब्लाकमेकर )

(५) श्री. पां. ना. बनहट्टी ( या पुस्तकाचे मुद्रक )



श्रीनरसिंव्हसरस्वती स्वामी महाराज, आळंदी



श्री महर्षी अण्णासाहेब पटवर्धन



**सौ. मनोरमाबाई पटवर्धन**
( महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या पत्नी )

तारुण्यांतचि जो नृसिंह–चरणीं संसार सोडोनिया ॥
झाला नम्र; न जो भवांत पडला केव्हाहि मोहोनिया ॥
श्री-सेवेमधिं जो सदैव झिजला जैसे झिजे चंदन ॥
आळंदी-स्थित माधवासि अमुचें भावें असो वंदन ! ॥



श्री माधवबुवां गोडबोले

दिनांक २३।३।६७ श्री. पोस्ट आळंदी-देवाची
जिल्हा पुणें
श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराज यांचे मंदिर
श्री रामचंद्र धोंडो दातार - काँग्रेस नगर -
मुक्काम पोस्ट नागपुर यानां न. वि. वि.
आपले परिचित लेखक, श्री. ठोसर
यांचेकडून "आरत्यांचा गोळा
करण्याचा उपक्रम होत आहे. प्रयत्न
करणेस हरकत नाहीं असें मला वाटतें [illegible]
[illegible] आपला [illegible]

दिनांक ४।४।६७ श्री. पोस्ट आळंदी-देवाची
जिल्हा पुणें
श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराज यांचे मंदिर
श्री रा. धों. दातार ऑडव्होकेट - मु. नागपुर
दातार यांचा बंगला - काँग्रेस नगर - पोस्ट
नागपुर यानां आ. प्रो. आपले मार्गिक [illegible]
व आज [illegible] श्रींच्या कृपेने येईल
[illegible] वणें करावे आपला
माधवराव गोडबोले [illegible]

श्री रामचंद्र धोंडो दातार, यानां आ. वि.
रविवार कार्तिक शुद्ध एकादशी शके १८८८ मुक्काम पोस्ट
आळंदी-देवाची - जिल्हापुणें येथें महर्षि श्री. अण्णासाहेब
पटवर्धन. वास्तव्य - पुणें शहर यांच्या आठवणीचे (हस्तलिखित
रिपण आळंदी देवाची येथें श्रीनरसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे
ठिकाणी श्री रामचंद्र धोंडो दातार - संग्राहक - मुक्काम पोस्ट नागपूर
यांचे इच्छेनुसार श्रींचे समाधीस लावून अर्पण
श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या विभूतिच्या कृपेनें, इच्छेने
नसते ते श्री दातार - संग्राहक यांची आठवणीचा सत्य हकिकत ठेवणेची
इच्छा पूर्ण झाली आतां श्रींच्याच कृपेने छापणेचा योग येईल
कळावे मिति कार्तिक शु ११ शके १८८८
आपला
माधव गोविंद गोडबोले
सरपंच श्रीनरसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे
संस्थान ट्रस्ट - आळंदी-देवाची.

# प्रस्तावना

यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा
तत्तदेवावगच्छत्वं ममतेजोंऽशसंभवम् ।
( श्रीभगवद्‌गीता–विभूतियोग )

श्री. महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या देहावसानानंतर आज पन्नास वर्षांनी त्यांच्या आठवणी व आख्यायिका प्रसिद्ध होण्याचा योग यावा हे अत्यंत विस्मयजनक आहे! ज्या थोर पुरुषाने आपल्या आयुष्यापैकी सुमारे अर्धशतक लोकसेवेतच व्यतीत केले त्याच्या आठवणी प्रसिद्ध होण्यास तितकेच अर्धशतक उलटून जावे, ही कालाची कृपणता की आमची अनास्था हेच समजत नाही. कालास, तर श्री. अण्णासाहेबांविषयी मात्सर्यबुद्धी वाटून त्याने बुद्‌ध्या या कार्यास विलंब लाविला, असे म्हणता येत नाही. पण, न जाणो, तोही आम्हा मानवांतच वावरत असल्यामुळे, त्यास एखाद्या मानवी गुणाची बाधा झाली असल्यास न कळे! अण्णासाहेबांचे चरित्र म्हणविला जाणारा एक ग्रंथ प्रसिद्ध झाला असल्यामुळे,* आठवणींचे विशेष प्रयोजन काय या बुद्धीने अण्णासाहेबांच्या भक्तांनी आणि

---

* कै. केळकर यांच्या एकसष्टीनिमित्त १९३२ साली प्रसिद्ध झालेल्या 'केळकर' ग्रंथात श्री. बनहट्टी लिहितात. "...परंतु चरित्रे कशी लिहिली जातात व जावीत यासंबंधीचा तात्त्विक विचार करून तदनुसार चरित्र-लेखनाची पद्धती सुधारावी असा प्रयत्न आपल्याकडे फारसा झालेला दिसत नाही." ( अजूनही ही स्थिती पालटली आहे असे म्हणता येत नाही. )

चहात्यांनी आठवणी संकलित करण्याचा प्रयत्न केला नसेल; किंबहुना 'चरित्र प्रसिद्ध झाले असल्यामुळे, आता आठवणी कशाला प्रसिद्ध करता' असा प्रश्न, अण्णासाहेबांच्या एका निकटवर्ती, सुशिक्षित सद्गृहस्थाने आम्हांस केला! परंतु चरित्राचे क्षेत्र वेगळे व आठवणींचे क्षेत्र वेगळे हे ते गृहस्थ विसरले! चरित्र-लेखक बहुधा एकच व्यक्ती असल्यामुळे, त्या व्यक्तीचे काही लाडके पूर्वग्रह किंवा कल्पना, नकळतच, चरित्रात कोठे तरी उमटून जातात. काही स्थानी तर असे झालेले दिसून येते की वर्ण्य विषय बाजूलाच राहून लेखकाचेच 'वक्तृत्व' ग्रंथातून वहाते किंवा वर्ण्य विषयाच्या प्रतिपक्षाच्या टीकेने किंवा निंदेनेच ग्रंथ भरून निघतो! आठवणी पाठविणाऱ्या व्यक्ती अनेक असल्यामुळे 'मल्ला वज्र गमे नरा नृप गमे' अशी स्थिती होऊन स्मृति-विषय व्यक्तीच्या अनेक स्थूल सूक्ष्म अंगोपांगांवर, स्वभावविशेषांवर भिन्नभिन्न प्रकाश-छटा पडू शकतात. श्री. स. वा. बापट यांनी प्रसिद्ध केलेल्या लोकमान्यांच्या 'आठवणी' ग्रंथांत असेच झालेले दिसून येईल.

श्री. लोकमान्यांइतके राष्ट्रव्यापी कार्यक्षेत्र अण्णासाहेबांचे नसल्यामुळे, किंबहुना ते मद्रासहून परत आल्यानंतर त्यांनी आपण होऊन आपले कार्यक्षेत्र मर्यादित करून घेतल्यामुळे उभयतांच्या लोक-संपर्कात साहजिकच सापेक्षतेने फरक पडला. अगोदरच मर्यादित झालेल्या किंवा केलेल्या कार्यक्षेत्रामुळे काही विवक्षित गटातूनच अण्णासाहेबांच्या आठवणी, पूर्वीच प्रयत्न झाला असता तर, अधिक प्रमाणाने मिळण्याचा संभव होता. परंतु पन्नास वर्षांचा दीर्घ कालावधी लोटून गेल्यामुळे आठवणी प्राप्त होण्याचे क्षेत्र अधिकच आकुंचित झाले! श्री. अण्णासाहेबांचा मृत्यू १९१७ साली झाला व आठवणींच्या कल्पनेचा जन्म १९६४ साली झाला. या 'जन्म-मृत्यु'मध्ये अर्ध-

शतकाला तीनच वर्षें कमी इतकी काळाची चाल झाल्यामुळे आठवणींचे उगम दुर्मिळच झाले! अण्णासाहेबांशी थोडाच संबंध आलेला, काही विवक्षित कालपर्यंत किंवा दीर्घकालपर्यंत संबंध आलेला कोणताही गृहस्थ १९१७ साली ऐन पंचविशीत असला तरी १९६४ साली सत्तरी उलटून गेलेला असणार,* वृद्धो याति गृहीत्वा दंडं अशी दंडप्राप्ती त्याला झालेली असणार आणि इतर वैकल्याप्रमाणेच स्मरणशक्तीचे वैकल्य त्याचे ठायी उत्पन्न झालेले असणार हे उघड आहे. तरी अशाही परिस्थितीत माझे स्नेही श्री. रामभाऊ दातार व नानासाहेब दांडेकर यांनी आठवणींचे 'उगम' शोधून काढून, पत्रव्यवहार करून, स्मरणपत्रे धाडून काही आठवणी मिळविल्या.

अर्थात्च अशा परिस्थितीत मिळालेल्या आठवणी अल्पच असणार हे स्पष्ट आहे. आठवणी गोळा करण्याची कल्पना आम्ही जेव्हा श्री. दांडेकर व दातार यांस सांगितली तेव्हा ती त्यांस पटली, पण ते काहीसे साशंक झाले. याचे कारण वर येऊन गेलेच आहे. आज ज्या आठवणी आम्हास मिळाल्या त्या काही दिवसांनी किंवा वर्षांनी मिळण्याची शक्यता मुदलीच संपुष्टात आली असती. तेव्हा जे काही झाले त्याबद्दल 'अकरणात् मंदकरणं श्रेयः' या न्यायाने समाधान मानणे भाग आहे. ज्यांनी आम्हास आठवणी पाठविल्या त्यांनी फडकू लागलेल्या जरेच्या ध्वजाला न जुमानता स्मृतीला चालना देऊन, त्यांस जे आठवले ते लेखनिविष्ट केले. त्यास यथोचित

* कै. दीक्षितकृत चरित्रात बाबासाहेब पटवर्धन म्हणतात. "अण्णासाहेबांसंबंधी प्रत्यक्ष माहिती सांगणारा यापुढे मिळणार नाही. आता सुद्धा असा मनुष्य असला तरी तो निदान ५५ वर्षांचा पाहिजे." (शाके १८६५ म्हणजे सन १९४३ साली.)

संस्कार करूनच मुद्रणयोग्य केले आहे. कालाचा तडाका आपल्या लेखणीनेच थोपवून धरून अण्णासाहेबांची स्मृती जागृत ठेवणाऱ्या या सज्जनांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

अण्णासाहेब देशभक्त होते. राष्ट्राच्या स्वातंत्र्याची त्यांना तीव्र तळमळ लागली होती आणि तत्प्रीत्यर्थ त्यांनी काय उद्योग केले याची काहीशी कल्पना परिशिष्टांतील लेखांवरून येईलच. या त्यांच्या उद्योगांचे यथातथ्य किंवा तपशीलवार वर्णन कोठेच आढळत नाही! अण्णासाहेबांच्या उत्तर-आयुष्यातील निवृत्तीने त्यांचे पूर्व वयातील ज्वलंत उद्योग झाकून टाकल्यासारखे दिसतात! लो. टिळकांचा मूळ पिंड जसा पंडिताचा होता आणि नाइलाजाने त्यास राजकारणात पडावे लागले, तद्वत्‌च अण्णासाहेबांचा मूळ पिंड संताचाच असून, पूर्ववयातील उद्योग त्यांनी उत्कट देशभक्तीने प्रेरित होऊनच हाती घेतले. त्यांचे उत्तर आयुष्यातील परिवर्तन हे निराशा-प्राप्त नव्हते. अंतःप्रेरणेने किंवा अन्य काही कारणाने किंवा नृसिंहसरस्वती महाराजांनी त्यांचे नियत भागधेय त्यांस दर्शविल्यामुळे त्यांना त्यांचे ' हरपले श्रेय ' सापडले आणि आत्मशोधनापुढे इतर उद्योग कितीही मोठे असले तरी तुलनेने तुच्छच होत असा प्रत्यय येऊनच त्यांनी आयुष्याची दिशा बदलली. राष्ट्रोद्धाराची तीव्र तळमळ आत्मोद्धारात परिवर्तित झाली आणि ते ज्या पदवीस पोचले ती पदवी निसर्गतःच प्राप्त झालेल्या दैवी गुणसंपदेने आणि स्वतःच्या परिश्रमाने त्यांनी प्राप्त करून घेतली!

ही पदवी त्यांनी कशा रीतीने प्राप्त करून घेतली याचा, काही एक विशिष्ट दृष्टीने विचार काही लोकांनी केलेला दिसतो. तो, सफल वा असफल झाला याविषयी मतभेद होण्यास पुष्कळच जागा आहे.

एका अर्थाने तसा प्रयत्न करणे औचित्यास धरून असले, तरी तो हमखास साधतोच असे नाही. संतचरित्राचे मर्म उकलून सांगणारा स्वतः संतच असला पाहिजे, असाही दंडक कोणालाच घालता येणार नाही. सूक्ष्म अवलोकन करून, एतद्विषयक काही अनुमान किंवा निष्कर्ष काढता येणे शक्य आहे. कै. प्रो. दीक्षितकृत अण्णासाहेब-चरित्रास श्री. बाबासाहेब पटवर्धन ( श्री. अण्णासाहेबांचे चिरंजीव ) यांनी जो लहानसा चरित्रलेख जोडला आहे त्यावरून अण्णासाहेबांनी आपले ध्येय काही विवक्षित रीतीने कसे साध्य करून घेतले याची चांगली कल्पना येईल. एखाद्या सामान्य धार्मिक कर्मठाप्रमाणे किंवा त्यापेक्षा थोडासा अधिक असाच त्यांचा आयुःक्रम लोकांस दिसत असता त्यांना जे कष्टसाध्य किंबहुना असाध्य ते अण्णासाहेबांनी कसे प्राप्त करून घेतले याचे पुष्कळांना गूढ वाटे. हे गूढ उलगडण्याचा प्रयत्न श्री. बाबासाहेबांनी केला आहे. श्री. बाबासाहेब लिहितात,

" महर्षींच्या नित्यक्रमासंबंधाने दुमत नाही. चार चार अहोरात्रहि ते झोप घेत नसत किंवा कसलाहि आहार घेत नसत........एखाद्या लहानशा खोलीत ते कधी बसले नाहीत. आंतून कडी लावून तर नाहीच नाही. त्यांच्या निरपेक्षतेविषयी, निःस्वार्थपणाविषयी अगर उपभोगविमुखतेविषयी कोणास शंका नाही. पण प्रश्न असा येतो की या गोष्टी जर योगाभ्यासानेच साध्य होत असतील तर तो योगाभ्यास अण्णासाहेब केव्हा आणि कोठे करीत ?

" योगाभ्यास करताना त्यांना कोणी पाहिले नाही हे काही अंशी खरेच. कारण योगाभ्यास म्हणजे मत्स्यासन, मयूरासन, शीर्षासन ... इत्यादि प्रकार करणे हा अर्थ घेतला तर अशी आसने....करताना त्यांना कोणी पाहिले असेल हे संभवनीय नाही. पण चित्तवृत्तींचा

निरोध हाच योगाभ्यास; चित्तवृत्तींवर पूर्ण ताबा मिळविणे हाच खरा योग, बाकीची सर्व साधारणपणे कसरतच असे तज्ज्ञच म्हणतात. हे लक्षांत घेतले तर त्यांच्या वर्तनक्रमातील रहस्य लक्षात येईल."

स्वतःच्या वर्तनक्रमातील हेतूचा किंवा स्वानुभवांचा त्यांनी कोणासच थांगपत्ता लागू दिला नाही; त्याविषयी कोणी पृच्छा केली तर ते दुसराच विषय काढीत असे सांगून श्री. बाबासाहेब पुढे लिहितातः—

"(मद्रासहून) परतल्यापासून अन्नत्याग, निद्रात्याग, द्रव्यत्याग आणि उपभोग त्याग इत्यादि त्यागांचा 'सराव' अंगवळणी पाडण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येई....अशा त्यागाचा सराव पचनी पडला म्हणजे पुढे पाऊल टाकायचे हीच त्यावेळी त्यांच्या आचरणाची दिशा असावी."

या वाक्यातील 'सराव' व 'पचनी पडला' हे शब्द महत्त्वाचे आहेत. अण्णासाहेबांनी हे 'त्याग' एकदमच आचरणांत आणले नाहीत, त्यांचा 'सराव' केला, युक्तीनेच त्यांनी आहार कमी केला, निद्रेवर ताबा मिळविला. एका दिवसातच आहार व निद्रा कमी केली असे झाले नाही. विषयांची बुभुक्षा आणि जागृतावस्था त्यांनी स्वतःचीच बुभुक्षा व निद्रा कमी करून आटोक्यात आणली. हे सर्व शनैः शनैः झाले. ही मंदगति बुद्धिपुरस्सरच अंगीकृत असावी यात शंका नाही. अशा रीतीने हा त्यागाचा 'सराव' 'पचनी पड' लागून अशी स्थिती आली की—

"क्रमाक्रमाने आठदहा वर्षांतच त्यांनी आहारवर्ज्यता आणि त्याबरोबरच विनिद्रताही आत्मसात केली आणि तिची तीव्रता ते वाढवीत चालले."

श्रीनृसिंहसरस्वती स्वामींचा उत्सवदिन, किंवा धुळे येथील उत्सवदिन, अशा वर्षातून तीन चार प्रसंगीच अण्णासाहेबांना जेवण्याचा 'प्रसंग' येई. जेथे दिवसातून तीनचारदा खाण्याची तयारी असते तेथे वर्षातूनच तीनचारदा अन्नसेवन करणाऱ्या महात्म्याचा 'योग' आणखी वेगळा तो काय असावयाचा! 'यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः। इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः' हे गीतावचन लक्षात आणले की अण्णासाहेब कोठल्या मार्गाने जात होते व त्या मार्गाने जाणे त्यांनाच किंवा त्यांच्या कोटीतील देवतुल्य पुरुषांनाच कसे शक्य होते हे लक्षात येईल. या मार्गाचे अवलंबन ते इतरांस कसे करावयास सांगणार? 'यस्मिन्कुले तव जन्म गजस्तत्र न हन्यते' हेच खरे! विषय-गजाची मदोन्मत्त गंडस्थळे फोडण्याचे काम पुरुष-सिंहाचेच, शृगालांचे नव्हे!

अण्णासाहेबांनी अनशन आणि विनिद्रता क्रमानेच आचरणात आणली हे वर सांगितलेच आहे. तथापि असे करताना त्यांनी मनावर जुलूम होऊ दिला नाही असे दिसते. मनाची अनुकूलता नसेल तर केवळ शरीराला क्रिया करावयास लावणे निरर्थकच ठरते. बंदिवासातील कैदी, पायात बेड्या असूनही खडी फोडण्यासारखी मेहनतीची कठीण कामे करतो. परंतु तेथे त्याचे मन नसते. 'मन लावून काम करणे' या साध्या शब्दप्रयोगात वस्तुतः किती गंभीर अर्थ भरलेला आहे. अण्णासाहेबांनी सर्व चित्तवृत्तींचा निरोध करूनच, त्यांना अभिप्रेत असलेल्या एकेक 'त्यागास' मनाची अनुकूलता मिळविली. मनाच्या अनुकूलतेच्या अभावी नुसतेच अनशन किंवा विनिद्रता शारीरिक कसरतच ठरली असती. श्री. बाबासाहेब पुढे लिहितात:

"अनाहार किंवा निश्चक्र उपोषणासंबंधीने अण्णासाहेबांनी एका प्रसंगी असे म्हटल्याचे आठवते की उपोषित कालात अन्नाची

मुळीच इच्छा जोपर्यंत झाली नाही तोपर्यंतच खरे उपोषण.* क्रमाने सवय न करता एकदम अन्न बंद करणे किंवा त्यासाठी तळमळत राहणे ही केवळ उपासमार होय. म्हणून अन्नत्याग आणि निद्रात्याग या गोष्टी सावकाशपणेच आत्मसात् केल्या पाहिजेत. चित्ताच्या एकाग्रतेला या गोष्टी अवश्य आहेत. ”

अण्णासाहेबांनी अन्न कमी केले; अर्थात्च तदंगभूत जी रुची तिचीही लालसा नष्ट केली. अन्न नुसते अन्न असून भागत नाही तर त्याला रुचीही असावी लागते. बिनवासाचे फूल आणि बिनरुचीचे अन्न दोन्ही सारखीच ! अन्न सेवनांत उदरभरणाबरोबरच जिव्हा-लौल्याची तृप्ती हा एक भाग, किंबहुना प्रमुख भाग असतो. अण्णासाहेबांनी रसनाही आटोक्यात आणली. जेव्हा केव्हा तीन चार दिवसांनी खावयाचे त्यावेळी अमुकच पदार्थ पाहिजे असा निर्बंध त्यांनी ठेवला नव्हता. त्यांनी जे लोकसेवेचे व्रत अंगिकारिले होते ते नीट चालण्याकरता शरीररक्षणास आवश्यक तेवढेच अन्न घ्यावयाचे असा क्रम त्यांनी सुरू केला.

अन्नाइतकीच निद्रेची आवश्यकता मनुष्य शरीराला असते. एका पुस्तकात एक गोष्ट वाचल्याचे स्मरते. काही अपराधाबद्दल एका अपराध्यास त्याने मुळीच झोप घेऊ नये अशी शिक्षा दिली गेली. त्याने झोप घेऊ नये म्हणून पहाऱ्यास शिपाई ठेविले होते. त्यास खावयास भरपूर देत असत परंतु झोप घेऊ देत नसत. त्याने झोपेवाचून चार पाच दिवस कसे तरी काढले. परंतु पाचव्या दिवशी त्याच्यापुढे जेवणाची थाळी ठेवताच तो मोठ्याने ओरडला “ मला

* श्रावणी सोमवाराचा उपवास घाईघाईने सोडणाऱ्यांनी हे वाक्य लक्षात ठेवावे !

अन्न नको. मुळीच नको. मला झोप पाहिजे. मला भरपूर झोप घेऊ द्या!"

वस्तूच्या अभावानेच तिची किंमत कळते याचा अनुभव सध्याच्या धान्य नियंत्रणाच्या दिवसांत आपणास येतच असतो. अन्न व निद्रा यांचा कोणत्याही कारणाने अभाव घडला, तर आपणा सामान्य जनांची कशी अनुकंपनीय अवस्था होते हे सांगणे नकोच! नलदमयंती स्वयंवराचा कर्ता रघुनाथ पंडित सुप्रसिद्ध कवी आनंदतनय, यांचा व्याही, यास उत्तर आयुष्यात विपन्नावस्था प्राप्त होऊन, तो अन्नाला महाग झाला तेव्हा त्याने भाताच्या गोळ्यासाठी केलेला आक्रोश त्यानेच रचिलेल्या एका श्लोकात व्यक्त झाला आहे. रघुनाथपंडित अव्वल दर्जाचे कवी खरे परंतु 'बुभुक्षितः काव्यरसो न पीयते' कवीची झाली तरी भूक ती भूकच! काव्याच्या तुकड्यापेक्षा भाकरीच्या तुकड्याने (किंवा भाताने)च तिची तृप्तता होणार! 'न मिळो खावया....परी तो नारायण कृपा करो' असे म्हणावे साधुवर्य तुकाराम महाराजांनीच! सामान्य जन ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थनेप्रमाणे "O! Lord give us our daily bread" असेच मागणार हे उघड आहे! तुकाराम महाराजांनीच आणखी एका अभंगात 'मागणें लई नाहीं। पोटापुरतें देईं।' असे म्हटले आहे. 'पोटापुरते' असे म्हटले आहे; पोटभर' नव्हे. आणि पोटापुरते तरी कशाला तर भगवद्भक्ती करण्यास शरीर कार्यक्षम रहावे म्हणून! कारण 'शरीरमाद्यं खलु धर्म साधनम्।' दुष्काळात, भुकेच्या यातना सहन होईनात, म्हणून विश्वामित्राने मांसाची चोरी केली आणि त्या चोरीचा धर्मव्याधाने निषेध करताच 'तुझ्यापेक्षा मला धर्म जास्त कळतो, परंतु या घटकेला मला भूक भागविण्याची जास्त गरज आहे' अशा अर्थाचे उत्तर दिले. अण्णासाहेबांच्या

मानाने विश्वामित्र क्षुद्र असे अर्थात्च आम्हाला ध्वनित करावयाचे नाही. उपमा किंवा दृष्टांत शब्दशः अर्थाने घ्यावयाचे नसतात. नाही तर 'पक्वबिंबाधरोष्ठी' असे म्हणताच अधरोष्ठावरील पक्वबिंब एखादा शहाणा शोधीत बसावयाचा आणि 'चंद्रमुखी' अशी उपमा देताच, प्रियेच्या मुखावर चंद्राप्रमाणेच काळे डाग आहेत की काय अशी एखाद्या प्रियकराला चिंता पडावयाची!

अण्णासाहेबांनी ज्या मार्गाने जावयाचे ठरविले तो मार्ग किती कठीण होता आणि म्हणूनच त्यांनी सावकाशच त्या मार्गाने जावयाचे का ठरविले, हे बाबासाहेब पटवर्धनांच्या लेखावरून व वरील विवेचनावरून लक्षात येईल. ते वैदिक धर्माचे व संस्कृतीचे कट्टे अभिमानी होते; परंतु त्यांचा मार्ग हा 'व्यक्ति विशिष्टच' होता. तो धर्म किंवा संस्कृतिसापेक्ष होता असे म्हणता येणार नाही.

चित्ताच्या एकाग्रतेसाठी अन्नत्याग व निद्रात्याग आवश्यक आहेत असे अण्णासाहेबांनी सांगितल्याचे श्री. बाबासाहेब यांनी म्हटलेच आहे. परंतु एवढ्यानेच भागत नाही. अण्णासाहेबांनी "तसेच जवळ असलेल्या धनाचा आणि उपभोगांचा पूर्ण त्याग केल्याशिवाय चित्तशुद्धि अशक्य.* परोपकाररूप सेवा ही साधकानेच नव्हे तर त्या स्थितीच्या पलीकडे गेलेल्या पुरुषानेही केली पाहिजे" असेही सांगून ठेविले आहे. श्री. बाबासाहेब यांनी अण्णासाहेबांच्या मार्गाचा खुलासा साध्या व सरळ शब्दांत, शुष्क अवडंबर न माजविता केला आहे. गीतेत सांगितलेल्या 'दिव्य पुरुषाच्या' चिंतनासाठी, चित्त दुसरीकडे जाऊ न देता अभ्यासाने स्थिर करावयाचे अर्थात्च ही चित्ताची एकाग्रता तिच्यासाठी अनशन व निद्रात्याग (क्रमशः) आवश्यक तसेच धनाचा व उपभोगाचा पूर्ण त्याग हाही केला पाहिजे.

हे सर्व क्रमशः होत आले म्हणजे गीतेच्या "अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना। परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन्।' ( गीता अध्याय आठवा-अक्षरब्रम्ह योग, श्लोक आठ ) या श्लोकांत सांगितलेली अवस्था प्राप्त होऊन अनुचिंतनाने मनुष्य दिव्य, परम पुरुषपदाला जातो. विनामूल्य निःस्पृह वैद्यकी करावयाचे ठरवून त्यांनी आपल्या आयुष्यास परोपकाराची जोड का दिली हे बाबासाहेबांच्या लेखावरून लक्षात येईल. हा सर्वच मार्ग कसा दुष्कर आहे व 'मनुष्याणां सहस्रेषु' एखाद्यासच कसा सुकर आहे हे वरील विवेचनावरून लक्षात येईल.

सरतेशेवटी ज्याच्या कृपेने हे लहानसे कार्य सिद्धीस गेले त्या मंगलमूर्ति गजाननाच्या अवतार समजल्या जाणाऱ्या श्रीविनायक योगींद्राच्या पुण्यस्मृतीस अभिवादन करून हा प्रस्तावना-लेख संपवितो.

**" पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः**
**स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः।**
**नादन्ति सस्यं खलु वारिवाहाः**
**परोपकाराय सतां विभूतयः ॥ "**

**॥ इति शम् ॥**

**—प्र. के. ठोसर**

---

* धन मिळविणे, त्याचे रक्षण करणे, त्याचा खर्च करणे व उपयोग घेणे.........त्याचा नाश होणे या कामी पुरुषास श्रम, चिंता, भ्रम ही प्राप्त होतात. ( भागवत ११ वा स्कंध )

# श्री महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या आठवणी

## कै. श्री. न. वि. गाडगीळ,

बी. ए., एल्. एल्. बी.

( कांग्रेसचे एक प्रमुख पुढारी. पुण्यांत किंबहुना महाराष्ट्रात कांग्रेसचे वजन वाढविण्यास श्री. गाडगीळ यांचे परिश्रम कारणीभूत झालेले आहेत. केंद्रीय मंत्री, नंतर पंजाबचे राज्यपाल, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे वेळेस यांनी असेंब्लीत व बाहेरही स्पष्टोक्तिपूर्ण वक्तव्ये केली. अव्वल दर्जाचे साहित्यिक. यांनी आपले एक आत्मचरित्रही प्रसिद्ध केले आहे. )

(१) प्रसिद्ध साधुपुरुष अण्णासाहेब पटवर्धन यांस त्यांच्या मरणापूर्वी १०-१२ वर्षे तरी मी पाहिले होते. फुटक्या बुरुजाच्या कोपऱ्यावर त्यांचे घर असे. पण त्यांना जे अधिक पाहिले ते नेहमी सायंकाळी देवदर्शनास जाताना. ते सायंकाळी शनिवारीतील ओंकारेश्वर, बीराचा मारुती, मेहेंदळ्या मारुती, इत्यादि देवांना जात असत. डोक्यावर पगडी, अंगावर उपरणे, हातात छत्री अगर काठी, एकटे अथवा कोणीतरी बरोबर असलेले, असे ते दृष्टीस पडत असत. आमच्या घराशेजारी रहात असलेल्या श्री. भागवतांच्या वृद्ध मातोश्री नेहमी अण्णासाहेबांकडे जात असत. मधूनमधून मीही त्यांच्याकडे जात असे.

(२) १९१५ च्या जून मधील पुढील हकीकत आहे. आमच्या आळीतील श्री. बापूसाहेब गुप्ते यांचा धाकटा भाऊ अतिशय आजारी होता. पुण्यामुंबईचे डॉक्टर येऊन गेले होते, पण गूण वाटत नव्हता; म्हणून मुलाचे चुलते प्रसिद्ध थिऑसॉफिस्ट श्री. तात्यासाहेब गुप्ते यांच्या सांगण्यावरून मी अण्णासाहेबांकडे गेलो. तो शनिवार होता. श्री. अण्णासाहेब यांस सर्व हकीकत सांगताच ते म्हणाले, ' मी सोमवारी ५॥ वाजता येतो, गाडी वगैरे आणू नको. ' त्यांचा लौकिक माहीत असल्याकारणाने, त्यांनी न येणे–आपले येणे लांबणीवर टाकणे– म्हणजे मृत्यूचे निश्चित येणे असेच मनाला वाटले. तथापि त्यांच्यावर श्रद्धा असल्याकारणाने गुप्ते मंडळी त्यांची वाट पहात बसली. सोमवारी ५। वाजता मुलाचा मृत्यू झाला. मी दारांत उभा होतो. बरोबर ५॥ वाजता अण्णासाहेब आले. त्यांनी विचारले, ' कसा काय आहे मुलगा ? ' मी म्हटले ' मुलगा गेला. ' शांत चित्ताने मनातच राम राम असे पुटपुटत ते पुढे गेले.

(३) त्यांच्या मृत्यूच्या आधी सहा सात दिवस त्यांची प्रकृती ठीक नाही असे समजल्यावरून, अक्का भागवतांबरोबर मी त्यांच्या घरी गेलो. ते स्वस्थ पडलेले होते. शेजारच्या खोलीत बाबा, त्यांचे चिरंजीव बसले होते. त्यांना विचारले ' काही औषध वगैरे ? ' त्यांनी उत्तर केले 'औषध तर घेत नाहीतच, पण कालपासून पाणीही घेतले नाही; व गुरुवारी म्हणजे बरोबर सात दिवसांनी त्यांनी सांगून ठेवले आहे की, मी आंघोळ करीन, नरसिंह सरस्वतींना नैवेद्य दाखवीन आणि मग अन्नग्रहण करीन. ' आम्ही दोघे परतलो आणि घरी आल्यावर हा विषय चर्चेत असता एका गृहस्थाने सांगितले की

गुरुवारी सकाळी दक्षिणायन संपते व उत्तरायण लागते,* यावरून असे दिसते की ते त्या दिवशी मृत्यूला परवानगी देतील. गुरुवारी सकाळी ९ वाजता मला अक्कांनी सांगितले की "चला, अण्णासाहेब गेले!" आरामखुर्चीवर त्यांचे शरीर बसवून ठेविले होते. मुद्रा शांत होती. आनंदाची छटा दिसत होती; आणि विशेष म्हणजे डोळे उघडेच होते!

(४) त्यांच्या चरित्रविषयक गोष्टी 'नूतन मराठी'चे श्री. सहस्रबुद्धे यांनी लिहिल्या आहेत.† नव्या पिढीला त्यांचे नांव अज्ञात आहे, पण ओंकारेश्वराजवळ नदीच्या पात्रांत त्यांची समाधी असून, तेच त्यांचे स्मारक आहे.

★ ★

## म. म. दत्तो वामन पोतदार

( कुलगुरु–पुणे विद्यापीठ )

श्री. दत्तो वामन पोतदार, अण्णासाहेबांच्या आठवणीसंबंधात लिहितात. "आपले पत्र पावले. अण्णासाहेबांना मी अगदी लहान-

---

* श्री. अण्णासाहेब, माघ शुद्ध ११ स म्हणजे २ फेब्रुवारी १९१७ रोजी कालवश झाले. मकर संक्रमणकाल १४ जानेवारी असा पंचांगात दिला असला तरी, सूर्य जेव्हा २४ डिसेंबरच्या उत्तररात्री, उत्तरेकडे वळतो तेव्हाच उत्तरायण सुरू होते व ते सामान्यतः १६ जुलैपर्यंत, कर्क राशीत सूर्य प्रवेश करतो तेथपर्यंत असते. फेब्रुवारीच्या १ तारखेला म्हणजेच गुरुवारी लागणारे उत्तरायण या गृहस्थांनी आणले कुठून? हा गृहस्थांचा शोध अपूर्वच म्हटला पाहिजे!

† पुष्कळ शोध करूनही या लिखाणाचा पत्ता लागला नाही.

पणापासून पाहिले आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या कृपाछत्रातच आम्ही सर्व वाढलो आहो."

( श्री. पोतदार यांच्याकडून आठवणी मिळण्याचा योग आला नाही. परंतु त्यांच्या पत्रातील अवतरण चिन्हांकित वाक्य महत्वाचे आहे. )

—संपादक

* *

## डॉ. शंकर दामोदर पेंडसे

( अनेक तत्वज्ञानविषयक ग्रंथांचे लेखक, पंढरपूर येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, सेवानिवृत्त अध्यापक, हिस्लॉप कॉलेज. )

लोकमान्य टिळक श्री. अण्णासाहेब यांना वडील म्हणूनच मानीत असत, त्यामुळे प्रत्येक वर्षी ते न चुकता स्वतःच्या वाढदिवशी अण्णासाहेब यांचे घरी जाऊन, त्यांच्या पायावर डोके ठेवून त्यांचा आशिर्वाद घेत असत.

* *

## कै. श्री. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे

( सीनिअर रँग्लर, फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल. मॉटफर्ड सुधारणांमुळे जी खाती लोकांच्या ताब्यात आली त्यापैकी एका खात्याचे दिवाण, ऑस्ट्रेलियात हाय कमिशनर, शेवटी पूना युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर. लो. टिळकांचे कट्टे विरोधक. मोडी लिपीचे अभिमानी व पुरस्कर्ते. पुण्यातील सुधारक पक्षाचे प्रमुख. जुन्या नेमस्तपक्षाचे पुण्यातील पुढारी. यांस ब्रिटिश सरकारकडून 'सर' हा किताब मिळाला होता. )

कै. अण्णासाहेब पटवर्धन यांची व माझी फारशी ओळख नव्हती..... अर्थात्च त्यांस मी पुष्कळ वेळा सभांमधून पाहिले होते.

त्यांची व माझी भेट एकदाच झालेली मला आठवते. माझ्या आजारी पत्नीला दाखविण्यास तिचे चुलते कै. गोपाळ विनायक जोशी यांजबरोबर मी त्यांच्याकडे गेलो होतो. गोपाळरावांची व त्यांची मैत्री होती असे वाटते. त्यांच्याविषयी मला अधिक काही सांगता येत नाही याबद्दल दिलगीर आहे.*

★ ★

## श्री. गजानन विश्वनाथ केतकर,

बी. ए., एल्. एल्. बी.

( श्री. ग. वि. केतकर महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहेत. ते लो. टिळकांचे दौहित्र होत. काही काळ ते केसरीचे मुख्य संपादक होते. नागपूर येथील 'तरुण भारता'च्या पुणे आवृत्तीचे ते संपादक होते. निरनिराळ्या नियतकालिकांतून त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत.

( १ ) महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांना मी लो. टिळक सुटून आल्यानंतर, पुण्याच्या लकडीपुलाजवळील विठ्ठल मंदिरात झालेल्या शिवाजी उत्सवात पाहिले. सार्वजनिक कार्यांतून ते निवृत्त झाले होते. परंतु लो. टिळकांवर त्यांचा फार लोभ होता व टिळकही त्यांस फार मानीत असत. शिवाजी उत्सवाचे अध्यक्ष म्हणून कार्य-

---

* रँग्लर साहेबांच्या आठवणीत 'आठवण' जवळजवळ नाहीच असे म्हटले तरी चालेल. ही आठवण अशाकरता दिली आहे की काही विशिष्ट मते धारण करणारांवरसुद्धा श्री. अण्णासाहेबांच्या निदानकौशल्याची व औषधयोजनेची कशी छाप पडली होती हे दिसून यावे. या आठवणीचा दुसरा विशेष हा की ती सर्व रँग्लर साहेबांनी सुवाच्य मोडी लिपीत लिहून पाठविली आहे आणि अक्षराचे वळण नमुनेदार आहे.

क्रमास उपस्थित राहण्याचे त्यांनी मान्य केले याचेच लोकांना आश्चर्य वाटले. ते लौकिक व्यवहाराविषयी त्यावेळी जीवनांतून निवृत्त झाले होते. पण बळवंतरावांनी विनंती केली म्हणूनच ते कार्यक्रमास उपस्थित राहिले. लो. टिळकांना त्यांच्या साधुत्वाबद्दल अतिशय आदर होता. त्यांचा आशिर्वाद एखाद्या कार्यारंभी घेणे हे टिळक महत्वाचे समजत असत.

( २ ) त्या शिवाजी उत्सवांत डॉ. पटवर्धन यांचे पहिलेच कीर्तन झाले. रोहिडेश्वरच्या देवळातील* शपथविधीचे आख्यान त्यांनी लावले होते. देवळात बैठक अर्थात्च जुन्या पद्धतीची होती. अण्णासाहेबांची दाढी व केस पांढरे शुभ्र झाले होते आणि शरीरयष्टीही कृश झाली होती अशा वेळी मी त्यांना पाहिले आहे. भोवतालच्या व्यवहारापासून पूर्णपणे अलिप्तता त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. कित्येक वेळा मधून मधून ते डोळे मिटून घेत असत. कीर्तनाकडे त्यांचे फारसे लक्ष दिसले नाही. टिळकांच्या आग्रहावरूनच त्यांचे कीर्तनसमयीचे 'स्थितप्रज्ञ' अध्यक्षत्व लोकांनी मानले. त्यांचे अध्यक्ष म्हणून असणारे अस्तित्वच, कीर्तन, भाषणादि समारंभास पावन करणारे होते असे लोक मानीत होते.

(३) प्रसिद्ध चित्रकार श्री. ओक यांनी अण्णासाहेबांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या टिळकांच्या व्याख्यानाचे मोठे तैलचित्र काढले होते, आणि टिळकांच्या ग्रंथसंग्रहालयाच्या दिवाणखान्यात ते

---

* पुण्यानजीकच्या मावळ प्रांतातील रोहिडखोऱ्यातील एक देऊळ. या देवळातच "इ. स. १६४५ मध्ये रोहिडेश्वरासमोर हिंदवी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा शिवाजीने काही सहकाऱ्यांसह केली" (श्री. वाकसकर संपादित श्रीशिवप्रभूचे चरित्र पृ. ६, टीप)

टांगले होते. टिळकांच्या आवेशयुक्त व्याख्यानाकडे अण्णासाहेब शांतपणे पण कौतुकाने पहात आहेत असे हे चित्र आहे; ते फारच उद्बोधक आहे. टिळकांना आपल्या कार्यात अण्णासाहेबांचा आशिर्वाद मोलाचा वाटे. त्याचप्रमाणे उलट टिळकांवरही अण्णासाहेबांचा पूर्ण विश्वास होता. ते जे जे राजकीय उपक्रम करतील ते ते विचारपूर्ण आणि समर्पक असतील अशी त्यांची खात्री होती.

(४) कै. दादासाहेब खापर्डे यांचा अण्णासाहेबांच्या वैद्यकीवर पूर्ण भरवंसा होता. त्यांच्या चिरंजीवांनी—श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी त्यांचा एक चरित्रलेख 'प्रसाद 'मासिकात प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या आजारी पत्नीला अण्णासाहेबांनी काढा सांगितला, त्याच्या पद्धतीची माहिती दिली आहे. श्री बाबासाहेब यांच्या पत्नीच्या रोगाची परीक्षा मुंबईतील प्रख्यात डॉक्टरांनी केली होती, औषधही सुरू केले होते पण त्यांच्या जीविताविषयी निराशा व्यक्त केली होती. अण्णासाहेबांच्या काढ्यांनी या बाईस सावकाश पण कायमचा गुण येऊन रोग निःशेष झाला.

* *

# श्री. महादेवशास्त्री दिवेकर*

महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचा व माझा साक्षात् परिचय नव्हता. त्यांचे घरी जाऊन मी कधी भेटलो नव्हतो. परंतु श्री. सदुभाऊ बापट, कै. वा. शंकरराव लवाटे, कै. वा. डि. जज्ज. भा. सि.

* श्री. महादेव शास्त्री दिवेकर यांनी किर्लोस्कर मासिकांतून केलेली बुवाबाजीविरुद्ध मोहीम वाचकांस स्मरत असेलच. या दृष्टीने त्यांच्या आठवणींचे महत्व आहे.

दिवेकर, श्री. अप्रबुद्ध इत्यादी श्रेष्ठ अधिकारी व्यक्तींच्या मुखांतून केव्हा केव्हा त्यांचेविषयी फार आदराचे उद्गार कानावर पडले. आळंदी येथे ज्यांनी समाधी घेतली असे थोर सत्पुरुष श्रीनरसिंह सरस्वती त्यांचे ते अनुग्रहीत होते. हे नरसिंहसरस्वती म्हणजे गुरुचरित्रातील नव्हे. इतक्या प्रस्तावनेने आता आठवणी सांगतो:—

(१) रिअर ॲडमिरल भास्करराव सोमण यांचे वडील कै. वा. बाबासाहेब सोमण बेळगावास असता म्हणाले होते (मी १९०५ ते ८ बेळगावास होतो.) अण्णासाहेब हे माणसाच्या परिस्थित्यनुसार प्रत्येक विकारावर साधीसुधी घरगुती औषधे सांगत असत. एकाच्या पायाला इसब झाले असता तो औषधास आला होता. महर्षींनी सांगितले, गाजरें शिजवून दोन चार कढत कढत त्या जागी बांध, नाहीतर बाजरीची भाकरी अगदी उनउन पापडा काढून बांध म्हणजे झाले.

(२) माकड खोकल्याने हैराण झालेल्या मुलीला घेऊन मध्यमवर्गीय एक बाई आल्या. हे वैद्यराज म्हणाले मधुर चक्क्याचे श्रीखंड चांगले केशर घालून ३ दिवस तिला चमचाभर खावयास दे. ३–४ दिवसांत माकड खोकला जाईल. त्याप्रमाणे रोग्यांनी केले व त्यांचे रोग गेले.

**अण्णा व नाना**

(३) अण्णा म्हणजे अण्णासाहेब पटवर्धन व नाना म्हणजे नानासाहेब देशमुख. दोघेही मोठे नामांकित डॉक्टर, सदाचारसंपन्न व थोर गृहस्थ होते. डॉ. नानासाहेब देशमुख हे उंच, धिप्पाड, मोठे भव्य पांढरे पागोटे घालीत असत, तर अण्णासाहेब हे जटा, दाढी,

तांबडे पागोटे, अंगरखा, उपरणे, हातात काठी घेऊन द्रुत गतीने जात असत. अण्णा पुण्यास तर नाना मुंबईस होते. डॉ. नानासाहेब देशमुख हे वरचेवर पुण्यास येत. कै. वा. माधवराव देशमुख, केशवराव देशमुख हे सर्व त्यांच्या नात्यांतीलच होते. एका प्रसंगी नानासाहेब पुण्यास आले असताना त्यांच्या एका समवयस्क मित्राने नानासाहेबांना खालील श्लोकाचा अर्थ विचारला व तो त्यांनी सांगितला. तो श्लोक असा.

न कळतां पद अग्निवरी पडे ।
न करी दाह असें न कधीं घडे ।
अजित नाम वदो भलत्या मिसें ।
सकळ पातक भस्म करीत असे ।।

समवयस्क मित्राने दृष्टान्त कळला पण त्याचे मर्म समजत नाही असे सांगताच नानासाहेब म्हणाले, 'तू तिकडे म्हणजे अण्णाकडे जा. अण्णाला सांग नाना आला आहे व तो या श्लोकाचा अर्थ विचारीत आहे.' त्याप्रमाणे अण्णा सायंकाळी नानांकडे आले त्यांच्या सुखसंवादांत हा विषय निघाला. लक्ष नसले तरी निखाऱ्यावर पाय पडला की चटका बसतो तसेच नामस्मरणाचे आहे. लक्ष नसले तरी सर्वज्ञ ईश्वराचे त्याकडे लक्ष असते. स्तनपान करणारे खेळकर पोर खेळामध्ये तन्मय झाले की तहानभूक विसरते पण त्याची भूक इकडे आईला लागते. "खेळता गुंतले उमगोनि आणि लावूनिया स्तनी दूध पाजे ।" तीच गोष्ट ईश्वराची आहे असे महर्षींनी सांगितल्यावर सर्वांना आनंद झाला. ही आख्यायिका श्रीमंत राजे तात्यासाहेब पटवर्धन यांचे कडून ऐकिली. त्यांनी ती श्रीमंत बाबासाहेब घोरपडे इचलकरंजी यांचे वाडामध्ये वाचली असावी.

**पुण्यांतील दोन सभा**

(१) लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगातून सुटून आल्यावर पहिलीच मोठी सभा गायकवाड वाड्यात त्यांच्या अभिनंदनार्थ झाली. त्या सभेचे अध्यक्षस्थानी महर्षी अण्णासाहेबांचे नांव कै. वा. लवाटे यांनी सुचविले. ते म्हणाले आजच्या या मंगल व आनंददायक प्रसंगी आपल्यातील पूज्य व श्रेष्ठ सत्पुरुष श्रीअण्णासाहेब पटवर्धन हेच अध्यक्षपदास योग्य आहेत.' ती सभा प्रामुख्यानें टिळकांच्या मुखातून ६ वर्षांनंतर चार अमृततुल्य शब्द ऐकण्याकरताच भरली होती. ते औचित्य जाणून प्रारंभी व शेवटी अगदी मोजक्या अशा शब्दांत उपक्रम व उपसंहाराची भाषणे अण्णासाहेबांनी केली. शेवटी ते म्हणाले 'परमेश्वराच्या कृपेने बळवंतराव आपल्यात आले. मधुमेहासारखा दुर्धर रोग व काळ्या पाण्याची ६॥ वर्षांची शिक्षा ऐकल्याबरोबरच आपण सर्व व्यथित झालो होतो. ईश्वराने त्यांच्यावर, आमच्यावर व राष्ट्रावर कृपा केली, ईश्वर त्यांना आरोग्य व दीर्घायुष्य देवो.'

**दुसरी सभा**

टिळक सुटून आल्यावर राजकारणाची चक्रे जोराने फिरू लागली. राजकीय प्रांतिक परिषदेचे १५ वे अधिवेशन पुण्यास भरावयाचे ठरले. बॅरिस्टर बॅप्टिस्टा अध्यक्ष होते. १०००।८०० प्रतिनिधी आले होते. स्वागताध्यक्ष अण्णासाहेब पटवर्धन यांनी छोटे भाषण करून सर्वांचे स्वागत केले. सभा फार उत्तम तऱ्हेने पार पडली. त्या सभेत सरकारने आयुर्वेदाला उत्तेजन द्यावे अशा आशयाचा एक ठराव होता. तो ठराव मांडताना महर्षी अण्णासाहेब यांनी जवळ जवळ पाऊण तास भाषण केले. त्या भाषणात त्यांनी

ओघप्राप्त म्हणून मुळा हा आयुर्वेदिक दृष्ट्या किती गुणकारक आहे याचे मार्मिक व दीर्घकाल विवेचन केले. या भाषणासंबंधी पुढच्या ठरावावर बोलताना दादासाहेब करंदीकरांनी अण्णासाहेबांच्या भाषणाचा उल्लेख करून आपण कसे देहभान विसरलो होतो वगैरे सांगितले.

महर्षी अण्णासाहेबांच्या या आठवणी पाठविल्या आहेत. त्यामुळे त्या सत्पुरुषाचे मला पुनश्च स्मरण होऊन आनंद वाटला.

* *

## श्री. बाबासाहेब खापर्डे,

अमरावती

[ श्री. बाबासाहेब खापर्डे, यांचा परिचय नव्याने करून देण्याचे कारण नाही. बरीच वर्षे त्यांनी सार्वजनिक कार्य केले आहे. विदर्भ साहित्य संघाचे ते अध्यक्ष होते.

प्रस्तुत आठवण प्रसाद मासिकात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लेखांतून घेतली आहे. सन १९१३-१४ च्या सुमारास त्यांच्या पत्नी सौ. मनुताई यांची, बरेच दिवस ताप येण्याचे निमित्त होऊन, प्रकृती अगदी क्षीण झाली. रोगाचे निदान होईना व प्रकृतीस उतार पडेना. मुंबईस नेऊन डॉ. गोपाळराव देशमुख यांस प्रकृती दाखविली. त्यांनी ' रोगी थोड्याच दिवसांचा सोबती आहे ' असे सांगितले. तेव्हा श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या सल्ल्याने त्यांस पुण्यास नेऊन श्री. अण्णासाहेबांस दाखवावे असे ठरले. श्री. बाबासाहेब, सौ. मनुताई, आपले बंधु आणि इतर परिवार यांसह पुण्यास आले. ]

येथपर्यंतची हकीकत विस्ताराने सांगून बाबासाहेब पुढे लिहितात :--

(१) “ माझे बंधू अण्णासाहेबांकडे गेले. त्यांनी रोग्याची सर्व हकीकत कळविली व हिला पहाण्याकरता आमच्या बंगल्यावर यावे अशी विनंती केली. त्यावर अण्णासाहेब म्हणाले ‘ मी रोगी गुरुवारी पहातो, मधल्या वारी येणार नाही. ’ इकडे पेशंटची स्थिती अशी नाजूक की गुरुवार उजाडतो की नाही याची शंका. गुरुवार अद्याप चांगला चार दिवस दूर होता. माझ्या बंधूंनी परोपरीने सांगून पाहिले पण अण्णासाहेब आपला नियम मोडायला व अपवाद करायला तयार नव्हते. ”

× × ×

“ गुरुवारी रात्री बारा वाजता अण्णासाहेबांनी आत पाय टाकला. अण्णासाहेबांनी हिच्याकडे एकदा नखशिखांत न्याहाळून पाहिले. पोट चापसून हाताने ठिकठिकाणी दाबून पाहिले, क्षणभर स्वस्थ बसले व म्हणाले, ‘ तुला काहीही झाले नाही. लिव्हर वाढले आहे, मरत नाहीस, पथ्य करशील तर जगशील. ’ माझ्या बंधूंना म्हणाले, ‘ उद्या काढा सांगतो. लिहून घ्यायला या. ’ माझे बंधू दुसरे दिवशी अण्णासाहेबांकडे काढा लिहून घ्यायला गेले. दहा वाजता गेले ते चार वाजता परत आले. ते म्हणाले, ‘ अण्णासाहेब चार तास काढ्यांची औषधे सांगत होते.... पांच तासांत ५६ ते ६० औषधांची यादी सांगितली. बहुधा या यादीत आली नाही अशी काष्ठौषधी उरली नाही. ’ हा काढा एका विशिष्ट प्रकारच्या अग्नीवरच शिजवावयाचा होता व दिवसातून तीनदा घ्यावयाचा होता. दुधावर रहायचे, दुसरा आहार घ्यायचा नाही. भात व धान्यान्न अजिबात वर्ज्य सांगितले होते. फळे वर्ज्य नव्हती.

सात महिने अण्णासाहेबांचा हा औषधोपचार चालू होता. .... पुण्याच्या या सात महिन्यांच्या मुक्कामात, हिचा ज्वर हळूहळू

कमी होत गेला व तो निःशेष नाहीसा व्हायला अजमासे पांच महिने लागले."

श्री. खापर्डे पुढे लिहितात :—

"अण्णासाहेब पटवर्धनांच्या काढ्याने काय गुण आला असेल तो येवो; पण ही दुखण्यातून पार पडली याचे श्रेय अण्णासाहेब पटवर्धनांच्या तपश्चर्येला, पुण्याईला व आशीर्वादालाच आहे यात संशय नाही."*

★ ★

# कै. शंकर कृष्ण देवभक्त

[ कै. शंकर कृष्ण देवभक्त हे प्रसंगावशात् लेखन करीत असे दिसते. कैक वर्षांपूर्वी पुण्याच्या 'रत्नाकर' मासिकाने 'बालगंधर्व–विशेषांक' काढला होता. त्यातही बालगंधर्वासंबंधी श्री. देवभक्त यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. पुढील आठवण पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'कुमार' मासिकाच्या मे १९६५ च्या अंकातून घेतली आहे. ]

(१) बिनीवाल्यांच्या वाड्यावरून खाली किंवा शालूकरांच्या बोळातून शनिवार वाड्याकडे जायला वळले की या दोन रस्त्यावरच्या

---

* दुखणे बरे होण्याचे श्रेय ... तपश्चर्येला, पुण्याईला व आशीर्वादालाच मिळाल्यावर, औषधयोजनेत विशेष असे काहीच नव्हते असे अप्रत्यक्षत: ध्वनित होते ! 'अण्णासाहेब यांच्या योजनेत औषधपणा काय आहे ? त्यांच्या कृपेचीच जास्त किंमत' असे म्हणणाऱ्यांत चांगले विद्वान् देखील होते. खापर्डेही 'काढ्याने काय गुण आला असेल तो असो' असेच लिहितात. त्यांच्या लांबलचक औषधी काढ्याबद्दल 'इतकी औषधे सांगितल्यावर काही लागू पडणारच' अशा अर्थाचे उद्गार काढणारे काही लोक होतेच. ( पहा दीक्षितकृत पटवर्धन–चरित्र. )

कोपऱ्यावर जो वाडा लागतो तिथे अण्णासाहेब पटवर्धन रहात असत. 'धन्वंतरी' म्हणून पुण्यातले आणि आसमंतातले सगळे आबालवृद्ध लोक त्यांना ओळखीत. असा होता अण्णासाहेबांचा लौकिक. दर रविवारी आणि गुरुवारी दोन वाजल्यापासून, रात्री बारा साडेबारा वाजेपर्यंत त्यांच्या घरी तळमजल्यावर लोकांची नुसती झुंबड उडत असे. तीत सर्व जातींचे आणि सर्व धर्मांचे लोक असत. अण्णासाहेब रुग्णाईताच्या बाबतीत कधीच भेदभाव करीत नसत. जो जसा येईल त्याने, तसे जाजमावर ठाण मांडायचे. मागाहून येईल त्याने मागल्या ओळीत बसायचे. अण्णासाहेबही पुढच्या ओळीपासून रोगी तपासायला सुरवात करायचे. त्यातही ते कधीच धार्मिक पंथ किंवा सामाजिक विषमता अशी संकुचित वृत्ती दाखवीत नसत. संध्याकाळ झाली की स्त्री-रोग्यांना तपासायला सुरवात करायचे. यावर कोणी तरी तक्रार केलीच, तर त्यांचे समाधान करायला अण्णासाहेबांचे एक ठराविक उत्तर असे. "घरच्या बायकांना दिवे लागायच्या आत परत पाठविल्या नाहीत तर तुम्हा पुरुषांना 'मं मं' कोण घालील?" आणि या बिनतोड उत्तराने तक्रार करणारे लोक चूप बसत. थर्मामीटर आणि स्टेथास्कोप ही आधुनिक उपकरणे अण्णासाहेब कधीच वापरीत नसत. रोग्याची, डोळे मिटून, ते नुसती नाडी पहात. रोगी मधेच काही बोलू लागला आणि स्वतःला काय होतंय् हे सांगू लागला तर अण्णासाहेब मधेच त्याला दटावीत आणि सांगत. 'तुला काय होतंय् ते मी सांगतो, तू मधे बोलू नकोस' असे म्हणून अण्णासाहेब अचूक निदान करायचे. त्यांची औषधयोजना म्हणजे काढे व निकाढे असत. औषध घेण्याचीही मुदत ते सांगून टाकीत. त्या मुदतीच्या आधी जर रोगी आला तर पुन्हा त्याला मुदतीची आठवण करून देत आणि मुदत संपल्यावर त्याला यायला सांगत.

बरा झालेला रोगी किंवा त्याचा नातेवाईक यांपैकी कोणी त्यांच्याकडे बिल विचारायला गेला की त्याची कंबक्ती ओढवलीच म्हणून समजावे. तुला पैसे नासायचेच होते तर गावात डॉक्टर आणि वैद्य गल्लोगल्ली पाट्या लावून बसले आहेत त्यांच्याकडे जायचं होतंस. मी काही दारावर अजून पाटी लावली नाही", अशा तऱ्हेवाईक उत्तराने त्याची संभावना व्हायची. इंजेक्शने तर त्यांना कधीच रुजू नव्हती. आणखी एक गोष्ट त्यांना आवडत नसे. वयाच्या ऐन उमेदीत डोळ्यांवर चढवलेला चष्मा. या चष्म्याला ते उपरोधिकपणे 'ढापणे' असे म्हणत. एका ऐन उमेदीत असलेल्या माणसाला, त्याला क्षय झाला आहे असे निदान करून एका नामांकित डॉक्टरने बरी-चशी इंजक्शने दिली. गुण येईना म्हणून, त्याच्या नातेवाईकांनी अण्णासाहेबांना प्रकृती दाखविली. अण्णासाहेबांना जेव्हा पूर्वीच्या डॉक्टरांचे निदान आणि त्यांनी केलेली योजना समजली तेव्हा हसून त्यांनी विचारले, 'मग थांबला का तो डॉक्टर ? त्याच्याजवळची इंजेक्शने संपली म्हणून की तू कंटाळलास म्हणून? त्या डॉक्टराने सुईवाटे भिनविलेले विष समूळ नाहीसे करायला मला तीन महिने लागतील. मग माझे उपचार मी सुरू करीन." तो रोगी अण्णासाहेबांच्या उपचारांनी खडखडीत बरा झाला.

(२) रविवारी आणि गुरुवारी भरणाऱ्या अण्णासाहेबांच्या दरबारात कोण कोण माणसे येतील याचा काही नेम नसे. सामान्य माणसांच्या घोळक्यांत काही संस्थानिकही असत. सगळ्यांनाच तिथे मुक्तद्वार असे. अंबाल्याहून पुण्याला बदलून आलेला एक मोठा लष्करी अधिकारी एका रविवारी आपली बायको आणि चौदा पंधरा वर्षांची मुलगी घेऊन तिथे आलेला पाहून भोवतालच्या लोकांना आश्चर्यच वाटले. चौदा पंधरा वर्षांची ती मुलगी म्हणजे जरत्कारूची

प्रतिमा होती नुसती. तिला औषधोपचार चालू होते. प्रत्येक डॉक्टराने शस्त्रक्रियेशिवाय मुलगी बरी होणार नाही असे आपले मत दिले होते आणि शस्त्रक्रिया चालू असतानाच ती मुलगी दगावेल असे बापास वाटत होते. म्हणून तो या 'अघोरी' उपायास तयार होत नव्हता. दोन तीन महिने झाल्यावर घरच्याच एका नोकराने भीत भीत तोंड उघडले. "गांव में एक अवलिया हैं, वो खाली दवा देता है, आपकी हरजा न हो तो छोटी बाई को आप एक दिन इनको बताना, मैं आपके साथ आऊंगा और अवलियाका मकान आपकू बताऊंगा" असे त्याने सांगितल्यावर, आणि विशेषतः तो अवलिया फक्त औषध देतो हे ऐकल्यावर, मुलीचा बाप तिथे यायला तयार झाला होता. त्या अवलियाची वाढलेली दाढी, नखें आणि डोक्याला गुंडाळलेले फडके हा विचित्र अवतार पाहून मुलीचा बाप तर सर्दच झाला. त्यातून नाडीवर बोटे ठेवून रोगाचे निदान करण्याची ती पद्धत. परंतु अस्खलित इंग्रजीत जेव्हा अण्णासाहेबांनी Ascariasis (जंत) असे रोगाचे निदान केले तेव्हा तर तो अधिकारी चाटच पडला. काढ्यांच्या औषधांची यादी देऊन तीन महिन्यांनी पुन्हा येण्याबद्दल बजावून अण्णासाहेब इतर रोग्यांकडे वळले. तीन महिने होतात न होतात तोच त्या मुलीला जंत पडायला सुरवात झाली. पंधरा-वीस दिवस हा प्रकार सतत चालू होता. महिन्यादोन महिन्यात ती मुलगी चांगली सुधारली. आणि दोन महिन्यांनी ती एखाद्या बाईसारखी दिसू लागली. तिचा बाप हे सांगायला अण्णासाहेबांकडे आला आणि आणखी औषध विचारू लागला. तेव्हा त्याला उत्तर मिळाले. "दोनच गोष्टी करायच्या आहेत यापुढे. ज्या ज्या डॉक्टरांनी ही मुलगी शस्त्रक्रिया केल्याशिवाय बरी होणार नाही असे सांगितले होते, त्यांना एकदा तिची ठणठणीत प्रकृती

दाखवावयाची आणि शक्य तितक्या लवकर मुलीचे लग्न करावयाचे. जास्त औषध नको.*

(३) अण्णासाहेब रोज रात्री ओंकारेश्वराच्या दर्शनासाठी जायचे. घरातूनच ते अनवाणीच निघायचे. रविवारी आणि गुरुवारी त्यांना रात्री एक दोन देखील वाजत. पण त्यांनी दर्शनाची कधी टाळाटाळ केली नाही. त्यांना कोणी तरी देवदर्शनास अनवाणी जाण्याबद्दल सहज विचारले. त्याला अण्णासाहेबांनी मोठे मासलेवाईक उत्तर दिले. " तू गव्हर्नरला भेटायला घरातून निघताना जरी पायात जोडा घालून जातोस, तरी त्या गव्हर्नरचा मान राखण्यासाठी तुझा जोडा बाहेर काढून ठेवतोस. हा तर सगळ्या विश्वाचा गव्हर्नर, त्याच्या भेटीला तर घरात जोडा काढून ठेवणे शहाणपणाचे नाही काय ? " या बिनतोड युक्तिवादावर कोण काय बोलणार ?

---

* श्री. अण्णासाहेबांच्या चरित्रात ही हकीकत निराळ्या प्रकाराने दिली आहे. एका नऊ वर्षांच्या मुलीच्या ओटीपोटात साधारण लहान नारळाएवढा गोळा होऊन ती अगदी आसन्नमरण झाली होती. पुण्यातील सर्व डॉक्टरांनी Abnormal development of ovaries ( अंडफलकांची भलतीशी वाढ ) असे तिच्या रोगाचे निदान करून ऑपरेशनशिवाय इलाज नाही असे सांगितले. तिची आजी मुलीला घेऊन अण्णासाहेबांकडे आली. अण्णासाहेबांनी, तिच्या रोगाचे निदान 'जंत' असेच केले व औषधयोजना केली. सहा महिन्यांनी मुलीस जंत पडू लागले व नंतर दोन महिन्यांनी ती मुलगी बरी झाली.

श्री. देवभक्त यांच्या 'आठवणी'तील मुलगी चौदा–पंधरा वर्षांची आहे व तिचा बाप 'ऑफिसर' आहे. चरित्रात उल्लेख झालेली मुलगी नऊ वर्षांची असून तिला आजी आहे. कदाचित् दोन निरनिराळ्या जंताच्या 'केसेस' अण्णासाहेबांनी बऱ्या केलेल्या असाव्यात.

(४) पुष्कळ वर्षे झाली या गोष्टीला. ओंकारेश्वराजवळच्या नदीला या वेळी घाट बांधलेला नव्हता. ब्रह्मगिरीबुवांनी वर्गणी जमवून तो घाट बांधण्याचे ठरवले. घाट, देवळासमोरचा नगारखाना आणि देवळाभोवतालच्या ओवऱ्या हे काम झपाट्याने सुरू झाले. पण जमवलेला पैसा संपुष्टात आल्यावर सुरू झालेले कामही संपुष्टात आले. एका रात्री अण्णासाहेबांच्या हे लक्षात आले. ब्रम्हगिरीबुवां-कडून सगळा उलगडा झाल्यावर त्यांनी बुवांना रविवारी दुपारी घरी बोलावले. कशाला बोलावले आपल्याला, पैशासाठी म्हणावे तर अण्णासाहेब कुठून देणार इतके पैसे, या व अशा प्रकारच्या विचारांनी बुवा अस्वस्थ झाले असतानाही ते रविवारी दुपारी अण्णा-साहेबांकडे गेले. तिथे सोलापूरचे मलाप्पा बसाप्पा वारद* हात जोडून उभे होते. बुवा येताच वारदांकडे वळून ते म्हणाले, "अरे वारद, यांच्याबरोबर जा, ओंकारेश्वराचे देऊळ पहा आणि नंतर तुला देव बुद्धी देईल तसे वाग." वारद, बुवांबरोबर देवदर्शनाला गेले, घाटाचे अपुरे पडलेले काम, वर्गणीदारांची यादी वगैरे सर्व गोष्टी त्यांनी नजरेखाली घातल्या आणि एका भल्या मोठ्या रकमेचा आकडा वर्गणीच्या यादीत घालून तेथून निघून गेले. पुढच्या आठवड्यात बुवांच्या हातात रोख रक्कम पडून बंद झालेले काम पुन्हा सुरू झाले.

(५) अण्णासाहेब रोगी बघण्याकरता दुसऱ्याच्या घरी सहसा जात नसत. या त्यांच्या नियमाला काही अपवाद असत, पण ते

---

* श्री. रा. ब. वारद, हे सोलापुरात एक दानशूर गृहस्थ होऊन गेले. ते व्यापारी असून गिरणीवाले होते. सोलापूरचे अनाथालय व संस्कृत पाठशालांचे संस्थापक होते. कित्येक लक्ष रुपये त्यांनी दानधर्मात खर्च केले. वृत्तीने ते राष्ट्रीय होते. सुप्रसिद्ध जुने मासिक 'मनोरंजन' यात त्यांचा परिचय आला होता.

फारच थोडे. लक्ष्मणराव भिडे नावाचे माझ्या वडिलांचे एक स्नेही होते. त्यांना बहुधा यकृताचा विकार झाला असावा. विकार असाध्य झाला होता. बाळशास्त्री लागवणकरांचे औषधोपचार चालू होते. पांच महिने झाले तरी प्रकृतीत काही फरक पडेना, म्हणून अण्णा-साहेबांना घरी आणण्याबद्दल भिड्यांचा माझ्या वडिलांना आग्रह चालला होता. एक दिवस अण्णासाहेब घरी आले. नेहमीच्या रिवाजाप्रमाणे डोळे मिटून आणि नाडीवर बोट ठेवून त्यांनी साधारण पाच दहा मिनिटे रोग्याला तपासले आणि सध्या कोणाचे औषध चालू आहे हे विचारले. लागवणकरांचे नांव ऐकताच ते म्हणाले, " बाळशास्त्री एक नामांकित वैद्य आहे बरं का देवभक्त. " अण्णा-साहेबांना रोगी बरा होण्याची आशा नसली की ते असल्या अवांतर गोष्टीवर बोलत हे माझ्या वडिलांना माहित होते. त्यांनी अण्णा-साहेबांस सांगितले, " अण्णासाहेब, बाळशास्त्री लागवणकरांवर मत देण्यासाठी मी तुम्हास बोलावले नाही. रोगी बरा होईल की नाही हे मला तुमच्याकडून समजले पाहिजे." यावर अण्णासाहेब नुसते हसले. " आज वार कोणता आहे ? " " आज मंगळवार असून तिथी एका-दशी आहे, " असे त्यांच्या प्रश्नास माझ्या वडिलांनी उत्तर दिले. मुद्रा गंभीर करून माझ्या वडिलांना त्यांनी बाजूला बोलावले आणि हलक्या आवाजात म्हणाले, " हे पहा देवभक्त, हा तुझा स्नेही येत्या पूर्णिमेचा चांदोबा पाहात नाही रे, याला माझा नाइलाज आहे. " अण्णासाहेबांच्या वाचासिद्धीचा पूर्ण पडताळा आला. पूर्णिमेच्या दिवशी संध्याकाळी ५॥ वाजता लक्ष्मणरावांनी जगाचा निरोप घेतला !

(६) श्री. अण्णासाहेब यांच्या काढयांच्या याद्या पुष्कळ लोकांनी त्यांच्या पश्चात् प्रसिद्ध केल्या.* पण कोणालाही त्यांचा व्हावा तसा उपयोग झाला नाही. त्यांची किमया त्यांच्याबरोबरच लुप्त झाली असे भाविक लोक अद्यापही म्हणतात.

(७) सगळ्यांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे पानशेत धरणावरची भयानक आपत्ती पुणें शहरावर कोसळली त्यावेळी नदीकाठचे पुणें शहर साफ धुवून निघाले. इतक्या थोर आपत्तीलाही टक्कर देऊन ओंकारेश्वरावरील उभारलेली अण्णासाहेबांची समाधी अभंग राहिली आहे.

* *

---

* पुण्याचे प्रो. दीक्षित यांनी प्रसिद्ध केलेल्या अण्णासाहेबांच्या चरित्रांत त्यांनी निरनिराळ्या रोगांवर सांगितलेले काढ्यांचे पाठ तपशीलवार दिले आहेत. अण्णासाहेबांनी सांगितलेले काढ्यांचे पाठ लुप्त होऊ नयेत म्हणून प्रो. दीक्षितांनी परिश्रमपूर्वक माहिती मिळवून, अनेक काढे या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. या पुस्तकात अण्णासाहेबांचे चरित्र थोडकेसे दिले आहे. काही अवांतर औषधांचीही माहिती या पुस्तकात दिली आहे.

# श्री. गणेश विश्वनाथ बापट

[ श्रीभक्त गणेश विश्वनाथ बापट, " विष्णुप्रसाद " बिल्डिंग, विलेपार्ले, मुंबई, यांची भेट घेऊन श्री. दा. द. कान्हेरे, कांग्रेसनगर, नागपूर यांनी लेखी वृत्तांत कळविला. तो काही प्रश्नोत्तररूपाने आणि काही श्री. बापट यांनी सांगितलेल्या महर्षी श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या आठवणी अशा दोन प्रकाराने दिला आहे. ]

प्रश्न १. आपला व महर्षी अण्णासाहेब यांचा परिचय कसा झाला व केव्हा ?

-- श्री. अण्णासाहेब व माझे वडील हे गुरुबंधू व मित्र. ते दर दोनचार दिवसांनी आमच्या घरी येत. त्यावेळी त्यांचे जेवणही आमच्या घरी होत असे. मी त्यावेळी पुण्यास शिकत होतो; अण्णासाहेबांचा घरोबा असल्यामुळे माझीही ओळख झाली आणि त्यामुळेच त्यांना पाहण्याचा योग मला आला.

प्रश्न २. श्री. अण्णासाहेबांची व श्री. तात्यांची ( श्री. गणेश विश्वनाथ बापट = तात्या ) राजकीय परिस्थितीबद्दल चर्चा कोणत्या दिशेने होत असे ?

-- याबद्दल मला फारसे आठवत नाही, पण जर विषय निघालाच तर अण्णासाहेब म्हणत " आम्ही इंग्रजीचे शिक्षण घेतले ते इंग्रजांना देशाबाहेर घालविण्यासाठी; येथे स्थायिक होण्यास त्यांना सहाय्य व्हावे म्हणून नव्हे. " याला ते कचविद्या अगर मंडणमिश्र विद्या म्हणत.

प्रश्न ३. या चर्चेत श्री. अण्णासाहेब यांनी केलेल्या राजकीय उलाढालींचा उल्लेख येत असे काय ?

— माझ्या आठवणीप्रमाणे फारसा उल्लेख नसे. कारण आमचा घरोबा अण्णासाहेबांनी श्रीमहाराजांचे शिष्यत्व पत्करल्यानंतर वाढला. शिष्यत्व पत्करल्यावर श्री. अण्णासाहेब राजकारणात फारसा रस घेत नसत, तर त्यांचा ओढा अध्यात्माकडे अधिक असे.

प्रश्न ४. मद्रासहून परत आल्यानंतर, राजकीय चळवळीतून निवृत्त झाल्यासारखे जे धोरण त्यांनी स्वीकारले ते निराश झाल्यामुळे की काय ?

—मला तसे वाटत नाही. कारण निराशा ही गोष्टच अण्णासाहेबांना माहीत नव्हती. पण त्यांचे लक्ष राजकारण या गोष्टीवरून कमी होऊन श्रीमहाराजांच्या सहवासामुळे अध्यात्माकडे वळले.

प्रश्न ५. तत्कालीन राजकीय चळवळीत त्यांना स्वारस्य वाटत होते की नाही ?

—माझ्या आठवणीप्रमाणे चर्चा होत असे, पण त्यात अण्णासाहेब फारसा रस घेत नसत.

प्रश्न ६. त्यांनी केलेल्या वऱ्हाडच्या कारस्थानाचा उल्लेख किंवा हकीकत या चर्चेत येत असे काय ?

—मला स्मरत नाही; नीट सांगता येणार नाही.

प्रश्न ७. श्रीनरसिंहसरस्वती स्वामींच्या समाधीच्या वेळेस अण्णांनी पुण्यास प्रयाण केले ते हेतुपुरःसर होते किंवा कसे ?

—हे प्रयाण हेतुपुरःसर नव्हते, तर श्रीमहाराजांनी तसा बनाव ( प्लॅन ) निर्माण केला. त्याप्रमाणे श्रीअण्णासाहेबांना घरून

एकाएकी बोलावणे आले. त्यात त्यांचे जवळचे नातेवाईक माणूस अत्यंत आजारी आहे असा निरोप होता. तेव्हा श्रीमहाराजांनीच त्यांना जाण्याची आज्ञा केली व म्हणूनच ते गेले.

श्रीनरसिंहसरस्वती महाराजांना माहीत होते की अण्णासाहेब योगी व ज्ञानी आहेत. प्रयाणाबाबत इतर शिष्यमंडळींनी चौकशी करता श्रीमहाराज म्हणाले, " जर ते समाधी घेण्याच्या वेळी राहिले तर ते आपल्या ठरविलेल्या वेळी आपणास समाधीत नेऊ देणार नाहीत. यासाठी " घरची मंडळी आजारी आहेत, तर ताबडतोब निघून या " असा ( मायेने ) त्यांना पुण्याहून निरोप येईल असे केले.*

प्रश्न ८. श्रीअण्णासाहेबांची दिनचर्या आपणास आठवते काय ?

—अण्णासाहेब फार पहाटे उठत, उठल्यानंतर त्यांचा अभ्यास चाले; तोंडाने स्तोत्रे वगैरे म्हणत ते सकाळचे सर्व आन्हिक उरकीत. नंतर ७-८ चे दरम्यान त्यांच्या बैठकीत येत, प्रथम ते पक्षकारांना अपिले लिहून देत, ते स्वतः कोर्टात जात नसत, तर सल्ला व अपिले लिहून देणे, अशी कामे करीत; ही कामे संपल्यानंतर प्रथम रोग्यांकडे लक्ष पुरवीत, स्त्रीरोगी संपल्यानंतर पुरुषमंडळींना तपाशीत, यावेळपर्यंत बहुधा बारा वाजून जात. नंतर देवदर्शनास निघत, हा कार्यक्रम ४ ते ५ पर्यंत चाले. नंतर खाणे (जेवण असे नसे; गूळ दाणे हा प्रसाद व हेच जेवण ) व सायंकाळचा धार्मिक कार्यक्रम. रात्री काही मित्रमंडळींबरोबर परत देवदर्शन १२ तें १ वाजेपर्यंत चाले. कधी कधी दोन तीनही वाजत. नंतर झोप. ते दोन गुड-

* मागे एकदा श्री. आठवले यांनी श्रीमहाराजांची समाधी भंग केली होती, तसा प्रसंग न यावा हीच इच्छा.

घ्यांत डोके घालून व अंगावर धोतर घेऊन बसल्याबसल्याच झोपत. ही झोप २॥ ते ३ तास असे.

प्रश्न ९. औषधे सांगताना, सगळे रोगी तपासून एकदमच सगळ्यांची औषधे सांगत, की प्रत्येक रोग्याची पृथक्‌पणे सांगत असत?

—प्रत्येकाची वेगवेगळी तपासणी करून वेगवेगळी औषधे सांगत; ते काढे लिहून देत; स्वतः औषध देत नसत. त्यांची नाडी-परीक्षा अप्रतिम होती.

मी स्वतः औषधे लिहून देत असे, औषधे लिहिणे त्यामागे परमेश्वरी अधिष्ठान लागते, असे ते म्हणत.

प्रश्न १०. काढयात घालायला निर्माल्यातलेच बेलपत्र सांगत असत काय?

—होय, ते काढे लिहून दिल्यावर सांगत. "आपल्या आराध्य-देवतेची पूजा करा व निर्माल्यातील तुळस, बेलपत्रे काढयात टाका. साळीच्या लाह्या व लाह्यांचे पीठ हेच फक्त खाण्यास सांगत. विषमज्वरावर सोने उकळवून पाणी देत. (घेण्यास सांगत)

प्रश्न ११. देवदर्शनाच्या वेळा ठरलेल्या होत्या काय?

—"टाईम" या अर्थी वेळ ठरलेली नव्हती, पण दुपारी सर्व काम आटोपल्यावर व रात्रीही सर्व कार्यक्रम आटोपल्यावर ते देव-दर्शनास निघत. रोज एकवीस गणपतींचे दर्शन घ्यायचे असा त्यांचा परिपाठ असे.

प्रश्न १२. त्यांनी काही योगाभ्यास केला असल्याचा उल्लेख त्यांच्या भाषणात येत असे काय?

— असा अस्पष्ट उल्लेख येत असे; पण त्याबाबत ते काही स्पष्ट बोलत नसत. मात्र त्यांचा योगाचा अभ्यास दांडगा होता; ते श्रेष्ठ प्रतीचे योगी होते.

[ श्री. बापट यांनी स्वतःच्या मुखाने सांगितले ते वर दिले आहे. श्रीभक्त गणेश विश्वनाथ बापट हे आज वयोवृद्ध म्हणजे ८५ चे वर वय असलेले असे गृहस्थ आहेत. त्यांची पत्नी अजून हयात आहे आणि त्यांचे सेवेतच असते. त्यांना ऐकू कमी येते म्हणून त्यांच्या सौभाग्यवतीने सुचविल्या-प्रमाणे एक नळी घेऊन त्यांच्याशी बोलावे लागले. शिवाय श्रीमहाराज नरसिंहसरस्वती, त्यांचे स्वतःचे वडील श्रीभक्त विश्वनाथपंत आणि श्री. अण्णा-साहेब पटवर्धन अशा तिघांच्याही स्मृति होऊन ते आठवणी सांगत असल्यामुळे सांगता सांगता आनंदाश्रूंचा उद्रेक होत असे. त्यामुळे त्यांच्या पत्नी मधून मधून थांबावयास सांगत. आनंदाश्रूंचा उद्रेक कमी झाल्यावर पुन्हा प्रवाह सुरू होत असे. प्रश्नांची उत्तरे सांगता सांगता त्या ओघातच इतर माहिती आणि अण्णासाहेबांच्या आठवणी निघत, त्याचा विस्तार होत असे. अशा तऱ्हेने मिळालेली माहिती निराळी अशी संकलन करून खाली देतो.

इसवी सन १९०० च्या नंतर (अंदाजे) ते पुण्यास कॉलेज शिक्षणा-करिता आले. त्या नंतरचे प्रसंग आणि आठवणी त्यांच्या स्वतःच्या. परंतु काही प्रसंग आणि आठवणी श्रीभक्त विश्वनाथपंत ( त्यांचे वडील ) यांच्या तोंडून ऐकलेल्या अशाही आहेत. काही ठिकाणी त्या सांगताना त्यांचा अनुक्रमही पाळला गेला नाही. परंतु ओघात आल्या तशाच त्या दिल्या आहेत. परंतु वाचकास ते समजू शकते. ]

## १. श्री. माधव महाराजांची गादीवर निवड

श्री. शंकर महाराज वारल्यानंतर गादीवर कोणी यावे अशी चर्चा सुरू झाली. श्रीअण्णासाहेबांचे म्हणणे, माझ्या वडिलांनी—तात्यासाहेबांनी,—गादीवर बसावे. ( त्यावेळी माझ्या वडिलांनी पेन्शन

घेतले होते ) पण माझे वडील म्हणाले, " अण्णासाहेब महाराजांची इच्छा तरुण इसमाने गादीवर बसावे अशी होती; त्या दृष्टीने मी गादीला योग्य नाही. " यावेळी माधव महाराज हे तरुण होते व ते अण्णासाहेबांच्या जवळ होते. या चर्चेत अखेर असे ठरले की ज्याला दृष्टांत होईल, त्याने गादीवर बसावे. त्याप्रमाणे दृष्टांत झाल्यावर माधव महाराज गादीवर बसले.

## २. श्रीअण्णासाहेब यांचा योगाभ्यास :

### महाराज आपले तेज देतात

श्रीनरसिंहसरस्वती महाराज पुण्यास आले म्हणजे रायरीकर बागेत ( श्रीभक्त तात्यासाहेब रायरीकर, यांनीच अण्णासाहेबांची व श्रीमहाराजांची ओळख करून दिली ) ओंकारेश्वराजवळ राहत असत; त्यांचेजवळ अण्णासाहेब रात्री योगाभ्यास शिकत.

श्रीनरसिंहसरस्वती महाराज आळंदीस वास्तव्य करू लागल्यावर त्यांनी श्रीविठ्ठलमंदिर बांधले. (त्या श्रीविठ्ठलमंदिरातच त्यांची समाधी आहे) त्याचे पुजारी लक्ष्मणबुवा गांधी. त्यांना मुलगा नव्हता. त्यांचा पुतण्या श्रीपादबुवा गांधी॰ याचे मुंजीचे वेळी पंगत चालली असताना अण्णासाहेब बाहेर जाण्यास निघाले, परंतु श्रीमहाराजांनी त्यांस

* हल्लीचे पुजारी अण्णा गांधी यांचे श्रीपादबोवा गांधी हे वडील. ते दोन तीन वर्षांपूर्वी वारले. त्यावेळी त्यांचे वय अंदाजे ९० । ९५ होते. म्हणजे त्यांचा जन्म १८७० च्या सुमारास झाला असावा. मुंजीचे वय आठ वर्षाचे धरल्यास १८७८ या वर्षी मुंज झाली असावी. त्यावेळी अण्णासाहेब ३० । ३२ वर्षांचे. त्यावेळी शक्तिपात करून श्रीमहाराजांनी आपले तेज त्यांस दिले. अण्णासाहेब मद्रासेस १२–१०–१८८० रोजी गेले. म्हणजे त्यापूर्वी ही गोष्ट घडली असे दिसते.

परत बोलाविले आणि एकीकडे खोलीत नेले. तेथे उभयतांचा बराच वेळ एकांत झाला. या एकांतानंतर अण्णासाहेब खोलीबाहेर पडले ते अत्यंत तेजःपुंज असेच बाहेर पडले. शिष्यावर अनुग्रह करावयाचा म्हणजे गुरू तो अनेक प्रकारांनी करतात. अण्णासाहेबांची योग्यता महाराज जाणून होते. त्यांनी साक्षात् आपले तेजच त्यांच्या ठायी प्रविष्ट केले. अर्थातच हे तेज समाविष्ट करून घेण्याची पात्रता येण्यास श्रीअण्णासाहेबांचा अगोदरच बराचसा योगाभ्यास झाला असला पाहिजे. ही घटना अण्णासाहेब काही राजकारणानिमित्त १८८० मध्ये मद्रासेला जाण्यापूर्वी झालेली आहे. मद्रासला जाणे हे अपरिहार्य व प्रसंगप्राप्तच होते. वस्तुतः त्यांची अध्यात्मिक तयारी श्रीमहाराजांनी अगोदरच करून दिली होती.

## ३. अण्णासाहेब कोर्टात गेले ?

एकदा गणेश उत्सवात हिंदूमुसलमानांचा दंगा झाला. त्यात १७।१८ इसम पकडले गेले. यावेळी आरोपीतर्फे स्वतः अण्णासाहेब कोर्टात उभे राहिले* व सर्वांची निर्दोष सुटका झाली. त्यांच्या तर्फे उभे राहण्यापूर्वी अट अशी होती की त्या सर्वांची सुटका होताच सर्वांनी महाराजांचे दर्शन घेऊन, एकवीस गणपतींचे दर्शन करावे. त्याप्रमाणे सर्वांनी केले.

## ४. द्रव्याचा निरभिलाष

एकदा एक पार्शी कुटुंब अण्णासाहेबांकडे औषधोपचारार्थ आले. पार्शी गृहस्थाचा मुलगा काविळीने अत्यंत पीडित झाला होता.

---

* अण्णासाहेब कोर्टात जात नसत. परंतु प्रसंगाचे महत्त्व लक्षात घेऊन ते आरोपीतर्फे उभे राहिले असावे.

अंगातले कपडेही पिवळे पडण्याइतका तो रोगग्रस्त झाला होता. सर्व डॉक्टर, वैद्य, हकीम यांनी त्या रोग्यावर उपचार करूनही मुलास गुण आला नाही. इतर डॉक्टर–वद्यांचे उपाय थकले म्हणजे मगच अण्णासाहेबांकडे यावयाचे असा जणू काय धाराच ठरून गेला होता. त्याप्रमाणे हे कुटुंब अण्णासाहेबांकडे आले. अण्णासाहेबांनी मुलास तपासून औषधे लिहून दिली आणि पथ्यपाणीही सांगितले. काही दिवसांनी तो मुलगा खडखडीत बरा झाला. त्यानंतर ते पार्शी कुटुंब अण्णासाहेबांस त्यांची फी द्यावयास आले. रोग्याकडून एक छदामही घ्यावयाचा नाही हा अण्णासाहेबांचा नियम त्यांस ठाऊक नसावा. अण्णासाहेबांनी अर्थात्च औषधाचे पैसे घेतले नाहीत. तेव्हा त्या पार्शी गृहस्थाने कोणाच्या नकळत बैठकीखाली नोटांचे पुडके ठेविले व तो निघून गेला. सायंकाळी झाडण्याचे वेळी सतरंजी उचलली असता ते पुडके सरदार ( एक भक्त ) याच्या दृष्टीस पडले. त्याने ते पुडके अण्णासाहेबांस नेऊन दिले. त्या पार्शी गृहस्थानेच हे पुडके ठेविले असावे असे थोड्या विचारांती त्यांच्या लक्षात आले. मग त्यांनी ते पुडके त्याक्षणीच पार्श्याकडे परत पाठविले. त्यांना द्रव्याचा अभिलाष नव्हता, परंतु स्वतःच्या सुखाचाही नव्हता. ‘ स्वसुखनिरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः ’ हे वचन त्यांना समर्पक लागू पडते.

## ५. विद्यार्थ्याची पोटदुखी बरी केली

डेक्कन कॉलेजातील एक विद्यार्थी पोटदुखीने अत्यंत त्रस्त झाला. काही खाल्ले तरी पोटात दुखू लागे. त्याने बरेच औषधोपचार केले पण पोटदुखी थांबेना. अखेर तो अण्णासाहेबांकडे आला. अण्णासाहेबांनी त्याची तपासणी केली आणि त्याच्या चिकित्सेचा विचार करू लागले. त्यावेळेस मी जवळ होतो. मी विचारले, “ काय

दुखणे आहे व औषध काय सांगणार ?" त्यावेळी अण्णासाहेब म्हणाले, "आता मी याचा रोग पकडतो." त्याप्रमाणे त्यांनी त्या विद्यार्थ्यास रोज एकच पदार्थ खाण्यास सांगितले. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की या विद्यार्थ्याने तुरीची डाळ खाल्ली की त्याचे पोट दुखत असे. त्यांनी जेवणातून तुरीची डाळ वर्ज्य करण्याचा त्यास सल्ला दिला. या उपायाने त्याची पोटदुखी बरी झाली.

### ६. सुजलेल्या पायावरती उपाय

माझ्या वडिलांचे अनंतराव जोशी नावाचे मित्र होते. त्यांच्या पुतण्याचा पाय एकदम सुजला. त्यावर त्यांनी इतर डॉक्टर–वैद्यांकडून औषधे व उपचार करून पाहिले, परंतु पायाची सूज कमी झाली नाही. त्यानंतर अनंतराव आपल्या पुतण्याला घेऊन माझे वडिलांकडे आले व त्यांच्या बरोबर अण्णासाहेबांकडे पाय दाखविण्यासाठी गेले. पाय तपासल्यावर अण्णासाहेबांनी पुढीलप्रमाणे उपाय सुचविला. एका भांड्यात पाय ठेऊन मीठ ओतावयाचे व त्यात खायचे तेल टाकायचे. ही क्रिया पायाला कळ लागेपर्यंतच करावयाची आणि नंतर पाय मोकळा करून घ्यावयाचा. या उपायामुळे चार सहा दिवसातच गुडघा वगळून इतर भागावरील सूज उतरली. नंतर गुडघ्याची सूज उतरण्यासाठी काही औषधे लिहून दिली आणि त्या औषधीपासून तेल तयार करून त्याचे गुडघ्यास मर्दन करावयास सांगितले. या उपायाने गुडघ्याची सूजही उतरली. ही सूज पायातील दोषामुळे निर्माण झाली असे ते म्हणाले.

### ७. अण्णासाहेबांच्या औषधाने गुण येण्याचे रहस्य

इतर डॉक्टरांकडून औषधोपचार करून थकल्यानंतर आणि रोगी जर्जर झाला की मगच अण्णासाहेबांकडे यावयाचे आणि त्यांच्या

प्रसंगविशेषी साध्यासुध्या औषधानेही गुण यावयाचा याचे अनेकांस गूढ वाटे. परंतु एका प्रसंगी खुद्द अण्णासाहेबांनीच ह्याचा खुलासा केला. एक आयुर्वेद विषयाचा विद्यार्थी रोज अण्णासाहेबांकडे येत असे. तो अण्णासाहेबांनी लिहून दिलेली औषधे व काढे लिहून घेत असे. अण्णासाहेबांच्या लक्षात ही गोष्ट येताच, त्यांनी त्याला जवळ बोलाविले व सांगितले, " मी औषधे सांगतो हे खरे पण त्या नुसत्या औषधानेच गुण येत नाही. त्या औषधामागे माझी तपश्चर्या व भक्ति असते, त्यामुळे गुण येतो. मी औषधाचे पैसे घेत नाही आणि ही निरभिलाष वृत्ति इतर तपस्येबरोबरच त्या रोग्याच्या पाठीशी उभी असते, त्यामुळेच गुण येतो. कोणत्याही गोष्टीत परमेश्वराचे अधिष्ठान पाहिजे."

### ८. देवाचे दर्शन घेत असतानाही रोग्यांची गर्दी

अण्णासाहेबांची भेट होणे कठीण पडे म्हणून पुष्कळ रोगी त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसत व ते ज्या गणपतीचे दर्शन घेत असत त्याठिकाणी आपले दुःख अण्णासाहेबांना सांगत असत. अण्णासाहेबही रोगाची नीट चौकशी करून तेथेच त्यांना औषधे लिहून देत असत. पुष्कळ वेळा दर्शनाला जाताना त्यांचेबरोबर मी असे. मी बरोबर असलो की औषधे लिहून देण्याचे काम मलाच करावे लागे. अण्णासाहेबांचे चालणे फारच जलद असे, इतके की मला तर त्यांच्याबरोबर चालताना मधूनमधून धावावेच लागे. पुण्यातील माळीलोक अण्णासाहेबांना रस्त्यातच गाठीत आणि त्यांना आपली दुःखे सांगून फुले हार, वगैरे स्वीकारण्याचा आग्रह करीत. परंतु अण्णासाहेब त्यांचा स्वीकार करीत नसत. उलट त्या फुलमाळ्याला सांगत, तुमचा आग्रहच असेल तर आमच्या महा-

राजांना ("श्रीनरसिंह सरस्वती स्वामी") फुले आणि हार नेऊन द्या.

## ९. स्थितप्रज्ञता

एकदा एक गृहस्थ (माझ्या वडिलांचे मित्र) त्यांच्याकडे आले व अण्णासाहेबांची भेट घेण्याबद्दल विचारू लागले. त्यांचा मुलगा मुदतीच्या तापाने आजारी होता, त्याला अण्णासाहेबांकडून औषधपाणी करावे हा हेतू होता. परंतु याच वेळेस अण्णासाहेबांची मुलगी वारल्यामुळे वडिलांना त्यांच्या घरून बोलावणे आले होते. अर्थात्च वडील विचारात पडले व मित्राला म्हणाले, "अण्णांची मुलगी वारल्याचा निरोप आताच आला आहे. मी त्यांच्याकडेच निघालो आहे. मग कसे? तरीपण, चल माझ्याबरोबर. पाहू काय करावयाचे ते." अण्णासाहेबांकडे गेल्यानंतर सांत्वनपर गोष्टी झाल्या. नंतर अण्णासाहेबांनी माझ्या वडिलांच्या मित्राची विचारपूस केली. तेव्हा माझ्या वडिलांनी ते कसे आले व त्यांचे काय काम आहे ते सांगितले. पण ही वेळ नाही असेही त्यांना सांगितले आहे असे स्पष्ट केले. त्यावेळी अण्णासाहेब म्हणाले, "त्यात कसली आली आहे वेळ! आपण आता सर्व मिळून घाटावर जाऊ. तेथील धार्मिक विधी उरकल्यानंतर शांतपणे त्यांच्याशी (माझ्या वडिलांच्या मित्राशी) बोलू. अहो घाटावरील शांतता ही फार चांगली असते. आता काय, मुलगी तर गेली, तिचा व आमचा ऋणानुबंध तेवढाच. अंक संपला की पडदा पडतो. संपला ऋणानुबंध." धार्मिक विधी आटोपल्यानंतर त्यांनी वडिलांच्या मित्राजवळ मुलाच्या प्रकृतीची नीट चौकशी केली व तेथेच काढा लिहून देऊन पथ्य-पाणीही समजावून दिले. पथ्यामध्ये त्यांचा साळीच्या लाह्यांवर आणि

लाह्यांच्या पिठाच्या पाण्यावर भर असे. औषधाबरोबरच पथ्य संभाळण्याचा त्यांचा अतिशय आग्रह असे. स्वतःची मुलगी वारली असतानाही ज्या पुरुषाची बुद्धी दुसऱ्याचे दुःख समजावून घेऊन त्यावर उपाय सांगण्याइतकी स्थिर राहिली त्या बुद्धीसच स्थितप्रज्ञा हेच नाव द्यावे लागेल.

" दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ "

अशा स्थितप्रज्ञ कोटीतील अण्णासाहेब होते आणि त्यांच्यासारखे दैवी संपदेचे पुरुष प्रायः तसेच आढळून येतात.

## १०. " श्रीमहाराजांची पालखी उचलायला भोई कशाला ? "

आळंदीला प्रत्येक पौर्णिमेस श्रीमहाराजांची पालखी निघत असे. ती पालखी उचलण्याचे काम भोई करीत असत. एकदा काही कारणामुळे पालखीचे भोई हटून बसले. पालखी उचलण्यास येईनात. काही वेळ वाट पाहून अण्णासाहेब सर्व गुरुबंधूंना व भक्त मंडळीस उद्देशून म्हणाले, " आपण एवढे शिष्य असताना भोई कशाला ? आता मी नावे सांगतो त्यांनी पालखी उचलावी. " पालखी जड होती, ती उचलण्यास सहा माणसे सहज लागत असत. अण्णासाहेबांनी स्वतः सकट सहा जणांची नांवे सुचविली, त्यात माझ्या वडिलांचेही नाव होतेच. तेव्हापासून शिष्यमंडळीच ( मागे तीन व पुढे तीन ) पालखी उचलू लागले.

## ११. " पाय आपले काम करतो "

एका गुरुवारी श्रीमहाराजांची पालखी निघाली. पायास झालेल्या दुखापतीमुळे अण्णासाहेब लंगडत चालत होते. ते लक्षात

येताच इतर भक्त म्हणाले; "आपण विश्रांती घ्यावी, पालखीला खांदा देऊ नये, आम्ही पालखीला खांदा देतो." परंतु अण्णासाहेबांनी उत्तर दिले, "पाय दुखतो तर दुखू द्या, त्याचे काम तो करतो, माझे काम मी करीन," असे म्हणून त्यांनी शेवटपर्यंत पालखीला खांदा दिलाच.

★ ★

## श्री. घनश्याम लक्ष्मीदास गुजराती,

नंदुरबार

[ श्री. घ. ल. गुजराती हे नंदुरबार येथे वकिली करतात. श्री. अण्णासाहेब व त्यांचा घनिष्ठ संबंध आलेला असून, प्लेगच्या तावडीत सापडलेल्या त्यांच्या जामातासाठी अण्णासाहेबांनी केवढे दिव्य केले याची हृदयस्पर्शी हकीकत त्यांच्या आठवणीत दिलेली आहे. त्यांच्या इतर आठवणींवरूनही जसा त्यांचा दृढ भक्तिभाव सिद्ध होतो तद्वतच अण्णासाहेबांचे अलौकिकत्व प्रत्ययास येते. ]

( १ ) आमचे एक बंधु श्री. हरिकिसन भाई यांस सौ. उत्तमबाई नावाची वडील मुलगी आहे. हिचे लग्न सन १९१६ मध्ये श्री. शंकरलाल किसनदास भारतीया यांच्याबरोबर झाले. श्रीपद्मनाभ स्वामींच्या पुण्यतिथीस, श्री. अण्णासाहेब धुळ्यास आले असताना, श्री. भारतीयाही उत्तमबाईबरोबर विवाह ठरविण्यास अण्णासाहेबांच्या अनुज्ञेने आले होते; आणि त्यांच्याच अनुज्ञेने श्री. भारतीया यांचा विवाह उत्तमबाईबरोबर झाला. नंतर आमच्या बंधूंनी या पतिपत्नीस, श्रीनृसिंहसरस्वती महाराजांच्या पुण्यतिथीचे वेळी श्रींच्या दर्शनार्थ, स्वतः बरोबर आळंदीस नेले. श्री हरिकिसनभाई व मी, श्री अण्णासाहेब व

श्री. गयाताई यांच्या आज्ञेप्रमाणे प्रतिवर्षी श्रींचे पुण्यतिथीस जात होतो. सदर पतिपत्नीस १९१७ चे जानेवारी महिन्यात आम्ही प्रथमच श्रीच्या दर्शनार्थ नेले. श्रीच्या उत्सवाचे समयीच आळंदी-मध्ये प्लेग सुरू झाला. आमच्या जावयासही प्लेगची गाठ आली! श्री. अण्णासाहेब उत्सवास उपस्थित होतेच. श्री. हरिकिसनभाई यांचे कुटुंब व मुलेही त्यांच्या समवेत होती. जावयास प्लेगची गाठ आल्या-मुळे आम्ही सर्व घाबरून गेलो. श्री. अण्णासाहेबांचा सल्ला घेतला; व उत्सवासाठी आलेले एक डॉक्टर श्री. सुंदरलाल नानालाल मोदी–हे प्रतिवर्षी उत्सवास येत असत--यांनी आमच्या जावयास औषध दिले. श्री. अण्णासाहेबांनी आम्हास पुण्याहून चौचाकी गाडी माग-विण्यास सांगितले, त्याप्रमाणे गाडी मागवून, श्रींची प्रक्षाळपूजा झाल्या-वर, गाडीत जावयास बसवून पुण्यास आलो व श्री. अण्णासाहेबांकडेच मुक्काम केला.

(२) श्री. अण्णासाहेबांकडे अशी एक प्रथा होती की श्रींची प्रक्षाळपूजा झाल्यानंतर धुळ्याचे बुवासाहेब, आळंदीचे बुवासाहेब पुण्यास येत व श्री. अण्णासाहेब यांचा सवडीचा दिवस पाहून श्रीमहाराजांस नैवेद्य होत असे. त्याप्रमाणे या वेळेस धुळ्याचे श्री. वासुदेवबुवा रुद्र, आळंदीचे श्री. शंकरबुवा, श्री. माधवराव गोडबोले, श्री. विष्णुपंत उर्फ मामा पाळेकर, त्यांचे बंधु श्री. बाबासाहेब पाळेकर वकील व श्री. वासुदेवबुवा रुद्र यांचे चिरंजीव श्री. पुरुषोत्तमबुवा, ही सर्वच मंडळी पुण्यास, श्री. अण्णासाहेबांकडे आली. श्री. महाराजांचा नैवेद्य श्री. अण्णासाहेब 'आज करू, उद्या करू' असे म्हणत लांबणी-वर टाकीत होते. अर्थातच या सर्व मंडळींचाही अण्णासाहेबांकडील मुक्काम वाढला. वरील मडंळींत श्री. बाबासाहेब पाळेकर आणि पुरुषोत्तमबुवा रुद्र या उभयतांस प्लेगच्या साधारण गाठी आल्या.

त्यांना श्री. डॉ. सुंदरलाल व डॉ. साठे ( नक्की नांव आठवत नाही ) यांनी औषध दिले. श्री. बाबासाहेब पाळेकर आणि श्री. रुद्र यांच्या गाठी फुटून त्यांस आराम वाटू लागला.

( ३ ) परंतु आमच्या जावयाचे दुखणे कमी न होता, ' छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति ' या उक्तीप्रमाणे, त्यांस धनुर्वात झाला. अण्णासाहेब आम्हास धीर देत होतेच व आम्हीही सर्वस्वी त्यांच्यावरच विश्वास ठेवला होता. धनुर्वातामुळे जावईबुवा इतके अनावर होत की, त्यांस धरावयास दोन दोन माणसे लागत. अशा वेळेस, श्री. माधवबुवा व श्री. मामा पाळेकर हे प्लेगच्या रोगास न भिता, आमच्या जावयास आवरून धरीत, हे त्यांचे आम्हांवर महदुपकार आहेत. श्री. अण्णासाहेब यांनी तर कमालच केली. आम्हास ते धीर देत होतेच परंतु तो धीर कोरडा नव्हता. त्यात फार अर्थ होता. त्यांच्या घराच्या माडीवरील भागावर गच्ची आहे, तेथे ते दिवसभर उन्हात उभे राहून आमच्या जावयाकरता श्रीमहाराजांची प्रार्थना करीत असत. अशा रीतीने आमच्या जावयास जीवदान देऊन त्यांनी मात्र माघ शुद्ध ११ स आपला देह श्रीच्या चरणी अर्पण केला ! दोन दिवस प्रकृति बरोबर नाही म्हणून लिंबाचा पाला सर्वांगावर टाकण्यास सांगितले आणि स्वतःचे आयुष्य आमच्या जावयास देऊन आपण परधामी निघून गेले ! असो. आमचे जावई बरे झाले. अण्णासाहेबांच्या निर्याणानंतर दुसरीकडे राहून धुळ्यास परत गेले. श्री. महाराजांस अण्णासाहेबांच्या घरी होणारा नैवेद्य झालाच नाही व नैवेद्याकरता आलेल्या मंडळीस अण्णासाहेबांच्या निर्याणयात्रेस जावे

लागले ! ( ही गोष्ट श्री. मामा पाळेकर यांस माहीत आहे. त्यांनी ती त्यांचे चरित्रात कां घातली नाही, ते त्यांसच माहीत ! )*

(४) अण्णासाहेबांचे निर्याण माघ शुद्ध एकादशीस झाले. ही ब्रातमी लगेच पुणें शहर व आळंदी येथे वाऱ्याप्रमाणे पसरली. पुणें शहरातील दुकाने बंद झाली व सर्व शहर सुनेसुने दिसू लागले. लोकमान्य टिळक, श्री. नातूप्रभृति प्रमुख पुढारी, इतरही बरीच मंडळी आणि नंतर जवळजवळ सर्व शहरच श्री. अण्णासाहेबांच्या दर्शनाकरता जमले. त्यांचे अंत्यदर्शन सर्वांस सुकर व्हावे म्हणून, खालच्या ओसरीत त्यांची मूर्ति बसती केली. दुपारी दोन वाजता पालखीत बसवून त्यांची शवयात्रा निघाली. शहरातील प्रमुख रस्त्यांनी ही शवयात्रा जाऊन सायंकाळी श्रीओंकारेश्वरी गेली. लोकमान्य प्रभृतींची त्यांच्या गुणानुवादपर भाषणे झाल्यावर, चंदनकाष्ठांमध्ये त्यांच्या पार्थिव देहाचे दहन करण्यात आले. केसरी व मराठा पत्रांत श्री. अण्णासाहेबांचे संक्षिप्त चरित्र आले आहे ते अर्थातच वाचनीय आहे.

(५) वर उल्लेख आलेले आमचे जावई व मुलगी आज विद्यमान असून दरवर्षी ती उभयता श्रीचे दर्शनास जातात. आमच्या

---

* श्री. पाळेकरकृत चरित्रात श्री. अण्णासाहेबांच्या आजाराची व निर्याणाची हकीकत अगदी वेगळ्याच रीतीने दिली आहे. श्री. घनश्याम व त्यांचे जावई श्री. भारतीया यांचा नामनिर्देशही नाही. १६३ पानावर प्लेगच्या रोग्यांचा मोघम उल्लेख आहे. या पानावरील दुसऱ्या परिच्छेदात "प्लेगच्या रोग्यांस गाडीत घालून त्यांनी स्वतः पुण्यास आणिले व आपल्या घरीच ठेविले. उत्सवानंतर श्री. अण्णासाहेब यांचेकडे व्हावयाचा प्रसादही अर्थातच लांबून धुळेकर मंडळीचाही मुक्काम लांबला होता. त्यातच प्लेगचे रोगी, त्यांची नातेवाईक मंडळी यांची भर पडून एकच गर्दी उडून गेली होती......"

जावयास तीन मुलगे आणि चार मुली अशी संतति असून दोन मुले विलायतेस जाऊन M. Sc. ( Technology )ची परीक्षा उत्तीर्ण करून आले आहेत. दोघेही मुंबईस मोठ्या कारखान्यात, मोठ्या पगारावर मॅनेजर म्हणून काम करीत आहेत. श्रीचे दर्शनास प्रतिवर्षी ते न चुकता जात असतात.

(६) सन १९०० सालात श्री. अण्णासाहेब हे धुळ्यास श्री. पद्मनाभस्वामींकडे श्री. दत्तजयंतीच्या उत्सवानिमित्त आले असता मला त्यांचे दर्शन झाले व परिचय झाला. सदर साली ते प्रथमच उत्सवानिमित्त आले परंतु पुढे श्री. पद्मनाथस्वामींनी १९०१ चे वैशाख महिन्यात समाधी घेतल्यावर, ते प्रतिवर्षी त्यांच्या पुण्यतिथी-उत्सवानिमित्त धुळ्यास येत असत. हा त्यांचा क्रम सन १९१६ सालापर्यंत अव्याहत चालला होता. यामुळे त्यांचा व माझा परिचय आणखी वाढला. त्यांच्याबरोबर पाच-पंचवीस मंडळी उत्सवाकरता येत असत. त्यांत गवई वगैरे लोकही असत. त्यांच्याबरोबर एक जज्ज आणि दुसरे पंजाब असे टोपण नाव असलेले गृहस्थही येत असत.

( ७ ) श्री. अण्णासाहेब धुळ्यास आले की, लांबलांबूनही अनेक लोक त्यांस आपली प्रकृति दाखविण्याकरता आणि औषधोपचारासाठी येत असत. श्री. अण्णासाहेब आपले आन्हिक वगैरे आटपल्यानंतर रात्री १२ नंतर प्रसाद ग्रहण करीत असत. त्या वेळेस सदर 'जज्ज' 'डाळवांग्याचे वरण' आणि मेथीचे वरण फारच उत्कृष्ट करीत. श्री. अण्णासाहेबांचे पंक्तीस बरेच भक्तजन उपस्थित असत.

( ८ ) श्री. गयाताई म्हणून एक वृद्ध बालविधवा बाई होत्या. ( त्या पूर्वजन्मी ऋषि होत्या असे अण्णासाहेब म्हणत. ) त्या प्रथम

आळंदीस रहात असत. पण पुढे, महाराजांचा उत्सव आटोपल्यावर श्री. अण्णासाहेब त्यांस आपल्या घरी घेऊन जात असत. श्री. अण्णासाहेब त्यांस श्री. नारायणबुवांच्या पुण्यतिथीकरता धुळ्यास नेत असत. आळंदीच्या उत्सवाची वेळ येईपर्यंत त्या धुळ्यास श्री. नारायणबुवांच्या मंदिरात वास्तव्य करीत. साध्वी गयाताई प्रतिदिनी एक शेर दूध आणि वाटीभर लिंबाचा पाला सेवन करीत असत. त्यांचा हाच नित्याचा आहार असे. सन १९२७ साली त्यांचे निर्याण होईपर्यंत हाच त्यांचा आहार असे. श्री. गयाताईंचा मुक्काम धुळ्यास असल्यामुळे मला त्यांच्या सहवासाचा पुष्कळच लाभ होई.

(९) श्री. अण्णासाहेब उत्सवासाठी धुळ्यास येऊ लागल्यामुळे लांबलांबूनही लोक तेथे येत असत. पुणे, मलकापूर, वऱ्हाड, पूर्व व पश्चिम खानदेश मधील लोक उत्सवाचा लाभ घेत असत. सदर उत्सवास आळंदीहून शंकरबुवा, नंतर माधवबुवा गोडबोले नियमितपणे येत असत. श्री. पाळेकरही येत, पण गेली तीन वर्षे मात्र ते आलेले दिसले नाहीत. श्री. अण्णासाहेब धुळ्यास आले की त्यांस श्री नृसिंहसरस्वती स्वामीचे दर्शन* होत असे. महाराज श्रीदत्तजयंतीच्या उत्सवाकरता आणि श्रीपद्मनाभस्वामींच्या उत्सवाकरता येतात असे ते म्हणत. श्रीनृसिंहसरस्वति स्वामी हे, पांझरा नदीच्या काठी एक मोडकळीस आलेले श्रीगणपति मंदिर होते तेथे रहात---उत्सवाचे वेळेस तेथेच त्यांचा मुक्काम असे--आणि म्हणूनच श्री. अण्णासाहेब नेमाने

---

* श्री. अण्णासाहेबांची ज्यांच्यावर नितांत श्रद्धा होती, ते त्यांचे गुरु आळंदीचे नृसिंहसरस्वती स्वामी यांचे निर्याण पौष शुद्ध पौर्णिमा शके १८०७ या दिवशी झाले. निर्याणानंतरही ते उत्सवास येत असत, परंतु फक्त श्री. अण्णासाहेब किंवा श्री. बुवासाहेब यांसच त्यांची उपस्थिति समजत असे.

त्या गणपतीच्या दर्शनार्थ जात आणि तेथून ते व महाराज पंक्तीचे वेळेस मठात येत असत. ते कोणत्या तरी रूपाने येत परंतु त्यांस फक्त अण्णासाहेब व बुवासाहेब ( ते विद्यमान असताना ) हेच ओळखत असत. श्री. अण्णासाहेब यांस मी देवच समजतो आणि त्यांचे सर्वच भक्त त्यांस तसे समजतात. त्यांचा प्रभाव इतका असे की त्यांचा शब्द कोणीही वाया जाऊ देत नसे. त्यांची मूर्ति डोळ्यासमोर असली की त्याची मति पालटून जात असे. असेच एक उदाहरण धुळ्यास घडले.

(१०) धुळ्यास हल्ली जे श्रीनारायणबुवा उर्फ पद्मनाभस्वामींचे मंदिर आहे तेथील सभामंडपाची जागा, उत्तरेकडील धर्मशाळेच्या इमारतीची व त्याजवळ असलेल्या बगीच्याची जागा संस्थानास कशी मिळेल याची सर्वांनाच शंका होती. म्युनिसिपालीटीची ती धर्मशाळा व सरकारी बगीच्याची जागा, तसेच सभामंडपाची जागा मिळविणे त्यावेळी दुरापास्तच वाटत होते. श्री. अण्णासाहेबांच्या सांगण्याप्रमाणे अर्ज वगैरे करून अधिक जागा थोड्या किंमतीस संस्थानास मिळाली. त्यावेळी म्युनिसिपालिटीचे, तसेच सरकारी अधिकारी आणि जागेचे मालक यांनी विनाविरोध आणि एकमताने संस्थानास त्या जागा दिल्या. हा केवळ श्री. अण्णासाहेबांचा प्रभाव. अर्ज करण्याच्या अगोदरच अण्णासाहेबांनी सर्वांस सांगितले होते की आपणास ही जागा मिळणार आहे व येथे महाराजांचा सभामंडप होणार आहे.

( ११ ) पुण्यास इतका प्लेग होता आणि लोकांना इतका त्रास होत होता की त्यामुळे, दरवर्षी आळंदीस उत्सवाकरता जाणाऱ्या बुवासाहेबांस, उत्सवास जावे किंवा कसे, हा मोठा प्रश्न पडला. पुण्यास कसे जावे, गेले तर अगोदरच ( Qurantine ) क्वारंटाईन

मध्ये १०।१० दिवस कसे पडून रहावे ह्याची बुवासाहेबांस व इतर मंडळीस काळजी पडली. त्यांनी श्री. अण्णासाहेबांस विचारता, 'आपण खुशाल यावे, कांही त्रास होणार नाही,' असे त्यांनी कळविले, व स्वतः बुवासाहेबांच्या येण्याच्या वेळेस, त्या ठिकाणी हजर राहून त्यांस आळंदीस रवाना केले.

( १२ ) लोकमान्य टिळकांस श्री. अण्णासाहेबांबद्दल निरतिशय आदर वाटत असे; उलटपक्षी अण्णासाहेबांचाही त्यांच्यावर उत्कट लोभ होता. सन १९१४ साली, मंडालेहून, शिक्षेची मुदत संपल्या-मुळे टिळकांस रात्री पुण्यास आपले घरी आणून सोडले; व टिळकांनी अण्णासाहेबांचे दर्शन घेतले. नंतर टिळकांचा जाहीर सन्मान झाला ही हकिकत प्रसिद्धच आहे. सन्मानाच्या सभेत एक सभा सार्वजनिक काकांचे हॉलमध्ये झाली व दुसरी अन्यत्र झाली. टिळकांनी अध्यक्ष श्री. अण्णासाहेब यांस शिरसाष्टांग नमस्कार घातला! या दोन्हीही सभांस उपस्थित रहाण्याचे भाग्य मला लाभले होते.

( १३ ) श्री. अण्णासाहेब हे L. M. & S.* डॉक्टर होते व LL. B. ची कायद्याचीही परीक्षा उतीर्ण झाले होते. त्यांची नाडी परीक्षा अप्रतिम असे व नुसते डोळ्यांनी पाहून ते दुःसाध्य रोगाचे अचूक निदान करीत असत. त्यांचा लौकिक ऐकून लांबलांबूनही त्यांच्याकडे औषधासाठी लोक येत असत. ते निष्णात वकील व धन्वंतरी होते, परंतु ज्योतिषही त्यांस अवगत होते. एकदा श्री. बुवा-साहेबांच्या पुण्यतिथीस अण्णासाहेब नित्यनियमाप्रमाणे आले होते.

* ही पदवी त्यांस, त्याच साली पसार केलेल्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिंडिकेटच्या एका ठरावामुळे घेता आली नाही. एकाच व्यक्तीने एकाच वेळेस एकदम दोन पदव्या घेऊ नयेत अशा अर्थाचा तो ठराव होता.

त्याच वेळेस धुळ्याचे सांप्रतचे बुवा श्री. पुरुषोत्तम रुद्र यांच्या लग्नाचे घाटत जुळत होते. या लग्नास श्री. अण्णासाहेबांनी हजर रहावे अशी सर्वांची इच्छा होती. धुळ्याच्या ब्रह्मवृंद ज्योतिषांस लग्नतिथी निश्चित करण्यास सांगितले. त्यांनी लग्नतिथी जवळची निघत नाही असे सांगितले. श्री. अण्णासाहेबांनी त्यांस एक नजीकची तिथी सुचविली. पण ती लग्नतिथीच नव्हे असे ब्रह्मवृंद म्हणू लागले. परंतु अण्णासाहेबांनी—ते धुळ्यास आले होतेच—पुण्याहून छत्रे यांचे पंचांग बोलावून, जी तिथी अण्णासाहेबांनी सुचविली होती ती लग्नतिथीच आहे, अशी त्या पंचांगावरून ब्रह्मवृंदाची खात्री करून दिली; त्या तिथीस अनुसरून सन १९१२ सालात श्री. पुरुषोत्तमबुवा रुद्र यांचे लग्न अण्णासाहेबांच्या उपस्थितीतच झाले.*

( १४ ) श्री. अण्णासाहेब यांचे चिरंजीव बाबासाहेब यांचे लग्न सायंकाळी ८–२१ वाजता, त्यांनी निश्चित केलेल्या वेळेप्रमाणेच झाले. या लग्नास मी हजर होतो. या लग्नांत वधूपक्षाकडील लोकांनी वरपक्षास अपमानकारक वाटेल असे उद्गार काढले. अण्णासाहेबांनी वधूपक्षास आपले म्हणणे परत घ्यावयास लावले व मगच लग्नसमारभ पार पडला.

( १५ ) श्री. माधवराव गोडबोले यांचे वडील धुळ्यास आमच्या घराशेजारीच रहाण्यास आले. फक्त एक भिंत मध्ये आडवी

---

* श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या चरित्रात ही हकीकत वेगळ्या स्वरूपात दिली आहे. लग्नतिथीसंबंधी अण्णासाहेबांकडे विचारणा होताच त्यांनी 'महाराजांस चिठ्या टाका व त्यांचे आज्ञेप्रमाणे करा' असे सांगितले. चिठ्या टाकल्या; परंतु चिठ्ठीत जो दिवस निघाला त्या दिवशी प्रचलित पंचागात मुहूर्तच नव्हता ! श्री. अण्णासाहेबांनी पटवर्धनी पंचांग बोलावून त्यातून चिठ्ठीतील लग्नतिथी सिद्ध करून दिली.

होती. श्री. माधवराव आणि मी एकाच हायस्कूलमध्ये म्हणजे गरुड हायस्कूलमध्ये शिकत होतो. मी दोन वर्ग पुढे होतो. परंतु क्रिकेट वगैरे खेळण्यास एकाच क्लबात जात असल्याकारणाने माधवरावांचा व माझा परिचय झाला. माधवरावांचे एक बंधू श्री. हरिभाऊ डॉक्टर होते. माधवराव पण कॉलेजमध्ये जाऊन ग्रॅज्युएट होऊन नंतर पहिली एलएल्. बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. माधवरावांच्या भगिनीचे यजमान श्री. व्ही. व्ही. करमरकर हेही वकील होऊन नंदुरबारास वकीली करण्यास आले, आणि ते व मी व्यवसायबंधु झालो. माधवरावांचे वडील हेही वकीलच होते. अण्णासाहेबही दरवर्षी धुळ्यास येत असत. श्री. माधवराव यांस अण्णासाहेबांचा लौकिक कळला होता. परंतु विशेष परिचय होण्याचे कारण असे की श्री. अण्णासाहेब पटवर्धन हे कै. श्री महादेव अनंत दांडेकर (दादा) यांचेबरोबर, श्री. माधवराव गोडबोले यांचे वडील आजारी होते त्यांस, औषध देण्याकरता दादा दांडेकर यांनी श्री. अण्णासाहेब यांस आणले. त्यामुळे श्री. माधवबुवा व अण्णासाहेब यांचा परिचय झाला. कॉलेजमध्ये असताना ते अण्णासाहेबांकडे जात येत असत. नंतर त्यांना काय प्रेरणा झाली कोणास ठाऊक, त्यांनी आपली सर्व इस्टेट श्रीमहाराजांच्या चरणी अर्पण केली व आळंदीस आले. श्री. माधवराव हल्ली जेथे निजतात, उठबस करतात ती सर्व जागा खालपासून वरपर्यंत बांधून काढली, त्याचा सर्व खर्च स्वतःच्याच पैशाने केला, आणि नंतर त्यांनी आळंदीसच निरंतर वास्तव्य केले.* मी आळंदीस प्रतिवर्षी येत होतो ही गोष्ट

---

*श्री. शंकरबुवा सोनगिरकर यांच्या नंतर, श्री. आळंदी संस्थानची व्यवस्था श्री. माधवराव गोडबोले यांच्याकडे आली असून सांप्रत ते त्या संस्थान-ट्रस्टचे सरपंच आहेत. त्यांच्या अमदानीत संस्थानचा कारभार सुयंत्रित आणि सुव्यवस्थित झाला आहे.

त्यांच्या बहिणीला ठाऊक होती.* त्यांनी मला श्री. अण्णासाहेबांस विनंति करण्यास सांगितले की 'माधवराव यांची पहिली एलएल. बी. ची परीक्षा उतरली आहे. फक्त त्यांची दुसऱ्या एलएल्. बी. ची परीक्षा द्यावयाची राहिली आहे. श्री .अण्णासाहेबांनी त्यांस ही पण परीक्षा द्यावयास सांगावे. आळंदीस श्रींच्या उत्सवास गेलो तेव्हा हा मजकूर मी अण्णासाहेबांस कळविला. त्यावर अण्णासाहेबांनी "दुसऱ्या एल्एल्. बी. ची परीक्षा देऊन काय करायचे आहे? तुला काय समजते व त्या बहिणीला काय समजते? काही परीक्षा वगैरे देणे नाही" असे उद्गार काढून ही गोष्ट उडवूनच दिली.** त्यावेळेस मला अगर कोणासच श्री. माधवराव यांस प्रेरणा होऊन ते महाराजांच्या गादीवर बसतील अशी कल्पना नव्हती. परंतु श्री. अण्णासाहेबांस या घटनेचे ज्ञान अगोदरच झाले होते असे दिसते.

(१६) माझ्या बाबतीत पण त्यांनी वकीलीची परीक्षा उतरण्यापूर्वीच सांगितले की 'चि. बाबा (त्यांचे चिरंजीव) हा आळंदीच्या महाराजांचा वकील आहे व तूं धुळ्याच्या महाराजांचा वकील आहेस.

(१७) एके वर्षी श्रीच्या उत्सवाकरता दरसाल मी काही कारणाने जाऊ शकलो नाही. उत्सवापूर्वी चार दिवस मी आळंदीहून नंदुरबारेस आलो होतो व उत्सवाचे दिवशी परत काम करून जावे

---

* पुढील हकीकत श्री. माधवराव आळंदीस येऊन स्थायिक होण्यापूर्वीची आहे.

** श्री. अण्णासाहेब यांचे एक शिष्य श्री. गणपती नवले यांनीसुद्धा हाच प्रश्न अण्णासाहेबांस अनेकदा विचारला असता अण्णासाहेबांनी त्यास वरप्रमाणेच उत्तर देऊन मोडून काढले.

असे मी ठरविले. त्याप्रमाणे मी निघालो; व उत्सवाचे दिवशी सायंकाळी ७ वाजता पुणे स्टेशनवर दाखल झालो. आळंदीस पोचण्यास अजून तीन तास तरी लागणार होते. सर्व मंडळी श्रींच्या शेवटच्या प्रसादास बसण्याच्या तयारीत होती. इतक्यात माझी आठवण, कोणी तरी काढून म्हटले 'घनःश्याम अजून आला नाही.' त्यावर अण्णासाहेब म्हणाले 'घनःश्याम येत आहे, आपण प्रसाद घेतो तोपर्यंत तो येईलच.' मी १० च्या सुमारास आळंदीस पोचलो व प्रसाद घेतला.

(१८) त्यांची राहणी अत्यंत साधी होती. निजावयास गादी लागत नव्हती. माडीवरच्या दिवाणखान्यात घातलेल्या सतरंजीवरच झोपी जात. त्यांना उशी लागत नसे व धुळयास येत असत तेव्हा एका सतरंजीवरच निजून किंवा पडून असत.

(१९) श्री. अण्णासाहेब वर्षातून तीनचारदाच जेवत असत. प्रायः शेंगदाणे किंवा निराहारच यावर दिवस काढीत असत. आहार अल्प असून त्यांची काम करण्याची शक्ती विलक्षण होती. रोगी पहाण्यात, औषधे सांगण्यात तासन् तास निघून जात पण ते थकत नसत. श्री. आळंदीस व धुळयास पालखीचा दांडा धरून चार चार, पाच पाच तास चालत, मध्यंतरी बसत नसत. पुण्याहून आळंदीस अगर आळंदीहून पुण्यास ये-जा करताना तासन् तास बैलगाडीच्या खटाऱ्यात बसावे लागले तरी खटाऱ्याच्या धक्क्यांनी त्यांना त्रास झाल्याचे दिसत नसे. एक वर्षी उत्सवाला जाण्याकरता दोन खटारे नक्की केले. अण्णासाहेबांसही आम्ही एका खटाऱ्यात घेतले. एक मैल गाड्या गेल्या नसतील तोंच अण्णासाहेब खाली उतरले व म्हणाले, 'चला, आपण आज पायीच जाऊ' त्यांच्या बरोबर इतर मंडळी उतरली व पायी चालू लागली. अण्णासाहेब ठिकाणी पोचेपर्यंत,

एकदाही बसले नाहीत, तडफेने चालतच होते. इतर मंडळी मध्ये बसत, विश्रांती घेत व पुन्हा चालू लागत !

( २० ) अण्णासाहेब पहिल्या प्रतीचे कायदेपंडित ( Jurist ) होते. सरदार, संस्थानिक मंडळी, त्यांचा कायद्याच्या बाबतीत सल्ला घेत. एकदा जो कायदा कोणासच माहित नाही तो कायदा शोधून, त्या कायद्याच्या पुस्तकाची प्रत त्यांनी मजकडे मागितली. ते पुस्तक मुंबईस कोठेही न मिळाल्यामुळे, मी ते कलकत्याहून मागवून त्यांस पाठविले.

( २१ ) त्यांचे आमच्यावर अनंत उपकार झाले आहेत. त्यांच्या पुण्य–स्मृतीस आमचे सतत शतशः प्रणाम असोत !

★ ★

## श्री. स. वि. बापट

( श्री. स. वि. बापट यांनी लो. टिळकांच्या आठवणींचे तीन खंड प्रसिद्ध केले आहेत हे प्रसिद्धच आहे. ता. १ ऑगस्ट १९६७ च्या केसरीच्या अंकात ‘ लोकमान्य व सयाजीराव महाराज ’ या शीर्षकाखाली एक लेख प्रसिद्ध झाला आहे. या लेखांत कै. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या संबंधी एक आनुषंगिक आठवण येऊन गेली आहे. तीच पुढे उद्धृत केली आहे. )

[ श्री. सयाजीराव महाराज व लोकमान्य यांचे संबंध स्नेहभावाचे व सलोख्याचे कसे होते याची अनेक उदाहरणे महाराजांनी बापटांस सांगितली. १९०८ पर्यंत महत्वाच्या कामकाजानिमित्त उभयतांच्या गांठीभेटी झाल्या होत्या. महाराज पुढे सांगतातः—]

“ १९१४ साली सहा वर्षांची शिक्षा भोगून टिळक सुटून परत आल्यावर त्यांची आमची भेट व्हावी असे आम्हांस वाटू लागले. पण भेट कशी होणार ? त्यांच्या भोवती सी. आय. डी. चे जाळे

व आम्हीहि काही त्यांतून सुटलो नव्हतो. पण आमची भेटण्याची इच्छा असल्याचे त्यांच्या कानावर गेले होते. ते मोठे बहाद्दर, धाडसी व युक्तिवान होते. त्यांनी भेटीचा योग जुळवून आणला. भेट झाली, प्रथम थोड्या सुखदुःखाच्या गोष्टी झाल्यावर देशातील त्यांच्या सहा वर्षांच्या अनुपस्थितीतील घडलेली एक गोष्ट आम्ही त्यांना सांगितली. आमच्या मातुःश्री फार आजारी झाल्या. बडोदे, मुंबई वगैरे ठिकाणच्या डॉक्टर-वैद्यांचे सर्व उपाय झाले. पण गुण नाही. निराश झालो. शेवटी शेवटी पुण्याचे बाळासाहेब नातू आम्हांस म्हणाले की, पुणे येथील महर्षी डॉक्टर अण्णासाहेब पटवर्धन यांचे उपाय करून पहावे. महर्षींची कीर्ति आम्ही ऐकली होती, म्हणून त्यांचे उपाय सुरू केले. चमत्कार असा घडला की ज्या आमच्या मातुःश्रींना पलंगाखाली उच-लून घेण्यास जेथे दोन माणसे लागत तेथे दोन महिन्यात कस-ब्याच्या गणपतीच्या दर्शनास जाण्याइतकी त्यांची प्रकृति सुधारली. शेवटी महर्षींची संभावना कशी करावी असे आम्ही नातू ह्यांना विचारले. ते म्हणाले, गेल्या ४० वर्षांत शेकडो-हजारो लोक त्यांनी बरे केले, पण कोणाकडून एक पैसाहि त्यांनी कधी घेतला नाही. ते निरिच्छ आहेत, साधु आहेत. कोणी त्यांच्यापुढे नारळ ठेवला तर तोहि ते कसब्याचे गणपतीकडे पाठवून देतात. तथापि महाराज म्हणाले, आम्ही फारच आग्रह केल्यावरून नातू यांनी आमची तीव्र इच्छा महर्षींना सांगितली. त्यावर महर्षि म्हणाले, महाराजांची इतकी इच्छा असेल तर त्यांनी आमच्या 'पुणे सार्वजनिक सभा' ह्या संस्थेस भेट द्यावी व तिची पानसुपारी स्वीकारावी. हे ऐकून तर आम्हास नवल वाटले. तथापि सदर संस्थेची राजमान्यता सरकारने काढून घेतल्याचे आम्हास माहीत होते. तरीहि आम्ही आनंदाने आमंत्रण स्वीकारले. सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात मोठा समारंभ

झाला. अध्यक्ष महर्षि पटवर्धन ह्यांचे प्रथम भाषण झाले. चिटणीस केळकर ह्यांनी मानपत्र वाचून सत्कारपूर्वक आम्हांस मानपत्र दिले. नंतर आमचे भाषण झाले. माजी स्वराज्याच्या पेशव्यांच्या राजधानीतील सभेचा तो थाट पाहून आमचे मन उचंबळून आले. आम्ही आमच्या भाषणांत चालू परिस्थितीच्या काही अपरिहार्य भावना व्यक्त केल्या व शेवटी म्हणालो, 'जगात नसेल एवढे कुलूप आमच्या तोंडास लावण्यात आल्यामुळे आमचे मन उघडे करून दाखविता येत नाही.' पण आमच्या या भाषणाचा फार विपरीत परिणाम झाला. हिंदुस्तान सरकारला आमचा राग आला, फार काय, पण आम्हास पदच्युत करण्याच्या विचारापर्यंत मजल गेली. शेवटी आम्ही सरकारास कळविले की, 'केवळ 'सोशल फंक्शन' म्हणून आम्ही हे निमंत्रण स्वीकारले व त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.' अशा तऱ्हेने आम्ही या गंडांतरातून निसटलो."

★ ★

## श्री. दत्तात्रेय कृष्ण कापसे

( अमरावती )

[ श्री. दत्तात्रेय कृष्ण कापसे हे वयोवृद्ध असून पेन्शनर आहेत. श्री. अण्णासाहेब यांचा व त्यांचा परिचय होऊन तो कसा वृद्धिंगत झाला व कोठल्या घटनांमुळे अण्णासाहेबांच्या ठायी त्यांची निष्ठा जडली याचे उद्बोधक चित्र त्यांच्या आठवणीत आहे. ]

( १ ) सन १९१३ मध्ये मला प्रथमच पुण्यास जाण्याचा योग आला. माझ्या एका मित्राच्या मुलीचे लग्न पुण्यास व्हावयाचे होते. अमरावतीचे वकील कै. बाबासाहेब पाळेकर यांचा व माझा

घनिष्ट संबंध असल्यामुळे त्यांनी मला एक पत्र श्री. अण्णासाहेब यांच्या चिरंजीवांच्या नावे देऊन मला श्री. अण्णासाहेबांची भेट घेण्यास सांगितले. मी पुण्यास गेलो. त्यांचा वाडा पाहिला. त्यांचे सुपुत्र श्री. बाबासाहेब यांस पत्र देऊन अण्णासाहेबांची वाट पहात बसलो. काही वेळाने अण्णासाहेब माडीवरून खाली आले. मी आणि माझे एक स्नेही असे उभयता त्यांच्या पायां पडून उभे राहिलो. त्यांनी आमची विचारपूस केली. अधिक काही बोलावयाचे नसल्यामुळे, आम्ही आळंदीस जाण्यासाठी त्यांची परवानगी घेतली. त्या वेळेस अण्णासाहेब उघडेच होते. दाढी जटा वाढलेल्या होत्या. उंच, सड-पातळ, पण भव्य अशी त्यांची देहयष्टी होती, आणि नेत्रात विलक्षण तेज होते.

(२) सन १९१२ पूर्वी मला जे मोठे दुखणे झाले, त्या दुखण्यात मला पोटदुखीची व्यथा जडली. अगोदर ती होतीच, पण या दुखण्यानंतर तिने अतिशयच उग्र स्वरूप धारण केले. पुष्कळ उपाय केले. शेवटी येथील (अमरावतीच्या) दवाखान्यात दाखल झालो. अशा उद्देशाने की, शस्त्रक्रिया करून घ्यावी. सिव्हिल सर्जन शस्त्रक्रियेस संमती देईनात. दवाखान्यातून घरी आलो. दुधाचाच आहार ठेवला होता. व्याधी कमी होईना. शेवटी उन्हाळ्याचे दिवसात कै. बाबासाहेब पाळेकरांनी मला धुळ्यास नेले. तेथे ते प्रतिवर्षी श्री. पद्मनाथस्वामींच्या पुण्यतिथीस जात असत. तेथे श्री. अण्णासाहेब व त्यांची इतर मंडळी आली होती.* श्री. अण्णासाहेब यांच्या व माझ्या

* धुळ्याचे पद्मनाथस्वामी उर्फ बुवासाहेब हे श्री. अण्णासाहेब यांचे गुरुबंधू. शके १८२३ शुद्ध द्वादशी (वैशाख) या दिवशी त्यांचे देहावसान झाले. त्यांच्या पुण्यतिथीसाठी अण्णासाहेब प्रतिवर्षी पुण्याहून धुळ्यास जात असत.

पूर्वीच्या ओझरत्या ओळखीस बाबासाहेबांनी ऊजाळा देऊन, मला त्यांच्या समवेत पुण्यास घेऊन जाण्याची विनंती केली. त्यांनी मला पुण्यास नेले. पाच सहा दिवस झाले औषध मिळाले नाही. 'मी औषधोपचारासाठी आलो आहे, तरी मला औषध सांगावे,' अशी मी त्यांस विनंती केली. त्यावर 'औषध देतो' इतकेच म्हणून ते स्वस्थ बसले. काही दिवस जाऊन, इतर मंडळींची ओळख झाल्यावर आणि अण्णासाहेबांची दिनचर्या व कार्यक्रम अवलोकनात आल्यानंतर मला वाटू लागले की, ते नुसतेच केवळ वैद्य नाहीत; 'आणखी काही तरी विशेष आहेत!' त्यांचे दर्शनास नित्य येणारी मंडळी अनेक होती. त्यामुळे माझ्या पूर्वीच्या मतांत फरक पडू लागला.

( ३ ) मी रोज स्नान झाल्यानंतर त्यांना नमस्कार करावयास जात असे. मागच्याच खोलीत मी रहात होतो. त्यांच्या नित्यक्रमात अडथळा न यावा म्हणून एक दोन वेळाच त्यांचे दर्शन घेत होतो. एक दिवस मी औषध सांगण्याचा हट्टच धरला तेव्हा त्यांनी सोपे–अगदी साधे–औषध सांगितले. सुंठ, पांढरी वसू व थोडी कुटकी दुधांतून उगाळून घेण्यास सांगितले. १०–१२ दिवस ते औषध घेऊनही पोटदुखी थांबेना. एक दिवस पोटदुखीने कहर केला तेव्हा मी रागाने अण्णासाहेबांजवळ गेलो, व 'पोट बरे होत नाही, आज तर फारच दुखते, खात्रीचा इलाज सांगा' म्हणून ठाण मांडून बसलो. तेव्हा ते म्हणाले 'मजजवळ बस.' थोड्या वेळाने वैद्यक शास्त्रावरील एक पुस्तक दुसऱ्या खोलीतून आणून, आपल्या पोटाचा आकार कसा आहे, त्यात काय आहे वगैरे सर्व मला समजावून सांगून पोट कसे व का दुखते तेही सांगितले. सांगता सांगता आपल्या शरीराकडे पाहून म्हणाले, 'अरे हे रक्त, हाड, मांस नाही सर्व प्रकाश भरला आहे. रोमरोमांत महाराज (आळंदीचे श्रीनृसिंह सरस्वती स्वामी) भरले

आहेत.' मला काहीच उमज पडला नाही त्या वेळेपुरते बरे वाटले व पोटही थोडे बरे झाले.

(४) अधिक परिचय असल्यामुळे मी एकटाच त्यांना भेटत असे. श्रद्धेचा ओघ निराळ्याच दिशेने वाहू लागल्याने त्यांना मी महाराजांच्या गोष्टी विचाराव्या. 'तुमचा व महाराजांचा परिचय कसा झाला, त्यांचेकडून काय शिकलात,' वगैरे प्रश्न मी खुल्या दिलाने त्यांस विचारीत असे; व तेही काही प्रश्नांची उत्तरे देत असत. 'तुम्ही योग केला होता काय' तसेच योगातील षट्क्रिया, प्राणायाम वगैरे विचारीत असता, तो कसा करावा ते त्यांनी सांगितले. खेचरी मुद्रेचे वर्णनही सांगितले. मी विचारले की 'तुम्ही यापैकी काय केले?' ते म्हणाले 'मी काही केले नाही पण महाराजांना हे करीत असताना पाहिले'

(५) कधी कधी रात्री मी त्यांचे पाय दाबण्यास बसत असे. बहुतेक अंथरुणावर उताणे पडून त्यांचे काही म्हणणे सुरूच असे; व दोन्ही हातांनी नमस्कार करणे चालू असे. एक दिवस मी विचारले 'मी काय करावे (उपासना)? माझे पोट तर थांबतच नाही.' ते म्हणाले 'पोट दुखणे थांबल्यावर काय करावयाचे ते सांगेन' पाय दाबीत असता लागलीच घोरण्यास आरंभ होत असे. त्यांस झोप लागली आहे असे समजून, पाय दाबणे बंद करून, मी खोलीकडे जातो न जातो तोच त्यांचे 'म्हणणे' सुरू होई. त्यांना झोप अगदी कमी लागत असे.

(६) 'सूर्य उगवला म्हणजे दिवस व मावळला म्हणजे रात्र' हा सामान्य नियम अण्णासाहेबांच्या बाबतीत लागू करता येण्यासारखा नव्हता. त्यांची दिनचर्या संपली की तेव्हापासूनच त्यांची रात्र

सुरू होत असे. नेहमीच्या कार्यक्रमात कोणी भेटण्यास, कोणी काही विचारण्यास, अगर कोणी काही तातडीच्या कामासाठी आला असल्यास त्याच्याशी तास न् तास बोलणे होई आणि त्यांचा नित्य नेमक्रम खंडित होत असे किंवा त्यास विलंब होत असे. रात्रीसुद्धा ते सूर्यास अर्घ्य देत असत. ते म्हणत 'सूर्य कधी मावळतो काय ?' रोगी पहावयाची वेळ रात्री ९।१० वाजेपासून १–२ वाजेपर्यंत लांबत असे.

( ७ ) अण्णासाहेब दोन दोन दिवस काही खात नसत. कारण त्यांचा नित्यक्रम वर सांगितलेल्या कारणांमुळे अपुराच रहात असे. नित्यक्रमास पुनः पहिल्यापासून सुरुवात करावी लागत असल्यामुळे ते काही खात नसत–जेवत नसत. कधी दाण्याचा लाडू, केळे, भगर, खात असत. तेव्हा श्री. नानासाहेब दांडेकर, यांच्या तेथेच राहणाऱ्या आजी म्हणत, 'आज अण्णासाहेबांनी काहीच खाल्ले नाही. पहा, काही खातील तर.' मंडळी मला पुढे करीत. मीही अण्णासाहेबांस महाराजांच्या काही गोष्टी ऐकविण्याची विनंती करून, त्यांनी सांगावयास सुरुवात केली की हळूच एखादे केळे, एखादी संत्र्याची फोड महाराजांचा प्रसाद म्हणून त्यांचे पुढे करीत असे. महाराजांच्या गोष्टी सांगताना ते इतके रंगून जात की, खाण्यासाठी मग विशेष आग्रह करावा लागत नसे.

( ८ ) १९१४ साली जर्मन युद्ध सुरू झाले. त्या युद्धाच्या 'रम्या वार्ता' कळण्यासाठी कै. सीतारामपंत दांडेकर हे मुद्दाम रेल्वे स्टेशनवर जाऊन बॉम्बे क्रॉनिकलची प्रत आणीत असत; व ती हकीकत अण्णासाहेबांस वाचून दाखवीत असत. एके दिवशी क्रॉनिकल वाचून दाखवीत असता अण्णासाहेब एकदम म्हणाले, "अरे,

असे काय पहाता ? जर्मनांनी फ्रान्सचा पराभव केला, इंग्लिश पळून चालले आहेत, **काय तोफा चालल्या आहेत पहा !** + + + हा भाग घेतला." ( जर्मनांनी कोणता भाग घेतल्याचे अण्णासाहेबांनी सांगितले हे मला आता आठवत नाही. ) आम्हास वाटले की, आज अण्णासाहेब असे काय बोलत आहेत ? दुसरे दिवशी क्रॉनिकलमध्ये तंतोतंत तशीच बातमी आल्याचे पाहून आम्हास अत्यंत आश्चर्य वाटले.*

( ९ ) गुरुवारी रात्री ८–९ वाजता रोगी तपासण्याचा दिवस असे. रोगी तपासणे रात्री दीड दोन वाजेपर्यंत लांबत असे. औषधे लिहून घेण्यास कै. नथू पाटील बसत असत. एक दोन औषधे सांगितली की ४–५ मिनिटे खंड पडत असे. मग पुनः पुढील औषधे सांगितली जात असत. खंड पडल्याने एखादे भलतेच औषध सांगितले जाण्याची धास्ती नसे. ते आपल्या तंद्रीतच असत व म्हणत की 'महाराजच माझे तोंडून वदवितात. चूक होणार नाही.'

(१०) श्रीमंत लोक पुष्कळ पहाण्यात आले. पण खरे सरदार कसे असतात ते पाहिले नव्हते. अण्णासाहेबांनी संसार सोडल्या-सारखाच असला तरी ब्राह्मण्योचित कर्मे ते यथास्थित करीत असत. श्रावणी करावयाची ती त्यांच्या नित्यक्रमाप्रमाणे ३–४ वाजता सुरू होऊन संध्याकाळी संपावयाची. श्रावणीस ओळखीची मंडळी याव-

---

* हे सामर्थ्य आनुवंशिक होते की काय ? श्री. अण्णासाहेब यांच्या मातुःश्री श्री. जानकीबाई यांस १८५७ सालच्या बंडाची बातमी सभोवतालच्या मंडळींनी विचारली असता, त्यांनी क्षणभर ध्यानस्थ बसून सर्व वृत्तांत सांगितला ! नंतर तिकडून बातम्या व पत्रे आली त्यावरून तो सर्व वृत्तांत खरा ठरला !

याची. त्यांचेकरता स्नानास गरम पाणी, प्याले, जानवी, व ब्राह्मणास देण्याकरता लागणारी दक्षिणा सुद्धा तयार असावयाची !

( ११ ) अण्णासाहेबांकडे मुक्काम असतानाच आळंदीस गेलो. महाराजांची पुण्यतिथी उरकल्यानंतर पालखी निघत असे. त्या दिवशी कै. शंकरबुवा यांच्या मुलास धनुर्वात झाला. मुलगा २०-२१ वर्षांचा असावा. रात्री पालखी निघावयाची, पण मुलाची प्रकृति अतिशयच बिघडून त्यास घरघर लागली. अण्णासाहेब मुलाजवळ होते. श्री. माधवरावजीस ( गोडबोले ) बोलावून त्यांस गुरुचरित्रातील २०–२१ अध्याय वाचावयास सांगून ते स्वस्थ बसले. इकडे मंडळी पालखीची तयारी करून वाट पहात होती. ९ चे सुमारास घरघर थांबली व व मुलगा बरा झाल्यासारखा दिसला. अण्णासाहेब उठले व त्यांनी पालखी काढावयाची आज्ञा केली. रात्री २ वाजता मठात पालखी परतली; व नंतर ४–४॥ वाजता शंकरबुवांचा मुलगा स्वर्गस्थ झाला !

( १२ ) आळंदीस असताना, रात्री २–३ वाजता, सर्व आन्हिक आटपल्यानंतर महाराजांचा प्रसाद म्हणून, अण्णासाहेब जेवीत असत. कधीही न जेवणारे, एखाद्या दाण्याच्या लाडवावर किंवा केळ्या-वर दिवस भागविणारे अण्णासाहेब, जेवणास बसले म्हणजे मंडळींनी त्यांना आग्रह करून वाढावे व अण्णासाहेबांनी तो आग्रह सहन करूनही जेवावे; परंतु त्यांस कधी उलटी, पोट फुगणे असे विकार झाले नाहीत.

( १३ ) त्यांस महर्षि ही पदवी यथार्थपणे शोभत असे. महा-राजांच्या गोष्टी अगर एखादा गहन विषय निघाला की ते Trance मध्ये जात; अगदी तद्रूप होत असत. त्या वेळेस त्यांच्या डोळ्यातील आंतील बाहुली शून्याकार होत असे. डोळे पूर्ण उघडे परंतु आंतील

बाहुली मात्र शून्याकार म्हणजेच Vacant. या स्थितीस काय म्हणावे हे माझ्या अल्पबुद्धीस समजत नाही, परंतु महाराजांनी आपल्या स्वात्मसौख्यांत " आपुले दृष्टीचे देखणें । दृष्टि विरहित वर्तणें । सालंकृत विराजमाने । तेचि वस्तू ॥ " म्हणजे अगोचरी दृष्टी असे या स्थितीचे वर्णन करता येईल. किंवा " दृष्टीमाजी दृष्टि नाही । आपुला आपण सर्वां ठायीं । अंतरात्मा मीच हृदयीं । जगाचिया ॥ " या प्रकारची त्यांची दृष्टी मी अनेक वेळा पाहिली आहे; कारण मी त्यांच्या सान्निध्यात बाहुल्याने असे.

( १४ ) अस्तु. श्री. अण्णासाहेब यांचा व माझा सहवास काही महिनेच झाला, त्या सहवासात माझ्या अल्पबुद्धीला जे प्रतीत झाले ते वर दिले आहे. सहवास अल्पकाळ झाला तरी श्रीभागीरथीची अथांगता, पावित्र्य, आणि पुण्यप्रदता लक्ष्यात यावयास तिच्या काठी तिष्ठत बसावे लागत नाही. तिच्या जलांत अल्पकालचे निमज्जनही तिची महात्मता आपल्या प्रत्ययास आणून देते.

★ ★

# श्री. गोविंदराव बापट (पुणें)

[ पुढील तीन आठवणी श्री. बापट यांनी कै. भा. सी. दिवेकर, रिटायर्ड डिस्ट्रिक्ट जज्ज, नागपूर, यांच्या अनुमतीने पाठविल्या आहेत. कै. दिवेकर हे अण्णासाहेबांच्या परिचितांपैकीं एक सच्चरित्र व प्रतिष्ठित गृहस्थ होते. ते विद्यमान असताना प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध होण्याचा योग आला नाही, याबद्दल आम्हांस खेद होतो. ]

( १ ) श्री. भा. सी. दिवेकर ( रिटायर्ड डि. जज्ज, नागपूर ), मी (बापट) आणि एक दोन मित्र असे गच्चीच्या शेजारील खोलीत बसलो असता, मांजर उंदीर पकडते तशी आम्ही बसलेल्या पलंगडी-खाली गडबड सुरू झाली, म्हणून आम्ही पलंगडीवर थापा मारल्या. पलंगडीखालून एक मोठा काळा नाग एका बऱ्याच मोठ्या उंदराला विळखा घालीत घालीत बाहेर पडला. आम्ही सगळे बाहेर पडलो, आणि पलंगडी व त्या खालील अडगळ गच्चीवर नेऊन ठेवली. आम्ही घाबरून गेलो होतो. इतक्यात श्री. अण्णासाहेब तेथे आले. ते म्हणाले, 'मारू नका हं !' असे म्हणून थोडा वेळ थांबले आणि निघून गेले. तो नाग इतका बेभान झाला होता की इतकी गडबड चाललेली असता त्याने कोणाकडे लक्ष दिले नाही. उंदराला घातलेला विळखा तसाच ठेवून त्याने त्या उंदराचे नरडे फोडले व त्यातून रक्त वहात होते. सापाला मारावयाचे नाही म्हणून त्याला पकडून कोठे तरी सोडून द्यावे या उद्देशाने कोणी तरी धिटाईने तेथे असलेली घागर घेऊन सापाच्या अंगावर घातली. पण तेवढ्यात तो साप निसटून बिळाकडे गेला. उंदरास कचऱ्याच्या पेटीत टाकून रक्त सांडलेली जागा नीट सारवून काढली; तरी पण तो नाग पंधरा, वीस मिनिटे

झाली की उंदीर पडलेल्या जागेवर यावयाचा व माणसांची गडबड ऐकून परत जायचा. असे दोन तास झाल्यावर दगड, विटा आणून आम्ही सगळी बिळे बंद केली.

( २ ) नेहमीच्या पद्धतीप्रमाणे श्री. अण्णासाहेब, दोन तीन मंडळीसह रात्री ३ वाजता देवदर्शनास निघाले. काही रस्ता चालून गेल्यावर श्री. अण्णासाहेबांच्या उजव्या पायास एक साप विळखे घालून वर चढू लागला. बरोबरची मंडळी त्यास मारण्यास सरसावली. अण्णासाहेब म्हणाले, 'गडबड करू नका, त्याला मारू नका व थोडे बाजूला सरा' थोड्या वेळाने तो साप विळखे काढून आपल्या रस्त्याने निघून गेला.

( ३ ) एकदा श्री. अण्णासाहेबांच्या घरात एक साप निघाला. साप मोठा होता. त्यास मारण्यासाठी काही मंडळी पुढे सरसावली. अण्णासाहेब तेथे आले. त्यांनी सांगितले, 'त्याला मारू नका, तो वाट चुकला आहे' असे म्हणून त्यांनी एक लहानसा कंदील घेतला आणि मोठ्या दरवाजातून ते बाहेर पडले. तो साप खरोखरीच त्यांचे मागे मागे जाऊन रस्त्यावर आल्यावर निघून गेला !*

---

* ज्या पत्राबरोबर श्री. भा. सी. दिवेकर यांनी वरील आठवणी पाठविल्या त्या पत्रात ते म्हणतात, "सर्वच आठवणी सापासंबंधाने आहेत व त्यात दिसून येणारी अण्णासाहेबांची मनोवृत्ती प्रशंसनीय आहे. त्यांची अहिंसावृत्ती इतकी पराकाष्ठेला गेली होती की साप म्हणजे प्रत्यक्ष 'श्रीमहाराजच' असे ते म्हणत व त्याला धक्का न लावण्याची ते पराकाष्ठेची खबरदारी घेत असत......'अहिंसाप्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः' हे जे पातंजल योग, साधन पाद, सूत्र ३५ मध्ये म्हटले आहे ते त्यांच्या बाबतीत पूर्णपणे खरे होते."

या संबंधात 'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥' ही तुकारामोक्ति प्रसिद्धच आहे.

★ ★

# श्री. यादव केशव वडोदकर

( खामगांव )

[ श्री. वडोदकर यांच्या आठवणी त्यांचे पौत्र श्री. श. द. देशपांडे यांनी लिहून पाठविल्या आहेत. अर्थातच श्री. यादवबुवांनी त्यांस त्या कथन केल्या आहेत. या आठवणींवरून श्री. अण्णासाहेबांस भविष्यकालीन घटनांचे कसे सम्यक ज्ञान होते हे वाचकांच्या प्रत्ययास येईल. ]

( १ ) यादवबुवा त्या वेळेस विद्यार्थी दशेत होते. श्री. सदाशिव महादेव तथा बापूसाहेब दांडेकर यांनी मलकापुरास एक खाजगी शाळा चालविली होती, तीत यादवबुवा शिकत होते. या शाळेचा अमरावतीच्या शिवाजी हायस्कूलशी घनिष्ठ संबंध होता. श्री. बापूसाहेब दांडेकर दरवर्षी जी काही विद्यार्थी व इतर मंडळी बरोबर घेऊन आळंदीला श्रीनृसिंह सरस्वती स्वामींच्या पुण्यतिथीस जात असत तीत यादवबुवा हे एक असत. पुण्यतिथीचा उत्सव आटोपून मंडळी पुण्यास आली की तिचा मुक्काम अण्णासाहेबांकडे असे. पू. अण्णासाहेबांकडून मुक्काम हलायचा म्हणजे ते सांगतील तेव्हा आणि त्यांच्याच आज्ञेने. काही वेळा ८–१० दिवसही मंडळी राहत असत. पू. अण्णासाहेबांकडून निघायचे म्हणजे देवघर आणि परसातील देवमूर्तींस नमस्कार करावयाचा; अण्णासाहेब सौ. बाईंकडून हातावर दही घालीत ते घ्यावयाचे आणि मग त्यांना नमस्कार करावयाचा असा क्रम असे. नमस्कार करीत असता त्यांचे नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजार्पणमस्तु हे आशीर्वचन ऐकावयाचे, वेळ असेल तर बसावयाचे आणि नंतर श्री. अण्णासाहेबांनी दारापर्यंत पोचविण्यास यावयाचे ही ठरलेली प्रथा होती.

( २ ) दरवर्षीच्या या प्रथेप्रमाणे यादवबुवा आणि श्री. बापूसाहेब दांडेकर, मलकापुरास परत यावयास निघाले. आणि बापूसाहेबांनंतर श्री. यादवबुवा नमस्कार करीत असताना श्री. अण्णासाहेबांच्या तोंडून " मार्कंडेयाचे आयुष्य असो " असे नेहमीपेक्षा वेगळेच आशीर्वचन कानावर पडताच दोघेही विस्मित झाले. टांग्यातून येताना दोघांचे बोलणेही झाले परंतु त्या उद्गारांचा उलगडा झाला नाही.

( ३ ) मलकापुरास परतल्यानंतर काही दिवसांनी धुळ्याचे पद्मनाभ स्वामी, पूर्वाश्रमीचे नारायणबुवा रुद्र यांच्या आश्रमात केवळ दुग्धाहारावर कालक्रमणा करीत असलेल्या गयाताई श्री. बापूसाहेबांकडे आल्या. तेथें असताना त्यांस शेगावच्या श्रीगजानन महाराजांच्या दर्शनास जाण्याची इच्छा झाली; आणि त्याप्रमाणे व्यवस्था करण्यात आली. त्यांस गाडीवर पोचविण्यासाठी बापूसाहेब, यादवबुवा आदिकरून मंडळी निघाली. मंडळी स्टेशनवर गेली. सर्वजण जेव्हा परतले तेव्हा सर्वांबरोबर पुलावरून न जाता, का कुणास ठाऊक, यादवबुवा एकटेच नागपूरकडून येणारी गाडी स्टेशनात शिरत असल्याचे दिसत असतानाहि, मित्रांनी धरलेला हात सोडवून घेऊन, रूळ ओलांडीत पलीकडच्या प्लॅटफॉर्मवर जाण्यास निघाले; आणि काही कळावयाच्या आंतच इंजिनच्या समोरच्या फळ्यांनी जोरदार धक्का बसून, प्लॅटफार्मवर स्टेशन ऑफीससमोर म्हणजे कमी अधिक १४-१५ फूट अंतरावर फेकले गेले ! शुद्ध हरपत होती; पण तशातही त्या काळच्या साहेबी गार्डने दिलेल्या शिव्यांची पुसट पुसट जाणीव होताच ' खबरदार शिव्या दिल्या तर ' असे दटावून यादवबुवा बेशुद्ध झाले.

पुढचे सर्व उपचार झाले आणि यादवबुवांची प्रकृती पूर्ववत् झाली. श्री. अण्णासाहेबांच्या आशीर्वचनाचे रहस्य पूर्णपणे त्यांच्या प्रत्ययास आले. आज बऱ्याच व्याधींनी ग्रस्त असूनही वयाची 'ऐंशी' गाठण्याचा योग यादवबुवांस येत आहे ही श्री. अण्णासाहेबांची कृपा, अशी त्यांची अविचल व दृढ श्रद्धा आहे.

★ ★

## श्री. हरि भगवान पाटील, मलकापूर

[ श्री. हरि भगवान पाटील हे मलकापूरचे वयोवृद्ध गृहस्थ असून, तेथे अर्जनवीसाचा धंदा करतात. श्री. अण्णासाहेबांच्या निकट सान्निध्यात ते होते. ]

( १ ) श्रीभक्त सीताराम महादेव दांडेकर* हे श्रीसद्गुरु अण्णासाहेब पटवर्धन यांचेकडेसच रहात असत. त्यांचा पुतण्या गोविंदा त्यांचे बंधू सदाशिव महादेव यांच्याकडे अमरावतीस होता. या मुलाच्या अपमृत्यूचे ज्ञान श्री. अण्णासाहेब यांस अगोदरच असावे असे दिसते. गोविंदा ज्या दिवशी अमरावतीस वारला, त्या दिवशी अण्णासाहेबांनी पुण्यासच सीतारामकाकांना आपल्या वडिलांचे वर्षश्राद्ध करावयास लावले. 'अरे सीताराम, आज सदाशिव कदाचित गडबडीत असेल,

---

* श्री. नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचे एक प्रमुख शिष्य श्री. महादेव अनंत दांडेकर–ज्यांस अण्णासाहेब गुरुस्थानी मानीत असत– त्यांचे सीताराम महादेव हे एक चिरंजीव असून, त्यांच्याकडे श्री. अण्णासाहेब यांच्याकडील देवपूजेचे काम होते. दुसरे चिरंजीव श्री. सदाशिवराव अमरावतीस म्युनिसिपल शाळेत शिक्षक होते.

म्हणून दादांचे वर्षश्राद्ध तू येथेच कर' अशी सीतारामपंतांना आज्ञा करून त्यांच्याकडून ते कार्य करविले. गोविंदा अमरावतीस आजारीच होता. श्राद्ध वगैरे आटोपल्यावर श्रीभक्त सदाशिवराव दांडेकर यांची तार आली की 'गोविंदा गेला.'

( २ ) ( श्री. पाटील यांच्या यानंतरच्या दोन आठवणी विशेष महत्वाच्या नाहीत म्हणून येथे दिल्या नाहीत. )

* *

## श्री. रा. द. कुळकर्णी

( नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट व लाईफ इन्शुअरन्स कार्पोरेशन एजन्ट; तळेकर सदन, हुंडिवाला गल्ली, नाशिक. )

[ श्री. कुळकर्णी यांची पहिली आठवण, तशाच प्रकारची जी दुसरी आठवण अन्यत्र* प्रसिद्ध झाली आहे तिला पूरक आहे. ]

( १ ) कै. ब्रह्मर्षि अण्णासाहेब पटवर्धन हे माझे वडील कै. ती. दत्तात्रय गोपाळ कुळकर्णी, गुरांचे डॉक्टर, धुळे, यांस व आम्हास गुरुस्थानी होते. इ. स. १९१६ सालची गोष्ट असावी. मी व माझे वडील पुण्यास श्री. अण्णासाहेब यांचेकडे गेलो होतो. त्यावेळी चालू असलेल्या महायुद्धाबद्दल व त्याच्या जगावरील संभाव्य परिणामाबद्दल गोष्ट निघाली, तेव्हा श्री. अण्णासाहेब म्हणाले, 'महाराजांच्या मनात काय असेल ते खरे!' श्रीनृसिंहसरस्वती स्वामी हे अण्णासाहेबांचे गुरु व दैवत होते. त्यानंतर दुसऱ्याच साली हिंदुस्थानास साम्राज्यां-

* 'श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्र' या पुस्तकांतील पृष्ठे ७६–७७ वरील मजकूर पहावा.

तर्गत स्वराज्य देणे हे आमचे उद्दिष्ट आहे असे त्यावेळेचे स्टेट सेक्रेटरी मि. मॉंटेग्यु यांनी जाहीर केले. हिंदुस्तानला युद्धामुळे हा एक फायदाच झाला. याच संबंधात श्री. अण्णासाहेब यांचे वरील सूचक वाक्य असावे. (या संबंधात स्मरण मौक्तिक पहा.)

(२) मी व माझे वडील बंधू कै. ती. स्व. गंगाधर दत्तात्रेय कुळकर्णी, फर्ग्युसन कॉलेजच्या रेसिडेन्सीत रहात असताना कै. अण्णासाहेब यांनी आम्हास श्री. गुरुचरित्राची लहानशी पोथी ठेवून तिचे एकांतात पारायण करावे असे सांगितले होते.

* *

## श्री. जी. एन. खरे, ॲडव्होकेट, अमरावती कॅंप

[ जी. एन्. खरे हे अमरावतीस नामांकित वकील आहेत. यांचे वडील श्री. नारायण रामचंद्र खरे, हे मोर्शी स्कूलचे हेडमास्तर होते. पुढील आठवण ही त्यांच्यासंबंधीच आहे. ]

(१) माझे वडील श्री. नानासाहेब खरे ( नारायण रामचंद्र खरे ), हेडमास्तर, गव्हर्नमेंट स्कूल मोर्शी यांना त्यांच्या वयाच्या ४५ ते ५० या कालावधीत मलावरोधाची व्यथा जडली; त्यांचे पाय व टाचाही दुखत असत. तेव्हा ते महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांचेकडे गेले. प्रथम दोन तीन दिवस महर्षी अण्णासाहेबांनी अत्यंत शांतपणे काय होते, जेवणाखाणाच्या वेळा कोणत्या, इत्यादि सविस्तर माहिती विचारून घेतली. मग ते आमच्या वडिलांस म्हणाले 'पायाच्या टाचा दुखतात ना? शरीराचे वजन पायांना सहन होईल इतके कमी झाले पाहिजे. तेव्हापासून आमचे वडील रोज एक वेळ जेवण

करीत असत. अशा रीतीने त्यांनी शरीराचे वजन कमी केले. महर्षींच्या वाणीतून ६० ते ६५ वस्तूंची (औषधांची) नावे निघाली. ते रोज ५।१० औषधांची नांवे सांगत. ५।६ दिवसात यादी पूर्ण झाली. महर्षींची कामे, त्यांच्या ईश्वरावरील दृढ श्रद्धेनेच चालत असत. देवदर्शन झाल्यावर शांतपणे ते निदान करीत, व औषधी सल्ला सांगत. हे सर्व आमचे वडिलांनी, आम्हास पुण्याहून आल्यावर सविस्तर सांगितले होते. महर्षींच्या औषधीत 'पुनर्नवा' ही वस्तू प्रामुख्याने असे.

☆ ☆

## श्री. श्रीधर विष्णू दातार

[ रिटायर्ड रेल्वे सर्व्हंट सतना, विंध्य प्रदेश; श्री. दातार हे मूळचे पुण्याचे रहिवासी असून त्यांची ल्हाणपणची वीस वर्षे पुण्यात गेली. ते पुण्यास असताना त्यांनी अण्णासाहेबांस पाहिले होते. ]

माझे वडील पुण्यात प्रसिद्ध कीर्तनकार होते. आमचे निवासस्थान नारायण पेठेत परांजपे यांचे वाड्यांत होते. या वाड्याजवळच एक गणपतीचे मंदिर होते. या मंदिरातील गणेशोत्सव माघ शुद्ध प्रतिपदेपासून ते वसंत पंचमीपर्यंत होत असे. उत्सव सार्वजनिक वर्गणी जमा करून होत असे. गुरुवर्य श्री. अण्णासाहेब पटवर्धन दरवर्षी माघ शुद्ध चतुर्थीस दर्शनास येत असत. श्रीगणेशमूर्तीपुढे ध्यानस्थ उभे राहून अथर्वशीर्ष म्हणत असत. नंतर थोडेसे दूर्वांकुर हातात घेऊन मनोभावाने नमस्कार करीत व नंतर ते दूर्वांकुर मंदिराचे मालक कै. नारायणराव श्रोती यांचे हातात देत. गुरुवर्य अण्णासाहेबांनी गणेश-

मूर्तीपुढे दक्षिणा म्हणून तीन रुपये ठेविले. नंतर श्री. श्रोती यांस सांगितले की वर्गणीदारांचे यादीत माझे नांव न लिहिता ही दक्षिणा जमा करावी. शुभ्र धोतर, अंगात पेशवाई थाटाचा शुभ्र अंगरखा, शुभ्र उपरणे, डोक्यावर लालसर रंगाचे लहान पागोटे अशी त्यांची वेषभूषा होती. वर्ण पूर्णपणे गौर, अंगकाठी साधारण कृश, दाढी थोडी वाढलेली, नेत्र पाणीदार व मुखचर्या अत्यंत तेजस्वी अशी दिसली. हे सर्व पाहून ते एक सिद्ध पुरुष असावेत असा माझ्या मनाचा ग्रह झाला.

माझ्या वडिलांची कीर्तने श्री ॐकारेश्वर मंदिरात पुरुषोत्तम मासात होत असत. गुरुवर्य श्री. अण्णासाहेब पटवर्धन श्रीशंकराचे दर्शनास येत असत. कीर्तनकार, आमचे वडील, यांना दुरून नमस्कार करून ते जात असत. समाप्तीच्या दिवशी ते बुवांच्या हातात पाच रुपये देत असत. वडिलांच्या मागे राहून मी त्यांची साथ करीत असे. गुरुवर्य अण्णासाहेबांनी माझे वडिलांस नमस्कार केला. नंतर माझ्याकडे वळून ते म्हणाले, " बाळ वडिलांचे सारखी निरूपणशक्ति अवगत कर. " त्यांच्या बोलण्याचा माझ्या मनावर परिणाम झाला आणि मीही वडिलांचे सान्निध्यात कीर्तनकलेचा थोडासा अभ्यास केला. कै. अण्णासाहेब भोपटकर, स्वातंत्र्यवीर सावरकर इ० मंडळी ॐकारेश्वराच्या गच्चीवर बसत असत. समाप्तीच्या दिवशी श्रीयुत भोपटकर इत्यादि मंडळी बोवांस दक्षिणा देऊन जात असत. परंतु त्यांच्यासारखी मंडळीही अण्णासाहेबांपुढे नतमस्तक होऊन नमस्कार करीत असत.

माझा सह्राध्यायी श्रीयुत शंकर गणपुले शरीराने फार स्थूल होता. त्याचा मेद वाढला होता. चालताना श्वास फार लागे. आमचे इतर सहाध्यायी त्याची भोपळा म्हणून टवाळकी करीत असत. त्याचे वडिलांनी अण्णासाहेब पटवर्धन यांचे उपचार सुरू केले.

रोज प्रातःकाळी एक मैलपर्यंत जलद चालण्यास सांगितले. प्रथम त्याला चालावयास फार त्रास झाला. अभ्यासाने कसबापेठेतून पर्वतीपर्यंत जलद चालू लागला. गुरुवर्यांनी त्यास सांगितले की " शंकर, तू पर्वतीच्या पायऱ्या चढून जाऊ लागलास म्हणजे तुझा रोग बरा होईल." यावर विश्वास ठेवून त्याने आपला क्रम चालू ठेवला आणि तो रोगमुक्त झाला. श्री. अण्णासाहेबांनी दिलेले औषध त्रिफळाचूर्ण आणि त्याचबरोबर चालण्याचा व्यायाम हेच होते.

सुरतेची काँग्रेस समाप्त झाल्यानंतर श्रीयुत अरविंद घोष पुण्यास आले. राष्ट्रीय पक्ष व नेमस्त पक्ष या विषयावर केसरी कचेरीच्या मैदानात त्यांचे जाहीर व्याख्यान झाले. अण्णासाहेब अध्यक्षस्थानी होते. अरविंदांचे व्याख्यान सुरू झाल्यानंतर, लोकमान्य सभेस आले. घोष यांचे व्याख्यान ऐकण्यात श्रोतवृंद तल्लीन झाला होता. अण्णासाहेब यांनी फारच मार्मिक असा थोडक्यातच समारोप केला. शांततेच्या मार्गाने कार्य सफल होत नाही असा अनुभव आल्यावर जहाल उपाय योजावे लागतात असेच त्यांनी सांगितले. महाभारतातील श्रीकृष्णशिष्टाईचे उदाहरण दिले. तिघांचीही भाषणे इंग्रजीतूनच झालीत. अण्णासाहेबांचे इंग्रजी भाषेवर किती प्रभुत्व होते हे या प्रसंगी दिसून आले.

अण्णासाहेब त्या काळचे बी. ए.* व एल. एम. अँड एस. होते. ते मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजच्या मासिकाचे संपादक असल्याचे मी ऐकिले होते. मात्र त्यांनी कधीही अॅलोपॅथीचा उपचार रोग्यास सांगितला नाही. त्यांचा आयुर्वेदाचा अभ्यास अतिशयच गाढ होता. आठवड्यातून दोन दिवसच सर्व रोग्यांना आयुर्वेदिक उपचार

* श्री. अण्णासाहेब हे एल्.एल्. बी. ची परिक्षा उत्तीर्ण झाले होते.

आणि औषधे विनामूल्य सांगत असत. हजारो लोकांनी त्या औषधांपासून लाभ घेतला. पुण्यातील सार्वजनिक सभांतून लोकमान्य टिळक किंवा शिवराम महादेव उर्फ अण्णासाहेब परांजपे यांच्या व्याख्यानास अण्णासाहेबांचीच अध्यक्षस्थानी योजना होत असे.

* *

## श्री. अ. द. लिमये

[ श्री. लिमये यांनी श्री. बालगंधर्व यांस अण्णासाहेबांची आठवण विचारली. श्री. बालगंधर्व यांचे वास्तव्य मधून मधून पुण्यास असल्यामुळे, त्यांचा व बालगंधर्वांचा काही संबंध आला असावा. ही बालगंधर्वांनी सांगितलेली आठवण, श्री. लिमये यांनी अपल्या शब्दात लिहिली आहे. ]

सूर्योदयापूर्वी पहाटे उठून स्नान वगैरे धार्मिक विधी उरकून सोवळयाने औदुंबर वृक्षाला तीन प्रदक्षिणा घालावयाच्या, आणि औदुंबराजवळ उभे राहून, आपल्या पायाच्या गुडघ्याच्या खाली व पाउलाच्या वर असे माप घेऊन, त्या वृक्षाला चाकूने तीन खाचा पाडून तो चीक आठ दिवस दाताच्या हिरड्यांना लावला असता आयुष्यभर दात पडत नाहीत. हा प्रकार ज्यांचे दात संपूर्ण असतील त्यांनी व इतरांनीही करावयास हरकत नाही.

* *

---

**टीप**:—श्री. लिमये यांनी सांगितलेला हा प्रयोग सौ. आशा सोहनी, या आठवणीचे संग्राहक श्री. दातार यांची कन्या, यांच्या पडू पहाणाऱ्या दातांवर केला गेला व तो यशस्वी झाला. दात हलण्याचे थांबले.

# शंकर सदाशिव (ऊर्फ नानासाहेब) दांडेकर
## अमरावती

[ श्री. नानासाहेब ऊर्फ शंकर सदाशिव दांडेकर हे अमरावतीस शिक्षक असलेल्या कै. सदाशिव महादेव दांडेकर यांचे ज्येष्ठ पुत्र. श्री. अण्णासाहेब ज्यांस गुरुस्थानी मानीत असत, त्या महादेव अनंत दांडेकर यांचे कै. सदाशिव महादेव हे चिरंजीव. श्री. नानासाहेब हे अमरावतीस वैद्यकी करतात. परंपरेने त्यांस अण्णासाहेबांची काही औषधे माहीत आहेत. श्री. दांडेकर यांस अण्णासाहेबांच्या काही आख्यायिका ऐकून ठाऊक आहेत. त्या प्रायः ' इति श्रूयते ' या सदरातील असल्या तरी वाचकांस विश्वसनीय वाटतील अशी अपेक्षा आहे. ]

॥ श्री ॥

मी ज्या काही आठवणी देणार आहे, त्या देण्यापूर्वी, चार शब्द लिहिणे जरूर आहे. कै. नथ्थू राघो पाटील, हे माझे वडील श्री. सदाशिव महादेव दांडेकर, उपाख्य बापु दांडेकर, ह्यांचे जवळच लहानाचे मोठे झाले. पहिल्याने माझे वडिलांचा, पाटील बुवांचे एक खाजगी शिक्षक म्हणून ओळखीस प्रारंभ झाला. त्यावेळी माझे वडील हे मलकापुरास, एक राष्ट्रीय शाळा चालवीत असत व त्या शाळेतील पाटील हे एक विद्यार्थी. लहान वयात पाटीलबुवांचा स्वभाव फार हूड व खोडकर असल्यामुळे, ही असामी सहज दुरुस्त होईल असे श्री. बापूंना वाटेना व त्याचबरोबर श्री. बापूंचा असाही एक सद्‌हेतू असे की त्यांचे सहवासात जे कोणी येतील, त्यांस ते श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांचेकडे नेत. त्याप्रमाणे पाटीलबुवांनाही अण्णासाहेबांकडे नेले व पुढे गंमत अशी झाली की पाटील हे नंतर श्री. अण्णासाहेब

यांसच जास्त चिकटले, इतके की वर्षातील बहुतेक काल ते पुण्यात घालवीत. श्री. अण्णासाहेब यांचे हयातीपर्यंत हा क्रम चालू होता, त्यामुळे श्री. अण्णासाहेबांचे खाजगी जीवनातील पुष्कळशा गोष्टी पाटीलबुवा ह्यांचे शिवाय होतच नसत. परसाकडेस जाण्यासारख्या साध्या गोष्टीत देखील पाटील व सरदारसिंग (हेही श्री. अण्णासाहेब यांचे जवळ पुष्कळ वेळ राहणारे गृहस्थ होते) ह्याशिवाय अडत असे. पाटीलबुवांचा इतका निकट संबंध आल्यामुळे त्यांनी सांगितलेल्या आठवणींमध्ये किंचितही अवास्तव अगर अतिरंजित वर्णन नसे व दुसरी म्हणजे पाटीलबुवांचा पिंडच जरा संशयी व सर्व गोष्टी तावून-सुलाखून पाहण्याचा असल्यामुळे, त्यांनी श्री. अण्णासाहेबांनासुद्धा पुष्कळ वेळा हेतुपुरःसर त्रास दिला असे ते सांगत. अशा चोवीस तास जवळ राहणाऱ्या माणसाने सांगितलेल्या अशा ह्या आठवणी असल्यामुळे मी त्या जास्त प्रमाण मानतो. श्री. पाटील ह्यांचा कैलास-वास १९५० साली झाला. आता या गोष्टीला १७ वर्षे होऊन गेल्यामुळे क्वचित् कोठे एखादे नांव अगर प्रत्यक्ष तारीख ह्या गोष्टीत जरी किंचित् फरक पडत असला तरी त्या गोष्टी घडलेल्या आहेत ह्यांत मात्र अवाक्षरही असत्य नाही. आमच्या लहानपणी, ते श्री. अण्णासाहेबांनंतर श्री. बापूंकडे नेहमी येत व बापूंना ते पितृस्थानी मानीत. तेव्हा हा एक बापूंचा मुलगाच अशा तऱ्हेने ते बापूशी वागत व बापूंचे नंतर आमचा एक भाऊ ह्या नात्यानेच ते अखेर-पर्यंत राहिले. जेव्हा जेव्हा ते आमचेकडे येत तेव्हा श्री अण्णा-साहेबांच्या गोष्टी ऐकण्यात कित्येक दिवस-रात्री निघून जात. त्यांचा आमचे येथील मुक्काम म्हणजे आम्हाला एक मेजवानीच असे.

(१) श्री. पाटीलबुवा पहिल्याने जेव्हा श्री अण्णासाहेब यांचेकडे गेले तेव्हा श्री अण्णासाहेबांचे दर्शनास येणाऱ्या लोकांचे गर्दीवरून हे साधू आहेत अशी त्यांची खात्री झाली, पण मूळचा स्वभाव संशयी असल्यामुळे तो त्यांस स्वस्थ बसू देईना. हे खरेच साधू आहेत की लोकांनी उभे केलेले एक 'फॅड' आहे असे त्यांस वाटे व म्हणून त्यांचे खोडकर स्वभावाने उचल खाल्ली व श्री अण्णासाहेबांना त्रास देण्याची एक क्लृप्ती त्यांनी काढली. तो प्रकार असा की श्री. अण्णासाहेब ओलेत्याने औंदुबरास प्रदक्षिणा घालीत व ते तसे प्रदक्षिणा घालीत असले म्हणजे पाटीलबुवांनी मुद्दाम परसाकडेस जाऊन शौचाहून आल्यानंतर हातपाय न धुता अशुचि अवस्थेत जाऊन श्री. अण्णासाहेबांचे पायावर डोके ठेवावे व असे त्यांनी केले म्हणजे श्री. अण्णासाहेब नुसते किंचित् स्मित करीत. पाटीलबुवांचा हा क्रम कित्येक महिने चालला. पाटीलबुवांना वाटे की, एक दिवस अण्णासाहेब खूप रागावतील व "रोज रोज हे काय चालविले आहे" असे म्हणतील, १०-५ शिव्या देतील व "जा माझे घरून निघून" असे काही तरी म्हणतील. पण कित्येक महिने लोटले तरी श्री. अण्णासाहेब रागावत नाहीत हे पाहून पाटीलबुवांनाच एक दिवस असा नमस्कार करताना खूप हसू आले व ते श्री. अण्णासाहेब यांकडे पाहतात तो अण्णासाहेब त्यास म्हणाले, "अरे वेड्या ! तुझ्या स्पर्शाने मला अशुचिता येण्याऐवजी, माझ्या स्पर्शाने तुलाच शुचिता येईल." हे श्री अण्णासाहेबांचे अगदी शांत मनाने दिलेले उत्तर ऐकून पाटीलबुवांना आपण दिलेल्या

त्रासाबद्दल अतिशय वाईट वाटले व त्या दिवसापासून हा क्रम बंद पडला. पण ह्या प्रसंगाने पाटीलबुवा मात्र श्री. अण्णासाहेबांचे जास्त निकटवर्ती राहू लागले.

(२) श्री. बाबासाहेब पटवर्धन म्हणजे श्री. अण्णासाहेब ह्यांचे चिरंजीव. ह्यांचे लग्नाचे वेळी पाटीलबुवांनी जवळ जवळ चारपाच पिपे तूप स्वतःचे देखरेखीखाली घरी तयार करवून पुण्यास नेले व त्या तुपाचा वापर लग्नाचे वेळी करण्यात आला. पुरणपोळीचा बेत होता व पंक्तीतून तुपासाठी वाट्या दिल्या होत्या. तूप इतके साजुक व इतके भरपूर वाढण्यात आले होते की जेवणानंतर कित्येकांचे ताटातून तुपाच्या वाट्या भरलेल्याच राहिल्या होत्या. तेव्हा घरातील काही बायकांचे डोक्यात अशी कल्पना आली की हे वाट्यातून राहिलेले मोगऱ्याचे कळ्यासारखे तूप, वाया कसे घालवयाचे ? तेव्हा ते सर्व एका ठिकाणी करून, तापवून, गाळून, पंक्तीचे शेवटी जी गडीमाणसांची पंगत बसावयाची होती त्यांस हे उष्टे तूप वाढण्यात यावे. त्याप्रमाणे ती पंगत बसली. पाटीलबुवा कुणबी व वय पोरसवदा त्यामुळे त्यांचा नंबर त्या पंक्तीत लागला. दैवदुर्विलास असा की, ज्या मनुष्याने एवढा खटाटोप करून हे तूप आणले होते त्याचेच पोळीवर हे उष्टे तूप वाढले गेले. ही गोष्ट श्री अण्णासाहेब यांस कळली—कोणी सांगितली नाही —ते घाईघाईने पाटीलबुवापाशी आले व म्हणाले, " नथ्थू हा अपराध माझा आहे. याबद्दल तू मला क्षमा कर. " तेव्हा पाटील बुवा श्री अण्णासाहेबांना म्हणाले, " मी हे तूप उष्टे समजत नाही. मी ह्याला तुमचे येथील प्रसाद समजतो. तुम्हाला त्या करता वाईट वाट-

ण्याचे काहीही कारण नाही." पण ह्या प्रसंगाने दोघांनाही एक-मेकांच्या अंतःकरणाची खरी ओळख पटली.*

(३) एके दिवशी पाटील व सरदारसिंग हे नेहमीप्रमाणे श्री अण्णासाहेब शौचास गेले असता त्यांचेबरोबर होते. रात्री २ किंवा २॥ वाजण्याचा सुमार होता व हे दोघेजण कंदील घेऊन शौच कूपाजवळ उभे होते. जवळच्या झुडपात एक मोठा साप असल्याची चाहूल या दोघांना आली व त्यांनी कंदील घेऊन तो साप शोधून काढला. तो चांगलाच मोठा होता व ह्या दोघांचा विचार त्याला मारण्याचा होता. इतक्यात श्री अण्णासाहेब शौचकूपातून बाहेर आले व ह्या मुलांना "सापाला मारू नका" असे म्हणू लागले. साप जागीच फणा काढून बसला होता. श्री अण्णासाहेब जवळ आले त्याबरोबर तो साप अण्णासाहेबांना आडवा आला. ह्या मुलांना साप श्री. अण्णासाहेब यांस चावेल असे भय वाटू लागले व अण्णासाहेब मात्र त्या सापाला म्हणत होते "थोडे थांबा! मी तुम्हाला पाहतो." सापाला वाटे की अण्णासाहेब आपणाला न पाहता जातात व तो त्यांचे पायात अधिक अधिक घोटाळू लागला. श्री अण्णासाहेब सापाला पुनः म्हणाले, "मी परसाकडून आलो आहे पाय धुतो व

---

* तूप अतिरिक्त वाढल्यामुळे हा प्रकार झाला. परंतु एका द्रविडाच्या घरी पानात वाढण्यात येणारी धार योगबलानेच पहावी लागत असे. याचे वर्णन एका सुभाषितात आहे ते असे :—

आनंदतांडवपुरे द्रविडस्य गेहे
चित्रं वसिष्ठवनिता[1] सममाज्यपात्रं
विद्युल्लतेव परिनृत्यति तत्र दर्वी[2]
धारां विलोकयति योगबलेन सिद्धः !

(१) अरुंधतीच्या ताऱ्याएवढे (२) पळी.

मग तुम्हाला पाहतो." श्री अण्णासाहेबांचा मानस असा की भगवंताने स्वीकार केलेल्या ह्या उरग योनीतील जीवाला आपण अशा अशुची अवस्थेत कसे शिवावे? पण सापाने अधिकच हट्ट धरल्यामुळे नाइलाज होऊन अण्णासाहेबांनी मुलांचे हाती पाय धुण्याचे पाणी तेथेच बोलाविले व पाय धुवून मग त्या सापाला त्यांनी स्पर्श केला. तो साप देखील काही खळबळ न करता अण्णासाहेबांना पाहू देत होता. त्या सापाला कोठेतरी मार बसल्यामुळे त्याचे अंगावर खूप सूज आली होती म्हणून पाटीलबुवाला घरात जाऊन आंबेहळद उगाळून आणण्यास सांगितली. त्याप्रमाणे आंबेहळद उगाळून आणल्यावर सापाला ती लावावयाची कशी? हा प्रश्न पडला. श्री अण्णासाहेबांची नखे खूप वाढलेली असत. तेव्हा स्वतः लावण्याचा प्रयत्न केला तर ती नखे त्या सापाला लागतील म्हणून सापाला ते म्हणू लागले की "ही मुले तुमचे अंगाला तो लेप लावतील." पण साप ही मुले जवळ गेली की एकदम फणा काढून त्यांचे अंगावर धावे. शेवटी पुनः नाइलाज झाला. मग श्री अण्णासाहेबांनी घरातून कात्री बोलावली व उजवे हाताचे बोटावरील नखे काढवून घेतली व नंतर त्या सापाला तो लेप स्वतःच लावला. हा सर्व प्रकार जवळजवळ अर्धा तास चालू होता. नंतर त्याला दूध पाजण्यात आले व शेवटी कंदील दाखवीत श्री अण्णासाहेबांनी त्या सापाची बोळवण केली. हा सर्व प्रकार पाहून ह्या मुलांची श्री अण्णासाहेब यांचे साधुत्वाबद्दलची पूर्ण खात्री पटली.

(४) श्री अण्णासाहेब यांचे घरी एक पोपट होता. त्यावर अण्णासाहेबांचा फार लोभ होता. देवाची पूजा झाली म्हणजे ते स्वतःच त्या पोपटाला आरती देत, त्याचे कपाळाला आपले हाताने अंगारा लावीत व एक खडीसाखरेचा खडा त्याला प्रसाद म्हणून

खाऊ घालीत. असा क्रम रोज चालत असे. एकदा पिंजरा धुताना, पिंजऱ्याचे दार उघडे राहिले व तो पोपट बाहेर उडून गेला. तीन चार दिवस घरी आला नाही. पण एवढ्या काळात अण्णासाहेबांचे खाणे-पिणे देखील जवळ जवळ बंद पडल्यासारखे झाले. जो कोणी येई त्याला "आपला पोपट पाहिलात का ?" म्हणून ते विचारीत व पाटीलबुवा व सरदारसिंग यास त्या पोपटास पाहण्याकरता पाठवीत. पण ही मुले त्या पोपटास पाहणार कुठे ? व ते साहजिकच होते. तो बसणार झाडावर; ही मुले चालणार रस्त्यावरून; त्यांना तो कसा दिसावा ? तीन चार दिवसांनंतर कोणाला तरी जोगेश्वरीचे बोळातील एका झाडावर त्याचा आवाज ऐकू आला व त्याने ही वर्दी अण्णासाहेब यांस दिली. त्याबरोबर अण्णासाहेब, पाटीलबुवा, सरदारसिंग, हे त्या पोपटाचा पिंजरा व त्याचे खाण्याचे पदार्थ घेऊन पोपट जेथे होता तेथे गेले व अण्णासाहेबांना पाहिल्याबरोबर व त्यांची हाक ऐकल्याबरोबर पोपट अण्णासाहेबांचे खांद्यावर येऊन बसला. अगदी पिता-पुत्राची भेट व्हावी तद्वत् त्याला कुरवाळीत अण्णासाहेबांनी त्याला पिंजऱ्यात घातले व घरी आणले. अण्णासाहेब असे म्हणत की पोपटाने त्या तीन चार दिवसात काही खाल्ले नव्हते. असा काही काळ गेल्यावर पोपटाची आयुष्य संपण्याची वेळ आली. मरते वेळी त्या पोपटाची इच्छा अशी की श्रीअण्णासाहेबांचे हातात असताना प्राणोत्क्रमण व्हावे. ही गोष्ट श्री अण्णासाहेब यांस कळली. ते माडीवरून खाली आले व आरतीची वेळ नसतानाही श्रीमहाराजांची आरती करवली व नित्याप्रमाणे पोपटाला आरती दिली. आपले हाताने त्याचे कपाळास अंगारा लावला व प्रसादाचा खडीसाखरेचा खडा जेमतेम त्याचे चोचेत दिला. तेवढयात पोपटाने अण्णासाहेबांकडे एकदा पाहिले, व त्याचे नश्वर शरीर अण्णासाहेबांचे

हातात असतानाच त्याचे प्राणोत्क्रमण झाले. पण एवढ्यावर ही गोष्ट थांबली नाही. त्यानंतर अण्णासाहेब, पाटीलबुवा, सरदारसिंग, या तिघांनी त्याला ओंकारेश्वरावर नेले व तेथे त्याला पुरले. पाटीलबुवाला अण्णासाहेब म्हणाले, "तो तुझा पूर्वज होता. तुला त्याचेकरता एक दिवस सुतकही पाळले पाहिजे." त्याप्रमाणे पाटीलबुवांनी एक दिवस सुतक पाळले. त्या पोपटाला वागविण्यात देखील जी आत्मीयता अण्णासाहेबांचे ठिकाणी दिसत होती ती शब्दांचे चौकटीत बसविताच येणार नाही.

(५) एकदा श्री अण्णासाहेबांबरोबर पाटील वगैरे मंडळी धुळ्यास गेली असता अण्णासाहेबांस रात्री स्नान करण्याची इच्छा झाली. उन्हाळ्याचे दिवस होते. शुद्ध पक्षाची रात्र असल्यामुळे चांदणेही होते. धुळ्याची नदी पूर्णपणे आटलेली होती. मध्ये कोठे झिरे खणले होते, पण त्यांतही पाणी नव्हते. अशा परिस्थितीत अण्णासाहेब म्हणाले "आपण नदीवर स्नान करू." पाटील वगैरे या लोकांनी नदी पूर्ण कोरडी असल्याबद्दल त्यांना सांगितले. तरी ते म्हणाले, "अरे! सापडेल कोठे तरी स्नानापुरते पाणी. चल तर खरं!" त्यांचे म्हणण्याप्रमाणे एक दोन बादल्या, पंचा वगैरे घेऊन ही मंडळी नदीवर गेली. चांदण्यात इकडे तिकडे पाहिले पण पाण्याचा कोठे पत्ता नव्हता. तेव्हा अण्णासाहेब म्हणाले, "अरे नथ्थू! एकादा कामटीचा तुकडा तर पहा. पाहू जरा रेती उकरून." व खरोखरीच असा थोडा प्रयत्न केल्यानंतर एके ठिकाणी पाणी वर आले. या सर्वांनी तेथे स्नाने केली. आपले कपडे धुतले व अण्णासाहेबांनी पलीकडे असलेल्या गणपतीचे मूर्तीजवळ आपले आन्हिक उरकले. (सध्या जेथे श्रीगजाननाचे देऊळ आहे, तेथे त्यावेळी नुसती शेंदूर लावलेली एक श्रीगजाननाची मूर्ती होती.) पाटील वगैरे या

लोकांनी दुसरे दिवशी सकाळी उठून त्या जागेवर पुनः जाऊन पाहिले तर तेथे पाण्याचा एक थेंबही नव्हता. पाटील असे सांगत की या महात्म्याचे स्नानाकरताच भागिरथी तेथे थोडा वेळ अवतरली होती.

(६) रा. भाऊसाहेब लंबे, राहणार बाळापूर, नांवाचे एक गृहस्थ श्री अण्णासाहेबांकडे राहत असत. त्यांस वेड लागले होते व त्यावर उपाय करण्याकरता, ते अण्णासाहेबांचे सहवासात राहत. पण अण्णासाहेबांनी त्यांस औषध दिले नाही. "अरे! भोग भोगून टाक. एक दिवस श्रीमहाराजांचे कृपेने बरा होशील" असे ते रा. लंबे ह्यांस म्हणत. पुष्कळ दिवस पुण्यात राहून अण्णासाहेब औषध देत नाहीत, या गोष्टीमुळे रा. लंबे नेहमी उदास असत. एक दिवस रा. लंबे ह्यांनी "नरसोबाचे वाडी येथे श्रीवासुदेवानंदसरस्वती* यांचेकडे जाऊं कां?" म्हणून विचारले. तेव्हा अण्णासाहेबांनी परवानगी दिली. पण ह्या गृहस्थ वेडा, एकटा कोठे जाईल, अशी त्याची करुणा येऊन अण्णासाहेबांनी सरदारसिंग ह्यास रा. लंबे ह्यांचेबरोबर देऊन दोघांची रवानगी नरसोबाचे वाडीस केली. त्या वेळी श्रीवासुदेवानंद

* श्रीवासुदेवानंद सरस्वती— जन्म शके १७७६ समाधी शके १८३६, सन १९१४. हे टेंबे स्वामी या नावानेही प्रख्यात होते. स्वामींचे नरसोबावाडीस नेहमी जाणेयेणे असे व तेथेच त्यांस प्रथम दत्तदर्शन झाले. स्वामी आपले आचार कटाक्षाने पाळीत असत. यांचेही बरेच चमत्कार प्रसिद्ध आहेत. काशीचे एक संन्यासी मरणापूर्वी त्यांच्या भेटीची अपेक्षा करीत असता, ते जाणून त्यांच्या देहपाताच्या अगोदर चार तास त्यांची भेट घेऊन त्यास समाधान दिले. स्वामी वेदवेत्ते असून, ज्योतिष व वैद्यक ही शास्त्रेही त्यांस अवगत होती. स्वामींची ग्रंथरचना विपुल आहे. माणगावास (सावंतवाडी) येथे एक दत्तमंदिर त्यांनी बांधले आहे.

सरस्वतींचा मुक्काम वाडीस होता. यथाकाल हे लोक वाडीस गेल्यावर मुक्कामावर जाऊन पोहोचतात, तो घरांतून एक मनुष्य बाहेर आला व त्याने "आपण पुण्याहून आलात का?" अशी पृच्छा केली. होकारार्थी उत्तर मिळाल्याबरोबर तो म्हणाला "स्वामीमहाराज आज येथे आहेत. पण त्यांनी तुमचेसाठी एक निरोप सांगितला आहे. तो असा 'आल्यापावली लगेच पुण्यास जा. जेथून आलांत तेथे काय कमी आहे, म्हणून माझेपर्यंत येण्याची खटपट केली? याउपर हट्टाने माझे दर्शनाचा प्रयत्न कराल तर शाप देईन.'" हा निरोप ऐकल्याबरोबर दोघेही घाबरले व त्याच टांग्याने पुनः परत फिरले. पुढे काही दिवसांनी रा. लंबे, अण्णासाहेबांचे म्हणण्याप्रमाणे, काही औषधपाण्याशिवाय बरे झाले.

(७) एके वर्षी आळंदी येथील पौष शु. १५ ची श्रीमहाराजांची पुण्यतिथीची यात्रा संपवून धुळेकर मंडळी नेहमीप्रमाणे अण्णासाहेबाकडे परत आली होती, व त्यानिमित्त अण्णासाहेबांनी आपले घरी श्रीमहाराजांची पूजा वगैरे करून नैवेद्य केला होता. गोड म्हणून बुंदीचे लाडू केले होते. दिवसभर सर्व लोकांची जेवणे झाल्यावर, संध्याकाळी अण्णासाहेब माडीवर बसले असता, स्वयंपाकघरांत व त्यावेळेचे देवघरात खूप मुंग्या झाल्या. इतक्या की त्या दोन्ही खोल्यांत जवळ जवळ एक इंच जाड मुंग्यांचा थर आंथरल्यासारखा दिसत होता. ही गोष्ट मुलांना कळल्याबरोबर सर्व मुले त्या मुंग्यांवर रॉकेल टाकून त्यांना मारण्याचे बेतात होती. एवढ्यात अण्णासाहेब माडीवरून खाली आले व मुलांना म्हणाले, "अरे हे काय चालविले आहे? मुंग्यांवर रॉकेल टाकू नका. हे सर्व परा-सृष्टीतील लोक श्रीमहाराजांचा प्रसाद घेण्याकरता येथे आले आहेत." असे म्हणून अण्णासाहेबांनी नथ्थु पाटलास बाजारातून फुले आणण्यास पाठविले व मोठ्या कष्टाने

त्या मुंग्या हाताने दूर करत करत, बुंदीचे लाडू ठेवले होते, त्या पेटी-पर्यंत जाऊन, त्यांतील चार सहा लाडू काढून आणले व त्यांचा भुगा करून तो सर्व भुगा त्या मुंग्यांवर फेकला. नंतर त्या मुंग्यांची आरती केली व त्यांना गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्या वगैरे वाहून, जवळ जवळ एक तासभर हात जोडून त्या मुंग्यांकडे पहात उभे राहिले. आणि खरोखरीच आश्चर्याची गोष्ट ही की एक दीड तासानंतर त्या सर्व मुंग्या नाहीशा झाल्या. त्या मुंग्या म्हणजे परा-सृष्टीतील लोकच प्रसाद घेण्याकरता मुंग्यांचे रूपाने आले होते. ही त्यांची नितांत श्रद्धा त्यांचे वागण्यावरून अनुभवाला आली.

(८) कै. किसन रूपचंद दलाल, उपाख्य लालासाहेब, पोष्ट मास्तर, मलकापूर, या नांवाचे एक गृहस्थ श्री अण्णासाहेबांना गुरु-स्थानी मानीत. माझे वडील कै. बापूसाहेब दांडेकर, यांचेजवळच रा. दलाल उर्फ लाला लहानाचे मोठे झाले व रा. बापूंच्या मुळेच रा. लाला यांचा श्री. अण्णासाहेबांशी परिचय झाला. नोकरीमुळे पुष्कळ दिवसात अण्णासाहेबांचे दर्शन झाले नव्हते म्हणून ते एका वैशाख शु० ११ स धुळे येथे गेले. कारण श्री अण्णासाहेब धुळे येथील श्री पद्मनाभस्वामी यांचे पुण्यतिथीस (वैशाख शुद्ध ११) दरवर्षी धुळ्यास येत. रा. लाला धुळ्यास आले त्याच वेळी त्यांची तब्यत ठीक नव्हती व धुळ्यास आल्याबरोबर त्यांस कॉलराच झाला. ते अण्णासाहेब यांचे दर्शनास गेले तेव्हा वै. शु. १२ होती व मठात जेवण्याची गडबड होती. अण्णासाहेबांना भेटल्याबरोबर "अरे! प्रसादाला चल!" असे अण्णासाहेब त्यांस म्हणाले. तो शब्द कसा मोडावा, ह्या भीतीने दलाल जेवावयास बसले. या जेवणाचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला व दलालांचा कॉलरा विकोपास गेला. दुसरे दिवशी सर्व लोक धुळयाहून संध्याकाळचे गाडीने परत निघणार होते. त्याच गाडीने रा.

दलाल देखील मलकापुरास जाणार होते. पण धुळे ते चाळीसगाव याचे दरम्यान दलाल ह्यांस ३–४ ओकाऱ्या व ५–६ जुलाब झाले व अवस्था अशी झाली की गाडीचे डब्यात असलेल्या संडासमध्ये जाणे देखील सुधरेना. गाडी चाळीसगांव येथे पोहोचली तोपर्यंत दलाल अत्यवस्थच झाले. चाळीसगांवचे स्टेशनवर अप्–ट्रेन व डाऊन-ट्रेन, या दोन्ही गाड्या आपआपले प्लॅटफॉर्मवर येऊन उभ्या होत्या, तेव्हा भुसावळकडे जाणाऱ्या व मुंबईकडे जाणाऱ्या लोकांची एकच गर्दी झाली. मुंबईचे गाडीत चढता चढता श्री अण्णासाहेबांस रा. दलाल कॉलऱ्याने अत्यवस्थ झाल्याचे कोणीतरी सांगितले. हे ऐकल्यावर अण्णासाहेबांना गाडीत स्वस्थ बसवेना. ते रॉंग साईडने खाली उतरले व दलाल बसले होते त्या डब्यात गेले. रा. दलाल यांचे अंगावरून हात फिरवला व म्हणाले, "घाबरू नकोस." श्री अण्णासाहेबांस पाहून रा. दलाल यांस आनंद झाला व ते अण्णासाहेबांस म्हणाले, "मला औषध द्या. मी ह्या कॉलऱ्याने मरणार." तेव्हा वेळ अशी होती की अण्णासाहेबांजवळ काहीच नव्हते. अंगात घालावयाचा सदरा देखील शरीरावर नव्हता. तेव्हा रा. गणपतीबुवा नवले ह्यांस अण्णासाहेबांनी आपला अंगरखा आणण्यास सांगितले. त्याचप्रमाणे धावपळ करून अंगरखा आणला. पण त्या अंगरख्याचे खिशात औषध थोडेच असणार ? खिसे तपासून पाहिले, तेव्हा एका पाकिटात एक लहानसा हरबऱ्याएवढा सुंठेच्या वडीचा तुकडा सापडला. तो अण्णासाहेब यांनी रा. दलाल ह्यांचे तोंडात घातला व म्हणाले, "अरे लाला ! हा श्रीमहाराजांचा प्रसाद आहे. ह्याने तू बरा होशील." तेव्हा रा. दलाल त्यांस एकदम म्हणाले "अण्णासाहेब ! हा तर सुंठेच्या वडीचा तुकडा आहे, हे कॉलऱ्याचे औषध थोडेच आहे. तुम्ही माझी नुसती समजूत घालून, रवानगी करीत आहात." तेव्हा

श्रीअण्णासाहेब त्यांस हसून म्हणाले, "अरे वेड्या ! मी खोटे बोलत नसतो. ह्या श्रीमहाराजांचे प्रसादाने तू खरोखरीच बरा होशील." अशी रा. दलालची समजूत घालून, ते जेमतेम आपले गाडीत जाऊन बसतात, तोच गाडी सुरू झाली. पुढे भुसावळ येईपर्यंत रा. दलाल ह्यांच्या जुलाब व ओकाऱ्या थांबल्या तरी पण मलकापूरला येईपर्यंत रेल्वे पोलिसांनी चौकशी करून हा कॉलऱ्याचा पेशंट म्हणून, त्यांची मलकापूर येथे क्वारंटाईनमध्ये रवानगी केलीच. पण जुलाब थांबले असल्यामुळे एक दोन दिवस क्वारंटाईनमध्ये राहिल्यानंतर त्यांची मुक्तता झाली. केवळ एका हरबऱ्याचे तुकड्याएवढ्या सुंठेच्या वडीच्या तुकड्याने मी कसा बरा झालो हे जेव्हा रा. दलाल सांगत, तेव्हा त्यांचे डोळे पाण्याने भरून येत व बोलता बोलता ते श्रीअण्णासाहेबांचे आठवणीने निःस्तब्ध होत. रा. दलाल या प्रसंगानंतर ३०-३२ वर्षे हयात होते. शेवटी ते मलकापूर येथेच कैलासवासी झाले.

(९) आळंदीचा उत्सव अगर धुळ्याचा उत्सव ह्यांस जाणे म्हणजे अण्णासाहेबांचे मन अगदी उचंबळून येत असे. ओळखीचे बहुतेक लोकांस "काय रे! उत्सवास येणार ना" असे ते विचारीत व साहजिकच, सवड व अनुकूलता असली तर बहुतेक लोक त्यांचे-बरोबर जात. पण धुळ्याचे उत्सवास जाणे म्हणजे पुणे ते धुळे प्रवास व ही गोष्ट खर्चाची, व पुष्कळांना जरा जडच वाटत असे. असे झाले म्हणजे काही अण्णासाहेबांस म्हणत की "यावेसे तर वाटते पण पैशाचे कसे काय जमेल ते पाहतो." श्रीअण्णासाहेबांना हा परिवार बरोबर असल्याशिवाय उत्साहही वाटत नसे. मग जो कोणी बरोबर असावा असे त्यांस वाटे, त्यांस ते म्हणत "तू पाटील-बुवाला सांगून ठेव." असे अण्णासाहेबांनी म्हटले व तो निरोप पाटीलबुवा ह्यांस कळला म्हणजे पाटीलबुवा त्या इसमाचे पुणे ते धुळे

तिकिट काढीत. अशा तिकिटांची संख्या २० ते २५ पासून कधी कधी ५०–६० पर्यंत देखील जाई. पाटील या उत्सवाचे दिवसात पैशाची थैली घेऊनच तयार असे. इतका पैसा पडला तरी पाटील-बुवांचे मनात कधीही विकल्प येत नसे. [ पाटीलबुवांची अशी जिवंत श्रद्धा होती की आपले शेतात जे नेहमीपेक्षा तिप्पट–चौपट पीक येते, ते श्री अण्णासाहेबांकरताच श्रीमहाराज देतात. अशा मेळाव्यात अण्णासाहेबांचे बरोबर प्रवास करण्यास मिळावा याची हौस सर्वांनाच असे. कारण अण्णासाहेबासारखा मनुष्य जगात मिळणे कठीण. सहवास मिळाला तर तो इसम ( अण्णासाहेब ) आपलेशी मनमोकळेपणाने बोलणे कठीण व याउपर बोलला तर त्यांचे बोलणे आपल्याला समजावे, इतकी त्या महात्म्याचे ठिकाणी कळकळ सापडणे कठीण. कारण कित्येक साधू असे असतात की ते काही वेळ बोलतात पण ते इतके संदिग्ध असते की ते त्यांचे बोलणे समजून त्याचा उपयोग करून घेणे हे जवळजवळ अशक्य–प्रायच असते. तेव्हा असा सर्व सुयोग आल्यावर, तो कोण टाळणार? या उत्सवाचे दिवसात अण्णा-साहेब खूप प्रसन्न–चित्त असत व मग त्यांच्या श्रीमहाराजांच्या सह-वासातील आठवणी सांगण्यास त्यांना अगदी उधाण येत असे, इतके की लागोपाठ रात्री-चे-रात्री कोणीकडे जात तेही समजत नसे. संत लोकांचे सहवासात व त्यांतही खुद्द त्यांचे तोंडून गोष्टी ऐकण्यात काय आनंद असतो, हे सांगण्याचा प्रयत्न करणे हे देखील अशक्यच आहे. ज्या कोणा पुण्यपावन महाभागाला हा अपूर्व लाभ पूर्व सुकृतांचे पुण्याईने मिळाला असेल तोच ह्याची अपूर्वता समजू शकेल; इतरांना हे माझे लिहिणे देखील रुचणार नाही. पण इलाज नाही. मग असे श्री अण्णासाहेब प्रसन्न असताना धुळ्याचे श्रीपद्मनाभ स्वामींचे मठात बसून गोष्टी सांगू लागले की बैठक मोडू नये व अण्णासाहेबांनी व

जमलेल्या लोकांनी उठून जाऊ नये, म्हणून पाटीलबुवा वगैरे लोक, आंबे, कलिंगडे अगर खरबुजे ह्यांच्या गाड्या खरेदी करून व ती फळे त्या बैठकीत ठेवीत. व मग काय? एकीकडे खाण्याचा सपाटा व दुसरीकडे अण्णासाहेबांचे तोंडून निघणारी अमृतधारा आपले कानी पडावी म्हणून जमणाऱ्या गर्दीचा सपाटा, हे दृश्य फारच अपूर्व असे. आजही मला वाटते, जुन्या पिढीतील असे काही लोक धुळ्यात सापडतील, की जे ह्या गोष्टीची जीवंत हकीकत सांगू शकतील. श्री अण्णासाहेब हे एक नामांकित वैद्य, म्हणून त्यांस भेटण्याकरता टपलेले काही रोगी व ते साधु म्हणून त्यांचे दर्शनाचा लाभ घेण्याकरता उत्सुक असलेले काही साधक या धुळ्याचे उत्सवाची सारखी वाट पहात असत.

(१०) एकदा एक मनुष्य श्री. अण्णासाहेब यांस स्वतःची प्रकृती दाखविण्याकरता आला. वय ३०-३५ वर्षाचे असेल. चांगला तरुण व सुदृढ. त्याच्या हाताची बोटें वाकडी व वाढ न झालेली अशी दिसत असून, बोटांना येणारी नखे कुरतडलेली अशी येत असत व कोणतीही वस्तू हातात नीट घट्ट धरता येत नाही ही त्याची तक्रार होती. तो अण्णासाहेबांचे समोर नुसता बसला, तोंडाने एक अक्षरही बोलला नाही. फक्त त्याने आपले हात पुढे केले व अण्णासाहेब त्याकडे पहात राहिले. एखादा कुशल कारागीर जसा एखादे यंत्राचे, त्याचे खिळ्या-पट्टीपासून यथातथ्य स्वरूप जाणतो, त्याप्रमाणे मानव-शरीराचे ते अगदी अचूक निदान करीत. थोडा वेळ त्याकडे पाहिल्यावर अण्णासाहेब एकदम म्हणाले, "तुम्ही पिढयान्-पिढया कुंभाराचा धंदा करता, तुझ्या वडिलांनी ओल्या मातीत नेहमी काम केल्यामुळे तुझ्या शरीरावर हा परिणाम झाला." यावर तो मनुष्य हासून म्हणाला, "आम्ही कुंभार नाही. पण माझे वडील अगदी लहान-

पणापासून एका पॉटरीत काम करतात व तोच उद्योग मीही पण करतो. मीही एका पॉटरीत नोकर आहे." तेव्हा अण्णासाहेब म्हणाले, "अरे! नाव बदलले म्हणजे धंदा बदलतो का? दिवसभर संबंध ओल्या मातीशीच ना!" हे त्यांनी म्हटल्याबरोबर त्यांचे बुद्धीत एकदम प्रकाश पडला व आपण आपली काहीही हकीकत न सांगता अण्णासाहेबांनी ही पूर्वकालीन गोष्ट इतकी तंतोतंत कशी ओळखली ह्याचे त्या रोग्यास व इतर सर्वांनाच आश्चर्य वाटले. ते रोग्याला क्वचित्च हात लावीत व रोगी जरी आपली व्यथा तोंडाने सांगत असला तरी त्याचे बोलण्याकडे अण्णासाहेबाचे सर्व लक्ष असेच असेही नाही, तर ते रोग्याकडे नखशिखांत पहात व आपल्या भेदक दृष्टीनेच रोग्याच्या रोगाचे बहुतेक निदान करीत. हा रोगी पुढे बरा झाला किंवा नाही हे काही कळले नाही, पण औषध घेऊन मात्र तो गेला व पुण्यात ७-८ दिवस त्याचा मुक्काम होता, तोपर्यंत तो सकाळ-संध्याकाळ अण्णासाहेबांचे दर्शन घेऊन जाई. त्याची श्री अण्णासाहेबांचे ठिकाणी जडलेली भक्ति त्याचे डोळ्यात व वर्तनात मात्र स्पष्ट दिसत होती.

(११) दर गुरुवारी व रविवारी श्री अण्णासाहेबांकडे औषधाकरता रोगी येत. पहिल्या-पहिल्याने ते रोज औषध सांगत पण हा उपद्रव इतका वाढला की सकाळी ७ वाजल्यापासून तो रात्री १० वाजेपर्यंत, लोक संपावयाचे नाहीत. व त्यामुळे त्यांचा नित्याचा जीवनक्रमही कठीण होत असे. कारण रोगी संपल्यानंतर स्नान, त्यानंतर आन्हिक, त्यानंतर देवदर्शन, व मग रात्री दोन ते तीनचे सुमारास जेवण व थोडे कुठे आडवे होतात न होतात तोच त्यांचे आन्हिकाचा दुसरा दिवस सुरू होई. म्हणून ही रोज रोगी पाहण्याची प्रथा बंद करावी लागली व ते काम फक्त गुरुवार व रविवार या दोन

दिवशी चाले. त्यामुळे रोग्यांची फारच गर्दी होई. इतकी की रोग्यांना रांग लावावी लागे व एक एक जण पुढे येऊन, त्यांचे औषध लिहून झाले म्हणजे मग, दुसऱ्याने पुढे यावे असा क्रम चालत असे व कित्येक वेळा असे होई की, अण्णासाहेब आपले तंद्रीत असत व रोगी आपली तकलीफ सांगत असता अण्णासाहेबांनी डोळे मिटून घ्यावेत. असे डोळे मिटले म्हणजे, ५-१० मिनिटांपासून तो ४०-५० मिनिटे सुद्धा ते स्वस्थ बसत. व पुनः डोळे उघडले म्हणजे समोरील रोग्यास औषध सांगण्यास सुरुवात करीत. काही वेळा असे होई की समोरील मनुष्याने आपण संग्रहणीचे त्रासाने आजारी आहोत असे सांगितले असावे व डोळे उघडल्यावर अण्णासाहेबांनी त्याला क्षयाचा रोगी असे समजून औषध सांगण्यास सुरुवात करावी. पाटीलबुवा हे देखील ही औषधे टिपून घेण्याचे काम करीत असल्यामुळे त्यांना साधारण पुष्कळ रोगांवरची औषधे जवळ जवळ पाठच झाली होती. अण्णासाहेबांनी संग्रहणीचे रोग्याला क्षयाचा काढा कसा काय सांगितला ह्याबद्दल त्यांस आश्चर्य वाटे, पण त्या रोग्याचा बुद्धिभेद करावयाचा नाही म्हणून, ती चिठ्ठी रोग्याला देत. पण तो रोगी जाऊ लागला म्हणजे त्याचे नाव, गाव, खुलासेवार पत्ता वगैरे सर्व नीट टिपून ठेवीत, व सर्व गर्दी संपल्यानंतर अण्णासाहेबांस सांगत की, तुम्ही अमक्या संग्रहणीचे रोग्याला, संपूर्ण क्षयाचा काढा सांगितला. ह्यांत ह्या मुलांना फार भीती वाटे, पण अण्णासाहेब मात्र अगदी स्वस्थ रीतीने ते ऐकून घेत. एकदा दोनदा ते पाटीलबुवांना असे म्हणाले, " अरे ! नथ्थू तूं मला एक सांग की मी जी औषधे सांगितली, तीच तूं टिपून घेतलीस ना ! मग भलते औषध दिले गेले असे तुला वाटण्याचे काहीच कारण नाही. अरे ! श्रीमहाराज माझ्या तोंडून भलते औषध वदवणारच नाहीत." ही त्यांची श्रद्धा इतकी ठाम व पक्की होती

की, सांगितलेले औषध त्यांनी पुनः कधीच बदलले नाही आणि त्या बरोबरच ही मुले इतकी खट्याळ होती की, रोग एक व औषध भलतेच दिले गेले, अशा रोग्यांची पाटलाजवळ एक यादीच होती. पाटीलबुवांचा द्वाडपणा इतक्या पराकोटीचा की, त्या टिपून ठेवलेल्या पत्त्यावर पाटीलबुवाने पुष्कळ वेळा पत्रव्यवहार करून अगर काही वेळा रोग्यास प्रत्यक्ष भेटून, तो रोगी जिवंत आहे की त्याचे काही बरे वाईट झाले म्हणून मुद्दाम तपास करावा. असा पाटील-बुवांना एकही रोगी सांपडला नाही की जो दगावला अगर दुसऱ्या कोणत्या डॉक्टरकडे गेला. उलट ते रोगी त्याच औषधाने बरे होत व यथाकाल अण्णासाहेबांचे दर्शनास येत. असे प्रकार पुष्कळ वेळा दृष्टीस पडल्यामुळे औषध काय दिले जाते ह्या गोष्टीचे त्या मुलांचे मनातून तरी, महत्वच उडून गेले होते. " हे औषध घे व बरा झालास म्हणजे श्रीमहाराजांचे दर्शनास आळंदीस जा. " असे अण्णा-साहेबांचे तोंडून निघाले म्हणजे तो रोगी बरा होई व तो आळंदीस दर्शनास यथाकाल जाई.

( १२ ) श्री अण्णासाहेब यांकडे रोज येणारी मंडळी बरीच असत व त्यामुळे त्यांचे बैठकीतील मनुष्य तुटला असा प्रकार फार क्वचित होई. रात्री ९–१० वाजे पर्यंत ही ये–जा चालावयाची. काही ते साधू म्हणून त्यांच्या दर्शनास येत, काही ते नामांकित वैद्य म्हणून औषधोपचाराकरिता येत, काही ते एक राजकारणी म्हणून सल्ला-मसलत करण्याकरता येत व काही ते वकील म्हणून कायद्याचा सल्ला विचारण्याकरता येत, त्यामुळे त्यांचेशी बोलण्यास फारच थोडा वेळ मिळे, मग त्यांचे जवळ राहणारे लोक व त्यांना गुरुस्थानी मानणारे व नित्य–दर्शनोत्सुक लोक, यांना त्यांचा फार थोडा वेळ

हाती लागे. नुसते पायावर डोके ठेवावे व एखादे-दुसरे वाक्य त्यांशी बोलून आपले कामास जावे असेच होत असे. कारण इतक्यातून उरेल त्या वेळी त्यांचे आन्हिक. यांतही त्यांचा बराच वेळ जाई. मग त्यांचेशी बोलण्याची संधी, ते जेव्हा देव-दर्शनास निघत, अगर घरी परत आल्यावर जेव्हा एकांत मिळे तेव्हा मुले त्यांस काही विचारीत. श्री अण्णासाहेबांचा स्वभाव तसा फार बोलका नव्हता. पण एखादी गोष्ट सांगावयास लागले तर ती गोष्ट ह्या मुलांस सांगण्याकरता, जितक्या साकल्याने ती सांगावी लागणार असेल, त्यांत ते कधीही संकोच करीत नसत. एकदा त्यांचेजवळ राहणारे रा. भाऊसाहेब लंबे ह्यांनी श्री अण्णासाहेबांस विचारले की, " मी आपले समोर एकनाथी भागवत वाचू का ? " तर अण्णासाहेबांनी चटकन उत्तर दिले की, " ते काय आजीबाईचे शिळोप्याच्या वेळचे पुराण-श्रवण आहे काय ? " कदाचित अण्णासाहेबांनी हे ओळखले असेल की रा. भाऊसाहेब लंबे ह्यांस त्या भागवत-वाचनाचे भांडवल करून, आपण काही विशेष परमार्थ साधत आहोत असा देखावा करावयाचा असेल. पण असा हेतू मनात नसला व सात्विक उत्सुकतेचे पोटात जर कोणी एखादा प्रश्न विचारला तर ते एकच-एक गोष्ट काही दिवसचे दिवस लागोपाठ साकल्याने सांगत व ही त्यांची बोलण्याची वेळ म्हणजे बहुधा रात्री सर्व दिनचर्या आटोपल्यावर, जेव्हा सर्व शांत होई तेव्हा त्यांचे प्रसन्नतेला पूर येई व ती वेळ साधण्याकरता ही मुले दिवसा झोप काढून, रात्रीच्या गोष्टी ऐकण्याकरता तयार रहात. एकदा सहज " ज्ञान मनुष्यास कसे स्फुरते " असा प्रश्न विचारला असता, त्यांनी दोन तीन दिवस लागोपाठ तो विषय सांगितला. तो संवाद कोणी टिपून ठेवला नाही. पण त्याचा मथितार्थ असा होता की, श्री अण्णासाहेब म्हणाले, " ज्ञान हे पुस्तकांत नाही. पुस्त-

कांत किती ज्ञान साठविणार व गाडाभर पुस्तके वाचली तरी त्या ज्ञानाने मनाला शांती लाभणार नाही. म्हणून आमच्या वैदिक विचारसरणीमधे 'गुरुमुखात् विद्या' असे त्याचे वर्णन आहे. "ते म्हणत, ज्ञान हे चराचर सृष्टीत भरले आहे व ते मनुष्याचे ठिकाणी सूर्यकिरणापासून स्फुरते. जड सृष्टीचा विकास; पशु-पक्ष्यांमधे न शिकविता उदित होणारे ज्ञान; आणि आजच्या विज्ञान युगातील सर्व शोध, हे सर्व उष्णतेच्या पोटातूनच निघाले आहेत. ह्या सर्व उष्णतेची देवता 'सविता' ही आहे व त्या सूर्यकिरणाने हे ज्ञान भरलेले आहे." ते म्हणत "श्रीनरसिंहसरस्वती स्वामीमहाराज ह्यांचे 'स्वात्म–सौख्य' ह्या ग्रंथाचे ज्ञानकांडात १५ वी ओवी आहे.

**सूर्याचा प्रकाश झाला । अन्यत्र काय घेऊन आला ।**
**शब्दीं शब्द प्रगटला । प्रगटाकृती ॥** ॥ १५ ॥ ज्ञानकांड.

ह्या ओवीत ज्ञान मनुष्यापर्यंत कसे येते ह्याबद्दल ऊहापोह केला आहे." पुष्कळ उदाहरणे देऊन त्यांनी हे समजावून दिले की "प्रकाशलहरींचे रूपांतर, ध्वनि-लहरींत करता येते, व ध्वनि-लहरींचे ठिकाणी सृजनशक्ती आहे.* ह्या ध्वनि-लहरींचा इष्ट उपयोग करून घेण्याचे

---

* या संबंधात सर जेम्स जीन्स या विख्यात शास्त्रज्ञाचे उद्गार पहा : – The tendency of modern physics is to resolve the whole material universe into waves and nothing but waves. These waves are of two kinds : bottled up waves which we call matter, and unbottled waves, which we call radiation or light. The process of annihilation of matter is merely that of unbottling imprisoned wave energy and setting it free to travel through space. These concepts reduce

( टीप पुढील पानावर )

जे परिणत शास्त्र तेच 'मंत्रशास्त्र'. ह्या मंत्रांचे ठिकाणी ज्ञान-प्रसव-शक्ती आहे. तेव्हा आमचेकडील गुरु जे आपले शिष्याला देत, ते काही सर्व ज्ञानाची पुस्तके त्याबरोबर ते वाचीत नसत, तर त्यास ते मंत्र देत व त्या मंत्रोच्चाराचे योगे "शिष्यांचे मेंदूची 'ज्ञान-आकलन-क्षमता' ते उघडून देत." ते उदाहरण देत की, "बाप जेव्हा मुलाला आपले जवळची संपत्ती देतो तेव्हा तो तळघरातील एक-एक जिन्नस त्याला मोजून देत नाही, तर तळघराची किल्लीच त्याचे हवाली करतो व मग नुसता एक झटका मारला की सर्व भांडार मुलाचे हाती येते, तद्वत् श्रीमहाराज कृपा करतात तेव्हा—

"**अंतर्गृहीं लाविल्या दीपा। प्रकाश घे पा गृहभरी॥ ९॥**

अशी स्थिती करून देतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपले ज्ञानेश्वरीचे ९ वे अध्यायात असेच वर्णन केले आहे.

**मोटकें गुरूमुखिं उदैजत दीसे।**
**आणि हृदयीं स्वयंभ चि असे जैसें।**
**प्रत्यक्ष फावों लागे तैसें**
**आपैसेया॥ ४९॥** अध्याय ९.

गुरु मंत्रोपदेश करतात. गुरु काही शिष्याला एक एक शास्त्र शिकवत बसत नाहीत. तर फक्त असा मंत्र देतात की ज्या मंत्राचे उच्चाराने

---

(टीप मागील पानावरून)

the whole universe to a world of radiation, potential or existent, and it no longer seems surprising that the fundamental particles of which matter is built should exhibit many of the properties of waves

— Mysterious Universe : *Sir James Jeans;*
P. 99, 1937 Edition.

शिष्याचे आंगीची 'ज्ञान-आकलन-क्षमता' एकदम उद्दीपित होते. व ज्ञानाचा झरा शिष्याला त्याचे हृदयातच सापडून त्याचे समाधान होते." त्यांचे सांगण्याचा इत्यर्थ हा की, श्रीमहाराजांचे ठिकाणी श्रद्धा व त्यांचे स्मरण ह्याच दोन गोष्टी, मनुष्याला ज्ञान देण्यास समर्थ आहेत.

श्री अण्णासाहेब ह्यांचे तोंडून फार चांगले चांगले विषय ह्या मुलांना ऐकावयास सापडले पण कोणी ते टिपून न ठेविल्यामुळे ते अप्रकाशित राहिले.

श्री. अण्णासाहेबांचे ठिकाणी, रा. नथ्थु राघो पाटील तथा पाटीलबुवा ह्यांची अपार श्रद्धा होती. श्री. अण्णासाहेबांचे पश्चात् जेव्हा, श्री. अण्णासाहेबांची आठवण म्हणून, पुष्कळ लोकांनी त्यांच्या वापरणीतील वस्तु, रा. बाबासाहेब पटवर्धन ह्यांस मागून नेल्या. तेव्हा कोणी त्यांची काठी नेली; कोणी त्यांची पोथी नेली; कोणी लंगोटी नेली; कोणी कपडे नेले; पण रा. पाटीलबुवा ह्यांनी रा. बाबासाहेबांस त्यांचे घराचे संडासाच्या बैठकीचे दोन दगड मागून घेतले. रा. बाबासाहेबास हे दगड मागितले तेव्हा थोडे विचित्र वाटले, पण त्यांनी ते पाटीलबुवाला दिले. मी जेव्हा हे दगडच तुम्ही का मागितले म्हणून पृच्छा केली, तेव्हा ते म्हणाले की, "श्री. अण्णासाहेब ह्यास बद्ध-कोष्ठाची सवय होती व परसाकडेस अर्धा-पाऊण तास वेळ लागे-असा सकाळ-संध्याकाळ अर्धा-पाऊण तास ज्या दगडांना श्री. अण्णासाहेबांचे पद-स्पर्शाचा लाभ वर्षानुवर्षे मिळाला त्या दगडापेक्षा अधिक पवित्र वस्तू ह्या जगात कोणती असू शकणार ?" हे दगड रा. पाटीलबुवांचे जवळ होते व त्यांचे रोज दर्शन घेतल्याशिवाय त्यांस चैन पडत नसे. शेवटपर्यंत हा पाटीलबुवांचा क्रम चालू होता. रा. पाटीलबुवा असे म्हणत की पुराणात जी ऋषि-मुनींची वर्णने

आपण वाचतो, असा प्रत्यक्ष एक ऋषि-मुनी आम्ही डोळ्यांनी पाहिला, त्याचे अंगा-खांद्यावर आम्ही वाढलो, व ठणठणीत खरे नाणे काय असते हे पाहण्याचे परमभाग्य आम्हाला लाभले. एवढीच आमची ह्या जन्माची कमाई आहे.

★ ★

## श्री अण्णासाहेब यांच्या स्फुट आठवणी

### (१) अंधास दृष्टिलाभ !

श्रीक्षेत्र आळंदी येथे श्रीनृसिंह सरस्वती स्वामींचे मठात प्रतिवर्षी पौष शुद्ध चतुर्दशी ते पौष वद्य प्रतिपदा असा पुण्यतिथीचा उत्सव होतो. त्या उत्सवामध्ये स्वयंपाक करणाऱ्या आचाऱ्यापैकी एका आचाऱ्याचे दुर्दैवाने डोळे गेले. त्या आचाऱ्याने श्री. अण्णासाहेबांस विनंती केली, "श्रीमहाराजांच्या उत्सवात, डोळे नाहीत, त्यामुळे मला स्वयंपाक करणे जमत नाही. तुम्ही मला औषध सांगा, म्हणजे माझी दृष्टी परत येईल, आणि माझेकडून पूर्ववत् महाराजांची सेवा घडेल." श्री. अण्णासाहेबांनी त्यास 'तुझी दृष्टी येईल' असे उत्तर दिले. हे उत्तर मिळाल्यानंतर तीन चार वर्षे निघून गेली तरी आचाऱ्यास दृष्टिलाभ झाला नाही. प्रत्येक वेळी त्याने अण्णासाहेबांस हटकावे व अण्णासाहेबांनी त्यास 'तुला दृष्टी येईल' असे सांगावे असेच होत असे. शेवटी त्याने म्हटले, "तुम्ही एक दिवस जाल निघून व मी असाच आंधळा राहीन." अण्णासाहेबांनी उत्तर केले,

"नाही रे बाबा ! मी खोटे बोलत नसतो. तुला दृष्टी येईल. तू कडुलिंबाची फुले गोळा करून आणि त्यांत गूळ घालून खात जा." त्याप्रमाणे त्याने केले. अण्णासाहेबांवर त्याची दृढ श्रद्धा होती. आणखी पाच सहा वर्षे निघून गेली. मध्यंतरी अण्णासाहेबांचे अवसान झाले तरी आचाऱ्यास दृष्टी आली नाही ! असे होता होता आणखी काही दिवस निघून गेले.

आणि मग एक दिवस त्या आचाऱ्याला दृष्टी आली ! त्यास अत्यानंद झाला ! नऊ वर्षांनी त्यास दृष्टिलाभ झाला !

## (२) सरदारसिंग याचे कोड बरे केले.

मलकापूरचे श्री. सरदारसिंग हे श्री. नथ्थू पाटील यांचे समवयस्क. ते श्री. अण्णासाहेब यांचे सहवासात असत. त्यांस कोडाची व्याधी जडली. रोग जावा म्हणून त्यांनी अण्णासाहेबांस विनंती केली. त्यांनी त्यांस 'स्वात्मसौख्या'ची पोथी देऊन, तिचे नित्य पठन करण्यास सांगितले. काही दिवसांनी त्यांचा रोग बरा झाला. पोथीचे कार्य झाल्यामुळे सरदारसिंग यांच्या मोहनसिंग नावाच्या मुलाने ती पोथी श्रीमाधवबुवा यांचे स्वाधीन केली. त्या मुलास दुसरी एक हस्तलिखित प्रत श्रीमाधवबुवा यांनी दिली.

(३) अण्णासाहेबांच्या घरी नेहमीच एक साप रहात असे. त्याचे नाव त्यानी सोमनाथ असे ठेविले होते. त्यास रहाण्याकरता त्यांनी एक जाळीचे कपाटही तयार करविले होते. वरील व अन्यत्र छापलेल्या सर्पविषयक आख्यायिकांवरून सर्वांभूती 'सम' पहाण्याची

त्यांची दृष्टी कोठच्या सीमेपर्यंत पोचली होती ते दिसून येईल.* नामदेव तुपाची वाटी घेऊन कुत्र्यामागे का धावले व अण्णासाहेबांनी सापाच्या जखमेवर औषध का लावले याचे रहस्य त्यांचे त्यांसच माहिती! अण्णासाहेबांच्या सहवासात आल्यावर सापाच्या विषात 'विषत्व' कोठून उरणार? कदाचित 'ते' माणसातच उरले तर!

## (४) रा. नथू पाटलांच्या मिळकतीत वाढ

रा. नथू पाटील यांनी बरीच वर्षे अण्णासाहेबांची सेवा केली. त्यांचे ठायी त्यांची पूर्ण निष्ठा होती. श्री. पाटील यांचे शेतीचे उत्पन्न प्रथम चार पांच हजारच होते, परंतु नंतर ते सोळा हजारांपर्यंत गेले. हा फरक अण्णासाहेबांच्या कृपेने घडून आला अशी पाटलांची दृढ श्रद्धा होती. प्रपंचास लागणारा पैसा खर्च करून बाकी सर्व पैसा ते अण्णासाहेबांना देत असत. नथू पाटील हे मूळचे मलकापुरचे. मलकापुरास राष्ट्रीय शाळेत विद्यार्थी होते. परंतु वृत्तीने उनाड व खोडकर होते. त्यांचा मोठा भाऊ व्यसनी असे. बापू दांडेकर यांचेमुळे नथू पाटील सुधारण्याकरता अण्णासाहेबांकडे आले. त्यांच्या इस्टेटीची वहिवाट दि. ब. ब्रम्ह यांच्याकडे होती. योग्यकाली ती नथू पाटील यांच्या हातात आली. ते एम्. एल्. ए. होते. धुळयास अण्णा-

---

*हा साप कपाटात साधारणपणे असावयाचा. पण श्री अण्णासाहेब गोष्टी सांगू लागले म्हणजे त्यास त्या गोष्टी ऐकण्याची इच्छा होई व कपाटाचे दार जर लावलेले असेल तर तो रागावून कपाटाचे दारावर फणा आपटी. तेव्हा श्री अण्णासाहेब म्हणत 'अरे सोमनाथ रागावतील. जा! जा! कपाटाचे दार उघडा!' व असा तो मोकळा झाला म्हणजे तक्याचे मागे अगर जवळ–पास तो कोठे तरी असावयाचा व दुसरे कोणी त्याला हातात घेतला तर तो खुशाल कोणालाही घेऊ देत असे.

साहेबांची जी प्रतिवर्षी फेरी होत असे, त्या फेरीसाठी श्री. पाटील यांस साठ-साठ तिकीटे काढावी लागत असत! अण्णासाहेबांच्या दर्शन–भाषणाचा लाभ घेण्यासाठीच इतकी मंडळी त्यांच्या बरोबर जात असत.

## ( ५ ) कर्फ्यू ऑर्डर–पोलिसानेही हटकले नाही !

सन १८९६ चे प्लेगचे दिवस. पुण्यात प्लेगने हाहा:कार* उडवून दिला होता. कर्फ्यू ऑर्डर shoot at sight जाहीर करण्यात आली होती. विदर्भातील प्रसिद्ध साधुवर्य गुलाबराव माधानकर† बद्ध-

---

* पुण्यातील या हलकल्लोळाचे वर्णन एका सुप्रसिद्ध मराठी कवीने ( बहुधा कै. गणेश जनार्दन आगाशे ) पुढीलप्रमाणे केले आहे—

**पुण्याई सरली न पुण्यनगरी हे नाव साजे तुला**
**झाली जी तव हानि तीस भुवनी नाहीच कोठें, तुला !**

... ... ... ...

**होता हा तरणा अपात्र मरणा तो देखणा शाहणा**
**नाही मोल गुणां परंतु करुणा आली न नारायणा !**

† श्री गुलाबराव महाराज, जन्म सन १८८१ समाधि सन १९१५. श्री. कै. पांगारकर यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे श्रीगुलाबराव महाराज, 'एक अलौकिक विभूति होती...नवव्या महिन्यात त्यांना अंधत्व प्राप्त झाले, १२ व्या वर्षी लग्न झाले, २४ व्या वर्षी त्यांच्या पत्नीचा मृत्यु झाला, तेथपासून ते १० वर्षे विधुरावस्थेतच होते " जवळ जवळ जन्मांधत्व असून त्यांनी अथांग विद्वत्ता संपादन केली होती. त्यांच्या नंतरच्या पिढीत कै. सदाशिव शास्त्री भिडे यांनीहि अंध असून अशीच विद्वत्ता संपादन केली होती. विद्वान् साधु असतोच असे नाही ! क्वचित् त्याच्या उलटही असू शकते ! परंतु गुलाबराव जितके विद्वान् तितकेच उच्च कोटीतील साधु होते.

कोष्ठाच्या विकृतीने संत्रस्त होऊन पुण्यास अण्णासाहेबांचे औषध घेण्यासाठी आले होते. अण्णासाहेबांनी औषध सुरू केले आणि प्रकृतीत कमी अधिक झाल्यास त्यास कळविण्यास सांगून ठेविले. गुलाबरावांची प्रकृति एक दिवस अधिक झाली. अण्णासाहेबांस कळविणे आवश्यक वाटू लागले. परंतु त्यांच्याकडे जाणार कोण व कसे ? कर्फ्यू ऑर्डर मध्ये निर्दिष्ट केलेल्या वेळेच्या बाहेर कोणी रस्त्यात दिसल्यास त्याला shoot at sight ची ऑर्डर होती. निरोप घेऊन जाणारा माणूस 'कविमंडन' कसा तरी तयार झाला. रस्त्याने दबकत दबकत चालला होता. नुसता जाण्याचा प्रश्न नव्हता तर येण्याचाही होता ! जाताना मृत्यू चुकविला तरी परत येताना तो घेणेकऱ्याप्रमाणे गाठणार नाही कशावरून ? सारांश तो माणूस मृत्यूच्या सावलीतच चालला होता. परंतु जाता येता त्यास कोठल्याही पोलिसाने हटकले नाही. त्याने एका पोलिसाचा अंदाजही घेऊन पाहिला, परंतु तो निश्चल उभा होता. कोठलाही अडथळा न येता त्या माणसाने आपली कामगिरी पार पडली !

---

# महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचे संक्षिप्त चरित्र

[ श्री. अण्णासाहेब यांच्या निधनोत्तर त्यांच्यासंबंधी जे गौरवपर लेख 'केसरी', 'चित्रमय जगत्' इत्यादि नियतकालिकांतून आले, त्यांतील चरित्रात्मक असा आवश्यक भाग, क्वचित् काही ठिकाणी बदल करून पुढे दिला आहे. 'विवेक' मधील लेख ता. ३१ जानेवारी १९६५ या तारखेचा आहे. —संपादक ]

## केसरी

( मंगळवार ता. ६ फेब्रुवारी सन १९१७ )

श्री अण्णासाहेब यांचा जन्म सन १८४७ साली झाला. त्यांनी पुणे हायस्कुलात असतानाच कर्कॅहम साहेबांकडून असामान्य बुद्धिमत्तेची शिफारस मिळविली. कॉलेजातही, प्रिन्सिपल् वर्डस्वर्थ प्रो. क्यांडी, मार्टिन हौ, प्रो. केरुनाना छत्रे वगैरे गुरूंचे त्यांच्यावर विशेष प्रेम होते. बी. ए. ची पदवी घेतल्यानंतर ते एल्एल्. बी. च्या अभ्यासाकरिता मुंबईस जाऊन राहिले. मुंबईस त्यांच्या वडिलांनी त्यांस एखाद्या संस्थानिकाच्या मुलाप्रमाणे ऐश्वर्यांत ठेवले होते. पण श्रीमंतीत न सुचणारे असेच विचार त्यांच्या मनांत लहानपणापासूनच येत असत. विद्यार्जन व सार्वजनिक हितबुद्धी याविषयी त्यांची आकांक्षा इतकी प्रबल होती की, वकीलीचा अभ्यास करताना त्याबरोबरच ग्रॅन्ट मेडिकल कॉलेजात ते वैद्यकीचाही अभ्यास करू लागले. संसाराकरिता वकिली, पण लोकोपयोगाकरिता वैद्यकी हे सजोड ध्येय त्यांनी प्रथम पासूनच ठरविले होते. एल्एल्. बी. व

एल्. एम्. या दोन परीक्षांचा अभ्यास एकदम चालू ठेवल्यामुळे त्यांच्या सारख्या बुद्धिमान् विद्यार्थ्यासही पुष्कळच परिश्रम करावे लागले. दिवाणखान्यात प्रत्येक खांबास कंदील बांधून झोप न येण्याकरता, उभ्याने फेऱ्या घालीत ते रात्रीही वाचन करीत आणि दिवसा व रात्री मिळून ते सोळा ते अठरा तास अभ्यास करीत अशी आख्यायिका आहे. त्यांचा करारीपणा लहानपणापासून दिसून येत असे व अभ्यासाकरिता रात्रीच्या रात्री झोपेशिवाय त्यांना काढताना पाहून, त्यांच्या सुदृढ शरीरप्रकृती इतकीच त्यांच्या निश्चयी मनाची बरोबरीचे विद्यार्थी तारीफ करीत. आपल्या हेतूप्रमाणे अण्णासाहेब एल्एल्. बी. ची परीक्षा तर उत्तीर्ण झालेच; पण डॉक्टरीची अखेरची परीक्षा होण्यापूर्वी त्यांना वैद्यक शिक्षणाचा क्रम संपवावा लागला; त्याला विशेष कारण हेच झाले की मेडिकल कॉलेजात विद्यार्थी म्हणून अभ्यास करीत असताना, त्यांनी वैद्यक विषयावर एक इंग्रजी मासिक सुरू केले होते. कित्येक प्रोफेसरांनीही त्यांना या कामी उत्तेजन दिले होते. पण तात्विक चर्चेत आपल्या गुरूंचीही भीड न ठेवता, अण्णासाहेबांनी ' जर्नल ' मध्ये पाश्चात्य वैद्यकावर कडक टीका केल्यामुळे, शेवटची परीक्षा देऊन वैद्यकीची अंतिम पदवी घेण्याची कल्पना सोडून दिली आणि मुंबई हायकोर्टात वकिली व डॉ. सखाराम विठोबा* यांच्या दवाखान्यात धर्मार्थ औषधोपचाराचे काम सुरू केले. त्यांच्या वैद्यक चातुर्याची ख्याती पुण्यास व मुंबईस झाली असून खुद्द रावसाहेब रानडे हे अण्णासाहेबांचेच औषध घेत असत.

पण केवळ लोकांना धर्मार्थ औषध देऊन, आपल्या सार्वजनिक कर्तव्याची परिसमाप्ती होते असे अण्णासाहेब मानीत नसल्याने त्यांनी

---

* हे नाव बहुधा सखाराम अर्जुन किंवा सीताराम विठ्ठल असे असावे. पहा टिळक चरित्र, पृ. ६५.

विद्यार्थीदशेतच स्वदेशी व्रत घेतलेले होते. त्यांनी त्या वेळचे एक सुप्रसिद्ध पुढारी श्री. गणेश वासुदेव जोशी* ऊर्फ सार्वजनिक काका यांच्या सहकारितेने 'कौशल्योत्तेजक सभा' ( ही बहुधा 'कौशल्य शिक्षक सभा' असावी. पहा टिळक चरित्र, पृ. ९६ ) स्थापन केली आणि सल्फ्यूरिक ॲसिडचा एक लहानसा कारखाना स्वतःच्या भांडवलावर घातला. अण्णासाहेब हे रावसाहेब रानड्यांपेक्षा पाच वर्षांनी लहान होते आणि जो कोणी होतकरू दिसेल त्यास सार्वजनिक कामात ओढावयाचे व सहकारितेने त्याच्याकडून होईल तितके सार्वजनिक कार्य घडवून आणावयाचे हा रानड्यांच्या अंगचा गुण प्रसिद्धच असल्यामुळे अण्णासाहेब व रावसाहेब यांची गट्टी जमण्यास फारसा वेळ लागला नाही. हायकोर्टात वकिली करण्याचे काम अनेक कारणांनी अप्रिय वाटू लागल्यामुळे ते काही दिवस पुण्यास येऊन राहिले व लवकरच 'किरण' नांवाचे एक इंग्रजी–मराठी पत्र त्यांनी सुरू केले........बुद्धिमान् व स्वदेशाभिमानी असा तरुण मनुष्य जहाल नसेल तर ते आश्चर्यच होय ? विद्यार्थी दशेत शिपायाचे बंडावरील आपल्या निबंधात निर्भीड व कडक उद्गार काढून रावसाहेब रानड्यांनी वरील नियम जसा सिद्ध करून दिला होता, तसाच तो अण्णासाहेबांनीही सिद्ध करून दिला. कारण 'किरण' पत्राच्या....

---

* गणेश वासुदेव जोशी, ऊर्फ सार्वजनिक काका, पुण्यात वकील होते. महाराष्ट्रातील स्वदेशी चळवळीचे उत्पादक. पुण्यात लवाद कोर्टाची स्थापना यांनीच केली. सन १८६९ नंतर त्यांनी सवत स्वदेशी पोषाख करण्यास सुरवात केली. पुण्यातील सार्वजनिक सभेच्या आरंभीच्या चिटणिसांपैकी ते एक होते. सार्वजनिक कार्य स्वतःच्या त्यागाने नावारूपास आणणारी, अव्वल इंग्रजीत जी एक पिढी होऊन गेली तीत ते अग्रगण्य होते.

पहिल्याच अंकात "History shows that the tree of liberty was ever watered by the blood of despots." * असले वाक्य लिहून त्यांनी तत्कालीन मवाळ लोकांना चकित करून सोडले असे म्हणतात. रावसाहेब व अण्णासाहेब यांची मनोरचना इतर अनेक बाबतीत वेगळी होती. विशेषतः धार्मिक व सामाजिक बाबतीत या दोघांचे पटण्यासारखे नव्हते. यामुळे दोघांचे मार्ग हळूहळू वेगळे होऊ लागले. हे स्वाभाविकच आहे. तथापि प्रथम तरी पुण्यातले बरेचसे सार्वजनिक कार्य या उभयतांच्या सहकारितेने झाले. उभयतांना सारखीच प्रिय असलेली सार्वजनिक सभा हे त्यांपैकीच एक काम होय. बडोद्याचे महाराज यांच्या पदच्युतीच्या वेळी‡ त्यांच्या मदतीला धावून जाण्यात पुणेकरांनी

---

* श्री. पाळेकरकृत चरित्रात हे वाक्य 'The tree of liberty is watered by the blood of patriots heart' असे दिले आहे. अर्थाच्या दृष्टीने चरित्रातील वाक्य सुसंगत आहे.

‡ सन १८७४–७५ साली बडोद्याचे अधिपती मल्हारराव गायकवाड यांच्यावर तेथील रेसिडेंट कर्नल फेअर यांना विषप्रयोग केल्याचा आरोप येऊन कमिशनमार्फत त्यांच्या चौकशीस सुरुवात झाली. मल्हाररावांस अटकेत ठेविल्यामुळे पैशाचे बाबतीत ते पराधीन होते. मल्हाररावांच्या तर्फे जेफर्सन व पेन हे सॉलिसिटर्स काम करीत होते. डिफेन्ससाठी त्यांनी चार लक्ष ३२ हजार रुपयांचा अंदाज केला. पण सरकार एवढी रक्कम देण्यास तयार होईना. तरी निदान प्रारंभी दोन लक्ष तरी रुपये मला द्यावेत अशी महाराजांनी व्हाईसरॉय यांस तार केली. या तारेचा गवगवा चोहोकडे झाला. पुणेकरांनी बडोद्यास व व्हाईसरॉय साहेबांस एकदम तार केली की, महाराजांच्या बचावाकरिता महाराष्ट्र

( टीप पुढील पानावर )

जे धैर्य दाखविले ते रानड्यांप्रमाणेच अण्णासाहेब यांच्या प्रेरणेने होय. रावसाहेबांच्या खालोखाल, सार्वजनिक कामात अण्णासाहेबांचेच नाव लोक घेत असत.

मुंबईमध्ये वकिली व वैद्यकी ही, दोनही, अण्णासाहेबांनी निरनिराळ्या उद्देशाने चालू ठेवलीच होती. वकीलीपेक्षा वैद्यकीकडे त्यांचे लक्ष अधिक लागले होते हे, वैद्यसुधा नावाचे जे आयुर्वेदिक मासिक त्यांनी सुरू केले, यावरून दिसून येईल. अशा प्रकारच्या परार्थैक बुद्धीचे चीज झाल्यावाचून राहात नाही व या बुद्धीस विश्वासूकपणाची (?) जोड मिळाल्यामुळे लवकरच त्यांचे नांव मुंबईपासून मद्रासेपर्यंत झाले. हैद्राबादचे दिवाण सर सालारजंग यांच्याशी अण्णासाहेबांचा पत्रव्यवहार सुरू होऊन, वऱ्हाड प्रांताच्या गहाणाचे कर्जफेडीकरता, खास संस्थानाची अशी बँक काढून, वऱ्हाडच्या मुलकी वसुलीचे काम सदर बँकेकडे सोपविण्यात यावे, अशा तऱ्हेची कल्पनाही मुक्रर झाली; तसेच मद्रासकडील कॉरव्हेटनगर या संस्थानच्या राजानेही संस्थानी बँकेची कल्पना पसंत केली.

---

( टीप मागील पानावरून )

एक लक्षपर्यंत वर्गणी देण्यास तयार आहे, त्यांना जरूर ती कायदेपंडितांची मदत द्यावी. या कामी पुण्याचे जसे बाहेर नाव झाले तसेच सरकारच्या डोळ्यात पुणे खुपूही लागले. पुण्यात गुप्त पोलिसांचा सुळसुळाट झाला. सरकारने त्यांच्याकरवी अगदी बारीक शोध चालविला. असल्या शोधात प्रमुख माणसावर संशय यावयाचाच; तसाच तो माधवरावजी रानड्यांवर आला आणि फार दिवस पुण्यास राहिल्याचे निमित्त करून त्यांची बदली नाशिकास करण्यात आली. ( या प्रकरणी केसरीतील अग्रलेखात अण्णासाहेबांचे नाव असले तरी केळकरकृत टिळकचरित्रात त्याचा उल्लेख नाही.)

या दोनही बँकांचे काम एतद्देशीय लोकांच्या हातूनच करून घ्यावयाचे, मात्र मुंबईत व लंडन येथे जो पैशाचा व्यवहार चालणार त्या बाबतीत अण्णासाहेबांचे पूर्वीचे एक अध्यापक डॉ. स्मिथ यांच्या मार्फतीने करावयाचे असे ठरले. सन १८८० साली अण्णासाहेब हे प्रथम कॉरव्हेटनगरच्या राजेसाहेबांस भेटण्याकरिता मद्रासेस गेले. परंतु दुर्दैवाने थोड्याच कालावधीत राजेसाहेब व सर सालारजंग मृत्युमुखी पडल्यामुळे अण्णासाहेबांनी उभारलेली योजनाच कोसळली! १८८५ साली ते जे पुण्यास परत आले तेही अशा स्थितीत की हे पूर्वीचे अण्णासाहेब असे कोणासही ओळखता आले नसते! परोपकार व देशाभिमान याखेरीज त्यांच्या बाकी सर्व गोष्टी बदलल्या होत्या. त्यांच्या घरची काही स्पृहणीय श्रीमंती आपोआपच या अवधीत गेलीच होती; व जी शेष उरली होती तिलाही अण्णासाहेबांनी जाणूनबुजून त्याच मार्गाने घालवून दिले! मेण्यातून जा-ये करणाऱ्या पटवर्धनांच्या घरी तो पूर्वीचा थाट दिसेनासा झाला! मद्रासजवळ तिरुतणी नावाच्या गावी राहून या पाच वर्षांत अण्णासाहेबांनी एकच गोष्ट संपादन केली व ती एक प्रकारची तपश्चर्याच होय.

मद्रासहून परत आल्यावर त्यांनी सार्वजनिक कार्य अगदीच सोडून दिले असे नव्हे. तथापि या अवधीत केलेल्या सर्व कामकाजात त्यांच्या बुद्धीचे तेज पूर्वीसारखेच चमके, तरी प्रवृत्तीच्या उल्हासापेक्षा निवृत्तीच्या उदासीनतेचीच छटा त्यांत अधिक पडत असे. कित्येकांकरिता त्यांनी कायदेशीर अर्ज वगैरे लिहून दिले. १८९५ पासून १९१२ पर्यंत ते पुणे म्युनिसिपालिटीचे सभासद होते. १८९६ साली त्यांस सार्वजनिक सभेचे चेअरमन् निवडण्यात आले व मृत्युसमयी ते त्या सभेचे अध्यक्ष होते. पहिल्या पहिल्या वर्षांत सभेकडून जे अर्ज

वगैरे गेले त्यांतील कित्येक अण्णासाहेबांनी स्वतः लिहिले होते. पण ही सर्व कामे त्यांच्या परिस्थितीशी विसंगत म्हणून खंडक्रम अशीच होत. पण त्यांच्या खास आवडीचे जे केवळ निर्भेळ परोपकाराचे काम तें मात्र त्यांचे अखंड चालू होते. रोगी पहाण्याचे त्यांचे दिवस निश्चित होते .. ....त्यांच्या औषधाने रोग्यांना गुणच येत असे. मग तो त्यांच्या औषधामुळे असो किंवा त्यांचे ठिकाणी असलेल्या रोग्याच्या श्रद्धाभक्तीने असो.....रोग्याचे काम यशस्वी होत होतें एवढे खरे !*........क्षय, मधुमेह, महारोग, उदर वगैरे अनेक दुर्धर रोगांच्या बाबतीत, नामांकित पाश्चात्य वैद्यक पंडितांनी निराश होऊन असाध्य ठरविलेले अनेक रोगी अण्णासाहेबांच्या हातून बरे होऊन गेलेले आहेत. ( रोग्यांकडून ) एक पैचाही अभिलाष अण्णासाहेबांनी धरला नाही. धर्मार्थ औषधोपचार करून धन्यवाद किंवा पुण्याशिर्वाद म्हणा त्यांच्या इतका मिळविलेला मनुष्य महाराष्ट्रात दुर्मिळ होय.

( या पुढील मजकूर तितकासा महत्वाचा नसल्यामुळे गाळला आहे )

---

* औषधामुळेच गुण येत असें निरपवाद विधान केलेले प्रायः दिसून येत नाही. रोग्याच्या श्रद्धेमुळे गुण येत असे असे म्हटल्यावर, अण्णासाहेबांच्या औषधयोजनेला गौणत्वच दिले जाते, हे वरील प्रकारच्या संदिग्ध विधान करणाऱ्यांच्या लक्षात यावयास हवे.

# श्री. न. चिं. केळकरकृत टिळक चरित्रातील श्रीअण्णासाहेबांसंबंधी एक उतारा

१९१७ च्या फेब्रुवारी महिन्यात टिळकांचे एक परमस्नेही पुण्याचे डॉक्टर अण्णासाहेब पटवर्धन हे वारले. त्यांची लोकप्रियता अलोट असल्याकारणाने त्यांच्या स्मशानयात्रेचा समारंभ अपूर्व झाला व त्यांच्या भक्तांनी मुठा नदीच्या पात्रात दहनभूमीवर त्यांच्या समाधीदाखल एक देऊळ उभारले व त्यांच्या वार्षिक पुण्यतिथीचा समारंभ पुण्यास दरसाल होत असतो. अण्णासाहेब पटवर्धनांचे चरित्र अनेक दृष्टीने बोधप्रद आहे. या चरित्राचा प्रारंभ तेजस्वी प्रवृत्तिमार्गात आणि शेवट निवृत्तिमार्गात झाला. पूर्ववयात हाती घेतलेले अचाट उद्योग फसल्यामुळे ते निराश झाले.* निराशेचे परिणाम जगात सर्वांवर सारखेच होत नाहीत. कित्येकांच्या मनोरचनेत दैववादित्व हे कमानीतील मुख्य म्हणजे चावीच्या दगडाप्रमाणे गुंतलेले असते आणि त्याला धक्का बसल्याबरोबर त्यांचा प्रवृत्तिमार्ग ढासळून कोसळून पडतो आणि ते निवृत्तिमार्गी बनतात. पुढेही त्यांनी देशभक्ती व राजकारणाची चौकशी कायम ठेविली होती, परंतु प्रत्यक्ष उद्योगात ते पडत नसत. धार्मिक कर्मकांड त्यांनी पुढे स्वीकारल्यामुळे राजकारणाचे कर्मकांड त्यांना झेपेनासे झाले. म्हणून ते राजकीय

---

* चित्रमयजगत्कार आपल्या लेखात म्हणतात ' वरील कार्ये ( हैद्राबाद व मद्रास ) बिघडल्यामुळे अण्णासाहेब आध्यात्मिक मार्गाकडे लागले असे वाटण्याचा संभव आहे,' परंतु त्यांच्या रोजनिशीतील उताऱ्याकडे पाहाता हा समज सपशेल चुकीचा आहे असे दिसते. (स्मरण-मौक्तिक, परिशिष्ट ५–मधील (७) (८) (११) हे क्रमांक पहावे. )

पुढारी बनले नाहीत. कर्मकांड अप्रिय वाटल्यामुळे अस्सल परमार्थी ज्ञानी देखील नास्तिकाच्या सदरात ढकलले जातात. त्याचप्रमाणे अस्सल स्वदेशाभिमानी लोकही राजकीय कर्मकांड अप्रिय झाल्यामुळे कर्त्या मुत्सद्यांच्या सदरातून वगळले जातात. धार्मिक आचारात अदृश्य झालेली स्वदेशभक्ती आणि देशभक्तीच्या नित्य उपासनाविधीत अदृश्य झालेली धर्मश्रद्धा या दोन्ही गोष्टी सूक्ष्मभेदी प्रेक्षकाला मात्र दिसतात. दैवगतीचा बांध आडवा आल्यामुळे अण्णासाहेबांचे चरित्र अपेक्षेहून फार वेगळे झाले. घाटमाथ्यावर पुष्कळ ठिकाणे अशी दाखविता येतात की जेथे एका अंगुलीच्या अंतराने पडलेले निम्मे पाणी शेवटी पूर्व समुद्राला तर निम्मे पश्चिम समुद्राला जाऊन मिळालेले असते. क्रियात्मक राजकारण व क्रियात्मक परमार्थ यांचीही गोष्ट अशीच आहे. अण्णासाहेबांविषयी टिळक असे म्हणत की हा या काळचा पुरुष नव्हेच. हिंदुस्थान हे इंग्लंड असते तर माधवराव रानडे हे ग्लॅडस्टन होऊ शकते ही गोष्ट जितकी खरी आहे तितकीच ही दुसरी गोष्ट खरी आहे की पुणें जुन्या काळचे पॅरिस असते तर अण्णासाहेब पटवर्धन कार्डिनल रिचल्यो* झाले असते.

---

* फ्रान्सचा बादशहा तेरावा लुई याचा मुख्य प्रधान. Richelieu हा अत्यंत कुटिल, सूक्तासूक्ताची पर्वा न करणारा असा राजकारणी पुरुष होता. हाच खरी सत्ता गाजवीत असे. इंग्लंडचा राजा पहिला चार्लस याचा प्रधान जॉर्ज व्हिलीयर्स उर्फ ड्यूक ऑफ बकिंगहॅम याच्या खुनात याचा हात होता.

# चित्रमयजगत्

**( फेब्रुवारी १९१७ )**

...... भाऊसाहेब ( अण्णासाहेबांचे वडील ) हे पुण्यात त्यावेळी अतिशय नामांकित वकील होते. अर्थात्च पटवर्धन घराण्यावर लक्ष्मीची कृपाच होती. भाऊसाहेबांची रहाणी व खर्च एखाद्या सरदाराप्रमाणेच असे. इतके असूनही जानकीबाईंची ( अण्णासाहेबांच्या मातुःश्री ) वृत्ती विरक्तासारखी असे आणि याच स्वभावाचा पूर्ण परिपोष अण्णासाहेबांच्या वृत्तींत झाला होता......अगदी लहानपणी अण्णासाहेबांचा स्वभाव व्यावहारिकांस चमत्कारिक दिसे. देवदर्शनास आईनें नेले असता तेथून तास न् तास हालू नये, आपल्या अंगावरील वस्त्र भिकाऱ्यास देण्याचा हट्ट धरावा, अंगावर छानछोक कपडे किंवा अलंकार घालूं देऊ नये, घातल्यास ते फेकून द्यावे, अशा प्रकारची त्यांची वागणूक असे. . . . लहानपणी त्यांचे इंग्रजी शिक्षण फडक्यांच्या वाड्यातील इंग्रजी शाळेत झाले. त्यावेळी पुणे हायस्कूलवर एडविन् आर्नोल्ड हेडमास्तर होते. ते ( स्वभावाने ) सरळ परंतु अत्यंत तापट व एकल्ली असत व त्यांची रहाणी लष्करी थाटाची होती. अण्णासाहेबांचा स्वभावही अत्यंत तापट. तेव्हा समस्वभावानुरूप त्यांस आर्नोल्ड साहेबांचा स्वभाव आवडला, व ते पुढील अभ्यासासाठी हायस्कुलात गेले. त्यावेळी तेथे शेंडे शास्त्री आणि व्यंकटराव रामचंद्र वकील असे नामांकित शिक्षक होते. शिक्षकांच्या व छात्रवर्गांच्या द्वाडपणाच्या अनेक गंमती अण्णासाहेब सांगत असत. घरी दहा पंधरा सहाध्यायी भोजनास, अभ्यासास, खेळण्यास, आणि झोपावयास

असायचेच. श्री. बापूराव भाजेकर, चिंतामणराव भट, आबासाहेब काथवटे इत्यादी मंडळीशी अण्णासाहेब यांचे विशेष प्रेम व सलगी असावयाची. योग्य परंतु खडखडीत जबाब देण्यास केव्हाही पुढेमागे पहावयाचे नाही अशा सवयीमुळे हायस्कुलातील एका बड्या शिक्षकाचा अण्णासाहेबांवर रोष झाला. तेव्हा परीक्षेत नापास होणे शक्यच होऊ नये म्हणून त्यांनी हॉवर्डचे मोठे व्याकरण, भूमितीवरील पुस्तके मुखोद्गत केली, आणि कर्कहॅम साहेबांकडून, स्मरणशक्तीच्या अपूर्वतेबद्दल शाबासकी मिळविली. पुढे इलाख्यातील सर्व हायस्कुलांची, स्मरणशक्तीचे बाबतीत एक स्पर्धा–परीक्षा झाली, तीत बापूसाहेब भाजेकर, आणि अण्णासाहेब हेच अत्युत्तम ठरले.

'पूना कॉलेज'मध्ये* प्रविष्ट झाल्यावर तेथे चिंतामणराव भट, रामभाऊ देशमुख व अण्णासाहेब यांचा एक स्वतंत्रच क्लब झाला. तेथेच प्रो. केरोपंत छत्रे हे फराळास जात असत. या कॉलेजमध्ये प्रो. किलहॉर्न नावाचे एक चमत्कारिक व खुनशी स्वभावाचे प्रोफेसर होते. ते आणि अण्णासाहेब यांची 'विजन' या संस्कृत शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल जरा तिखटच अशी वादावादी झाली. किलहॉर्नसाहेबांनी

---

* पेशवाईत सरकारकडून विद्येची अशी सोय नसे. रमण्यात ब्राह्मणांची कोंडी करून दक्षिणा देण्याची वहिवाट होती. एल्फिन्स्टनने ही चाल बंद केली. परंतु १८२१ साली पुण्यासच विश्रामबाग वाड्यात सरकारी संस्कृत पाठशाळा स्थापण्यात आली व तिच्याकरता ५० हजारांची रक्कम बाजूला काढून ठेवली. १८४२ साली, एज्युकेशन सोसायटी स्थापन झाल्यावर याच पाठशाळेला इंग्रजी वर्ग जोडला आणि नंतर या संस्कृत व इंग्रजी वर्गांना मिळून 'पूना कॉलेज' हे नांव देण्यात आले. १८६८ साली हेच कॉलेज 'डेक्कन कॉलेज' या नांवाने सुरू झाले. टिळक वगैरे मंडळी याच कॉलेजातून शिकली.

वादाच्या आवेशांत अण्णासाहेबांस उद्देशून उपमर्दकारक शब्द वापरले. अण्णासाहेबांनीही I should like to say the same to you असा रोखठोक जबाब दिला. पुढे वर्डस्वर्थसाहेबांनी सर्व हकीकत ऐकून उभयपक्षी समजूत केली.

१८६८ साली बी. ए. ची. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर अण्णासाहेब मुंबईस गेले. शेठ मुरारजी गोकुळदास यांच्या चाळीत, सबंध तिसरा मजला व दुसऱ्या मजल्यावरील काही भाग इतकी जागा त्यांच्याकडे असे. अण्णासाहेबांची व रावसाहेब रानड्यांची ओळख याच सुमारास झाली. कारण पुनर्विवाहाचा वाद या वेळी जोरात आलेला होता. प्रपंच करतानाच, सार्वजनिक कार्य करीत राहून, लोकोन्नति साधावयाची ह्या रावसाहेबांच्या उपदेशाचा परिणाम अण्णासाहेबांच्या मनावर इतका झाला की लोकहित हाच त्यांचा प्रपंच ठरला........ रावसाहेब रानड्यांच्या प्रोत्साहनाने ते इंदुप्रकाशात लिहू लागले; व या कामाच्या अंगभूतच दुसरे काम म्हणजे पुनर्विवाहपक्षाचे अध्वर्यु श्री. विष्णुशास्त्री पंडित यांच्याशी शास्त्रविषयक वाद करावयाचा. या कारणाने श्री. जनार्दन सखाराम गाडगीळ* व रावसाहेब मंडलीक ह्यांच्याशी त्यांचा परिचय झाला. पुनर्विवाहाच्या वादामुळे अण्णासाहेबांच्या धर्मश्रद्धेवर बराच ताण पडला. ते पुनर्विवाहास अनुकूल होते पण केवळ न्यायबुद्धीमुळे. परंतु न्यायबुद्धीच्या

---

* श्री. ज. स. गाडगीळ, 'इंदुप्रकाश'चे (मुंबईत निघणारे जुने दैनिक) इंग्रजी लेखक व मालक. नंतर बडोद्यास हायकोर्ट जज्ज व नायब दिवाण. ता. ९–१०–१९०० रोजी कालवश झाले. यांनी तुकारामाच्या गाथेचे इंग्रजी भाषांतर केले आहे. (पहा कै. बा. अ. भिडे कृत 'तुकारामबोवा')

पांघरुणाखाली स्वैराचारास मोकळीक मिळणे हाच* जर पुनर्विवाहाचा अर्थ असेल तर पुनर्विवाह नको असे विष्णुशास्त्रींस त्यांनी स्पष्ट सांगितले. ब्राह्मण्याचा अभिमान व स्त्रीचारित्र्याची महती यापुढे इतर गोष्टींची महती कमी असे ते समजत असत व आरोग्याचे नियम पाळल्याने आणि स्वैराचार न केल्यास अकाली मृत्यु येऊन स्त्री विधवा होण्याचा संभव फार कमी होईल असे ते म्हणत.†

श्री. बाळशास्त्री लागवणकर यांनी अण्णासाहेबांस आयुर्वेद शिकण्याचा आग्रह केला. बाळशास्त्री यांचे चुलते श्री. महादेवशास्त्री यांच्याकडून मुद्दाम पुण्यास येऊन ते विषय समजावून घेऊ लागले व वैद्यसुधा मासिक काढण्याची तयारी चालू केली....मेडिकल कॉलेजमध्ये असताना ज्या भानगडी तेथे झाल्या त्या संक्षेपतः सांगण्यासही स्थल नाही. परंतु येवढे सांगितलेच पाहिजे की, पाश्चात्य वैद्यकाचे हार्द त्यांस समजावून देणारे डॉ. मॅकेंझीच होते. त्यांच्याविषयी अण्णासाहेब फार कृतज्ञ असत. मॅकेंझी साहेबांची अनुज्ञा घेऊन त्यांनी

* परंतु पुनर्विवाह न झालेल्या, व सोवळ्या केलेल्या विधवांच्याकडून स्वैराचार घडल्याची कैक उदाहरणे पूर्वी होऊन गेली! तसे नसते तर कै. श्री. लालशंकर उमियाशंकर, स्मॉल कॉज कोर्ट जज्ज, यांस पंढरपूरचे ऑर्फनेज उघडण्याचे काय प्रयोजन होते?

† १८९६मध्ये आणि तदनंतरही मुंबईस व पुण्यास प्लेगचा प्रादुर्भाव होऊन, आजच्या लोकांपेक्षा निश्चितच अधिक प्रमाणात आरोग्यनियमांचे परिपालन करणारी व संयमाने रहाणारी निकोप व सुदृढ प्रकृतीची माणसे प्लेगच्या तावडीत सापडून आकस्मिक कालवश झाली. १९१८–१९१९ च्या इन्फ्लुएंझाच्या साथीतही अनेक तरुण आकस्मिक कालवश झाले.

एल्. एम्.ची परीक्षा होण्यापूर्वीच लोकांस फुकट औषधोपचार करण्याचा प्रघात सुरू केला आणि काही दिवसांनी पाश्चात्य व आयुर्वेदिक अशी दोनही प्रकारची औषधे ते देऊ लागले. परंतु या सुमारास, बडोद्यास मल्हारराव प्रकरण उद्भवल्यामुळे तिकडे सार्वजनिक काकांबरोबर अण्णासाहेब गेले. तेथे बरेच दिवस त्यांचा मुक्काम झाला. अण्णासाहेबांची एलएल्. बी. ची परीक्षा यावेळी झाली होती. निर्लोभता, विद्वत्ता, कायदेपांडित्य व परोपकार बुद्धि, यांविषयी थोड्याच दिवसांत त्यांचा इतका लौकिक झाला की निझाम हैद्राबाद व मद्रास इलाख्यातील कारव्हेट नगर येथील संस्थानिकांची कामे आपोआप त्यांच्याकडे आली. हैद्राबादचे काम असे होते की मुंबईतील भांडवलवाल्यांच्या सहाय्याने संस्थानच्या हमीची एक बँक हैद्राबादेस काढावयाची. या बँकेने वऱ्हाड प्रांताबद्दलचा पैका ब्रिटिश सरकारास द्यावयाचा व वऱ्हाड प्रांताची दिवाणगिरी करावयाची; या योगाने आपल्या लोकांस (एखाद्या) प्रांतावर अंमल करण्याचें शिक्षण मिळेल, असा अण्णासाहेबांचा विश्वास होता. कारव्हेट नगरचे काम तशाच नमुन्याचे होते. (ही हकीकत केसरीतील लेखात आलीच आहे.) आपणास यशःप्राप्ती व्हावी म्हणून दैवी उपायही ते योजीत आणि अशा उपाययोजनेत असतानाच १८७७–७८ चे सुमारास त्यांची श्रीनृसिंहसरस्वती स्वामी यांच्याशी गाठ पडली. कारव्हेट नगरचे राजे व सर सालारजंग उभयता मृत्युमुखी पडल्यामुळे, ती योजना फसली. तथापि घटसर्पासारखा आजार आणि अन्य कारणे यांच्यामुळे मद्रास प्रांतात त्यांचा मुक्काम चार वर्षे झाला. आध्यात्मिक मार्गात त्यांची प्रगती ते मद्रास प्रांतात असतांनाच झाली.

अण्णासाहेब पुण्यात आल्यापासून ज्या ज्या लोकहिताच्या चळवळी येथे झाल्या त्यांच्या प्रवर्तकांत अण्णासाहेब होते. संमतिवयाचे

प्रकरण, गामण्य, श्रीगणपति महोत्सव, शिवाजी उत्सव, सार्वजनिक सभा, म्युनिसिपालिटी, अशा चळवळींस व संस्थांस त्यांचा आधार होता इतकेच नव्हे तर त्यांत त्यांचा प्रमुख भाग होता. म्युनिसिपालिटीचे काम त्यांनी सतत १७ वर्षे केले. सन १९१२ मध्ये त्यांनी म्युनिसिपालिटी सोडली आणि बहुतेक सार्वजनिक चळवळी सोडून दिल्या. याप्रमाणे सुमारे ४८ वर्षे लोकोपकारार्थ स्वतःची शरीरयष्टि चंदनाप्रमाणे झिजवून, त्यांनी माघ शुद्ध एकादशीच्या दिवशी आठ वाजता लोकांतरास प्रयाण केले ! ( पुढील मजकूर महत्वाचा नसल्यामुळे गाळला आहे. )

---

## श्री. मधुकर महाजन यांच्या श्री. अण्णासाहेबांवरील चरित्रलेखातील उतारा

( ' विवेक ' ता. ३१ जानेवारी १९६५ )

" ब्रिटिशांचे राजकारण आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांशी वागणूक यांचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला होता. राज्यक्रांतीचे डावपेच खेळून इंग्रजांना फसविणे कठिण आहे असे त्यांना वाटे. परंतु जगाच्या राजकीय उलाढालीत ज्या वेळी इंग्रज सापडतील त्या वेळी जर राष्ट्रीय स्वरूपाचे प्रचंड आंदोलन उभे राहिले तर स्वराज्यप्राप्ती सुलभ होईल अशी त्यांची समजूत होती. म्हणून समाजामध्ये सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, राजकीय आदि सर्व क्षेत्रांत स्वाभिमानाचा वन्हि सतत चेतवीत ठेवून संधी मिळताच परकीय सत्ता भस्मसात करणारा वडवानल त्यांतून उत्पन्न व्हावा अशी अण्णासाहेबांची कल्पना होती.

परकीय सत्ता उलथून पाडण्याकरता भारतातील संस्थानिकांचे सहाय्य होऊ शकेल असा अण्णासाहेबांचा कयास होता. म्हणून वकिली सल्ल्याच्या निमित्ताने त्यांनी वढवाण, लिमडी, जंजीरा, डफळापूर इत्यादि छोट्या संस्थानांशी संबंध जोडला. तसेच प्रत्यक्ष बोलणी करून तेथील राज्यकारभारात शिरकाव करण्याकरता इंदूर बडोदा, हैद्राबाद इत्यादि मोठ्या संस्थानिकांबरोबर परिचय वाढवला. हिंदी राजकारणात केव्हाही राष्ट्रव्यापी गोंधळ उडवून द्यावयाचा झाल्यास शक्तिसंचयाची ही ठिकाणे स्फोटक केंद्रे बनतील असा त्यांना विश्वास वाटत असे. एका बाजूला राजकीय आंदोलनाची मायभूमीत तयारी करीत असतानाच अण्णासाहेबांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही संधाने जुळवावयास सुरवात केली होती. या दृष्टीने ते निरनिराळ्या देशांतील कॉन्सल्सबरोबर स्वतंत्रपणे जाऊन चर्चा करीत. रशियातील राजपुत्राची भेटही त्यांनी या दृष्टीनेच घेतली होती.

## उत्तुंग महत्त्वाकांक्षा

राजकीय क्षेत्रातील उत्तुंग महत्त्वाकांक्षा म्हणून अण्णासाहेबांच्या स्वतंत्र वऱ्हाडप्रांताचा कारभार हाती घेण्याच्या प्रयत्नाकडे अंगुलिनिर्देश करता येईल. हैदराबादच्या निजामाचा वऱ्हाड प्रांत कर्जाच्या फेडीनिमित्त इंग्रजांनी गिळून टाकला होता. अण्णासाहेबांनी या संबंधात हैदराबाद संस्थानचे दिवाण श्री. सालारजंग यांच्याशी संधान बांधले व इंग्रजांची कर्जफेड करून वऱ्हाडप्रांत पुन्हा मिळवावा असा व्यूह रचला. वऱ्हाडप्रांत हाती आल्यावर त्याचा कारभार अण्णासाहेबांनी पाहावयाचे ठरले. या कार्यसिद्धीकरिता हैदराबादेत एक नवीन बँक स्थापन करून त्या बँकेमार्फत कर्जफेडीची रक्कम उभी करावयाची असा अण्णासाहेबांचा बेत होता. कोट्यावधि रुपयांची

रक्कम उभी करण्याची हिंमत बाळगणाऱ्या अण्णासाहेबांची पत जोखून पहावी म्हणून सालारजंगाने अण्णासाहेबांजवळ दुसऱ्या एका कामाकरता दोन कोटी रुपयांची मागणी केली. अण्णासाहेबांनी ही रक्कम डॉ. स्मिथ यांच्या मध्यस्थीने फ्रेंच बँकेकडून पाठवून दिली. अर्थात् ही रक्कम सालारजंगाने ताबडतोब परत केली. या घटनेमुळे सालारजंगचा अण्णासाहेबांवर एवढा विश्वास बसला की त्याने ताबडतोब पुढील बोलणी करण्याकरता अण्णासाहेबांना हैदराबादला बोलाविले. परंतु ही बोलणी पूर्ण होण्यापूर्वीच सालारजंग यांचा मृत्यु झाला व सर्व बेत ढासळून पडले.

सालारजंग प्रकरणापासून अण्णासाहेबांचे मुंबईतील वास्तव्य कमी झाले व १८८० मध्ये तर त्यांनी मुंबई सोडून आपला मुक्काम मद्रासमध्ये नेला. मद्रास इलाख्यातील एक संस्थानिक श्री. व्यंकट परमाळ यांच्या संस्थानी हक्काचे प्रकरण अण्णासाहेब त्यावेळी हाताळीत होते. दोन तीन वर्षे खटपट केल्यानंतर अण्णासाहेबांच्या मनाप्रमाणे सर्व गोष्टी घडल्या. श्री. व्यंकट परमाळ यांचा हक्क संपूर्णतः शाबीत झाला. परंतु एवढे होते आहे तोच मृत्यूचे पाश श्री. व्यंकट परमाळ यांचेभोवती पडले आणि अण्णासाहेबांच्या पदरी निराशा आली.

मुंबईला असताना बडोद्याची दिवाणगिरी अण्णासाहेबांकडे चालून आली होती. परंतु त्यावेळच्या संस्थानच्या रीजंटला अण्णासाहेबांच्या काही अटी मान्य नसल्याने ते जमले नाही. त्यानंतर तुकोजी होळकरांशी बोलणे होऊन संस्थानी राजकारणासाठी अण्णासाहेबांची मुंबईत नेमणूक होणार होती. परंतु आयत्या वेळी उद्भवलेल्या काही अडचणींमुळे तो बेतही रद्द झाला होता. या दोन प्रकरणांपूर्वी सालार-

जंग प्रकरणी व व्यंकट परमाळ प्रकरणीही अण्णासाहेबांच्या पदरी निराशा आली. त्यामुळे राजकारणाच्या या गोष्टी आपल्या हातून घडू नयेत अशी ईश्वरी इच्छा दिसते, अशी अण्णासाहेबांची ठाम समजूत झाली. अण्णासाहेबांनी आपल्या आयुष्याला एकदम निराळी कलाटणी दिली."

---

## परिशिष्ट १

# अण्णासाहेब यांच्या निर्याणानंतर झालेली भाषणे

श्री. अण्णासाहेब यांच्या अवसानानंतर भव्य शवयात्रा निघून दहनभूमीवर, लो. टिळक आणि विरूपाक्ष मठाचे श्री. बोधानंद यांची समयोचित भाषणे झाली.

ता. १३ फेब्रुवारी १९१७ च्या केसरीच्या अंकात श्री. कृष्ण-शास्त्री कवडे यांनी एक पत्र प्रसिद्ध करून 'अण्णासाहेबांचे मुख्य स्मारक म्हणजे पुण्यात एक आयुर्वेदीय धर्मार्थ औषधालय सतत सुरू ठेवणे हे होय' असे प्रतिपादन करून काही एक योजना लोकांसमोर ठेविली आणि तिच्या सिद्ध्यर्थ ५० हजार रुपये जमा करावे अशी विनंती केली.

ता. १३ फेब्रुवारी १९१७ रोजी पुणे येथे 'रे' मार्केट मध्ये पुण्याच्या नागरिकांची एक शोकसभा भरून श्री. अण्णासाहेब यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला. लो. टिळक अध्यक्षस्थानी होते. सभेत शि. म. परांजपे, श्री. विष्णुशास्त्री बापट, श्री. आवटे, श्री. ह. ना. आपटे, इत्यादिकांची भाषणे झाली, आणि दुखवट्याचा ठराव कै. अण्णासाहेबांच्या चिरंजीवांकडे पाठविण्याचे ठरले. सभेत श्री. शेखमहंमद अल्ली नावाच्या मुसलमान गृहस्थाचे उर्दूत भाषण झाले.

केसरी व चित्रमयजगत् या नियतकालिकांतून अण्णासाहेबांच्या निधनावर राधारमण (कृष्णाजी पांडुरंग लिमये*) व कै. अनंततनय (दत्तात्रेय अनंत आपटे) यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. राधारमण यांची कविता संस्कृतमध्ये असून, छदोभंगादी दोषाने युक्त अशी अगदी सामान्य आहे.


---

* श्री. लिमये हे जुन्या पिढीतील एक कवी असून 'राधारमण' या नावाने प्रसिद्ध होते. त्यांचा काव्यसंग्रह त्यांच्या चिरंजीवांनी अलिकडेच प्रसिद्ध केला असून 'तरुणभारता'त त्याचे सविस्तर परीक्षणही आले आहे.

परिशिष्ट २

# श्री. अण्णासाहेब यांच्या हस्ताक्षरांतील दोन अस्सल पत्रे

[ श्री. अण्णासाहेब यांनी नंदुरबारचे श्री. घनश्याम गुजराथी यांस लिहिलेली दोन अस्सल पत्रे पुढे दिली आहेत. मूळ पत्रे मोडीत असून सर्वसामान्य लोकांना ती वाचता यावी म्हणून त्याचे बालबोध लिपीत रूपांतर करून दिले आहे. त्या पत्रांवरून श्री. अण्णासाहेब यांची श्रीनृसिंह सरस्वती स्वामींचे ठायी असलेली अनन्य निष्ठा दिसते. तद्वत्च जीवनातील लहान मोठ्या घटना संचितानेच बद्ध आहेत असा त्यांचा दृढ विश्वास असल्याचे दिसून येते. पत्र लहान असले तरी अर्थगर्भ आहे. ]



Recd 16-4-08 VRP Poona
Repld 16-4-08 & 23-4-08

Recd 16-4-08 VRP Poona
Repld 16-4-08 & 23-4-08

श्री


६०६ शनवार पेठ, पुणे
१५-४-०८

चिरंजीव रा. रा. घनश्याम लक्ष्मीदास
गुजराथी कारकून मुंबई हायकोर्ट यांसी
विनायक रामचंद्र पटवर्धन व श्रीगुरुभक्तिपरायण
गंगाभागीरथी गयाताई यांचे अनेक आशिरवाद.
तुझी सर्व पत्रे पावली. यंदा तुझी परीक्षा पास जाहली नाही हें चांगलें जाहले नाही हे लौकिकदृष्ट्या खरे आहे. परंतु पूर्वकर्मसंचित कधींकधीं आड येतें तें संपलें पाहिजे म्हणून धीर सोडण्याचें कारण नाही. श्री महाराजांची भक्ती करणें ती केवळ परीक्षा वगैरे पास होऊन पैसे वगैरे मिळावे अशा हेतूने कोणी करतो कीं कसें हेही महाराज पाहतात हेही



लक्षांत ठेविले पाहिजे. करिता श्रीचे
ठिकाणी भक्ती व विश्वास कधींही कमी
होऊ देऊ नये. श्री कधीही वाईट करीत नाहीत
हे सदैव लक्षात ठेविले पाहिजे. माझी एलएल
बी ची परीक्षा च्यार पाच वेळ जाहली नाहीं. म्हणून
पिच्छा सोडला नाही व अखेरीस केवळ श्रीकृपे-
नेंच ती माझी परीक्षा उतरली. ठेचा लागल्या-
नें भक्ती दृढ होते हा लाभ समजला पाहिजे.
इंग्रेजी भाषा जरा जास्त चांगली लिहीतांना आली
पाहिजे. श्री कृपा करतील व करीत आहेत यांत
संशय नाहीं. ते सर्व आपले चांगल्याकरताच करितात.
असो, धीर सोडण्याचे कारण नाहीं. कळावे हे आशिरवाद.
उत्तर यावें.

**वि. रा. पटवर्धन**



Bengal Regulation I
of 1832

हायकोर्ट लायब्ररीत पुढील पुस्तक
असल्यास शोध करावा.

Bengal Regulation I
of 1832

बेंगाल रेग्युलेशन एक सन १८३२ चा
असल्यास तो फार लहान आहे एक दोन पाने असेल
तेवढा कॉपी करून पाठवावा. जरूर जरूर
व मुंबईच्या जुन्या बाजारात सन १८३२
व १८३५ किंवा१८४५ च्या दरम्यान
छापील बेंगाल कोड मिळाल्यास विकत घ्यावे.

---




श्री

६०६ शनवार, पेठ पुणें
५।२।०८

आशिरवाद. चिरंजीव रा. शीता-
राम दांडेकर याचें नावचें कार्ड पावलें.
चिरंजीव बाबाच्या लग्नाचा तिथि
निश्चय आद्यापि जाहला नाही.
तो जाहला म्हणजे याविषयी वेळेवर
कळविले जाईल. फक्त ताईस भेटण्या
करिता आता किंवा पुढे तुझ्या सोईस
येईल त्याप्रमाणे एक च्यार दिवस येऊन
जावे. कारण उत्सव होऊन तू घाईने गेलास
करिता हे लिहिले आहे कळावे हे आशिर्वाद.

वि. रा. पटवर्धन



हे पत्र रा. घनश्याम लखमीदास गुजराथी
यास मुंबई ग्रांटरोड येथे टोपीवाल्याचे बंगल्यात देणे.

४४

Grant Road,
B,bay

## परिशिष्ट ३

# कै. प्रो. दीक्षितकृत चरित्रांतील आठवणी

( कै. प्रो. ग. स. दीक्षित, डेक्कन कॉलेजातील प्रोफेसर, यांनी श्री. अण्णासाहेबांचे चरित्र लिहून प्रसिद्ध केले आहे. सन १९४३ पर्यंत या चरित्राच्या तीन आवृत्या निघाल्या यावरून त्याची लोकप्रियता लक्षात येईल. पुढील आठवण सदर चरित्रातून घेतली आहे. )

### पारमार्थिक बाजू

पारमार्थिक बाजू जी त्यांची वर सांगितल्याप्रमाणे होती ती सार्वजनिक कार्याप्रमाणेच अगदी उघड चारचौघांच्या समोर चाललेली अशी असे. तीत काही एक गुप्तपणा नसे. त्यांना कधी खोलीचे दार लावून एकांतात बसलेले पाहिले नाही, किंवा काही योगसाधन करताना पाहिले नाही. देवाची पूजाही ते कधी करीत नसत. फार तर स्नान झाले म्हणजे देवाला एखादे फूल, किंवा तुळसी वहाव्या येवढेच ... .. त्यांनी कोणत्याही तऱ्हेचा दांभिकपणा किंवा बुवाबाजी केली नाही की शिष्यसंप्रदाय वाढविला नाही. आपल्यात काही दैविक सामर्थ्य आहे असे भासविले नाही, की शिष्यांना आपले भजनी लावून त्यांचे करवी अण्णासाहेब चमत्कार करतात, दत्त म्हणून तीर्थ व गुलाबाच्या पाकळ्या हातातून काढून दाखवितात वगैरे थापा लोकांत पसरवून आपला मानमरातब व लौकिक वाढविला नाही, की धनिक श्रद्धाळू लोकांना आपले पाशात ओढून त्यांचे अलोट संपत्तीवर त्यांनी स्वतःची व शिष्यांची चैन करविली नाही.

# परिशिष्ट ४

## श्री अण्णासाहेब पटवर्धन यांच्या एका स्फुट लेखाची नक्कल

( ही नक्कल आळंदी संस्थानाचे सरपंच परमपूज्य श्री. माधवराव गोडबोले यांनी श्री. रामभाऊ दातार यांस पाठविली. ती जशीच्या तशीच खाली दिली आहे. )

३-१०-१९०६, पुणे.

'अहं वैश्वानरो भूत्वा' इत्यादी अकारापासून हकारपर्यंत वर्णोच्चार करणारी ज्या पदार्थामध्ये शक्ती असते तो पदार्थ अर्थात् मनुष्य· म्हणून मनुष्य इतर पदार्थापासून स्वतःला वेगळा दाखविण्यासाठी अहं अशी खूण उच्चारतो. ह्या शक्तीचे प्रमाण मनुष्य, प्राणी, उद्भिज, इत्यादीपर्यंत कमी कमी ( होत ? ) गेले आहे. परंतु अगदी लोप तिचा झाला म्हणजे निवळ शून्य झाली असे मानण्यास कारण नाही. ती स्पष्ट मात्र दिसत नाही. स्पष्टतेस योग्य सवड नाही. स्थिती नाही. तिचे अस्तित्व कार्यावरून जाणावयाचे. रस्त्यावरून खाली चाललेल्या गाडीने उत्पन्न झालेल्या धक्क्याचे थिरथिराट भोवतालच्या भिंतीत न दिसता पाण्याने भरलेल्या घागरीत लाटारूपाने दिसतात.

प्रत्येक पदार्थास नाद येतो तो या शक्तीचे रूपांतर आहे.

या शक्तीचे निरनिराळे प्रमाणामुळे निरनिराळे आकार उत्पन्न होतात. म्हणून प्रत्येक पदार्थाचा वेगळा अहंकार असतो.

एका अहंकाराचे मान कमी झाल्याशिवाय दुसरा त्यावर अहंकार चढत नाही. म्हणून दुसऱ्या पदार्थाची आत्मसात् क्रिया चालू होणार नाही.

अहंकार शक्ती प्रज्ञारूप आहे. ज्ञानविग्रह श्री गुरुमूर्तिज्ञानेश्वर भगवान् परमात्मा ज्ञानांशाने जीवरूप घेऊन सर्व पदार्थ जाहला.

वातविकृतीत प्रज्ञा–अहंकार नष्ट म्हणजे अती कमी होतो.... म्हणून रोग्यास खाण्यास देऊ नये.

(आळंदी, देवाची जि. पुणे येथे नक्कल लिहिली. १९-१०-६४)

---

## परिशिष्ट ५

# स्मरणमौक्तिक

( श्री. अण्णासाहेब पटवर्धन तपशीलवार दैनंदिनी ठेवीत होते असे दिसत नाही. चिंतन करता करता प्रसंगानुसार जे सुचले, जे टिपून ठेवले, कोणास काही उत्तरादाखल लिहून पाठविले त्यांतील काही दिले आहे. ही टिपणे श्री· नारायणराव दांडेकर यांनी संग्रहित केली. त्यांचा या पुस्तकात समावेश करण्यास त्यांनी परवानगी दिली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहो. टिपणात दृष्टांत देण्याची शैली, वेदान्तिक शब्दांची उकल करण्याची पद्धती जिज्ञासूंनी अभ्यसनीय आहे. )

श्री

॥ श्री नरसिंहसरस्वतीसद्‌गुरूभ्योनमः ॥

श्रीनरसिंहसरस्वती सद्‌गुरूदेवांचा मठ

श्रीक्षेत्र आळंदी ( ता. खेड, जिल्हा पुणे )

शके १८४० इंग्रजी सन १९१९ इसवी

---

संध्या–आचमन–अर्घ्य—मंदेहराक्षस मनाच्या तेहतीस कोटी लहरी आहेत त्या मारून टाकणे व श्रीसूर्यनारायणास आवाहन करून मन कल्पनारहित व निश्चल करणे— श्री. वागदरीकर उपाख्य श्री. बारीक मास्तर पुणे २ यांचेकडून चैत्र शके १८८४ मध्ये ( दि. २३-५-६२ ) समजले.

★ ★

॥ श्री ॥

श्रीसद्‌गुरू अण्णासाहेब पटवर्धन यांच्या दप्तरातील काही कागदपत्रांचे उतारे—

॥ श्री नरसिंव्हसरस्वतीसद्‌गुरूभ्योनमः ॥

( १ ) कल्हईचा दृष्टांतः-वरच्या कल्हईहून आतील वस्तू किंवा पदार्थ जसा वेगळा असतो व राहतो तसा आत्मा बाह्य सकळ मनबुद्धि आदिकरून सकळ दृश्याहून किंवा पासून भिन्न व अलिप्त आहे व त्याप्रमाणे निश्चय झाला पाहिजे.

( २ ) मीन = न मी = अहंकारनाश.

( ३ ) गुरूचे नांव सांगू नये. आपल्यात असणारे दोषामुळे त्याची निंदा होण्याचा संभव. ( ५-१-१२ ) दोघांस मंत्र इत्यादि एकदम सांगू नये. दोघांचे गुण एकच नसतात.

★ ★

( ४ ) वृत्ति = आंतली बोली. पुरुष = द्रष्टा.

प्रकृति = कल्पना. आत्मसाक्षात्कार = आपला ( आत्मा )

साक्षात्कार = ओळख = जाणीव = ज्ञान

अहं = ईश्वर, त्याचा अंश म्हणजे जीव म्हणजे सर्व दृश्य पृथक् पृथक् पदार्थ = म्हणजे निरनिराळ्या आकाराचे पदार्थ = अहंकार. अहंकार हे पृथ्वीचे तत्त्व किंवा देवता व पृथ्वीचा गुण गंध व गंध जीवादि पदार्थांच्या ठिकाणी नाकात राहतो व नाकावरून त्या त्या मनुष्यादि जीवाची ओळख होत्ये. नाक झाडी = अहंकाराचा त्याग = निराळेपणाचा = भेदाचा = द्वैताचा त्याग व त्याचा अनुभव.

★ ★

निर्गुण = अवाच्य म्हणजे गुण व वाणी ( मुख ) उत्पन्न होण्यापूर्वीची स्थिती वस्तूची. एक = अनाम. याचे जेव्हा दोन भाग केले, एक क्षर ( बदलणारा ) तेव्हा त्याचे संबंधाने दुसऱ्या बाकीच्या भागास अक्षर-अपार-अनंत-निराकार अशी सापेक्ष नावे बोलण्याकरिता, व्यवहार चालण्याकरिता पडली—म्हणून दोन भाग पडण्यापूर्वी मूळ असणाऱ्या एकास नावच नाही असे होत आहे. म्हणून एकाचा निर्देश क्षराक्षराहून अन्य या शब्दाने केला आहे. ( गीतेंत. )

समुद्राचे खरे ज्ञान काठावर आल्यावाचून नाही. आत्मा = ज्ञान = स्मृति = अमृत. सुखदुःखादिकांचा अनुभव त्या त्या स्थितीत असतो. स्थित्यंतरांत दुसऱ्या स्थितीतल्या सुखदुःखाची केवळ स्मृती असत्ये म्हणजे आत्मारूप केवळ - म्हणजे आत्म्याचा भाग होऊन राहिले नसतात. म्हणजे आत्म्याला चिकटून सुखदुःखादि नसतात. तीनही स्थितींचे ज्ञान म्हणजे स्मृति म्हणजे आत्मरूप होणे = तीनही स्थिति सोडून चवथ्या स्थितीत गेल्याशिवाय नाही.

ब्रम्ह = आत्मा = ज्ञान.

उदाहरणार्थ, दूध तापविले म्हणजे त्यास फुगारा इत्यादि निरनिराळा आकार येतो. ( फवारा ब्रम्हाचा म्हणजे विश्व = दृश्य + + अदृश्य ) परंतु दूधपणात कमी होत नाही. फवारा = वाढ = आनंद ब्रम्हाचा = आत्म्याचा = ज्ञानाचा. एखाद्या विशिष्ट जीवास जितक्या प्रमाणाने एक किंवा अनेक वस्तूंविषयी अनुभव होतो तितक्या प्रमाणाने त्या जीवाचा तो स्वानंद होय. तोच विश्वरूप अनुभव म्हणजे जीवाचा खरा स्वानंद होय. जे जे आकार ज्या ज्या जीवास दिसतात ते ते आकार तो तो जीव मनाच्या द्वारे स्वतः होतो. म्हणून आकारापुरता तो तो त्याचा स्वानंद होय.

★ ★

(५) १५-९-१९०९ रविवार अमावास्या

.........यांच्याशी भाषण. "द्वाविमौ पुरुषौ लोके......॥ १ ॥ "ममैवांशो........जीवलोके—॥ २ ॥ सत्ता अनंत म्हणून आत्यंतिक नाश कसलाही कधीही संभवत नाही. कारण सत्तेच्या बाहेर स्वतंत्र स्थल अवकाश नाही. "द्वाविमौ—ममैवांशो—कूटस्थोक्षर उच्यते" अक्षर शब्द सापेक्ष आहे. ज्या सत्तेच्या भागावर विश्वरूपी पालट दिसतात तो स्वतंत्र अविनाशी अक्षर = कूटस्थ, उदाहरण—लोखंडाचे पळीचे टोळे तापवून लाल केले. टोळ्याचे लोखंडपणाचे ठिकाणी पूर्वी जे अप्रकाशित काळे होते त्या काळेपणाचे ठिकाणी लाल रंग प्रकाशमान ( लालपण ) आले. लोखंडपण दोहोमध्ये सामान्य. त्याचा पालट मुळीच नाही. म्हणून टोळ्यातील लोखंडपण =कूटस्थ अक्षर अप्रकाशित काळे. प्रकाशित लाल व ह्या दोन्ही स्थिती = भूतानि = क्षरः ।। टोळे लाल झाले म्हणजे हे पाठीमागील पळीच्या दांड्याचा भाग नसल्याची म्हणजे दांड्यापासून वेगळे टोळे आहे असे वाटू लागते व अप्रकाशित काळेपण व प्रकाशित लालपण ही दोन्ही लोखंडपणापासून वेगळी आहेत अदृश्य = नाशिवंत = अनित्य = क्षर आहेत. परंतु लोखंडपणापासून अगदी स्वतंत्र असू शकत नाहीत = लोखंडपण सत्तेच्या निरनिराळ्या स्थिती आहेत ( माया ) म्हणून टोळ्यातील लोखंडपण दोहों स्थितीपासून अगदी वेगळे स्वतंत्र–नित्य—अविनाशी–अक्षर— व कधी न अदृश्य होणारे असे आहे. (ईश्वर) हाच परमात्मा हे म्हणणे विशिष्टाद्वैत. परंतु टोळ्यातील लोखंडपण कधीच विकार पावत नाही ते अनंत–कैवल्य–परमात्मा भगवन्. कापूस त्याचे सूत व त्याचा पट हे उदाहरण...नी सुचविले–कापूस सुतात व पटात आहे. जागृतीत शब्द निघण्यापूर्वीची स्थिती की जिचे भान नसते म्हणजे सहज असते

ते कैवल्य. त्यापासून केवळ आहेपणाचे भान मात्र ती ईश्वर (तुर्या–परा स्मृति त्यापासून......रूप आकाश (तीन प्रकारचे) मा (पोटाचे अवकाशमानात जीवाचे 'त्र' (रक्षण) होते ती मातृ. म्हणणारास रक्षिले म्हणून गायत्री. भान = ज्ञान. जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन तुर्येवर म्हणजे तिला धरून असतात. "ममैवांशो" इ० पासून द्वात्रिंमौपर्यंत परमात्मा ईश्वर होऊन माया कोणकोणत्या प्रकारच्या होतात ते मुख्य प्रकार वर्णन.

★ ★

(६) राम राम राम २४–११–०६ शनिवासरे रात्रौ २¼ तां. स. सा. (अ) हं ह्या वर्णांचा व सर्वनामाचा श्वासोच्छ्वासाशी संबंध आहे व त्यावरून हे वर्ण व नामें निघाली आहेत म्हणजे सोहं पुरुष प्रकृति होऊन ब्रम्ह आंत शिरते व साकारते आणि अ पासून ह् पर्यंत वर्णोच्चार करणारा जो मी एक मनुष्य. अहं यांतील मकार व अकार त्याच्या व त्वंच्या विभक्तीस लागले आहेत. जेथे श्वास नाही ते तत् (ब्रम्ह).

★ ★

(७) ११–५–१९०२ मीन मार्ग काय व कसा............ त्यांनी सांगितले, त्यांचा भाऊ आळंदीस १८८२–८३ साली डॉक्टरीचे कामावर नोकर होता. त्यावेळेस महाराजांचे दर्शन झाले होते. त्यांनी अमुक कर म्हणोन तोंडाने मुळीच सांगितले नाही, परंतु स्वामींचे दर्शन झाल्यापासून ध्यानयोग करावा म्हणून प्रेरणेने वाटू लागले. व देहाचे बाहेर राहून साक्षित्वाचा अभ्यास करू लागलो. आता असे कर असे करू नको म्हणोन स्वामींची प्रेरणा होऊन अभ्यास चालतो व देह गलित होऊन पडतो परंतु मी ब्रम्ह आहे व देहत्रयादिकांचा

मी साक्षी आहे येवढे भान असते असे...यांनी सांगितले. श्रीसद्‌गुरु-स्वामी अंतःप्रेरणेने हवे तेव्हा हवे ते सांगतात व शिकवितात हे सिद्ध झाले.

★ ★

(८) ३१–७–०६ नंद वर्धने–आनंद. वस्तू पाहून आनंद होतो (दृष्टीद्वारा वस्तूच्या आकारापुरता तूं वाढतोस) हा एक आनंद व वस्तू स्वाधीन झाली म्हणजे अनेक उपयोगरूप होतोस म्हणून ज्यास्त आनंदी. परंतु ती वस्तूच तूं स्वतः स्वतंत्र राहून स्वतः होतोस म्हणजे निर्माण करतोस तेव्हा तो अति आनंद म्हणजे स्वानंद. मुक्ति म्हणजे देह सोडून वागणे म्हणजे "ह्याचि देहीं ह्याचि डोळां पाहीन मुक्तिचा सोहळा" स्वतःच्या डोळ्याने दर्पणावाचून स्वताहाचा डोळा पाहणे (६–२–०७) म्हणजे **कणशः** स्वताहाच्या देहाशी ऐक्य ईशकृपेने साधणे व आपला देह आपण स्वेच्छेने टाकणे व घेणे किंवा निर्माण करणे म्हणजे निज निर्धारे स्वानंद विलास करणे.

बाह्य विषयांचे इंद्रियद्वारा ग्रहण करतोस म्हणजे ऐकतोस, पहातोस, चाखतोस इत्यादि तेव्हा तूं स्वताहाला विसरतोस, तुझे तुला भान नसते. ह्याचे नाव बहिर्मुखता* [ हे व्यंग सर्वभूतांच्या ठिकाणी सदैव असते. (३ तिन्ही स्थितींत) म्हणून तीं सदैव रात्री निजल्या-प्रमाणे असतात असे समजावे. ]* हे व्यंग नाहीसे करणे नाम-स्मरणाने, अमनस्काने इ० एकाच वेळेस स्वतःविषयी व बाह्यविषयाचे (कारण पडल्यास) भान असणे सदैव **ह्याचे नाव मौन मार्ग.** तो **गुरूकृपेने प्राप्त होतो.** सोहं हंसः ह्याने अखंड जागृति ठेवणे. म्हणून बाह्य विषयांचे ग्रहण करीत असताही स्वतःविषयी भान–जागृति राखणे, जीवेश्वर ऐक्य, अखंड तुर्या.

★ ★

(९) २२।८।०४ अमुक प्रकारच्या स्थूळ देहाच्या द्वारे जागृतीची किंवा अमुक प्रकारच्या लिंगदेहाच्या द्वारे स्वप्नाची क्रिया किंवा लीला करण्याचा जो जीवाचा किंवा आत्म्याचा मूळ निश्चय म्हणजे विशिष्ट निश्चय त्यास कारण देह किंवा सुषुप्ति देह म्हणतात. स्थूल किंवा लिंग, किंवा ते दोन्ही देह म्हणजे विशेषेकरून मस्तकातील मज्जा हे गात्र व शरीरातील रक्त इत्यादी, ती क्रिया किंवा लीला करता येण्यास अनुकूल स्थितीत नाहीत असे जेव्हा जीवास ज्ञान होते तेव्हा तो कारण देहात किंवा सुषुप्तींत राहतो, केवळ विशिष्ट निश्चयरूप होऊन राहतो. मज्जागात्रादिकांस अनुकूल स्थिती प्राप्त झाली म्हणजे स्वप्नाची किंवा जागृतीची क्रिया करण्यास लागतो. परंतु स्थूलाची अनुकूल स्थिती पुनः किंवा लवकर प्राप्त होणार नाही अशी जेव्हा जीवाची खात्री होते तेव्हा तो लिंगदेहाला स्थूलापासून सोडवून घेऊन स्थूलाला टाकून जातो म्हणजे स्थूलास मृत्यू येतो. ॐ श्री नरसिंव्हसरस्वती सद्‌गुरूभ्योनमः शुभंभवतु ॥

* *

(१०) ४–४–०४ .... .... .... वकीलाबरोबर भाषणः— डोक्यातील मेंदू हे कल्पना उत्पन्न करण्याचे इंद्रिय नाही. परंतु ईश-शक्तीत ईशशक्तीने कोठेतरी उत्पन्न झालेली कल्पना विवक्षित शरीरात घेण्याचे व तेथून शरीराबाहेर धाडण्याचे इंद्रिय व त्याची जागा होय. जसे तारायंत्र शब्द उत्पन्न करीत नाही परंतु उत्पन्न झालेले शब्द घेण्याचे व पाठविण्याचे यंत्र आहे. मेंदू किंवा मन सुस्थित किंवा प्रकृतिस्थ नसल्यास बाहेरच्या पदार्थांचे ठसे उजेड इत्यादी संबंधाने जरी डोळ्यात उठले तरी समजले जात नाहीत. [ पूर्वी कधी न पाहिलेली वस्तु स्वप्नात दिसते व ती नंतर खरी

ठरते म्हणजे देहधारी जीव असताना त्यांस अतीन्द्रिय ज्ञान म्हणजे देहत्रय उपाधिरहित ज्ञान कधी कधी आपोआप होते.]

* *

(११) अहंकार म्हणजे देहाच्या निरनिराळया अवयवांचे एकमेकांशी किंवा परस्परांशी जोडणे किंवा संधि अथवा सांधणे व सर्व अवयव जोडलेले आहेत अशी जी मनाची वृत्ती तिचाही अहंकार यांत अंतरभाव होतो. पक्षघात व्याधीतही नेहमीच्या सवयीमुळे अहंकार वृत्ती असते परंतु वास्तविकपणे तसे नाही. समग्र अवयव समुच्चय किंवा समग्र देह आणि तद्विषयक वृत्ती याजला "मी" असे जीव म्हणतो. तात्पर्य "अहंकार" याच्या शब्दार्थात स्वतंत्रता किंवा स्वतंत्रसत्ता असा मुळीच अंतर्भाव होत नाही. केवळ ईशसत्ता देहास सर्वथैव व्यापून बाहेर अती मोठ्या अंशाने राहते. त्या ईशसत्तेने हा समग्र देह तद्विषयक वृत्तीसह म्हणजे अहंकार वागतो किंवा क्रिया करतो. जसे वाफेच्या योगाने साखळयांनी जोडलेली आगगाडीच्या डब्यांची रांग व यंत्र ही चालतात. म्हणून देह व त्याची वृत्ती ईशसत्तेच्या स्वाधीन आहे.

* *

(१२) स्वप्न ७-२-०८ माघ शु॥ ६ शके १८२९

आज शनिवासरला उजाडण्यापूर्वी आमचे घरातून एक वाकलेला संन्याशी हातात दंड घेऊन माझा हेतु असा आहे असे म्हणत एका मुलाशी बोलत बाहेर पडला. तो तात्यासाहेब रायरीकर व मागाहून देव मामलेदारासारखा चेहरा असा वाटला. व जज्ज व मी हे स्वामी कोठे जातात हे पाहण्याकरिता बाहेर पडलो. तो पुढे पिरापलीकडे रस्त्याशेजारी स्मश्रु करीत बसले व तेथे पुष्कळ मुले व लोक जमले

त्यांजशी ते बोलू लागले. नंतर ते घरी आले व मला न्हाव्याचे पैसे देऊन टाक म्हणून व न्हाव्यास ओरडून हांक मार म्हणजे तो सापडेल असे सांगितले व मी त्याप्रमाणे केले व तो न्हावी म्हातारा होता व मी त्यास आठ पैसे ( दिडक्या ) दिल्या. ते स्वामी घरात बरेच दिवस राहिले व मी मध्ये जागा झालो. त्यावेळेस ( ५॥ वाजल्या होत्या ) व ते स्वामी असलेले असा भास झाला. [ इंग्रज लोक ज्या क्रिया येथे करतात त्यांचे पाप त्यांजलाच व त्यांचे राज्य ज्या वेळेस नष्ट होईल तेव्हा त्यांच्या राज्याचा परिणाम येथे चांगल्या प्रकारचा झालासा दिसोन येईल व असा परिणाम घडविण्या-करिताच त्यांचे राज्य चालू देवाने केले आहे. ] नंतर ते स्वामी अमावास्येला गावी गेले.........बोलल्याचा भास व मी पुन्हा जागा झालो. त्यावेळेस सूर्योदय झाला होता.

---

## परिशिष्ट ६

# श्री. सौ. मनोरमाबाई पटवर्धन यांचे निर्याण

[ पुढील उताऱ्यात श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या पत्नी सौ. मनोरमाबाई पटवर्धन ( माहेरचे नांव रमा दामले ) यांच्या निर्याणाची हकीकत श्री. अण्णासाहेब यांच्याच शब्दांत दिली आहे. त्या, ता. २९-७-१९०२ रोजी म्हणजे अण्णासाहेबांच्या निधनापूर्वी सुमारे १५ वर्षे, 'श्री. स्वामीचरणी स्वानंदी ' गेल्या. पुस्तकाच्या आरंभी जी छायाचित्रे दिली आहेत त्यांत कै. सौ. मनोरमाबाईंचेही आहे. श्री. अण्णासाहेब यांच्या पत्नीचे सासरचे नाव कळविल्याबद्दल आम्ही श्री. काशिनाथ त्रिंबक वागदरीकर यांचे आभारी आहोत. ]

श्री

शनिवार श्रावण शु।। १२ शके १८२४=१६-८-१९०२.

माझ्या बायकोला (दामलेकुलोत्पन्न रमाला) आषाढ शु।। १० मंगळवार रोजी ज्वर फार आला. ( १५-७-०२ कर्के ४ दिने ) व अतिसार झाला. शुक्रवारी अतिसार व वांति फार झाली. परंतु पहाटेस म्ह. उजाडता शनिवार सर्व कमी झाली व घायाळ होऊन गेली. व मोठ्याने पहाटे एकवार उमासा येऊन ओरडून उठली व निश्चेष्ट पडली व दुसरे दिवशी सावध झाल्यावर तिने सांगितले की, नेण्याकरता मंगळवार पासून चार दिवस मंडळी आली व खाली झोपाळ्यावरही बसत होती. परंतु श्रीस्वामी हातात सोटा घेऊन माझेजवळ बसत, यामुळे ते लोक अंगास हात लावीत नसत व शुक्रवारी जेव्हा

ते लोक मान धरून ओढूं लागले तेव्हा स्वामींनी सोटा त्यांना मारला व ते पळून गेले, व ते पुनः आले नाहीत. व श्रीस्वामी दिवाण-खान्यांत हिंडताहेतसे दिसले. आषाढ शु।। १५ रविवार (२०-७-०२) रोजी मी सुंदरलाल, बागलू इ. श्रीआळंदीस गेलो. कर्के भौम व।। ९ दिने (२९-७-०२) प्रातः सुमारे ८-३० वाजता बायको श्रीस्वामी-चरणी स्वानंदी गेली. प्रेत घराबाहेर नेण्यापूर्वी सुंदरलाल व विनायक आठवले यांनी फोटो काढले व बागलूने मजला गोठ्याकडे बोलावून नेऊन सांगितले की चार आण्यांचा हार आणवून श्रीस्वामी महाराजांची पूजा करा. त्यावरून लक्ष्मण आपल्याकडून पूजा केली. प्रेत नंतर नेले. यावरून आजाराच्या आरंभापासून शेवटपर्यंत सर्व लीला श्रीने स्वतः केली हे सिद्ध.

२९-९-०२ रा. माधवराव दांडेकर हे जुन्नरास जूनचे (१९०२) आरंभापासून कमलाकर हरी साठे, बी. ए. यांचे येथे जाऊन राहिले होते. तेथे त्याणी २५-७-०२ चे सुमारास स्वप्नात पाहिले की श्रीस्वामी महाराज आमचे ओट्यावर उभे आहेत व खाली रस्त्यावर एक ब्राम्हण दर्भ हातात घेऊन उभा आहे. त्यास महाराज बोलले की, तुमचे येथे काम नाही, हे मनुष्य आमचे आहे. याची क्रिया सांगणे वगैरे सर्व आमचेकडे आहे. तरी तो उभा राहिलेला मनुष्य जाईना. तेव्हा महाराजांनी त्यास धक्के मारून घालविला व आंत येऊन झोपाळ्यावर बसले. ही गोष्ट त्याणी कमलाकराचे आई वगैरे पाशी दुसरे दिवशी सांगितली व कोणावर गदा येत आहे या विचारात पडले. इतक्यात, आमची बायको आजारी असल्याचे त्यांस माहीत नव्हते, त्यास तिला देवाज्ञा झाल्याचे कळले. या स्वप्नात व बायकोस श्रीचे झालेल्या दर्शनाचे प्रकारात फार साम्य आहे. यावरून असे सिद्ध झाले की बायकोला श्रींचे दर्शन वायूची लहर नव्हे व

अंतकाळी अप्रार्थित सांनिध्य श्रींचे झाले. येणेकरून श्री केवल संत किंवा सिद्ध नव्हे परंतु साक्षात् सर्वसाक्षी, सर्वज्ञ व सर्वव्यापक देव होय. बायकोस वे. शा. सं. रा. बाळंभट भाऊ काळे याणी "नमः शिवाय" हा मंत्र दिला होता व श्रीचे दर्शन झाल्यावर मी आता बरी होईन असे देखील ती बोलली व मलाही तसेच वाटले. कारण ती मला बोले की श्री येतात ते तुमचेमुळे. यावरून बायकोस आपले चरणी नेऊन ठेविली यात संदेह नाही. श्रीगुरू केवळ देव आहे असे विषयी ही दुसरी प्रतीति कारण "प्रचीति दावी निजभक्ताशी" स्वा. सौ. ज्ञानकांड ओवी २०५.

---

## परिशिष्ट ७

# खेचरी मुद्रा

( श्री. कापसे यांच्या आठवणीत 'खेचरी मुद्रा' असा शब्दप्रयोग आला आहे. पुण्याचे सत्पुरुष श्री. योगिराट् परमपूज्य श्री. गुळवणी महाराज यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'योगभक्तिदर्शन' नामक जो मोठा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे त्यांतील...... 'श्रीवासुदेवानंद सरस्वतीकृत योगरहस्य' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या लेखातून पुढील उतारा घेतला आहे. हा लेख श्री. गुळवणी महाराजांनीच लिहिला आहे. ज्या वाचकांस हठयोगातील काहीच गम्य नाही त्यांस या मुद्रेची काही कल्पना यावी यासाठीच हे अवतरण घेतले आहे. )

" जिव्हां मूलशिरां छित्वा रोममात्रं प्रघर्षयेत् ।
पथ्यासैंधवचूर्णैर्गां प्राग्वत्सप्तदिनैर्मुहुः ।। २५

षण्मासादि जिव्हाधः शिराबंधो विनश्यति
मुद्रा स्यात्खेचरी त्र्यध्ये योजिता वाङ्मुखी कला ।।" २७

अर्थ :—जिभेच्या खाली असणारी शीर एक केसभर छेदावी आणि हिरडा व सैंधव यांचे चूर्ण तेथे चोळावे. याप्रमाणे सात दिवसांनी पुनः पूर्वी प्रमाणे छेदन वगैरे करावे. असे सहा महिनेपर्यंत केले असता जिभेच्या खाली असणाऱ्या शिरेचे बंधन नष्ट होते. नंतर तीन नाड्यांच्या मार्गांत पडजिभेच्यावर असणाऱ्या छिद्रामध्ये, वर अग्र करून ती जीभ घातली असता खेचरी मुद्रा सिद्ध होते.

विवरण:–वरील श्लोकामध्ये खेचरी मुद्रेचे महत्व प्रतिपादन केले आहे. खेचरीचे लक्षण हठयोगप्रदीपिकाकार असे करतात:—

‘ कपालकुहरे जिव्हा प्रविष्टा विपरीतगा
भ्रुवोरंतर्गता दृष्टिर्मुद्रा भवति खेचरी ’

पडजिभेपासून वर मस्तकापर्यंत असणाऱ्या छिद्रामध्ये जीभ घालून, दृष्टि भ्रूमध्यावर ठेवून बसणे म्हणजे खेचरी मुद्रा होय. टीकाकारांचे स्पष्टीकरण असेच आहे—कपालकुहरे जिव्हाप्रवेशपूर्वकं भ्रुवोरंतर्दर्शनं खेचरीति लक्षणं सिद्धम्. याकरता जीभ बरीच लांब करावी लागते ........जीभ तोंडाबाहेर काढली असता ती वर भुवयांच्या मध्यापर्यंत जाऊन पोचली पाहिजे. ” (अधिक माहितीकरता योगभक्तिदर्शन या ग्रंथातील पृष्ट ६८–६९ या पानावरील मजकूर पहावा.)

---

# परिशिष्ट ८

# शक्तिपात

## अर्थात् Transmission of spiritiul Power

( श्री. ग. वि. बापट यांच्या आठवणीत 'शक्तिपात करून नृसिंह-सरस्वती महाराजांनी आपले तेज श्री. अण्णासाहेब यांस दिले' अशा अर्थाचा मजकूर आला आहे. जे साधक आहेत आणि ज्यांस गुरूकडून शक्तिपात किंवा शक्तिसंचार ( Transmission ) या मार्गाने दीक्षा मिळाली आहे त्यांस शक्तिपात या शब्दात काहीच गूढ वाटणार नाही. परंतु असे जे नाहीत त्यांना या शब्दाचा वास्तविक अर्थ समजावा, त्याचे लक्षण थोडे फार लक्षात यावे, एतदर्थ अधिकारी पुरुषांच्याच वाणीने ते लक्षण किंवा अर्थ पुढे सांगितला आहे. मागे उल्लेख केलेल्या योगभक्तिदर्शन या पुस्तकातील **योगरहस्य** या लेखात पुढीलप्रमाणे हा प्रकार निवेदन केला आहे. )

### 'कुण्डलिनी योग'

" विश्वातील चेतन, अचेतन सर्व विभागांमध्ये एक विलक्षण शक्ती अनुभव सिद्ध आहे. परस्परविरोधी पंचभूतांमध्ये दिसून येणारा समन्वय, त्या शक्तीच्या नियमनामुळेच आहे असे मान्य करावे लागते. नाही तर परस्परांच्या धर्मसांकर्याने जगाचा नाश झाला असता. ही शक्ती परब्रम्हाची किंवा परमात्म्याची आहे असे 'देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढां' इत्यादि वाक्यांवरून सिद्ध होते........याच ईश्वर-शक्तीची अभिव्यक्ती त्या त्या उपाधींमुळे कमी जास्ती प्रमाणात असलेली दिसते. मनुष्यांमध्ये बाल, तरुण, निरोगी, रोगी, इत्यादी

अवस्थाभेदाने शक्ती कमी जास्त असलेली दिसून येते. याला कारण अभंग, निर्विकार, आत्मस्वरूप मानता येत नाही. तर शरीर, इंद्रिय, मन, बुद्धी इत्यादी उपाधींमुळेच हा शक्तिभेद मान्य करावा लागतो. ही शक्ती शक्तिमानाहून भिन्नही ठरविता येत नाही. पंचमहाभूतांच्या आधाराने व्यक्त होणाऱ्या या शक्तीला जडशक्ती किंवा भौतिक शक्ती असे म्हटले जाते आणि शरीर, इंद्रिय, मन, बुद्धी इत्यादिकांच्या आश्रयाने अभिव्यक्त होणारी हीच शक्ती चेतनशक्ती समजली जाते... ....या आध्यात्मिक शक्तीलाच कुंडलिनी म्हणतात. कुंडलिनीचा आकार सर्पासारखा मानलेला आहे ......तात्पर्य समष्टी किंवा व्यष्टिरूप पिंड-ब्रह्मांड धारण करणारी ही शक्ती एकच आहे.........ही शक्ती सुवर्णाप्रमाणे भासणारी, सत्व, रज व तम या तीन गुणांना व्यक्त करणारी, विष्णूची व्यापक परमात्माची निर्भय करणारी शक्ती आहे असे समजावे."

बुद्धिमान मनुष्याने कुंडलिनी शक्तीला तिच्या मूलस्थानातून म्हणजेच मूळाधारातून भ्रूमध्यापर्यंत संचलित केले पाहिजे आणि यालाच शक्तिचालन असे म्हणतात. आता या कुंडलिनी शक्तीचे कोणत्या मार्गाने चालन होते किंवा ती जागृत होते, याविषयी लेखक म्हणतात, "सद्‌गुरूच्या शक्तिपात दीक्षेने या शक्तीचे चालन होते म्हणजे ती जागृत होते. गुरू हे आपल्या शिष्याचे ठिकाणी आध्यात्मिक शक्तीचा पात करून त्याचे परतत्वाशी ऐक्य घडवून आणतात.........अनेक जन्मांच्या पापवासनारूप पाशांनी जखडलेल्या जीवांच्या ठिकाणी ही शक्ती आच्छादित झालेली असते...... शिष्यामध्ये असलेल्या शक्तीला जागे करणे यालाच शक्तिपात असे म्हणतात. शक्तिजागृतीने प्राणवायू ऊर्ध्वगामी होतो आणि चित्त व प्राण दोघांचाही पूर्ण लय होतो. म्हणून या कुंडलिनी योगाला महायोग

असे म्हणतात. म्हणजे हा योग पातंजलादि योगापेक्षा निराळा आहे असे नसून हाही त्यांच्याप्रमाणेच चित्तवृत्तिनिरोधरूपच आहे. पण हा गुरुकृपेने शीघ्र प्राप्त होतो.........एका दिव्याने दुसरा दिवा लागतो त्याप्रमाणे गुरुशक्तीच्या संबंधाने शिष्याची कुंडलिनी शक्ती जागृत होते."

अर्थातच 'साहे ओझे त्यास तेचि द्यावे' हा नियम येथेही लागू आहे. साधकाची किंवा शिष्याची आध्यात्मिक पात्रता नसेल तर सद्गुरू शक्तिचालन किंवा शक्तिसंचार करणार नाहीत हे उघड आहे. अण्णासाहेबांची आध्यात्मिक पात्रताच इतकी स्वयंसिद्ध होती की अशा शिष्याचे ठायी शक्तिसंचालन करण्यात श्रीमहाराजांना अतीव आनंदाचा लाभ झाला असला पाहिजे. श्रीबाबासाहेब पटवर्धनांना अण्णासाहेब कधीही योगासने करताना दिसले नाहीत, याचेहि उत्तर याच (योग-भक्ति-दर्शन) ग्रंथात प्रसिद्ध झालेल्या श्री. गुळवणी महाराजांच्या 'Transmission of Spiritual Power' या लेखात सांपडण्यासारखे आहे. या लेखात असे म्हटले आहे की:--

> "Once by the grace of the Guru the yogic power of the Sadhak is awakened, Asana and Pranayama and mudra and other accessories of yoga lose their utility for him."

अण्णासाहेबांसारख्या साधकांची गोष्ट अगदी निराळी. शक्तिपात करण्यापूर्वी महाराज त्यांच्याकडून योगाभ्यास करवीतच होते. परंतु अशिक्षित किंवा योगाभ्यासाचा संपर्क नसलेल्या माणसांच्या बाबतीत या लेखात पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत :—

> "There are occasions when even an illiterate Sadhak possessing no knowledge of

Asana or Pranayam may be seen doing all these processes exactly as prescribed in the shastras under the influence of the transmitted power just like a yogi who had a training in yoga for several years.

शक्तिपात झाला की अशिक्षित व योगाचा अभ्यास नसलेला मनुष्यसुद्धा, एखाद्या कसलेल्या योग्याप्रमाणे यौगिक प्रक्रिया करू शकतो असा या अवतरणाचा भावार्थ आहे. सद्गुरूने जागृत केलेली कुंडलिनीच त्याच्याकडून या क्रिया करविते असे या लेखात पुढे म्हटले आहे.*

---

* शक्तिपाताची आध्यात्मिक उपयुक्तता सिद्धच आहे. परंतु शक्तिपात–साधनेने रोगनिवारणही होऊ शकते अशा अर्थाचा आपला अनुभव मुंबईचे श्री शं. वा. देवधर यानी 'योगभक्तिदर्शन' या ग्रंथात वर्णन केला आहे. त्यांच्या पाठीत डाव्या बाजूस तीव्र कळा येऊ लागून पुढे त्या दुखण्याने ते जर्जर झाले. शरीराची डावी बाजू संपूर्ण अधु होऊन गेली. परंतु अधिकारी सद्गुरूंनी केलेल्या शक्तिपात–साधनेने ते पूर्णपणे रोगमुक्त झाले.

# स मा रो प

## ( आठवणीतून दिसणारे अण्णासाहेब )

" When help from outside ( from Guru ) comes, the higher powers and possibilities of the soul are quickened, spiritual life is awakened, and man becomes holy and perfect in the end. This quickening impulse cannot be derived from books. The soul can only receive impulses from another soul, and from nothing else. We may study books all our lives, we may become very intellectual but in the end we find that we have not developed at all*............ To quicken the spirit the impulse must come from another soul.

**—स्वामी विवेकानंद–भक्तियोग**

---

* " नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते " हे जरी खरे असले तरी भक्तीच्या जिव्हाळ्यावाचून केवळ विद्वत्ता किंवा ज्ञान अध्यात्माची प्राप्ती करून देण्यास समर्थ होत नाही. Stephen Crane या अमेरिकन कवीचा पुढील चुटका अतिशय उद्बोधक आहे.

A learned man came to me once.
He said " I know the way——come "
And I was overjoyed at this
Together we hastened.
Soon, too soon, were we
Where my eyes were useless

(टीप पुढील पानावर)

करूनी नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास । .. ....
तरी सद्गुरु कृपेविरहित । सर्वथा न घडे स्वहित ।।

—दासबोध

" न स्पर्शत्वं तथापि श्रितचरणयुगे सद्गुरुः स्वीयशिष्ये
स्वीयं साम्यं विधत्ते भवति निरुपमस्तेन वाऽलौकिकोऽपि

(सद्गुरु शिष्याला ' स्वीयसाम्य ' देतात, आत्मपद देतात, ते परिसाहूनही श्रेष्ठ आहेत.)

—आद्य श्रीशंकराचार्य ' शतश्लोकी '

तूतें देह नसे शुभाशुभ कदा तत्कर्म तेंही नसे
ऐसें हें निजमानसीं समजतां प्रारब्धरेषा पुसे ।
शुद्धात्मा विलसे सदा त्रिभुवनीं अद्वैत तें पाहणें
ब्रम्हानन्द अगाध चिन्मय सुधासाम्राज्य तें भोगणें ।।

—श्री. नारायणबुवा जालवणकर

---

(मागील पानावरून)

And I knew not the ways of my feet
I clung to the hand of my friend
But at last he cried " I am lost."

× ×

या संबंधात श्रीनरसिंव्हसरस्वती महाराजांनीही पुढीलप्रमाणे समर्पक आणि यथार्थ उद्गार काढले आहेत. " भक्ती आणि ज्ञान दोन नाहीत, एकच. भक्ति ज्ञानाची माऊली......... ज्ञानी जरी झाला तरी त्याने भक्ती केली पाहिजे. उलट असे आहे की नुसत्या भक्तीपेक्षा ज्ञान्याची भक्ती विशेष खुलते. भक्ती करील तर ज्ञानीच करील. . . भक्तीशिवाय ज्ञान हे ज्ञान नव्हे व ज्ञानाशिवाय भक्ती, ती भक्ती नव्हे."

—श्रीनरसिंव्हसरस्वतीस्वामीमहाराज यांच्या पत्रातील उतारे



आठवणीसारख्या पुस्तकाला समारोप कशास पाहिजे आणि तो असणार तरी काय अशा शंकाकुलतेने वाचक या समारोपाकडे पाहतील. परंतु ज्या अर्थी या पुस्तकास आम्ही प्रस्तावना लिहिली आहे त्याअर्थी समारोपही लिहिणे अप्रयोजक दिसणार नाही. या स्मृतिमंदिराचा प्रस्तावना हा पाया धरला तर कळसादाखल समारोपाचे चार शब्द लिहिणे ओघानेच प्राप्त होते.

अव्वल इंग्रजीनंतर झालेल्या शतकाचा किंवा अर्धशतकाचा इतिहास आपाततः पाहता असे दिसून येईल की महाराष्ट्राला पुढाऱ्यांची आणि संतांची वाण कधीच पडली नाही. प्रस्तुत आपल्याला पुढाऱ्यांशी किंवा देशभक्तांशी काही कर्तव्य नाही. आळंदीचे श्रीनरसिंह-सरस्वती स्वामी, श्रीगोंदवलेकर महाराज, गुलाबराव महाराज, श्रीमाणिकप्रभु महाराज, श्रीसाईबाबा, श्रीनारायणबोवा जालवणकर इत्यादी अनेक साधूंनी या कालात लोकांचे आधिभौतिक ताप तर दूर केलेच, परंतु ज्याची जशी इच्छा दिसली किंवा या संतांना ज्याची जशी पात्रता वाटली, त्याला परमार्थसाधनाकडे वळवून आपल्या उपदेशाने आणि शिक्षेने कृतार्थ केले. केवळ द्रव्यसंपादन किंवा सुखोपभोग हेच मानवी जीविताचे साध्य नसून, त्यापलीकडेही काही उच्चतर कर्तव्य मानवाकडून ईश्वरास अभिप्रेत आहे, हे त्यांनी स्वतःच्या उदाहरणांनी आणि निष्कलंक आचरणाने सिद्ध करून दिले. आणि जो आमचा समाज कदाचित् परधर्माच्या आहारी जाऊन भ्रष्ट आणि विस्कळित झाला असता, त्या समाजाच्या धार्मिक

अवनतीस त्यांनी चांगलाच पायबंद घातला.* आजही जरी परकीय आचारविचारांचे आम्ही निःशंकतेने ग्रहण करीत असलो तरी जोपर्यंत अजूनहि कांही कुलाचार, कुलधर्म कित्येक घरांतून पाळलेले दिसून येत आहेत तोपर्यंत अंतर्यामीचे हिंदुत्व सर्वस्वी लोपले आहे असे म्हणता येत नाही. हे हिंदुत्वाचे संस्कार किंवा संस्कारावशेष ज्यांनी आपल्या आचरणाने टिकवून धरले अशा सत्पुरुषांतच श्रीअण्णा-साहेबांची गणना होते. संतांची शिकवण ही कालातीत असते, म्हणजेच बहुजनसमाजावर कालनिरपेक्ष असा परिणाम करीत असते. पन्नास वर्षे लोटल्यावरही आज अण्णासाहेबांचे पुष्कळ चाहाते व भक्त आहेत. त्यांचे चरित्र वाचण्याची उत्सुकता अलिकडे दिसून येत आहे. याचाच अर्थ असा की त्यांची शिकवण, त्यांचे आचरण याचा अभ्यास समाजास करावासा वाटू लागला आहे.

हे वरील वाक्य जरी आम्ही लिहिले, तरी त्याच्याच बरोबर हे लिहिणे भाग आहे की, आज अण्णासाहेबांचे नांव बहुजनसमाजास इतके परिचित नाही की जितके इतर संतांचे आहे. अण्णासाहेबांची अतीव निरहंकार वृत्ती आणि प्रसिद्धिविन्मुखता हेही याचे कारण

---

* अव्वल इंग्रजीच्या आरंभी ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रचाराचा पगडा हिंदुसमाजावर शीघ्रतेने बसू पहात होता. सुशिक्षितांवरही या प्रचाराचा परिणाम झाला, आणि बाबापदमजी, मोडक, नारायण शेषाद्रि, नीळकंठशास्त्री गोरे, ना. वा. टिळक इत्यादि गृहस्थांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. सर्वांत ठळक उदाहरण पंडिता रमाबाई यांचे होय. कै. विष्णुबुवा ब्रम्हचारी यानी व्याख्याने देऊन मिशनऱ्यांच्या प्रचारास चांगलेच तोंड दिले व धर्मांतराची लाट थोपवून धरली.

असू शकेल. चमत्कार करणाऱ्या संतांची समाजावर लवकर छाप बसते आणि त्यांचे नाव लोकांच्या मुखी राहते. काही अपवादात्मक प्रसंग सोडल्यास अण्णासाहेबांकडून केवळ चमत्कार असे झाले नाहीत. हुबळीचे श्रीसिद्धारूढ स्वामी हेही कधी चमत्कार करीत नसत.* आपण इतर लोकांपेक्षा कोणीतरी विशेष आहो असे अण्णासाहेबांनी कधीच भासविले नाही. आणि त्यांच्या या निगर्वी वृत्तीमुळे आणि प्रसिद्धिविन्मुखतेमुळेच की काय, त्यांची स्मृती आज लोकांना असावी तशी नाही, असे विधान करणे भाग येते. वस्तुतः अण्णासाहेबांना आपली काही स्मृती मागे रहावी किंवा कीर्तिशेष मागे उरावा अशी इच्छा त्यांच्या सबंध आयुष्यातही झाली नसेल आणि निर्याणसमयीही ती इच्छा त्यांच्या मनात वास करून असण्याचा सुतराम् संभव नव्हता. जेथे क्रमाक्रमाने त्यांनी सर्व ईषणांचा किंबहुना सर्वस्वत्याग केला तेथे त्यांना लौकिक किंवा द्रव्य या गोष्टीचे महत्व काय होय ? पूर्ण निरिच्छता, पूर्ण निरहंकार आणि पूर्ण विषयत्याग ही त्रयी ते ज्या अवस्थेला पोचले तिचेच एक पूर्वकारण होते.

संत किंवा साधुपुरुषाविषयी सामान्य लोकांत आदर असतो हे खरेच आहे. परंतु काही लौकिक लाभ किंवा ऐहिक आशा

* "महाराज काही चमत्कार करीत नाहीत किंवा काही अकल्पित क्रियाही करीत नाहीत. येथे हे नमूद करणे जरूर वाटते की चमत्कार करणे, लोकांस दाखले दाखविणे, रोग बरे करणे, नवसास पावणे...... इ. इ. ज्ञानाची कार्ये नव्हेत किंवा ती संतांची खास लक्षणेही पण नव्हेत."

—ल. रा. पांगारकर, 'चरित्र माला' पृ. १४६.

फलद्रूप करण्यापलीकडे त्या आदराचा फारसा विनियोग होत नाही. परंतु काही असे विलक्षण आणि जिज्ञासू असतात की एखाद्या संत किंवा साधुपुरुषाला त्यांनी जर गुरु केला असेल तर आपले गुरु कोणत्या मार्गांनी गेले याचा शोध लावण्याकडे त्यांची साहजिकच प्रवृत्ति होते. अण्णासाहेब कोणत्या मार्गाने गेले आणि ते ज्या पदवीला पोचले ती पदवी त्यांना कोणत्या साधनेने, वा साधनाने किंवा मार्गाने प्राप्त झाली याचा शोध काही जिज्ञासू लोकांनी केला आहे. स्वतः अण्णासाहेबांस यासंबंधी प्रश्न केला असता ते उत्तर देण्याचे टाळीत असत किंवा दुसराच विषय काढीत असत. अर्थात्च याच्या मुळाशी आपण काही छपवून ठेवावे ही वृत्ती नसून, त्यांनी अंगिकारिलेली निरहंकारवृत्ती हीच कारणीभूत होती. त्यांचे चिरंजीव श्री. बाबासाहेब पटवर्धन यांनी अण्णासाहेबांच्या मार्गाचा त्यांना जसा सुचला तसा ऊहापोह केलेला आहे. आणि त्याचा उल्लेख आम्ही प्रस्तावनेत केलाच आहे. त्यांनी जे लिहिले आहे त्याचा अधिक्षेप करावयाची आमची इच्छा नाही. बाबासाहेब वयांत आल्यानंतर, आणि त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर अण्णासाहेबांचा दिनक्रम, त्या दिनक्रमातील त्यांच्याकडून होणारे कर्म आणि आचरण, त्यास जसे दिसले त्यास अनुसरूनच त्यांनी आपले विवेचन केले आहे. प्रत्यक्ष काही योगक्रिया करीत असताना अण्णासाहेब त्यास कधीच दिसले नाहीत अशा अर्थाचे त्यांचे विधान आहे. हे विधान अर्थात्च अवास्तव नाही. कारण अण्णासाहेबांस योगमार्गाची दीक्षा श्रीमहाराजांकडून पूर्वीच मिळाली होती आणि त्यांचे योगसाधन मद्रासेस जाण्यापूर्वीच होऊन गेले होते. त्या योगसाधनेची पूर्तता

करण्याकरताच सालारजंग प्रकरणाचे निमित्त करून श्रीमहाराजांनी त्यास कंचीचे श्रीरामचंद्र अय्या यांजकडे पाठविले.* नामदेवावर श्रीज्ञानेश्वरांचा अतिशय लोभ खरा, परंतु त्यास त्यांनी उपदेशग्रहणा-साठी विसोबा खेचराकडेच पाठविले, त्यातलाच हा प्रकार होय. खुद्द महाराजांच्या निर्याणसमयी त्यांनी श्री अण्णासाहेबांस काही निमित्त करून पुण्यास पाठविले याचे कारण महाराजांनी असे दिले की " अण्णासाहेब योगी व ज्ञानी आहेत. व ते महाराजांस समाधी घेऊ देणार नाहीत. "

अण्णासाहेबांच्या मार्गाचे निश्चित स्वरूप श्रीभक्त गणेश विश्वनाथ बापट यांच्या आठवणीत मिळते. या आठवणींत श्री. बापट यांनी असे निश्चित विधान केले आहे की अण्णासाहेबांनी महाराजांच्या सहवासात आल्यावर राजकारण सोडले. श्रीपादबुवांच्या ( गांधी, पुजारी, आळंदी ) व्रतबंधाचे समयी भोजनाच्या पंक्ती चालू असताना, महाराजांनी अण्णासाहेबांस बोलावून घेतले आणि त्यांच्याशी बराच वेळ एकांत केला. बापट असे म्हणतात की

---

* असे दिसते की संत पूर्णावस्थेत येण्याकरता त्याची काहीतरी कसोटी परमेश्वर घेत असतो. पूर्वी तुकाराम महाराजांवरती सांसारिक आपत्ती कोसळल्यानंतर प्रपंचाचे वैयर्थ्य लक्षात येऊन त्यांचे मन परमार्था-कडे कायमचेच वळले. अण्णासाहेबांसही, सालारजंग आणि करवेटनगर या प्रकरणातील अपयशाची झळ लागावी अशी परमेश्वरी योजनाच असावी.

" The goods are better made by ill "

हे सॅम्युयल रॉजर्स या कवीचे उद्‌गार येथे यथार्थ वाटतात.

महाराजांनी 'शक्तिपात'* करून अण्णासाहेबांस आपले तेज दिले. कारण या एकांतानंतर अण्णासाहेब तेजःपुंज झालेले दिसले. याचा अर्थ असा नाही की अण्णासाहेब पूर्वी तेजःपुंज नव्हते. ते निसर्गतःच तेजःपुंज होते. श्रीपादबुवाच्या मुंजीच्या वेळेस महाराजांनी केलेल्या एकांताचा उल्लेख जसा त्यांच्या आठवणींत आहे, तसाच रायरीकर-बागेत महाराज अण्णासाहेबांस योग शिकवीत असत असाही उल्लेख आहे. महाराज त्यांस योग शिकवीत होते असे एकदा समजल्यानंतर, ते किती दिवस योग शिकत होते या कालावधीची किंवा त्यांतील शास्त्रीय वा तांत्रिक तपशिलाची आपल्याला आवश्यकता नाही. परंतु सामान्य दाखला द्यावयाचा झाला तर असे म्हणता येईल की, मनुष्य एकदा एखाद्या मार्गाला निघाल्यानंतर तो शेवटच्या टप्प्यापर्यंत पोचला किंवा नाही हेच पहाणे महत्त्वाचे; त्याने वाटेत किती विश्रांती घेतली वगैरे गोष्टी दुय्यम होत. महाराजांशी संबंध

---

* श्री. बापटांनी "शक्तिपात" असा जो शब्द वापरला आहे, त्याची काहीशी उकल होण्याकरता श्रीज्ञानेश्वरीतील पुढील ओव्या सहाय्यीभूत होतील असे वाटते.

"हृदया हृदय येक जालें। ये हृदयींचें ते हृदयीं घातलें।
द्वैत न मोडितां केलें। आपणा ऐसें अर्जुना ॥

अध्याय १८, ओवी १४२१

"दीपे दीपु लाविला। तैसा परिष्वंगु तो जाला।
द्वैत न मोडितां केला। आपणपें पार्थु ॥

अध्याय १८, ओवी १४२२

"म्हणौनि गूढपण आपुलें मोडो। वरि न बोलणें ही बोलावें घडो।
परी आमुचियें जीवींचें पडो। तुझ्या जीवीं ॥

अध्याय ९, ओवी ३७

तसेच परिशिष्ट ८ पहावे.

आल्यानंतर त्यांनी जे आचरण ठेविले, ते जणू काय योगमयच होते आणि त्यांनी कोणती अंतिम मर्यादा गाठली होता हे त्या आचरणावरून स्पष्ट होण्यासारखे आहे.

अण्णासाहेब महाराजांचे जवळ योगमार्ग तर शिकले, परंतु आपल्या सबंध आयुष्यभर ज्या दुसऱ्या एका योगाचे किंवा मार्गाचे अवलंबन केले, तो मार्ग विशेष उल्लेखनीय आहे. हा मार्ग म्हणजे त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर "मी + न" हा मार्ग होय. मी+न म्हणजे "मी" ला नाहीसा करणे. सर्वतोपरी मीत्व किंवा ममत्व आणि अहंकार बुद्धी नाहीशी करून, क्रमाक्रमाने ईश्वराशी सारूप्य होण्याचा प्रयत्न करणे हाच मीन मार्गाचा अर्थ दिसतो. स्वभावतः ते स्वाभिमानी व बाणेदार होते. परंतु अहंकारी होते असे त्यांच्या चरित्रावरून किंवा आठवणींवरूनही दिसून येत नाही. निसर्गानेच जो मनुष्यस्वभाव दिला आहे त्या स्वभावास अनुसरून प्रथमतः त्यांच्या अंगी थोडासा अहंकार वास करीत असेलही. परंतु एकदा महाराजांचे सान्निध्य लाभल्यानंतर, त्यांनी त्या थोड्याफार अहंकाराचेही उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला आणि त्यात ते यशस्वीही झाले. साध्या बोलण्यांतही "महाराजांची इच्छा", "महाराजांच्या इच्छेस येईल ते खरे", "अरे, महाराजांनी बघ कसे सुचविले" असे शब्दप्रयोग त्यांचे तोंडून नेहमीच निघत असत. एखादा कष्ट साध्य रोगी त्यांच्याकडे आला असताना त्यास "औषध देऊन पहातो मग महाराज काय करतील ते खरे" अशा अर्थाचे शब्द ते नेहमी वापरीत असत. एका आठवणीत तर असे लिहिले आहे की औषध सांगताना ते भानावर नसत आणि यासबंधी विचारले असता, ते म्हणत "अरे येथे महाराज आहेत, माझ्या तोंडून ते भलते औषध कसे वदवितील?" येथे एका गोष्टीचा खुलासा करणे आवश्यक

आहे. महाराज म्हणजेच कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं असे परमेश्वर अशी त्यांची निष्ठा होती. यासंबंधी खुद्द अण्णासाहेबांचे उद्गार पुढीलप्रमाणे आहेत:—

"........आणि परमात्मा म्ह० श्री नरसिंव्हसरस्वती सद्‌गुरुदेव सर्व व विश्वव्यापक, अखंड, सदैव, नित्य आहे हे प्रत्ययाला आणून दिले." अहंकारबुद्धीचा लोप करून महाराजांच्या चरणी ते कसे लीन होऊन गेले होते याचे गमक त्यांच्या "मम तथाच मामकांना इत्यादि अस्माकं सर्वेषां देवताघटित जीव व त्याचे शरीर याशी श्रीचे ऐक्य......व्हावयाचे ते झाले" या उद्गारांत मिळते. अण्णासाहेब महाराजांकडून योग तर शिकलेच परंतु त्यांनी सबंध आयुष्यभर जे काही केले ते हेच की आत्यंतिक निष्ठा बाळगून ममत्वबुद्धीचा आणि अहंकारवृत्तीचा पूर्णतया लोप करून महाराजांचे चरणी विनम्रभावाने इतकेंच काय, परंतु महाराज म्हणजेच प्रत्यक्ष परमेश्वर अशा निष्ठेनेच अखेरपर्यंत ते वागले. इतकी एकांतिक निष्ठा अर्थात्‌च अहंभाव लोपल्याशिवाय संपादन होणे शक्य नाही. साधुवर्य तुकाराम महाराजांनीही ईश्वरप्राप्तीसाठी "प्रथम ती पाहिजे गळाली अहंता" असेच उद्गार काढले आहेत. अहंभावाचा लोप झाल्याशिवाय अशी एकांतिक निष्ठा, उपजत नाही आणि अशा एकांतिक निष्ठेशिवाय ईश्वराची, दैवताची किंवा सद्‌गुरूची कृपा प्राप्त होत नाही. अर्थात्‌च येथे हे लक्षात ठेवणे अवश्य आहे की "अहंकाराचा लोप करणे" "ममत्व नाहीसे करणे', इत्यादि शब्दप्रयोग लिहिण्यात जितके सोपे आहेत तितकेच त्या शब्दामध्ये जे काही अभिप्रेत आहे ते आचरणात आणणे अत्यंत कठीण आहे. मनुष्याचा किंवा जीवाचा विषयाशी जों जों संपर्क वाढू लागतो, अनेक दृश्य पदार्थ, ते नाशिवंत आहेत हे जाणूनही न कळतच (unconciously) त्या

पदार्थांवर त्याचा लोभ जडू लागतो, सारांश, त्या सर्व विषयासंबंधी किंवा पदार्थासंबंधी साहचर्याने त्याला इतकी आत्मीयता किंवा ममत्व वाटू लागते की ते नाहीसे करणे त्याच्या शक्तीबाहेर होते. प्रत्येकाने जर सद्भावनेने आपले अंतर्निरीक्षण केले आणि आपल्या मनोवृत्तीची, विकारांची आणि प्रसंगवशात् उत्पन्न होणाऱ्या लहरींची छाननी केली तर असे दिसून येईल की अण्णासाहेबांचा "मी+न" मार्ग वाटतो तितका सहज साध्य नाही. किंबहुना तो योगापेक्षाही कठीण तर आहे असे म्हणावे लागेल. परंतु हा मार्ग सहज साध्य नसला तरी त्या दिशेने कोणी प्रयत्न करू नये असे मात्र होत नाही.

आम्ही हे जे वर लिहिले आहे त्याचा अर्थ, अण्णासाहेब ज्या मार्गाने गेले, त्या मार्गाचें रहस्य आम्हांस निश्चित समजून आलें, असा मात्र कोणी करू नये. तो समजण्याची आमची अणुमात्रही पात्रता नाही. परंतु श्रीभक्त बापट यांच्या आठवणीवरून जे काही विचार आम्हांस सुचले, ते आम्ही मांडले आहेत. त्यांतील 'शक्तिपात' या शब्दाचे नीट आकलन होण्यास स्वामी विवेकानंद यांच्या भक्तियोग या ग्रंथांतून प्रारंभी जे अवतरण दिले ते आणि "शक्तिपात अर्थात् Transmission of Spritual Power या शीर्षकाखालचा लेख उपकारक होईल असे वाटते. संत कोणत्या मार्गाने जातात हे त्यांस किंवा त्यांच्या गुरूसच ठाऊक असते आणि त्या रहस्याचा उलगडा करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे मुंगीने मेरू पर्वतावर जाऊन तेथील सोन्याचा तुकडा उचलून आणण्यासारखेच आहे. द्रोणाचलावरील औषधी आणण्याकरता बुद्धिमतां वरिष्टम् अशा श्रीहनुमंताचीच योजना झाली होती. परंतु असे जरी असले तरी अण्णासाहेबांच्या अगदी निकटवर्ती समकालीनांकडून काही आठवणी मिळाल्या असताना त्यांच्या आधारे, वरील रहस्य थोडे फार उल-

गडण्याचा प्रयत्न करणे अगदीच अनुचित दिसणार नाही या विचारानेच आतांपर्यंतचे विवेचन केले आहे.

येथे संपादित झालेल्या आठवणींवरून असे दिसते की अण्णा-साहेब जरी योगी आणि ज्ञानी होते तरी त्यांनी आपले नित्य आन्हिक कर्म चुकू दिले नाही. ज्या दिवशी ते करावयाचे राहून जात असे त्याच्या दुसऱ्या दिवशी मागील बाकी पुरी करून दुसऱ्या दिवशीचे कर्म सुरू होत असे. ज्ञानी पुरुषाने कर्म करू नये, केले तरी चालेल किंवा केलेच पाहिजे या पुरातन वादात येथे शिरण्याचे प्रयोजन नाही. कारण व्यक्तिविषयक इच्छा ( Individual volition ) ही मानवी अंतःकरणाचा एक प्रमुख भाग आहे आणि या इच्छेस अनुसरून एखाद्या ज्ञानी पुरुषास ज्ञानोत्तरही कर्म करावेसे वाटल्यास त्याने काही अतिक्रम केला किंवा धर्मनिषिद्ध कर्म केलें असे होत नाही. कर्म म्हणजे वर्णाश्रमविहित कर्म; परंतु कर्म या शब्दाची व्याप्ती अधिक आहे. स्वतःच्या चित्तशुद्धीसाठी अर्थात् आध्यात्मिक उन्नतीसाठी किंवा एखाद्या उपासनेने आदिष्ट झालेले असे जे काही करावे लागते ते कर्मच होय. आजच्या यांत्रिक आणि धावपळीच्या जीवनात एखाद्या यःकश्चित कारकुनापासून तो एखाद्या उद्योगपतीपर्यंत जे जे उद्योग चालतात, ते केवळ उदरपोषणासाठी आणि द्रव्यार्जनासाठी चालत असल्यामुळे त्यांचे हे उद्योग हे कितीही निरलसपणे किंवा प्रामाणिकपणे होत असले, तरी ते "उद्योग"च आहेत, ते कर्म नव्हे. कारण या सर्व खटपटी जरी केल्या तरी जीवाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी त्यांचा काही एक उपयोग होत नाही व पुन्हा भर्तृहरीने एका श्लोकात म्हटल्याप्रमाणे "ततः किम्" असा प्रश्न शिल्लक उरतो. आणि ज्या क्षणी माणसाला असे "ततः किम्" वाटावयास लागेल त्या क्षणी लौकिक जीवनापेक्षा काही तरी दुसरे

जीवन निश्चितच आहे आणि त्याचें वास्तव स्वरूप आकलन होण्यासाठी काहीतरी केले पाहिजे अशी प्रतीति त्यास येऊ लागल्याचे निश्चित समजावे. प्रस्तुतच्या जीवनक्रमात कर्म करावयास फारशी कोणास सवड होत नाही आणि ही कर्मे केल्यावाचून आपले काय अडणार आहे, जीवनक्रम तर व्यवस्थित चाललाच आहे अशी एक प्रकारची समजूत झालेली दिसते. किंबहुना आजचे जीवनच इतके धांदलीचे, धकाधकीचे आणि यांत्रिक झाले आहे की, धर्मविचार, नीतिविचार इत्यादि विचार उद्‌भवण्यास अवकाशच मिळत नाही, मिळाला तरी अनेक व्यवधानांमुळे ते स्थिर होऊ शकत नाहीत. काही सण, कुलाचार पाळले जातात हे खरे आहे, पण त्याच्या मुळाशी, संस्कारवशता आणि उत्सवप्रियताच आहे. दोनही एकादशीच्या दिवशी पंढरीच्या वारीस अजूनहि वारकऱ्यांचे जथ्थे जातात, परंतु सुशिक्षित म्हणविला जाणारा माणूस मानवी जीविताचे साफल्य काय असले पाहिजे किंवा कसे असावे या विषयी विचार करताना दिसून येत नाही. पाश्चात्य किंवा अमेरिकन विज्ञानाची जी अत्यंत वेगवान् प्रगती होत आहे, नवे नवे शोध लागत आहेत त्यामुळे, विज्ञानाचे ज्ञान की आध्यात्मिक उन्नतीची साधना या उभयतांत वरेण्य कोणते या विषयी आजचा सुशिक्षित वर्ग संभ्रमात पडला आहे. अर्थात असे लोक केवळ अप्रामाणिकच आहेत असे म्हणतां येत नाही किंवा त्यांच्या ‘कर्म’ विहीन आयुष्याबद्दल त्यांस दोषही देता येत नाही. परंतु आपल्या उद्योगातून किंवा व्यवसायातून निवृत्त झाल्यानंतर किंवा इंद्रियांच्या सर्व शक्ती क्षीण होत चालल्यानंतर जे “देव देव” करावयास लागावयाचे, त्यापेक्षा आरंभापासूनच हा अभ्यास जसा अवकाश असेल तसा सुरू करणे हे अधिक लाभदायक आहे. तुकाराम

महाराज म्हणतात "पडिले वळण इंद्रियां सकळा" म्हणजे त्यांच्या इंद्रियांना भगवत् भक्तीचे वळण पडूनच गेले होते. आणि क्रमाक्रमाने 'विषय तो त्यांचा झाला नारायण' असे होऊन गेले होते.

श्रीअण्णासाहेबांच्या अंगी हे तुकारामी वळण कसे परिपूर्ण बाणले होते हे काही आठवणींवरून सहज सिद्ध होण्यासारखे आहे. प्रथमपासूनच इंद्रियांना पडलेले वळण स्थिर राखण्यासाठी त्यांनी कर्मांत कधीही अंतराय पडू न देता ते शेवटपर्यंत चालू ठेविले. आपणापैकी प्रत्येकास योगी होता आले नाही किंवा ठराविक आन्हिक करता आले नाही, तरी ईश्वरस्मरणाकडे रोजच्या दिनक्रमांतून थोडा फार काळ द्यावयास हरकत येऊ नये असे वाटते.

परंतु या आन्हिक कर्मापेक्षाही श्रेष्ठ कर्म असे जे अण्णासाहेब आचरणात आणीत असत, ते खरोखरीच निरुपमेय आहे. आर्त आणि रोगी लोकांना औषधे सांगून त्यांस आरोग्य प्राप्त करून देणे हाही त्यांच्या कर्माचाच एक भाग होता व कितीही कष्ट पडले तरी त्यांनी शेवटच्या एकदोन दिवसांखेरीज तो सोडला नाही. याचे कारण त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे, "परोपकाररूप सेवा ही साधकानेच नव्हे तर ती त्या स्थितीच्या पलीकडे गेलेल्या पुरुषानेही केली पाहिजे." ही सेवा स्थलकालाचा अनुक्रम न पाळता, त्यांनी कशी केली याचे वर्णन आठवणींत एकदोन ठिकाणी आलेच आहे.

आता आठवणींवरूनच अण्णासाहेबांचे जे काही इतर गुण प्रत्ययास येतात, त्यांपैकी प्रमुख म्हणजे त्यांचे अंतर्साक्षित्व किंवा अंतर्ज्ञान हे होय. मात्र या गुणाची अभिव्यक्ती तसाच प्रसंग आल्याचाचून झाली नाही. श्री. यादवबुवा वडोदकर आणि श्री. हरी भगवान पाटील यांच्या आठवणींवरून हे दिसून येते. श्री. देवभक्त, यादवबुवा आणि श्री. न. वि. गाडगीळ यांच्या आठवणींवरूनही, हीच त्यांची

शक्ती अनुभवास येते. हा गुण प्राप्त होण्यास त्यांनी एखाद्या सिद्धीची साधना केली होती असे दिसत नाही. त्यांचे जीवन म्हणजेच एक मूर्तिमंत तपःसाधना होती. आणि तिच्या अनुषंगाने हा गुण त्यांस प्राप्त झाला असला पाहिजे.

तुकाराममहाराजांची परिपूर्णता झाल्यानंतर, "अवघीं भूतें आलीं साम्या" अशी त्यांची स्थिती झाल्याचे त्यांनी स्वतःच म्हटले आहे. बाहेरचा एक साप अण्णासाहेबांकडे औषध मागावयास येतो, आणि अण्णासाहेब त्यास वाढलेली नखे काढून औषध लावतात, औषध लावण्याअगोदर जवळपासच्या मंडळीस त्यास "मारू नका" असे बजावतात, याचा अर्थ काय? जवळ बाळगलेला पोपट उडून गेला असताना, तो सापडेपर्यंत त्यांनी अस्वस्थ होणे, तो मेला असताना माणसासारखी त्याची क्रिया करविणे आणि श्री. पाटील यांस सुतक धरावयास सांगणे ह्या सर्व घटनांचा अर्थ असाच निघतो की, सर्वांभूती ते परमात्मा, किंवा त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे, श्रीमहाराजच पहात होते. ही आत्मौपम्यबुद्धी, त्यांच्या योगपरिपूर्णतेनेच प्राप्त झाली असली पाहिजे. सर्पासारखा मानवशत्रू दृष्टीस पडताच सामान्य माणसे त्यास मारावयास काठी घेऊन धावतात, परंतु अण्णासाहेब घरी नित्य एक साप बाळगतात, या घटनेवरून "चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती। व्याघ्रही न खाती सर्प तया" या श्री तुकारामाच्या उक्तींतील सत्य लक्षात येते. एकदा श्रीतुकोबांच्या अंगावर एक कुत्रे भुंकत आले असताना त्यांनी "तुम्ही कशासी करता गुरगुर। येथे काही नसता गुरगुर ॥" असे उद्गार काढले आणि त्या कुत्र्याचे गुरगुरणे तत्क्षणी बंद झाले. आपपरभेद लोपून आत्मौपम्यबुद्धीचा उदय होऊन सर्वत्र समदर्शिन् अशी दृष्टी प्राप्त झाली असता, केवळ मानवच नव्हे, तर मानवेतर

योनीही असल्या समदर्शिनाच्या अंतर्गत भावनेला कशी प्रतिसाद देतात हे वरील दोन उदाहरणावरून लक्षात येईल. शिवाय भूताभूतांतील विषमता विसरून जो त्यांच्याकडे समदृष्टीने पहावयास शिकला किंवा पाहू लागला, त्याने मानवी जीवनाचे कोणते उच्च ध्येय गाठावयाचे शिल्लक ठेविले? सद्गुरुकृपा तर अवश्य असतेच, परंतु वरील गुण उद्भूत होण्यास मनुष्याचीही तशीच अभिजात पात्रता लागत असते.

अण्णासाहेबांनी तपस्या तर केलीच, परंतु नुसत्या तपःसाधनेतच ते रमले नाहीत. त्यांनी लोकसेवेचे व्रत पत्करिले आणि ते आमरण चालविले. एका पैशाचाही अभिलाष न धरता दिवस रात्रीकडे न पाहाता, रोग्यांमध्ये बसून त्यांना औषधे सांगणे हाही एक त्यांच्या तपस्येचाच भाग होता. त्यांच्या औषधाने लोकांस गुण तर येतच असे, परंतु या औषधामागे 'माझी तपस्या आणि महाराजांचा आशिर्वाद उभी आहेत' असे ते म्हणत असत. रोग कष्टसाध्य अवस्थेत गेल्यावरच रोग्याने अण्णासाहेबांकडे यावयाचे आणि अण्णासाहेबांच्या औषधाने त्यास गुण यावयाचा, याचे दाखले येथे संपादित झालेल्या आठवणींतून अनेक मिळण्यासारखे आहेत. औषध देताना सुद्धा "मी हे देतो" अशी त्यांची भावना कधीच नसे. सारांश सर्व ईषणांचा त्याग, अत्यंत निरहंकार वृत्ती, सर्वांभूती समदृष्टी, आणि श्रीनरसिंह सरस्वती महाराजांवर एकनिष्ठा असे लोकोत्तर गुण असलेलीच ही एक वंदनीय विभूती महाराष्ट्रात होऊन गेली. या विभूतीच्या काहीशा मंद झालेल्या स्मृतीला उजाळा देण्यासाठीच, या लहानशा पुस्तकाचे प्रयोजन झालेले आहे. त्या वंदनीय विभूतीच्या चरणांना पुनः एकवार वंदन करून हा यथामति लिहिलेला समारोप संपवितो.

—प्र. के. ठोसर

# मागाहून आलेल्या आठवणी

( 'समारोप' पूर्ण छापून झाल्यानंतर आमच्या हाती कांही आठवणी आल्या. नाईलाजाने त्या समारोपानंतर समाविष्ट कराव्या लागत आहेत.

संपादक )

## श्री. शरश्चंद्र वामन रानडे, बी. ए. नागपूर.

माझ्या लहानपणी पुण्यास चार नामांकित वैद्य होते. भावे, लागवणकर, गणपुले आणि अण्णासाहेब पटवर्धन. भावे व लागवणकर हे धंदेवाईक पद्दीचे वैद्य. लागवणकर बहिरे पण चिट्ठीवर चार शब्दात लिहून दिलेली तक्रार वाचून नाडी परीक्षा करिताना प्रश्न विचारून रोगचिकित्सा निश्चित काढून पाच मिनिटांत गोळ्या देणारे. भाव्यांच्या औषधांत वैद्यकीय औषधाचा रस, मात्रा, काढे असा कोणताहि प्रकार असे. नुसते पाणी हेच मुख्य औषध देणारे मानसिक चिकित्साकार डॉ. गुणपुले हेही एक वैद्य गावात होते. अण्णासाहेब पटवर्धनांचा मात्र काढाच असे.

अण्णासाहेब धंदेवाईक वैद्य नव्हते. त्यामुळे कोणत्याही सामान्य दुखण्यासाठी त्यांच्याकडे रोगी येण्याचा प्रघात नव्हता. प्रकृतीत काही स्थायी विकृती वाटणारे परस्थ सुस्थितीतील लोकच बहुधा कोणातरी अण्णासाहेबांच्या ओळखीच्या स्नेह्यास बरोबर घेऊन गुरुवारी अण्णासाहेबांना प्रकृती दाखविण्यास जात. अण्णासाहेबांचा

प्रेमळ व अगत्यशील स्वभाव त्यावेळी कोणाच्याही अनुभवास येई. नाडी पहाणे हे कोणत्याही रोगात त्या काळी वैद्याच्या तपासणीचे मुख्य तंत्र असे. नाडी पाहून अथवा पहाता पहाता अन्य औपचारिक बोलणे चालू असतानाच काढ्यांतील एकेक औषधाचे नाव टिपण्यास सांगणे हा प्रकार तर १०-१५ मिनिटे चाले. काढ्याची भाषा सात्र्याची ( सात्र्य=सप्तक=सात दिवस ) असते. चार दोन सात्री झाल्यानंतर पुन्हा सल्ला घ्यावयाचा हे उघड असे.

मात्र औषधाबरोबर सांगितलेले अनुपानही महत्त्वाचे असे. माझ्या ओळखीच्या एका सुदृढ देहयष्टीच्या बाईच्या प्रकृतीस काढ्याबरोबरच दररोज तुळशी प्रदक्षिणा घालून त्या हळूहळू वाढवीत हजार पर्यंत नेण्यास अण्णासाहेबांनी सांगितले होते. वडील मंडळींनी हे अनुपानच अण्णासाहेबांचे मुख्य औषध आहे म्हणून ओळखले होते.

२. अण्णासाहेबांकडून स्वतःच्या रोगाची परीक्षा करू पहाणाऱ्या सर्वांनाच अण्णासाहेब L. M. S. शिक्षण घेतलेले पाश्चात्य शिक्षित आहेत हे माहीत होते व ते एल्.एल्. बी. असल्याचेही माहीत होते. हे इंग्रजी शिक्षण असलेले अण्णासाहेब देशी वैद्यकीय काढा सांगतात हे त्यांच्या स्वाभिमानाचे द्योतक वाटे. ते जहाल वृत्तीचे राजकीय पुढारी म्हणून समजले जात व लो. टिळक सुटून आल्यानंतर १९१५ मध्ये झालेल्या प्रांतिक परिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते. परिषदेत कोणत्याही ठरावावर सूचक अनुमोदक वगैरे वक्त्यांत ते नव्हते. पण त्यांच्या वयोमानास अनुसरून त्यांचे चार शब्द संमेलनात होणे अवश्य वाटून शेवटी शेवटी त्यांना ती विनंती लो. टिळक वगैरेंनीच केली. पण अण्णासाहेब एकदा बोलण्यास उभे राहिल्यावर त्यांचे

चार शब्द तासभर ऐकणे सर्वांस प्राप्त झाले. माननीय वक्त्यास टाळ्या वाजवून खाली बसविण्याचा प्रघात त्या काळी सामान्य श्रोतृवृंदांतही नव्हता.

३. वैद्य व नेते ह्या लौकिक महत्त्वापेक्षां अण्णासाहेबांचे आध्यात्मिक महत्त्व लोकांत अधिक आदराचे होते. वैद्यकीय लोकसेवेसारख्या दिनक्रमास धरून त्यात खंड न करिता पण निश्चितपणे चालणारे त्यांचे आन्हिक, देवदर्शन व निराहारी दिनक्रम सर्वज्ञात होता व साहजिकच एक साधुपुरुष म्हणून त्यांची लोकांत मान्यता होती. त्यांच्या मृत्यूची वार्ता ऐकून त्यांच्या अंत्य दर्शनास झालेली स्त्रीपुरुषांची गर्दी साहजिकच होती. पालखीत मानाने निघालेली अंत्ययात्रा मी त्यापूर्वी कोणाची पाहिली नव्हती. कोणाच्याही अंत्य यात्रेबरोबर ब्राम्हण स्त्रिया जाण्याचा प्रघात नाही. पण अण्णासाहेबांची अंत्ययात्रा ओंकारेश्वरावर गेल्यावर मागोमाग अनेक ब्राम्हण स्त्रिया त्या दिवशी मुद्दाम ओंकारेश्वरास येऊन स्मशानभागाकडे वळून काळभोराचे देवळाबाहेरील फरसावरून अण्णासाहेबांच्या अन्त्य अग्निविधीचे दर्शन घेताना प्रथमच दिसल्या.

* *

## श्री. भाऊसाहेब उर्फ य. ना. आठवले,
## इंजिनियर व कॉंट्रॅक्टर पुणे २
### (पंच, श्रीनरसिंव्हसरस्वती मंदिर-संस्थान, आळंदी)

सन १९१५ सालची गोष्ट. नूतन मराठी विद्यालयात इंग्रजी सहावीत असल्यापासून दर शुद्ध आणि वद्य एकादशीला आम्ही तीन चार विद्यार्थी मिळून पहिल्यांदा काही महिने पायी व नंतर ३-४ वर्षे सायकलीवरून श्रीज्ञानेश्वर महाराज व श्रीस्वामी महाराज यांच्या समाधींच्या दर्शनाकरिता जात होतो. त्यावेळी पुण्यात डॉ. पळसुले यांनी स्थापन केलेले एक भारत स्वयंसेवक मंडळ होते. आळंदीस जाणारे आम्ही त्या मंडळाचे स्वयंसेवक होतो. कधी कधी एखाद्या एकादशीला श्री. अण्णासाहेबांचे दर्शन तेथे आम्हाला होत असे. त्यांचे व्यक्तिमत्व सर्वच बाजूंनी फार मोठे असल्यामुळे त्यांच्या भोवताली, ते कोठेही असले तरी, सर्व प्रकारच्या लोकांचा नेहमीच घोळका बसलेला असे. त्याप्रमाणे आळंदीतही त्यांच्याकडे सल्लामसलतीकरीता अनेक मंडळी जात येत असत. ४–५ वेळा तरी आम्ही स्वयंसेवक संधी बघून काही तरी विचारावे म्हणून प्रयत्न करीत होतो. एकदा त्यांनी आमची चाचणी परीक्षा घेतली व विचारले,–" तुम्ही प्रत्येकजण रोज किती जेवण करता ? " माझे स्वयंसेवक बंधू प्रकृतीने बेताचेच होते. त्यामुळे त्यांचा आहारही बेताचाच होता. पण मी भटांच्या तालमीत व्यायाम घेणारा व रोज दोन-तीनशे नमस्कार घालणारा असल्याने मोठ्या अभिमानाने माझा आहार मी श्री. अण्णासाहेबांना सांगितला. मला रोज सकाळी व सायंकाळी मिळून शेरभर दूध व दोन्ही वेळेस जेवणात ४-४ भाकरी व भरपूर भात, भाज्या वगैरे लागतात म्हणून सांगितले. त्यावर ते हसून म्हणाले, " अरे, ब्राह्मणाच्या मुलांनी

इतका आहार घेणे बरे नाही. त्यामुळे शरीर जरी टोणग्यासारखे धष्ट-पुष्ट झाले तरी बुद्धी मंद होईल. ब्राह्मणांच्या मुलांनी आहार सात्विक आणि परिमित ठेवल्यास त्यांचे बौद्धिक बल, व्यायाम आणि सूर्यनमस्कारांनी वाढत राहील आणि मग त्यांचा राष्ट्राच्या अभ्युदया-कडे खास उपयोग होईल. म्हणून तूं आपला आहार कमी करीत करीत एक ते दीड भाकरीपर्यंत आणून ठेव. आणि वयाच्या ४० वर्षाच्या पुढे आणखी कमी करून तो दोन वेळेला न घेता एक वेळेलाच घेण्याचे व्रत कर. **कारण यापुढे आपल्या राष्ट्राला दिवसेंदिवस अन्नान्नदशा येणार आहे. त्यावेळी तुझ्या मिताहाराने शिल्लक राहिलेले अन्न इतरांच्या उपयोगी पडेल.** हे जर लक्षात ठेवून त्याप्रमाणे तूं वागलास तर तुझे तर कल्याण होईलच, पण तुला देश-भक्तीही घडेल." हा त्यांचा उपदेश माझ्या मनात ठसला व त्याप्रमाणे आहार कमी करीत गेलो. १९३६ साली श्रीबद्रिनारायणाच्या दर्शनास गेलो असता एक विशेष प्रसंग घडला. तेथील आमचे उपाध्याय यांनी यात्रेचे फळ म्हणून देवाच्या पुढे काही तरी त्याग करण्याचा संकल्प करावा असे मला सांगितले. मला तेव्हा श्री. अण्णासाहेब यांची आठवण झाली व मी तेव्हापासून रोज एकदाच वेताचे जेवण घेण्याचा संकल्प केला व अंशतः श्री. अण्णासाहेब यांच्या उपदेशाचे पालन केल्याचा आनंद आजही मला ७० व्या वर्षी मिळत आहे.

सन १९१६ सालची गोष्ट. वैशाख महिना होता. धुळ्याची भक्तमंडळी आळंदीस श्रींचे मठात दर्शनाकरिता आली होती. त्यात भक्त श्री महंत व माझे नातेवाईक कै. दत्तोपंत आमडेकर हे आले होते. श्री. अण्णासाहेब त्या काळात क्वचितच केव्हा तरी अन्नग्रहण करीत असत. मी वारंवार श्रींचे दर्शनास आळंदीस जात असे. एका रात्री १-१॥ वाजता श्री. दत्तोपंतांनी मला अंथरुणातून उठविले.

आम्ही हातपाय धुवून चूळ भरून विहिरीजवळच्या हल्लीच्या दूध-चहाच्या खोलीत १५-१६ मंडळी गेलो. तो प्रसंग व देखावा मी कधीही विसरणार नाही. खोलीत जेमतेम ७-८ मंडळीच फार तर जेवणास बसू शकली असती इतकी ती खोली लहान आहे. पण तेवढ्या जागेत आम्ही १५-१६ जण एकमेकाला अगदी चिकटून प्रसादाकरिता म्हणून उघडे बसलो. एका कोपऱ्यात थोडे बाजूला श्री. अण्णासाहेब येऊन बसले. आमच्या पुढे पत्रावळी ठेवून श्री. अण्णा-साहेब यांचे सेवेकरी व भक्त 'जज्ज' या नावाचे यांनी पत्रावळीवर भरपूर भाताचा ढीग वाढला व त्यात मधोमध खळगा करून अनेक डाळींचे मिश्रण केलेले वरण वाढले. सर्व पानावर एकदाच अन्नाची वाढ करून सर्व भांडीं मोकळी केली. नंतर श्री. अण्णासाहेब यांनी आपल्या पत्रावळीवरील अन्नाचा श्रीमहाराजांना नैवद्य समर्पण कर-ण्याकरिता छातीला डावा हात लावून उजवा हात घास देण्यासारखा करून डोळे मिटले. हा नैवद्य-समर्पणविधी सुमारे अर्धापाऊण तास चालला तोपर्यंत अर्थातच आम्ही आतुरतेने वाट पहात बसलो होतो. मध्य-रात्रीचा मला तसा पहिलाच प्रसंग असल्याने, माझ्यासारखेच कांहीजण आणि मी पेंगू लागलो. नंतर ३ वाजण्याच्या सुमारास नैवेद्य समर्पण झाल्याची खूण म्हणून 'श्रीविठ्ठल श्रीविठ्ठल' असे ४-५ मिनिटे मोठ्याने सर्वांनी नामस्मरण केले. 'पुंडलीक वरदा' होऊन आम्ही जेवू लागलो. मला तो पहिलाच प्रसंग असल्याने अपरिचित-पणामुळे मी वरणाबरोबरच अर्धा भात संपविला आणि पुन्हा वरण येईल म्हणून वाट पहात बसलो, त्यावेळी कळले की एकवाढ करून आता काहीच शिल्लक राहिलेले नाही. परिचित मंडळींनी वरणभाताचे योग्य मिश्रण करून जेवण संपविले आणि माझा अर्धा राहिलेला भात पाहून तो संपविल्याशिवाय कोणाला उठता येत नाही अशी मला

सूचना दिली. अर्थात मोठ्या कष्टाने पाण्याच्या घोटाबरोबर मला तो भात कसा तरी गिळून संपवावा लागला. नंतर 'श्रीविठ्ठल' होऊन आम्ही उठलो. मला पोट अतिशय भरल्यामुळे उलटी होण्याची भीती वाटू लागली व तसे मी श्री. अण्णासाहेबांजवळ बोललो. तेव्हा ते मला म्हणाले, 'अरे वेड्या, महाराजांचा प्रसाद कधीही उलटून पडणार नाही आणि तूं मुद्दाम उलटी करून काढू नकोस. आता स्वस्थ जाऊन झोप म्हणजे सर्व जिरून जाईल.' श्री. अण्णासाहेब यांच्या सहवासात राहिलेल्या अनेकांना अनेक प्रकारचे विलक्षण अनुभव आले त्यांतील हा एक लहानसा प्रसंग आहे.

सन १९१७ सालची गोष्ट. श्रीक्षेत्र आळंदी येथे श्रीस्वामी महाराजांच्या पौष महिन्यातील पुण्यतिथी-उत्सवात पौष शुद्ध चतुर्दशीचे दिवशी महर्षि अण्णासाहेब यांनी मला पहाटे ३॥ वाजता अंथरुणातून उठवण्याची व्यवस्था केली होती. त्याप्रमाणे मी उठून स्नान करून ओलेत्याने श्रीमहाराजांच्या गाभाऱ्यात समाधीजवळ गेलो. तेथे श्री. अण्णासाहेबांनी मला जवळ बसविले व आपल्या कडोसरीचा चांदीचा एक रुपया काढून माझ्या हातांत दिला. ते स्वतः त्यावेळी श्रीसमाधीवर पाणी घालीत होते. मला तांब्यातून समाधीवर पाणी घालण्यास सांगितले. त्यानंतर माझे हातात तुळशीपत्र देऊन श्रीमहाराजांना ते वहाण्यास सांगितले. नंतर समाधीवर रुपया ठेवून मी डोके टेकले, तेवढ्यात त्यांनी आपल्या उजव्या हाताने समाधीवरील तीर्थ गोळा करून डाव्या हाताने माझे डोके धरून ते तीर्थ माझ्या तोंडात घातले आणि म्हणाले की– 'आजपासून तू श्रीमहाराजांचा झाला आहेस!' इतके सांगून मला पुन्हा झोपण्यास जा म्हणून आज्ञा केली. त्यांच्या त्या शब्दांचा अर्थ श्रीमहाराजांचा

नुसता अनुग्रहच नव्हे तर मला सर्वस्वी त्यांच्या स्वाधीन करून माझे जीवन आनंदमय केले असा माझा अनुभव आहे.

श्री अण्णासाहेब यांना माझे शतशः प्रणाम.

★ ★

## श्रीमती पार्वतीबाई दामले

[ श्रीमती पार्वतीबाई दामले या पुण्यातील सुप्रसिद्ध दामले घराण्यातील असून, श्री. अण्णासाहेबांच्या पत्नी कै. सौ. मनोरमाबाई यांच्या चुलत भावजय होत. आज अर्थात्च त्या वयोवृद्ध आहेत. आमच्या विनंतीस मान देऊन त्यांनी ज्या आठवणी पाठविल्या त्या प्रायः जशाच्या तशाच आम्ही वाचकांपुढे ठेवीत आहो. उतारवयातील त्यांची स्मरणशक्ति कौतुकास्पद आहे. ]

माझे लग्न शके १८२४ ( इ. स. १९०२ ) मध्ये झाले. त्यावेळी श्री. अण्णासाहेब यांच्या पत्नी, माझी चुलत नणंद सौ. मनुवन्सं ह्या हयात होत्या. त्या चार महिन्यांनी १ महिना आजारी पडून वारल्या. त्या हयात होत्या तेव्हा दर शनिवारी नरसोबास जाऊन आमच्या घरी जेवावयास येत आणि घरी जात. श्री. अण्णासाहेब दररोज रात्री भिकारदास मारुतीस जात असत, व परत घरी जाऊन ओंकारेश्वरास जात असत, व परत घरी जाऊन गुंडाच्या गणपतीस जात असत व बुधवार पेठेत साठे यांचे वाड्यात नागपंचमीस ठरलेल्या फडताळात नाग निघत असे तेथे जात असत. पुढे फराळ रात्रीं बारा वाजता करीत. फराळास उपवासाचे रताळी, बटाटा, भोपळा, दाण्याचे कूट घालून केलेले जिन्नस, देवघरात ठराविक ठिकाणी ठेवलेले घेऊन, फराळ करीत. झाकलेले जिन्नस दुसऱ्या दिवशी तसेच असले म्हणजे

काल फराळ केला नाही असे समजावयाचे. संध्याकाळी पुन्हा दुसरे करून ठेवावयाचे. रात्री देवास जाताना त्यांच्या सेवेसाठी राहिलेली माणसे त्यांच्या समवेत असत. एकाचे नाव सीताराम दांडेकर असे होते. ते ब्रह्मचारी होते. दुसऱ्याचे नाव गणपति नवले व तिसरे सरदारसिंग म्हणून वऱ्हाडातीलच होते. माझी स्वतःची मुले कधी बरे नसले तर, आणि घरातील पुरुष मनुष्य परगावी गेले असले तर, मी संध्याकाळी अण्णासाहेबांकडे जात असे. त्यावेळी ते मला विचारीत, कां गे का आली होतीस? मी मुलांना बरे नाही म्हणून आले, तुम्ही रात्री घरी येऊन जा असे उत्तर दिले की ते रात्री ८-९ वाजता येत व मुलांना काढा सांगत. त्याच्यांत तुळस घाल असे सांगत. तुळस महाराजांच्या पायांवर घाल आणि मग काढ्यात घाल. कारण तुळशी-चा जन्म महाराजांचे पायावर पडण्यासाठी असतो. एके दिंवशी त्यांचे घरी नळ मोरीवर नाग निघाला व कोणी तरी तो पाहिला. हा नाग हात दीड हात लांबीचा पुढे आला होता. नाग पाहिल्यावर सगळ्यांची गडबड झाली व अण्णासाहेब यांना कळले. अंधार पडावयास लागला होता म्हणून ते कंदील घेऊन खाली आले. त्या नागास कंदील दाखवीत ते फरसावरून चौकात आले. नाग बाहेर जात होता. त्याला रस्त्यावरून बुरुजापाशी नेऊन सोडला, व त्यास म्हणाले, " महाराज, आपण या माणसांत येऊ नये, हे लोक आपल्याला मारतील. आपण घरी जा."

त्यांचे चिरंजीव रा. रा. रामचंद्र विनायक पटवर्धन, हे बी. ए. एल्‌एल्. बी. होते. ते सांगत असत की एके दिवशी अण्णा-साहेबांकडे एक अनोळखी गृहस्थ आले. माझे वडील आजारी आहेत व मला त्यांना भेटावयास जावयाचे आहे. माझ्याजवळ पैसे नाहीत, मला ५-६ रुपये द्या; अण्णासाहेब म्हणाले, " ठीक आहे.

तुम्ही जाणेपूर्वी तासभर माझ्याकडे या, आमचा मनुष्य तिकीट काढून गाडीत बसवून देईल." तो मनुष्य संध्याकाळी येतो ( ८ वाजता ) असे सांगून गेला, तो पुन्हा आलाच नाही.

पुण्यात प्रभात सिनेमाच्या लाइनीला ५-६ घरे टाकून अष्टभुजा देवीच्यासमोर दीक्षित यांचा वाडा आहे. दीक्षित प्रोफेसर होते. ते आजारी होते. ते अण्णासाहेबांकडे गेले व म्हणाले "मी नोकरीवर असतो, तेथील हवा मला मानवत नाही, पुण्यास येऊन डॉक्टराचे औषध घेतल्यास तात्पुरते बरे वाटते व पुन्हा परत गेल्यावर बरे नाहीसे होते. तुमचा काढा घेऊ का?" "ठीक आहे, नोकरीवरची हवा मानवली तर बरे वाटले असे समजावयाचे" असे अण्णासाहेबांनी उत्तर दिले. त्यांनी काढा तीन महिने घेतला व ते पूर्ण बरे झाले. त्यांच्या पत्नी सौ. ताई त्याही पुढे आजारी होत्या, त्यांनीही अण्णासाहेबांचे काढे घेऊन त्याही पूर्ण बऱ्या झाल्या. पुढे अण्णासाहेब दिवंगत झाल्यावर सौ. दीक्षित यानी २००० रु. अण्णासाहेबाच्या समाधीस देणगी दिली. त्याच देणगीचे फळ, अण्णासाहेबाच्या समाधीचा चौथरा, प्रदक्षिणेची वाट, समाधीची खोली, जिना हे प्रत्यक्ष दिसत आहे. ह्याच दीक्षितांनी श्री. अण्णासाहेबांचे चरित्र लिहिले आहे. तसेच त्यांचे काढे औषधे वगैरेही या पुस्तकात दिले आहेत. त्याला ४० वर्षे झाली. ते पुस्तक आता सर्वास मिळत नाही.* ४-५ वर्षांपूर्वी पुण्यात ज्यावेळी पानशेतचा पूर आला, त्यावेळी ओंकारेश्वराचे देवळासमोरील नंदी व दीपमाळ पुरात वाहून गडगडत गेली. परंतु त्यावेळेस अण्णासाहेबांच्या

---

* प्रो. दीक्षित यांच्या परिचयासाठी परिशिष्ट ३– शिरोलेख पहावा.

समाधीस यत्किंचितही धक्का लागला नाही हा एक दैवी चमत्कारच नाही का?

अण्णासाहेब विद्यमान होते त्यावेळी त्यांचे औषधे लिहून देण्याचे ठराविक वार असत (दोन). त्यावेळी ते चौकाचे सोप्यात दोन तास उभे राहून काढे सांगत (मोफत). त्यावेळी त्यांच्या जवळ भिषग्रत्न गंगाधर शास्त्री जोशी हे काढे लिहून घेत असत. त्यांचे काष्टौ-पधींचे दुकान होते. ते काढयांच्या पुड्या करून विकत देत असत.

अण्णासाहेबांचे शिष्य माधवराव गोडबोले, बी. ए. एलएल. बी.* हे येत असत. ते म्हणाले, मला जप करावयाचा आहे तो मी कुठे करू. अण्णासाहेबांनी सांगितले की आळंदीस नरसिंव्ह सरस्वतीचे देऊळ आहे तेथे जप करा. त्याप्रमाणे श्री. गोडबोले हे आळंदीस राहिले आणि उपवासाचे पदार्थ सेवन करून सेवा करीत असत. अण्णासाहेब गेल्यावर सुमारे चार पाच वर्षांनी आळंदीचे शंकरबुवा मठाधिपति दिवंगत झाले. व मठाधिपति कोणाला करावे याबद्दल वाद चालू झाले. त्यावेळी अण्णासाहेबांचे चिरंजीव श्री. रामचंद्र विनायक पटवर्धन हे व वऱ्हाडातील मंडळी यांचे मते माधवराव गोडबोले यांनाच मठाधिपति केले. या गोष्टीला ४०।४५ वर्षे अजमासे झाली. अद्याप माधवरावच मठाधिपति आहेत व त्यांनी मठाचा व्यवहार उत्तम प्रकारचा ठेवला आहे, हे सगळ्यांना माहीतच आहे.

अण्णासाहेबांचे चिरंजीव, यांना सर्व लोक बाबासाहेब म्हणत

---

* श्री. माधवबुवा गोडबोले हे एलएल्. बी.ची पहिलीच परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. श्री. अण्णासाहेबांनी त्यांस दुसऱ्या परीक्षेस बसू दिले नाही.

असत, तेही विद्वान् होते. व त्यांनी वेदांची भाषांतरे केली आहेत.*
त्यांना दोन तीन मुलगे आहेत.

अण्णासाहेबांच्या गुरुभगिनी गयाताई म्हणून होत्या. त्या त्यांच्याकडे वर्षातून एकदा येत असत. त्यावेळेस आम्ही त्यांना पाहिले आहे. त्या पांढरे वस्त्र नेसत व पांढरेच परिधान करीत. त्या देवघरात जप करीत बसलेल्या असत. त्या कडूनिंबाचा पाला वाटून दोन गोळ्या करीत आपण एक खात व एक अण्णासाहेबांना ठेवीत. स्वतः लाहीपीठ वगैरे दूध घालून खाऊन वर दूध पीत. अण्णासाहेबांचे फराळाचे उरलेले असेल तर खात असत.

आळंदीचे नरसिंव्ह सरस्वती महाराज यांचा उत्सव पौष शु॥ पौर्णिमेला असतो व अण्णासाहेब महाराज यांचा उत्सव माघ शु॥ एकादशीला असतो. ज्यावेळेला १०-१५ वर्षापूर्वी त्यांचा उत्सव फार मोठ्या प्रमाणात होत असे त्यावेळी १०००-५०० पान होत असे. त्यावेळी आळंदीचे मठाधिपति माधवराव गोडबोले हे वसंत पंचमीला येऊन (उत्सवाच्या आरंभी) बरोबर सामानसुमान आणून उत्सव करीत असत. पुण्याचे म्युनिसिपालिटीचे आफिसर अद्यापपर्यंत वाळवंटांत मोठा मांडव घालतात. साफसफाई, दिवाबत्ती, नळ, पाणी याची सोय करतात. अण्णासाहेब होते त्यावेळी धुळ्याहून वैशाख महिन्यात उत्सवाहून परत आले म्हणजे प्रसाद घेऊन जा असा निरोप येत असे. ते म्हणत असत, "बाई प्रसाद घरी येऊन घेऊन जावा लागतो" आणि ते आम्हाला बेसनाचा लाडू देत असत.

---

* फार वर्षापूर्वी मुंबईस श्रुतिबोध नांवाचे एक मासिक निघत असे. त्याचे संपादक श्री. दत्तो अप्पाजी तुळजापुरकर, श्री. बाबासाहेब पटवर्धन, आणि अ. ब. कोल्हटकर असे होते. श्री. बाबासाहेब नामांकित पंचांगकर्ते ज्योतिषी होते.

## श्री. अण्णासाहेब यांचें गाणें

"हाय हाय प्रभुवरा धरा दीनमुख झाली ।।
सत्पुत्र वियोगे रुदन करी या काली ।। ध्रु. ।।

जन्मुनी जयाने धन्य जननि ती केली ।।
निज कुलाभिमानी सकल बंधूंचा वाली ।।
द्यावया तयासी सौख्य तनू झिजविली ।।
जणु भीष्म देव तो मूर्त दुजी अवतरली ।।

पटवर्धन अण्णा यांचे नांव ते ।।
नीति-वर्तन-कृतीने केले सार्थ ते ।।
विद्याधन मिळवी भारी विपुल ते ।।

विधि सख्या सुतासह भक्त हृदयी संचरली ।।
नच सोडी क्षणभर योग मंदिरी रमली ।। १ ।।

इंग्रजी डिग्रीची सहज दाविली लीला ।।
स्वधर्म आपुला तिळही नच त्यागिला ।।
महाराष्ट्र केसरी श्रेष्ठ मानिती ज्यांना ।।
होतसे भक्त बहुकामी बाळ टिळकांना ।।

तारुण्य देश कार्यासी वेचिले ।
नि:स्वार्थी प्रेमे लोकांना मोहिले ।
तन मन धन परउपकारा वाहिले ।

जो वैद्य धनुर्धर कीर्ति दिगंती भरली ।।
थरथरा कापती रोग भीति त्यां भरली ।। २ ।।

मारूनी षड्रिपू दिव्य तया आचरले ।।
प्राशुनी लिंबरस दुग्ध पानी राहिले ।।
ही घोर तपस्या देइल फल देशाला ।।
ही आस धरीली राष्ट्राने घननीळा ।।

सुरपती दचकला वाटे अंतरी ।।
मनी हरील स्वराज्या शंका तो करी ।।
म्हणुनि काय मासी आज्ञा तो करी ।।
परि सर्वसाक्षी तूं समजुत असती केली ।।
तरी अनर्थ टळता खचित खचित वनमाली ।। ३ ।।

एकादशी दुर्दिन पुण्य नगरीसी आला ।।
चिंतामणि आमुचा क्रूरकृतांते नेला ।।
तळमळती कितीक ते पाहुनि अवचित घाला ।।
जाहला तेजहिन देशभानु मावळला ।।
प्रिय पुत्र देवव्रत अण्णावाचुनी ।।
दु:खात बुडाली माता मेदिनी ।।
अण्णांची इच्छा ध्यानी आणुनी ।।
शांतवी मुकुंदा विनंती तव कमली ।।
स्वर्गीय मूर्त ती मनोभावे मी पुजिली ।। ४ ।। *

या गाण्याच्या कवयित्री श्री. लक्ष्मीबाई कोल्हटकर, ४० वर्षांपूर्वी त्यांच्या भावाचे बिऱ्हाड आमच्या घरी होते, तेथे रहात होत्या. त्यांना मूल, नवरा नव्हता. त्या नर्स काम शिकल्या होत्या. त्यांनी हे गाणे अण्णासाहेब गेले त्यावेळी रचून आम्हाला दिले आहे. हे गाणे अण्णासाहेबांच्या उत्सवात, कथाकीर्तन झाल्यावर आरतीच्या वेळी म्हणतात. लक्ष्मीबाई शेवटी १०-१५ वर्षे माटुंगा येथे श्रद्धानंद महिलाश्रमाच्या लेडी सुपरिंटेंडंट होत्या. त्यांना दिवंगत होऊन १५ वर्षे झाली.

★ ★

* हे गाणे जरी बरेचसे अशुद्ध आहे तरी आम्ही जसेच्या तसेच छापले आहे.

# कै. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

[ कै. पांगारकर यांचा जन्म ३१ जुलई १८७२ या दिवशी झाला. ते आपल्या लेखनाने, आणि वक्तृत्वाने महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरहि प्रसिद्ध होते. अनेक धार्मिक ग्रंथांचे त्यानी संपादन केले. मोरोपंत, मुक्तेश्वर, ज्ञानेश्वर इत्यादि महाराष्ट्र कवींवर आणि संतांवर त्यांनी निबंध व प्रबंध प्रसिद्ध केले. मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिला. त्यांचे 'मुमुक्षु' हे पत्र वेदान्त व परमार्थाच्या अभ्यासकांत अत्यंत प्रिय झाले होते. आपल्या लेखनाने आणि रसाळ वक्तृत्वाने त्यांनी संस्थानिकांवरहि छाप पाडली होती. त्यांचा 'भक्तिमार्गप्रदीप' तर एकेकाळी महाराष्ट्रात घरोघर जाऊन पोचला होता. ते काव्यरचनाहि करीत. जुने मराठी संतवाङ्मय मिळविण्यासाठी त्यांनी पुष्कळ प्रवासहि केला. ते संशोधकहि होते. श्रद्धा आणि चिकित्सा यांचा सुंदर समन्वय त्यांच्या लेखनात झाला आहे. त्यांची ग्रंथरचना विपुल आहे. पुढील आठवण त्यांच्या 'चरित्रचंद्र' नामक' आत्मवृत्तांतून उद्धृत केली आहे. ]

मी एकदा अण्णासाहेबांच्या घरी संध्याकाळी गेलो होतो तो दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी मला सोडले! मी घरी जाण्याची रात्री ९ वाजता गडबड करून पाहिली. त्यांनी फराळ घातला व घरी निरोप पाठविला. थोड्या राजकारणाच्या व पुष्कळ परमार्थाच्या गोष्टी केल्या. मध्यरात्रीनंतर ते मला घेऊन ओंकारेश्वर, कसब्याचा गणपति या देवांच्या दर्शनास घेऊन गेले, ते आम्ही पहाटे परत आलो! थोरांच्या समागमाचा आनंद झाला, पुण्याचा खोल इतिहास समजला; असो. बोलता बोलता त्यांनी केरोपंत छत्रे यांची एक गोष्ट सांगितली. केरोपंत व अण्णासाहेब एकदा रात्री गोष्टी सांगत सांगत आपापल्या बिछान्यावर लवंडले. दोघांनीही निद्रेची आराधना चाल-

विली. केरोपंतांना झोप लागली असे वाटले होते पण ते काही पुटपुटत होते. अण्णासाहेबांनी विचारले 'केरोपंत ! जागे आहांत काय ?' ते होय म्हणाले, दोघेही पुन्हा उठून बसले व त्यांचा संवाद झाला.

'केरोपंत ! तुम्ही काही पुटपुटत होता काय ?'

'होय खरे आहे. मी विष्णुसहस्रनाम म्हणत होतो.'

'काय विष्णुसहस्रनाम ? आश्चर्य आहे !'

'होय. आश्चर्य वाटण्यासारखे आहे. मी नास्तिक आहे म्हणजे देव ही काही चीज आहे असे मला पटलेले नाही.'

'पटले नाही पण पटविणारे कोणी भेटले तर पटवून घ्यायला तयार आहांत काय ?'

'माझा आग्रह कोणताच नाही. देव आहे असे ज्यांना प्रामाणिक श्रद्धेने वाटते त्यांना मी नावे ठेवणार नाही. माझ्यापुरते माझे मत आहे. हे मी कोणाला सांगत नाही.'

'देव नाही असे तुम्हाला वाटते तर मग देवाची सहस्रनामे ज्यांत गोविली आहेत असे विष्णुसहस्रनाम तुम्ही का म्हणत होता ?'

'त्याची गोष्ट अशी आहे. आमची आजी वारली तेव्हा तिने माझ्याकडून हे कबूल करवून घेतले आहे. ती मरण्याच्या पूर्वी मला म्हणाली, 'केरू ! तू फार चांगला निघालास, कुलदीपक निघालास, तुझा मोठा लौकिक झाला आहे, पैसे रगड मिळविलेस, हे सर्व पाहून मला नेहमी आनंद वाटतो, पण तू नास्तिक झालास याबद्दल मला वाईट वाटते. तुलसीदासाचे एक कवन आपले शास्त्रीबोवा नेहमी म्हणून दाखवितात. त्याचा अर्थ असा आहे की, माणसाची बुद्धी मोठी आहे, चतुराई आहे. धनदौलत व कीर्ति मोठी आहे. हजारो माणसे मान देत आहेत पण रामनाम त्याच्या तोंडात नाही; तर सुंदर

पण नकट्या स्त्रीसारखे, त्याचे वैभव सारे फुकट आहे ! खरेच सांग, देवाने सर्व अनुकूलता दिली असून तू देवाला विसरलास याचा जाब तूं देवापुढे काय देशील ? माझे शेवटचे एकच सांगणे आहे की रोज जेवायला बसण्यापूर्वी तू देवाला एक तुळशीपत्र वाहत जा व आठ प्रहरांत केव्हा तरी तुला सवड होईल तेव्हा एकदां विष्णुसहस्रनाम म्हणत जा.' त्याप्रमाणे मी आजीला वचन दिले व ते मी पाळीत असतो.'

'मला हे ऐकून समाधान वाटते. आजीसाठी का होईना तुमच्या तोंडून रोज देवाची सहस्रनामे येतात, हे काय थोडे आहे ? हे नामस्मरण तुम्हाला तारील.'

'ते मला काही ठाऊक नाही. मी पुढचा कधी विचारच करीत नाही. देव कोणी असलाच तर ही माझी सेवा त्याच्या घरी रुजू होईल. नसलाच तर रोज पंधरा मिनिटे फुकट गेली असे होईल. पण २४ तासांत किती तरी तास आमचे फुकट जातात. त्यांत पंधरा मिनिटे गेली म्हणून काय नुकसान आहे ?'

'केरोपंत ! तुम्ही आपले आयुष्य सदाचारांत व परोपकारात घातले आहे. देव तुमची उपेक्षा करणार नाही. आजी तुम्हाला गुरु झाली. तिचे वचनपरिपालन हीच परमात्म्याची पूजा आहे. तुम्ही धन्य आहात.'

* *

# श्री. गो. गो. गोखले, नागपूर

[ श्री. गोखले बरीच वर्षे तरुण भारताचे सहसंपादक होते. सन १९०८ पासून १९२४ पर्यंत त्यांचे वास्तव्य पुण्यात असून तेथेच न्यू इंग्लिश स्कूल आणि नंतर फर्ग्युसन कॉलेजमध्ये इंटरपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. नंतर ते ग्रँट मेडिकल कॉलेजमध्येही गेले होते. नंतर काही दिवस केसरी कचेरीत काम करून नागपूर येथे वास्तव्य करिते झाले. ]

## महर्षींचे प्रथम दर्शन

महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांना मी प्रत्यक्ष असे एकदाच पाहिले. माझ्या मोठ्या वहिनी कै. प्रि. विनायक गोपाळ गोखले यांच्या पत्नी कै. शारदाबाई गोखले यांची प्रकृति दाखविण्यासाठी मी त्यांच्यासह महर्षींच्या वाड्यात गेलो. तो बहुधा गुरुवार असावा. तेथे त्यावेळी अनेक रुग्णांची रांग लागली होती. सुमारे ११ च्या सुमारास महर्षी बाहेर आले. क्रमवार रोग्यांची तपासणी करून ते काढयांच्या औषधी लिहून देत व औषध कसे घ्यावयाचे, पथ्य कोणते पाळावयाचे, याविषयी सूचना देत. माझ्या वहिनींचा क्रम लागल्यावर त्यांनी तिची तपासणी केली व औषधे लिहून तो कागद दिला. त्यानंतर त्यांनी माझीही तपासणी केली व औषधे लिहून दिली. त्याबरोबरच त्यांनी नियमित नमस्कारांचा व्यायाम घ्यावा असे सांगितले व त्याबरोबरच संध्या व गायत्रीजपही करावा असा सल्ला दिला. त्यांची औषधे वनस्पतींची असल्यामुळे शुद्ध वनस्पति उपलब्ध व्हाव्या यासाठी त्यांनी कांष्ठौषधी-संग्रहालय नांवाचे

दुकानही चालविले असावे असे वाटते.* त्या दुकानाच्या नांवाच्या छापील कागदावर ते औषधी लिहून देत. हे दुकान बुधवारवाडा व बेलबाग यांच्यामध्ये होते असे आठवते.

महर्षींचे दर्शन घेण्याचा योग मला वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षींच आला, परंतु यानंतर मात्र त्यांच्या गाठीभेटींचा योग आला नाही. अण्णासाहेब अत्यंत कळकळीचे देशभक्त होते आणि त्याकाळच्या इतर पुढाऱ्यांप्रमाणेच त्यांनाही देशाचे स्वातंत्र्य कोणत्या उपायाने परत मिळविता येईल याची तळमळ लागली होती. काही क्रांतिकारक उठाव करावा तर वासुदेव बळवंताला आलेले अपयश त्यांच्या दृष्टीसमोरच होते. म्हणून दुसऱ्याच काही मार्गाचा अवलंब करावा असे त्यांस वाटू लागले. ब्रिटिश साम्राज्याची अनियंत्रित सत्ता भारतात प्रस्थापित झाली असली तरी अद्याप लहानमोठी संस्थाने मांडलिक म्हणून अस्तित्वात होती. त्यांच्याजळ मुबलक पैसाही होता आणि काही संस्थानांना थोडाफार फौजफाटा ठेवण्याचीही परवानगी होती. अशा एखाद्या बड्या संस्थानाच्या राज्यकारभारात स्वतःचा शिरकाव करून घेणे इष्ट होईल अशा उद्देशानेच त्यांनी त्या दृष्टीने हालचाल करण्यास आरंभ केला.

## सालारजंग प्रकरण

[ श्री. गोखले यांनी सालारजंग प्रकरणी जे लिहिले आहे त्यासंबंधी काही प्राथमिक हकिकत देण्याचे आम्ही योजिले आहे. सालारजंग आणि

* काष्ठौषधींचे दुकान गंगाधरशास्त्री जोशी यांनी चालविले होते. आपल्या नावाचे छापील फार्म घेऊन ते अण्णासाहेब सांगतील ती औषधे लिहून घेण्यास बसत असत.

श्री. अण्णासाहेब यांचा वऱ्हाड प्रकरणी संबंध येण्यापूर्वी वऱ्हाडची राजकीय परिस्थिती पुढीलप्रमाणे होती.* सन १८५३ मध्ये निजाम आणि इंग्रज यांच्यामध्ये तह होऊन निजामाने Contingent फौजेच्या खर्चासाठी वऱ्हाडचा मुलुख तोडून दिला. इ. स. १८५३ च्या तहानंतर वऱ्हाड इंग्रजांच्या ताब्यांत येताच इंग्रजांनी सुव्यवस्थित पद्धतीने राज्यकारभार सुरू केला. या तहाने वऱ्हाडप्रमाणेच नळदुर्ग आणि रायचूर-दुआब हे दोन प्रदेश इंग्रजांचे वहिवाटीस आले. **या सर्व मुलुखाचा अधिकार हैद्राबादच्या रेसिडेंटाकडे असे.** १८५३ च्या तहाप्रमाणे निजामास दरसाल हिशेब देण्यास त्रास पडे व त्यात अनेक भानगडी निघून मतभेद उत्पन्न होत असे. शिवाय फार पूर्वी म्हणजे १८०२ मध्येच निजामाचा ब्रिटिशांशी व्यापारी तह झाला होता. त्यात इंग्रजी व्यापाऱ्यांच्या मालावर फक्त पाच टक्के जकात घ्यावी असे ठरले होते, परंतु त्यातही अनेक भानगडी निघत असत. १८५७ च्या बंडाच्या वेळी निजामाने आणि त्याचा प्रसिद्ध दिवाण सर सालारजंग याने सैन्याची वगैरे सर्व मदत करून आपली राजनिष्ठा जागृत ठेविली. त्याबद्दल थोडे फार तरी निजामाचे उतराई व्हावे म्हणून १८६० मध्ये पुन्हा तह झाला. आणि त्या तहात असे ठरले की निजामाकडून इंग्रजांचे जे पन्नास लक्ष रुपये येणे होते तेही सर्व माफ करावे. सुरापूर, रायपूर, धाराशिव, वगैरे प्रांत निजामास परत द्यावे, आणि वऱ्हाड व दुसरा थोडा मुलुख १८५३च्या**च तहातील कारणाकरिता,** इंग्रजांच्या वहिवाटीत रहावा, इंग्रजी मालावरील जकात माफ व्हावी, वऱ्हाडच्या जमाखर्चाचा हिशेब निजामाने मागू नये आणि जहागिरी व सरहद्दीचे सोयीकरता काही मुलुखाची अदलाबदल व्हावी. १८६०च्या तहाच्या शर्तीप्रमाणे निजामास हिशेब मागण्याचा हक्क नव्हता, म्हणून एक तर वऱ्हाड परत द्यावे किंवा दुसरा काही तरी समाधानकारक निकाल लावावा असे निजामाने आणि त्याचा दिवाण सर सालारजंग याने मागणे सुरू केले. सन १८८० पूर्वी वऱ्हाड प्रांताची राजकीय परिस्थिती अशा प्रकारची होती. निजामाच्या मागणीला रेसिडेंट आणि तेथील इंग्रज अधिकारी अनुकूल नव्हते. तसेच

* श्री. काळेकृत वऱ्हाड प्रांताचा इतिहास पहा.

टाईम्ससारखे अँग्लो इंडियन पत्रकारही या मागणीच्या विरुद्ध होते. असे कोठे कोठे सूचित केले गेले आहे की, वऱ्हाड प्रांत इंग्रजांकडून परत मिळवून तेथे काही तरी ' विशेष ' करावे असा श्री. अण्णासाहेब यांचा मानस होता. परंतु श्री. गोखले यांच्या लिहिण्याप्रमाणे अण्णासाहेबांच्या ताब्यात वऱ्हाडचे चारही जिल्हे जरी आले असते, तरी सभोवारची परिस्थितीच अशी चमत्कारिक होती की अण्णासाहेबांस तेथे काही ' विशेष ' उठाव करता आला असता असे वाटत नाही. फार तर ते एक चार जिल्ह्यांचे नमुनेदार संस्थान झाले असते. काही झाले तरी वऱ्हाडप्रांत निजामास परत द्यावयाचा नाही, हा इंग्रज मुत्सद्यांचा निश्चय ठरून गेला होता. वऱ्हाड परत करण्याची मागणी सुरू होताच इंग्रजांनी आपली काही धोरणे आखली आणि त्याचे पर्यवसान कसे झाले हे श्री. गोखले यांच्या लेखात येऊन गेलेच आहे. १९०३ मध्ये लॉर्ड कर्झन याने या प्रश्नाचा निकाल लावताना निजामाशी झालेल्या समक्ष मुलाखतीत असे उद्‌गार काढले की " **पन्नास वर्षांच्या इंग्रजी सुधारलेल्या अमलानंतर वऱ्हाडातील लोकांस परत निजामाचे राज्यात जाणे आवडणार नाही.** " सन १९०३मध्ये काढलेल्या या उद्गाराचे बीज १८५३ मध्येच रोवले गेले होते हे उघड आहे. १८८० च्या पूर्वीची ही राजकीय परिस्थिती वाचल्याने श्री. गोखले यांच्या लेखातील मर्म समजण्यास अधिक सुलभ जाईल असे वाटते. — संपादक ]

' दत्तक वारस नामंजूर ' या लॉर्ड डलहौसीच्या धोरणामुळे संस्थानिक असंतुष्ट झाले असले तरी ब्रिटिश सत्तेविरुद्ध आवाज उठविण्याची त्यांची हिंमत होत नव्हती. संस्थानी राजकारणातील ही वस्तुस्थिती महर्षींना परिचित होती म्हणूनच श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांनी देऊ केलेले दिवाणपद त्यांनी स्वीकारले नाही. तथापि कायद्याचे सल्लागार म्हणून कोणत्या तरी संस्थानच्या कारभारात शिरकाव झाल्यास हिंदुस्तान सरकारशी कायद्याच्या आधारे दोन हात करणे शक्य होईल असा त्यांना विश्वास वाटत होता व तशी संधी

त्यांस १८७८-७९ साली मिळाली. दक्षिणेकडील एका बड्या संस्थानिकाचा हिंदुस्थान सरकारशी वाद चालू होता. त्या संस्थानिकाने महर्षींशी त्याबाबत सल्लामसलत करून त्यांस आपल्यातर्फे वकीलपत्र दिले. त्याला अनुसरून महर्षी अण्णासाहेबांनी तहनाम्यातील कराराचा सूक्ष्म अभ्यास करून हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधीशी झुंज घेण्याची तयारी केली. परंतु ब्रिटिश सरकारला त्याचा सुगावा लागला. अर्थात् कूटनीतीत प्रवीण अशा आपल्या प्रतिनिधीमार्फत त्यांनी या कार्यात अडथळा आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आपल्या तावडीत सापडलेले सावज निसटू द्यावयाचे नाही हे ब्रिटिश मुत्सद्याचे मुख्य सूत्र होते. वरून न्यायनीतीचा पुकारा करीत राहून लाचलुचपत फितुरी व जरूर तर लांडगा कोकरू या न्यायाचा अवलंब करून सावजावरील पकड आवळावयाची असाच त्यांचा राजनीतीचा पाया होता. हे लॉर्ड क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्सपासून डलहौसीच्या कारभारापर्यंत अनेक घडामोडीतून प्रत्ययास येऊन चुकले आहे. दक्षिणेकडील या संस्थानिकाबाबतीतही या नीतीचा अवलंब झाल्यामुळेच महर्षींना या कामी अपयश आले असे म्हणावयास हरकत नाही. ( या प्रसंगातील तपशीलवार माहिती स्मरणातून निसटल्यामुळे ती देता येत नाही. )

मद्रास प्रांतातील संस्थानिकाचे प्रकरण चालू असताना महर्षी अण्णासाहेब यांना हैदराबादच्या निजामाच्या राजकीय कारभारात चंचुप्रवेश मिळाला. तैनाती फौजेच्या खर्चासाठी निजामाला हिंदुस्थान सरकारच्या कर्जाचा फार मोठा बोजा सहन करावा लागला, आणि कर्जफेड करणे निजामाच्या आटोक्याबाहेर जात चालले. तेव्हा ब्रिटिश सरकारने त्या कर्जफेडीसाठी हैद्राबाद संस्थानच्या मालकीचे वऱ्हाडचे चार जिल्हे वहिवाटीसाठी ब्रिटिश सरकारला तोडून द्यावे

अशी मागणी केली व ती अखेर निजामाला मान्य करावी लागली व वऱ्हाडचे हे चार जिल्हे Ceded Districts म्हणून मुंबईच्या गव्हर्नरच्या अधिकारात वहिवाटीसाठी आले. अर्थात्‌च मुंबई राज्यातील अधिकाऱ्यांची त्यावर नेमणूक करण्यात येऊ लागली. रा. ब. सीताराम विश्वनाथ पटवर्धन हे त्या अधिकाऱ्यांपैकीच. त्यांच्या मार्फत महर्षींना या कराराची माहिती मिळाली असावी. निजामाचे त्यावेळचे दिवाण सालारजंग यांना हे चार समृद्ध जिल्हे इंग्रजी माशाचे घशात गेल्याबद्दल अत्यंत खेद होत असे. या जिल्ह्याचे मालकीचे हक्क इंग्रजाने मान्य केले असले तरी कोणती ना कोणती सबब काढून ते गिळंकृत करण्याचा ब्रिटिशांचा डाव त्यांच्या लक्षात आला असावा. यासाठी त्या कराराच्या कलमांचा सूक्ष्म अभ्यास करून त्या करारातून मुक्त व्हावे असा त्यांनी विचार केला व याबाबत सल्लामसलत देण्याविषयी विनंती केली. ती विनंती मान्य करून अण्णासाहेबांनी मध्यस्थामार्फत कलमांची छाननी करून काही मुद्दे काढले. त्याला अनुसरून हे चार जिल्हे परत कसे मिळविता येतील याविषयी सालार-जंगाशी त्यांनी खल केला व त्यासाठी लागणाऱ्या कायद्याचा सल्ला वेळोवेळी देण्याचे मान्य केले व याबरोबरच कर्जफेडीसाठी रकम उभी करण्यास हातभार लावण्याचेही कबूल केले. दिवाण सालार-जंगालाही त्यांच्या कर्तृत्वाविषयी खात्री पटली व या व्यवहारात यश आले तर वऱ्हाडच्या चार जिल्ह्यांचा कारभार अण्णासाहेबांकडे सुपूर्द करण्याचे आश्वासनही त्यांना दिले. महर्षींना अर्थात्‌च ही चालून आलेली एक पर्वणीच वाटली असल्यास नवल नाही. त्यांनी आपले चातुर्य पणास लावले व पहिल्या कराराचा फेरविचार करण्यासाठी हिंदुस्तान सरकारच्या पोलिटिकल खात्याशी पत्रव्यवहार सुरू करण्याविषयी दिवाण सालारजंगांना सूचना केल्या. त्या सूचनांना अनुसरून

सालारजंगांनी पोलिटिकल खात्याशी पत्रव्यवहार सुरू केला. प्रथम त्यास टोलवाटोलवीची उत्तरे मिळाली, पण दिवाण सालारजंगाने पिच्छा सोडला नाही व अखेर कर्जफेड एकजिनसी रकमेने करण्याची तयारी असेल तर पोलिटिकल खात्याने कराराच्या फेरविचाराची तयारी दर्शविली. निजामाला एकजिनसी रकमेने कर्जाची फेड करता येणार नाही अशी खात्री असल्यामुळे हिंदुस्तान सरकारने वाटाघाटीची तयारी दर्शविली होती. अण्णासाहेबांनी रक्कम उभी करण्याचे आश्वासन दिले होते,*तरी सालारजंगाला त्याविषयी खात्री वाटत नव्हती म्हणूनच त्यांनी तशी खात्री करून घेण्यासाठी, विशिष्ट महत्वाच्या कामासाठी दोन कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे महर्षींना कळविले. महर्षींनी त्यांचे हे आव्हान स्वीकारून एका फ्रेंच बँकेशी संधान बांधून दोन कोटी रुपयांचे कर्ज मिळविले व रक्कम तयार आहे असे सालारजंगाला कळविले. अण्णासाहेबांची पत किती मोठी आहे याची खात्री पटताच सालारजंगाने पोलिटिकल एजंटामार्फत पोलिटिकल खात्याशी वाटाघाटीसाठी आपण तयार आहो असे कळविले. धूर्त व कावेबाज इंग्रज मुत्सद्यांना अर्थात्च अण्णासाहेब व सालारजंग यांच्यामधील वाटाघाटींचा सुगावा लागण्यास विलंब लागला नाही. अण्णासाहेबांच्या चातुर्याचा त्यांना अनुभव येऊन चुकला व त्यांची पत परराष्ट्रांतही किती दांडगी आहे याचीही त्यांस जाणीव झाली. वऱ्हाड संबंधीच्या फेरविचाराची निजामाशी पुन्हा बोलणी सुरू केली तर त्यात आपल्याला हार खावी लागेल हेही त्यांस कळून चुकले. अर्थात्च हा

* या कार्यासाठी हैद्राबादेस एक स्टेट बँक उभारून तिच्या मार्फत निजामास कर्ज द्यावयाचे व निजामाने ते कर्ज ब्रिटिश सरकारचे देणे फेडून टाकण्यासाठी उपयोगात आणून वऱ्हाड प्रांत परत घ्यावयाचा अशी अण्णासाहेबांची योजना होती.

नामुष्कीचा प्रसंग येनकेन प्रकारेण टाळलाच पाहिजे या निर्धाराने त्यांची कूटनीतीची चक्रे फिरू लागली. आपले उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी सामान्य न्यायनीतीची बंधने तोडून टाकण्यास ते मागेपुढे पहात नसत याचा प्रत्यय चेतसिंग व अयोध्येच्या बेगम प्रकरणापासून त्यावेळेपर्यंत अनेकदा प्रत्ययास आला आहे. अर्थात्च या प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी वाटाघाटींना सुरुंग लावण्याचे ठरविले. दिवाण सालारजंगाचा काटा काढून टाकला तर अण्णासाहेबांच्या माऱ्याला तोंड देणेही टळेल असा कयास बांधून त्यांनी पुढील पावले टाकण्यास सुरवात केली. वाटाघाटीची पूर्वतयारी व कार्यक्रम ठरविण्यासाठी त्यांनी सालारजंगाशी पोलिटिकल एजंट मार्फत वाटाघाट सुरू केली व सद्हेतूचे मायाजाळ पसरून त्यांनी सालारजंगाशी बोलणी सुरू केली. त्याच्या सन्मानार्थ त्यांनी अनेक समारंभांचे आयोजन केले व त्यातूनच त्यांनी प्राथमिक वाटाघाटीचा मुहूर्तही निश्चित केला. त्याप्रमाणे सालारजंगाला त्यांच्या कुटीलनीतीचा सुगावा लागू नये अशी खबरदारीही घेतली. सालारजंगाने सरळपणाने याचा अर्थ लावून प्रास्ताविक वाटाघाटीच्या पूर्वी दोन दिवस आधी महर्षींनी हैद्राबादला यावे असे सुचविले. अण्णासाहेब त्यावेळी मद्रास येथे होते. परंतु दरम्यान पोलिटिकल एजंटांनी सालारजंगांना एका ठिकाणी मेजवानीला बोलाविले. त्याप्रसंगी सालारजंगांशी अत्यंत स्नेहभावाने बातचीत केली. परंतु अखेर त्याप्रसंगी त्यांना विषप्रयोग केला* व

* "The project had made much progress but, as destiny would have it, Sir Salar Jung's untimely demise from cholera — though there was cholera nowhere in Hyderabad — brought this scheme to an unhappy culmination."

(पुढील पानावर)

त्यातच त्यांचा अंत झाला; वाटाघाटीचा प्रसंग टळला व अण्णा-साहेबांच्या पदरी अपयश आले. परंतु अण्णासाहेबांनी तयार केलेली कैफियत अमोघ होती. त्या कैफियतीचे आधारे पुढे छत्तरीचे नबाब यांनी वऱ्हाडचा प्रश्न वेळोवेळी उपस्थित केला व त्यांच्या प्रयत्नाचे फळ म्हणूनच पुढे वऱ्हाड मध्यप्रांतास जोडताना वऱ्हाडचा मुलुखास वेगळे स्थान द्यावे लागले व शेवटी निजामाच्या युवराजाचा उल्लेख " प्रिन्स ऑफ बेरार " म्हणून करण्यास मान्यताही दिली.

महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या तेजस्वी चळवळीची स्मृती आज ५१ वर्षांनंतरहि उचंबळून आल्याशिवाय राहात नाही. त्या स्मृती शब्दरूपात प्रकट करून त्यांना स्मृती श्रद्धांजली अर्पण कर-ण्याची संधी दिल्याबद्दल माझे स्नेही रा. धों. दातार यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

* *

---

(मागील पानावरून)

( सदर, वऱ्हाड-योजनेने बरीच प्रगति केली होती परंतु दैवाची लहर फिरली म्हणूनच की काय सालारजंग कॉलऱ्याने अचानक मृत्यु-मुखी पडले. परंतु या वेळेस हैद्राबाद संस्थानात कॉलऱ्याची साथ असल्याची कोठेहि बोलवा नव्हती.—श्री. का. त्रि. वागदरीकर यांच्या ब्रम्हर्षीज गॉस्पेल या पुस्तकातील अण्णासाहेबांच्या चरित्रांतून )

# कै. नथ्थू राघो पाटील

**कस्यादेशात् क्षपयति तमः सप्तसप्तिः प्रजानाम् ॥**
**छायाहेतोः पथि विटपिनामंजलिः केन बद्धा ।।**
**अभ्यर्थंते जललवमुचः केन वा वृष्टिहेतो ।।**
**जात्यैं वै ते परहितविधौ साधवो बद्धकक्षाः ।।**

( भावार्थः--सूर्य लोकांचा अंधकार कोणाच्या आज्ञेने दूर करतो ? रस्त्यावर वृक्ष जणू काय छाया पसरण्याच्या हेतूने अंजली करून उभे असतात. तसेच मेघ वृष्टी करतात; या सर्वांस ही कामे कोण करावयास सांगतो ? अर्थात्च कोणी नाही. कारण साधु लोक स्वभावतःच दुसऱ्याचे हित करण्यासाठी तत्पर असतात. )

**जाड्यं धियो हरति सिंचति वाचि सत्यं ।।**
**मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति ।।**
**चेतः प्रसारयति दिक्षु तनोति कीर्तिम् ।।**
**सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम् ।।**

( भावार्थः--सत्संगती मनुष्याचे कोणते हित करीत नाही ? बुद्धीचे जाड्य हरण करते, वाचेने सत्य बोलावयास लावते, उन्नतीची दिशा दाखविते आणि पापाचे क्षालन करते, तद्वतच अंतःकरणाला प्रसन्नता आणून दशदिशांना कीर्ति प्रसृत करित्ये. )

सज्जनांचा सहवास लाभणे हा सुद्धा योगायोगच आहे. किंबहुना सत्पुरुषांचा सहवास लाभण्यास तर एक प्रकारचे भाग्यच लागत असते. आपल्या परिसरात किंवा निकट संबंधात आलेल्या व्यक्तीवर अनेक तऱ्हेने कृपा करणे हे सज्जनांचे व्रतच असते किंवा तशी त्याची नैसर्गिकच वृत्ति असते. पहिल्या अवतरणात लिहिल्याप्रमाणे सूर्य कोणाच्या आदेशाने अंधकार नाहीसा करतो, कोणाच्या आज्ञेने वृक्ष

आपली छाया पसरतात ? अर्थात् कोणाच्याही आदेशाने किंवा आज्ञेने नाही. निसर्गतःच ही कर्तव्ये होत असतात. श्री. अण्णासाहेब हे अशा निरपेक्ष रीतीने सदैव उपकार करणाऱ्या संतांपैकी होते हे सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु इतके सांगणे आवश्यकच आहे की, नथ्थू पाटील यांच्यासारखा सामान्य गृहस्थ, अण्णासाहेबांच्या सहवासात आला आणि त्या सहवासाचा लाभ त्यांना बरीच वर्षे म्हणजे अण्णासाहेबांच्या अवसानापर्यंत मिळाला. दुसऱ्या अवतरणात म्हटल्याप्रमाणे सत्संगाने त्यांच्या बुद्धीचे जाड्य निघून गेले किंवा त्यांस कीर्ति प्राप्त झाली, अशाविषयी अतिशयोक्त विधाने करण्यात स्वारस्य नाही.

अण्णासाहेब व पाटील यांचा गुरुशिष्य संबंध होता असे म्हणता येत नाही. कारण, अण्णासाहेबांनी शिष्य असे कोणालाच केले नाही. सेव्य-सेवकभाव हाच उभयतांचा संबंध होता आणि हा संबंध उभयपक्षी निरपेक्ष होता. कारण, पाटील अण्णासाहेबांपासून काही लौकिक अपेक्षा करीत होते असे दिसत नाही आणि अण्णासाहेब तरी पाटिलांपासून कसली अपेक्षा करणार ? पाटलांचे कल्याण व्हावे हाच त्यांच्या मनातील अंतिम हेतु असणार हे उघड आहे. अण्णासाहेबांच्या परिवारात अनेक गृहस्थ होते, परंतु अक्षरशः अण्णासाहेबांची सेवा तनमनधनाने पाटलांनीच केली. या उभयतांचा हा लोभ किंवा प्रेमसंबंध पाहिला म्हणजे 'व्यतिषजति पदार्थान् आंतरः कोऽपि हेतुः' या उक्तीतील सत्य लक्षात येते. काही तरी पूर्वानुबंधानेच किंवा 'जननान्तर सौहृदानेच' हे उभयता एकत्र आले आणि त्या उभयतांतील अकृत्रिम स्नेह किंवा सेव्य-सेवकभाव अखेरपर्यंत टिकला. वस्तुतः या दोघांमध्ये कोणत्याही किंवा एकाही गुणाचे साधर्म्य नव्हते. अण्णासाहेबांचे नाव पहिल्या क्रमांकात घातले तर किती तरी जागा कोरी सोडून मगच नथ्थू पाटलांचे नाव लिहावे लागेल. इतकी विषमता

असूनही पाटलांना अण्णासाहेबांचा सहवास लाभला हे त्यांचे बलवत्तर भाग्यच म्हटले पाहिजे.

पाटीलबुवा व अण्णासाहेब यांचा संबंध येण्यास सदाशिव महादेव दांडेकर हेच कारणीभूत झाले. श्री. दांडेकर मलकापुरास एक राष्ट्रीय शाळा चालवीत असत. पाटीलबुवा हे त्या शाळेतील विद्यार्थी होते. लहान वयात पाटीलबुवांचा स्वभाव फार द्वाड व खोडकर असल्यामुळे त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी दांडेकरांनी त्यांस अण्णासाहेबांकडे आणून सोडले. आणि पुढे पुढे तर पाटीलबुवा अण्णासाहेबांस इतके चिकटले की वर्षातील बहुतेक काळ ते पुण्यातच घालवीत असत. मलकापुरापासून पाच सहा मैलांवर असलेले म्हैसवाडी हे पाटीलबुवांचे मूळ गाव होय. तेथे त्यांची बरीच मोठी शेतीवाडी व जमीनजुमला होता आणि अजूनही आहे. पाटीलबुवा अण्णासाहेबांच्या सहवासात आले तरी प्रथमत: ते त्यांच्याकडे साशंक वृत्तीनेच पहात होते. अण्णासाहेबांची परीक्षा करण्याकरता त्यांनी एक क्लृप्ति शोधून काढली. ती अशी की रोज शौचाहून आल्यावर त्यांनी पाय वगैरे न धुता अण्णासाहेबांच्या पाया पडावे. असे केल्याने अण्णासाहेब रागावतील असे त्यास वाटे, परंतु तसे झाले नाही. एक दिवस असा नमस्कार करताना पाटीलबुवांना खूप हसू आले. त्यांच्या हसण्याचे कारण अण्णासाहेबांच्या लक्षात आले आणि ते म्हणाले, "अरे वेड्या, तुझ्या स्पर्शाने मला अशुचिता येण्याऐवजी, माझ्या स्पर्शाने तुलाच शुचिता येइल." एक मुसलमान गृहस्थ श्री. एकनाथांच्या अंगावर जितक्यावेळा थुकत असे, तितक्यावेळा एकनाथांनी रागास न येता स्नान करावे. शेवटी त्या मुसलमान गृहस्थाला एकनाथांच्या शांतिब्रम्हस्वरूपाची खात्री पटली आणि तो त्यांस शरण गेला. अण्णासाहेब व पाटील या उभयतांत असाच काहीसा प्रकार झाला असे

म्हणावयास हरकत नाही. ग्रीस देशातील प्रसिद्ध तत्त्ववेत्ता व मुत्सद्दी पेरिक्लीज याचीही अशीच एक गोष्ट प्रसिद्ध आहे. तो नित्याप्रमाणे आपल्या कचेरीत काम करीत बसला असताना, एक गृहस्थ तेथे येऊन त्यास शिव्या देत बसला. पेरिक्लीजने अर्थात्च तिकडे लक्ष दिले नाही. हे पाहून त्या गहस्थाने आणखी जोराने शिव्या देण्यास सुरवात केली. पेरिक्लीज काम आटोपून घरी जावयास निघाला, तेव्हा तोही गृहस्थ त्याच्या मागोमाग शिव्या देत त्याच्या घरापर्यंत गेला. घरी पोचताच पेरिक्लीजने नोकरास हाक मारून सांगितले "कंदील लाव, आणि या सद्गृहस्थास त्याच्या घरी नीट पोचवून दे." तीनही उदाहरणांत त्रास देण्याचा प्रकार आणि कालावधी भिन्न असला तरी संबंधित व्यक्तीची दिसून आलेली शांतता अनुपमेय आहे. पाटलांनी आपल्या मताने अण्णासाहेबांची अशी कसोटी घेतल्यानंतर त्यांच्या साधुत्वाची त्यांस पूर्ण खात्री पटली आणि त्यांनी त्यांचे सेवेस जणू काय वाहूनच घेतले.

परंतु इतके असले तरी पाटील यांचा मूळ द्वाड स्वभाव मधून मधून उचल खातच असे. औषधे लिहून देण्यास पाटीलबोवा बसत असत. त्यांच्या मताने अण्णासाहेब यांनी चुकून एकाद्यास भलतेच औषध सांगितले, तर ते रोग्याला पत्ता विचारून घेऊन, त्याच्याशी पत्रव्यवहार करून चौकशी करीत असत. परंतु एकही रोगी दगावल्याचे किंवा तो दुसऱ्या डॉक्टरकडे गेल्याचे उदाहरण पाटील यांस दिसून आले नाही.

पाटीलबोवांचे शेतीवाडीचे उत्पन्न बरेच होते, आणि ते पुढे दिवसेदिवस वाढतच गेले. पाटीलबोवांची श्रद्धा अशी की अण्णासाहेबांकरताच हे उत्पन्न आपल्याला श्रीनरसिंव्ह सरस्वती स्वामी

महाराज देत आहेत. या श्रद्धेमुळे अण्णासाहेबांसाठी लागेल तो पैसा खर्च करावयास पाटील मागेपुढे पहात नसत किंवा त्याबद्दल तक्रार करीत नसत. श्रीपद्मनाभस्वामींच्या पुण्यतिथीच्या उत्सवासाठी पुण्याहून धुळयास जाणाऱ्या पन्नास साठ मंडळींचा जाण्यायेण्याचा खर्च पाटील बोवाच करीत असत. आणि हे सर्व दातृत्व त्यांचे निरपेक्षच होते असे म्हणावयास हरकत नाही. येथे हे लक्षात ठेवणे जरूर आहे की स्वतः श्री. अण्णासाहेब पाटीलबोवांच्या पैशावर अवलंबून नव्हते. मोठमोठ्या संस्थानिकांचे अपील अर्ज लिहून अण्णासाहेबांस भरपूर पैसे मिळत असत. परंतु ज्या महात्म्याच्या सहवासाने आपले कल्याण झाले त्याच्यासाठी आपणही थोडाफार त्याग करणे अवश्य आहे अशीच पाटीलबोवांची भावना होती आणि त्यामुळेच ते वर सांगितल्याप्रमाणे पैसा खर्च करीत असत.

आध्यात्मिक किंवा पारमार्थिक दृष्ट्या पाटीलबोवांनी अण्णासाहेबांपासून फारसे काही उचललेले असावे असे दिसत नाही. ते श्रद्धावान्च होते. उभयतांच्या बौद्धिक पातळीत मूलतःच इतका फरक होता की, केवळ श्रद्धा ठेवून अण्णासाहेबांची सेवा करणे यापलीकडे पाटिलबोवांना अण्णासाहेबांकडून दुसरे काही उचलता आले नाही. परंतु अण्णासाहेबांची परोपकारवृत्ति त्यांनी अवश्यमेव उचलली. अण्णासाहेबांच्या अवसानानंतर ते आपल्या गावी परत आले आणि तेथे त्यांनी रोग्यांस विनामूल्य औषधे देण्याचा उपक्रम शेवटपर्यंत सुरू ठेवला.

वरील विवेचनावरून पाटिलबोवा कोणी असामान्य गृहस्थ होते असा आभास उत्पन्न करण्याचा आमचा हेतू नाही. ते सामान्यच होते. परंतु त्यांच्या या सामान्य आयुष्याला अण्णासाहेबासारख्या

सत्पुरुषाचा सहवास ही एक सुवर्णकडाच होती. मृत्तिका कस्तुरीपाशी गेली तरी कस्तुरी आपला सुगंध तिला दिल्यावाचून राहाणार नाही. अण्णासाहेबांच्या सहवासाने पाटीलबोवांच्या आयुष्याला एकप्रकारची उदात्तता प्राप्त झाली होती. एरव्ही त्यांचे आयुष्यात विशेष असे काहीच नव्हते. परंतु ते विशेष असो किंवा नसो आम्हाला येथे नमूद करून ठेवणे जरूर आहे की या पुस्तकाच्या निर्मितीचे श्रेय सर्वस्वी पाटीलबोवांनाच आहे. पाटिलबोवा, श्री. दांडेकर यांस आठवणी सांगत असत. त्या आठवणी आम्ही प्रसंगवशात् श्री. दांडेकर यांचे तोंडून ऐकल्या आणि तदनंतर अण्णासाहेबांच्या आठवणी संकलित करण्याची कल्पना प्रादुर्भूत झाली. इतर गृहस्थांनी जरी आठवणी पाठविल्या असल्या तरी या कल्पनेच्या उगमाचे श्रेय पाटील-बोवांकडेच आहे. अण्णासाहेबांबरोबरच त्यांच्या या एकनिष्ठ सेवकाची स्मृती जागृत रहावी या उद्देशानेच वरील चार शब्द लिहिले आहेत.

* * *

“ आठवणींचें पुस्तक पूर्ण श्रींचे
क्रुपेने आपले श्रद्धेनुसार होईल
त्या आठवणींचा अपूर्व आनंदाचा
लाभ आपला आपणालाच. ”

—श्रीमाधवबुवा गोडबोले

।। श्री ।।

# विनायकाष्टक

१

माता जानकि रामचंद्र सुपिता युग्मोदरीं जन्मला
जो त्या पुण्यपुरीं, नृसिंह मुनिचा सच्छात्र कीं गाजला
जो भावी महनीयता प्रकटवी बाल्यांत सुस्पष्ट ती
त्या योगीन्द्र विनायकास अमुची भावें असो ही नती

२

अभ्यासा दिनरात्र कीं करुनियां एल. एल. बी. जाहली
ज्यासी किन्तु न वैद्यकीय पदवी ती अन्तिमा लाभली
देई औषध व्याधि नष्ट करितो घेतां न द्रव्याप्रती
त्या योगीन्द्र विनायकास अमुची भावें असो ही नती

३

झाला दुःखित पारतंत्र्य बघुनी जें भारतीं पातलें
युक्तीसी तरि बंधमुक्त करण्या त्यातें जयें योजिलें
पावे युक्ति अपेश घोर तरि ना सोडी जयाची मती
त्या योगीन्द्र विनायकास अमुची भावें असो ही नती

४

देशालागि विमुक्त शीघ्र करण्या अन्यां असे योजिलें
ऐसे ये कळुनी; स्वचित्त अवघें ईशाप्रती वाहिलें
श्रीस्वामी म्हणजेच ईश्वर अशी श्रद्धा धरी यन्मती
त्या योगीन्द्र विनायकास अमुची भावें असो ही नती

५

योगाभ्यास करोनि सांग न कुणी योगासनीं पाहिलें
आर्तांनि नच सांगताचि परि यद्रोगाप्रती जाणिलें
निद्राधीन दिसे वरी परि असे ती अंतरीं जागृति
त्या योगीन्द्र विनायकास अमुची भावें असो ही नती

६

अर्थोपार्जन पूर्ण तुच्छ गणिलें न स्थान अर्था दिलें
गार्हस्थ्यास सुयोग्य वैभव परी ज्याचें न मंदावलें
संसारी जरि राहिला न धरिली त्याची विशेषा रति
त्या योगीन्द्र विनायकास अमुची भावें असो ही नती

७

गंगौघासहि लाजवील इतुके पावित्र्य ज्याचे असे
धैर्याशीं तुलना–प्रचंड गिरिही तो धाकुटासा दिसे
कांहीही निकटीं नसो; न चुकला द्यायास दानाप्रती
त्या योगीन्द्र विनायकास अमुची भावें असो ही नती

८

मी-त्वा त्यागुनि मी+न मार्ग धरिला जो कीं स्वयें शोधिला
श्री-स्वामी-चरणांत रंगुनि मुदें स्वानंद संपादिला
जाणोनी दिधले उदाहरण ते अत्युच्च लोकांप्रती
त्या योगीन्द्र विनायकास अमुची भावें असो ही नती

—प्र. के. ठोसर

# नामसूची

**आगाशे**, गणेश जनार्दन, मराठी कवि १०५
**आचारी**, आळंदी देवस्थान १०२
**आठवले**, दत्तोबा, श्रीनरसिंव्ह सरस्वती स्वामीमहाराज यांच्या नंतरचे मठाधिपति ३७
**आठवले**, विनायक १५१
**आर्नोल्ड**, एडविन् ११६
**आनंदतनय**, ११
**आपटे**, दत्तात्रेय अनंत, अनंततनय, मराठी कवि १२६
**आपटे**, ह. ना., कादंबरीकार १२५
**आमडेकर**, कै. दत्तोपंत, एक भक्त १७९
**आवटे**, धार्मिक ग्रंथांचे प्रकाशक १२५
**उत्तमबाई** भारतीया, घनश्याम गुजरातीची पुतणी ४७
**एकनाथ**, महाराष्ट्र–संत आणि कवि २०३
**ओक**, चित्रकार २०
**कर्कहॅम**, १०७, ११७
**कर्नल फ्रेअर**, ११०
**करंदीकर**, दादासाहेब, वकील, लो. टिळकांचे सहकारी २५
**करमरकर**, व्ही. व्ही., वकील, नंदुरबार ५६
**कर्झन**, लॉर्ड १९५
**कवडे**, कृष्णशास्त्री १२५

**कविमंडन** १०६
**काथवटे**, आबासाहेब ११७
**कार्डिनल रिचल्यो**, ११५
**काळे**, वे. शा. सं. रा. बाळंभट १५२
**क्यांडी**, मेजर १०७
**क्लाइव्ह**, लॉर्ड १९६
**किलहॉर्न**, प्रोफेसर ११७
**कुळकर्णी**, गंगाधर दत्तात्रेय ७५
**कुळकर्णी**, दत्तात्रेय गोपाळ, धुळें ७४
**केळकर**, नरसिंह चिंतामण ३
**कोल्हटकर**, अ. ब., संपादक 'संदेश', प्रसिद्ध लेखक १८६
**कोल्हटकर**, लक्ष्मीबाई, लेडी सुपरिटेंडंट श्रद्धानंद महिलाश्रम, माटुंगा १८८

**खरे**, नारायण रामचंद्र, हेडमास्तर, मोर्शी हायस्कूल ७५
**खापर्डे**, दादासाहेब २१, २५
**खापर्डे**, मनुताई, दादासाहेबांची सून २५

**गणपुले**, शंकर ७७
**गणपुले**, नामांकित वैद्य, पुणे १७५
**गयाताई**, ज्यांना पूर्व जन्मीच्या ऋषि असे अण्णासाहेब म्हणत असत ५१, ७२, १८६
**गाडगीळ**, जनार्दन सखाराम, हायकोर्ट जज्ज व नायब दिवाण, बडोदा, मूळ संपादक 'इंदुप्रकाश' ११८
**गाडगीळ**, न. वि. १७२
**गायकवाड**, मल्हारराव, बडोदा नरेश ११०, १९५
**गायकवाड**, सयाजीराव, बडोदे संस्थानचे अधिपति ५९

**गांधी,** अण्णा, श्रीनरसिंव्ह सरस्वती स्वामीमहाराज मंदिरातील सध्याचे पुजारी ४०
**गांधी,** श्रीपादबोवा, अण्णा गांधींचे वडील ४०, १६५
**गांधी,** लक्ष्मणबोवा, श्रीपादबोवांचे चुलते ४०
**गुजराती,** हरिकिसन भाई, घनश्याम गुजरातीचे बंधू ४७
**गुप्ते,** तात्यासाहेब १६
**गुप्ते,** बापूसाहेब १६
**गुळवणी महाराज,** पुणें १५३, १५७
**गोखले,** विनायक गोपाळ १९२
**गोखले,** शारदाबाई १९२
**गोडबोले,** माधवबोवा, बी. ए., श्रीशंकरबोवा सोनगीरकर यांच्यानंतर सध्याचे आळंदी संस्थानचे सरपंच. श्रीअण्णासाहेब यांचे एकनिष्ठ भक्त १, ३९, ४८, ५२, ५५, ५६, ६७, १०३, १३९, १८५, २०६
**गोडबोले,** हरिभाऊ, माधवबोवांचे बंधू ५६
**गोंदवलेकर महाराज** १६१
**गोरे,** नीळकंठ शास्त्री १६२
**ग्लॅडस्टन** ११५

**घोरपडे,** बाबासाहेब, इचलकरंजी २३
**घोष,** अरविंद ७८

**चार्लस्,** इंग्लंडचा राजा, पहिला ११५

**छत्रे,** केरो लक्ष्मण, नामांकित गणिती आणि खगोलशास्त्रज्ञ, त्या शास्त्रांतील संशोधक, डेक्कन कॉलेजांतील प्रोफेसर, त्यांच्या देहावसानानंतर यांच्या पत्नीस ब्रिटिश सरकारने दरमहा पेन्शन ठरवून दिले होते. १०७, ११७, १८९

**जज्ज,** अण्णासाहेबांचे एक भक्त ५१, १४८, १८०

**जालवणकर,** नारायणबोवा १६०, १६१

**जॉर्ज व्हिलिअर्स,** ड्यूक ऑफ बकिंगहॅम, इंग्लंडचा मुख्य प्रधान ११५

**जोशी,** अनंतराव ४३

**जोशी,** गणेश वासुदेव उर्फ सार्वजनिक काका १०९

**जोशी,** गोपाळ विनायक १९

**जोशी,** गंगाधरशास्त्री, पुणें १८५, १९३

**जेम्स जीन्स,** सर ९९

**टिळक,** ना. वा., कवि १६२

**टिळक,** लोकमान्य, भारताचे अनभिषिक्त सम्राट, अद्वितीय राजकीय पुढारी, ओरायन, आर्कटिक होम ऑफ दि वेदाज् आणि गीतारहस्य या ग्रंथांचे कर्ते, अण्णासाहेब यांना गुरुस्थानी मानणारे—जन्म १८५६, मृत्यू १९२०—४, ६, १९, २०, २४, ५०, ५४, ५९, ७८, ७९, ११७, १२५

**डलहौसी,** लॉर्ड, हिंदुस्तानचा गव्हर्नर जनरल, 'दत्तकवारस नामंजूर' या तत्वाचा प्रणेता १९५

**तुकाराम महाराज,** ११, १६५

**तुळजापुरकर,** दत्तो अप्पाजी, संपादक श्रुतिबोध, 'माझें रामायण कर्ते १८६

**दलाल,** किसन रुपचंद, उपाख्य लालासाहेब, अण्णासाहेबांचे एक भक्त ९०

**दांडेकर,** गोविंदा, सदाशिव महादेव उर्फ बापूसाहेब यांचा मुलगा ७३

**दांडेकर,** नानासाहेब, शंकर सदाशिव ६७, ८०

**दांडेकर,** नारायणराव, सदाशिव महादेव यांचे तृतीय चिरंजीव १४१

**दांडेकर**, महादेव अनंत, उर्फ दादा दांडेकर. श्रीनरसिंव्ह सरस्वती स्वामी महाराज यांचे शिष्य, अण्णासाहेब यांचे गुरुबंधू ५६, ७३, १५१

**दांडेकर**, सदाशिव महादेव, उर्फ बापूसाहेब, महादेव अनंत यांचे चिरंजीव ७१, ७३, ८०, ९०

**दांडेकर**, सीतारामपंत, महादेव अनंत यांचे चिरंजीव ६५, ७३, १८३

**दीक्षित**, प्रो. डेक्कन कॉलेज, श्री. अण्णासाहेबांचे चरित्रकार ५, ७, ३४, १३८, १८४

**द्विवेकर**, भा. सि. रिटायर्ड सबजज्ज २१, ६९, ७०

**देव** मामलेदार १४८

**देवधर**, शं. वा. १५८

**देशमुख**, केशवराव २३

**देशमुख**, डॉ. गोपाळराव, मुंबई २५

**देशमुख**, नानासाहेब डॉ. २२, २३

**देशमुख**, माधवराव २३

**देशमुख**, रामभाऊ ११७

**देशपांडे**, श. द. ७१

**नरसिंव्ह सरस्वती** स्वामीमहाराज, श्री अण्णासाहेब यांचे गुरु, साक्षात्कारी संत, यांनीच अण्णासाहेबांच्या आयुष्यास वेगळी कलाटणी दिली—निर्याण शके १८०७ पौष शु।। १५ सन १८८६—आळंदी येथे समाधि. १, ६, ९, १२०, १६०, १६१, १८६

**नवले, गणपतीबुवा**, अण्णासाहेबांचा एक भक्त ५७, ९१, १८३

**नातू**, सरदार बाळासाहेब, पुणे ५०, ६०

**नामदेव**, १०४, १६५

**नारायण शेषाद्री** १६२

**पटवर्धन**, अण्णासाहेब, श्रीनरसिंव्ह सरस्वनी स्वामींचे पट्टशिष्य, देशभक्त, अनेक राष्ट्रीय उपक्रम, रोग्यांस विनामूल्य औषध देणारे अत्यंत उच्च कोटीचे सत्पुरुष, लोकमान्य टिळकांचे वर अतिशय लोभ—जन्म १८४७ निर्याण १९१७—ओंकारेश्वर, पुणे येथे समाधि

**पटवर्धन**, डॉ. २०

**पटवर्धन**, जानकीबाई, अण्णासाहेबांच्या मातोश्री ६६, ११६

**पटवर्धन**, भाऊसाहेब, अण्णासाहेबांचे वडील ११६

**पटवर्धन**, रामचंद्र विनायक उर्फ बाबासाहेब, अण्णासाहेबांचे चिरंजीव, श्रुतिबोध-संपादक, पंचांग कर्ते ५, ७, ९, १२, ५५, ६२, ८३, १०१, १५७, १६४, १८३, १८५, १८६

**पटवर्धन**, सीताराम विश्वनाथ, वऱ्हाडचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन, मोडी पुस्तकांचे कर्ते, स्वावलंबनाने योग्यतेस चढलेले १९७

**पटवर्धन**, विनायक रामचंद्र, अण्णासाहेब यांचे नांव १२८, १२९

**पटवर्धन**, श्रीमंत तात्यासाहेब २३

**परांजपे**, शिवराम महादेव, पुणे ७९, १२५,

**पळसुले, डॉ.** प्रस्थापक भारत स्वयंसेवक मंडळ १७८

**पंजाब**, अण्णासाहेब यांचा एक भक्त ५१

**पांगारकर**, ल. रा. १०५, १६३

**पाटील**, नथ्थू राघो ६६, ८०, ९२, १०१, १०४

**पाटील**, हरी भगवान १७२

**पाळेकर**, बाबासाहेब, वकील अमरावती ६१

**पाळेकर**, विष्णुपंत २२, ४८, ५०, ५२

**पेरिक्लीज**, ग्रीस मधील तत्ववेत्ता व मुत्सद्दी २०४

**बनहट्टी**, प्रोफेसर ३

**बापट**, गणेश विश्वनाथ १६५, १६९
**बापट**, विश्वनाथपंत, अण्णासाहेबांचे गुरुबंधु ३९
**बापट**, विष्णुशास्त्री १२५
**बापट**, सदुभाऊ, लो. टिळकांचे आठवणीकार २१
**बालगंधर्व**, नटसम्राट ७९
**बाप्टिष्टा**, बॅरिस्टर २४
**बाबा पद्मनजी** १६२
**बोधानंद**, श्री. १२५
**ब्रम्हगिरीबुवा** ३२
**ब्रम्ह**, दि. ब. १०४

**भट**, चिंतामणराव ११७
**भागवत**, अक्का, मातोश्री १५, १६
**भाजेकर**, बापूराव ११७
**भारतीया**, गुजराती, धनश्यामच्या भावाचा जावई ४७
**भावे**, वैद्य १७५
**भिडे**, बा. अ., कवि व टीकाकार ११८
**भिडे**, लक्ष्मणराव ३३
**भिडे**, सदाशिवशास्त्री १०५
**भोपटकर**, लक्ष्मण बळवंत उर्फ अण्णासाहेब भोपटकर ७७

**मनुवन्स**, कै. सौ. मनोरमाबाई पटवर्धन, श्री. अण्णासाहेबांच्या पत्नी १८२
**मॅकेंझी**, डॉ. ११९
**महंत**, श्री. श्रीपद्मताभस्वामी धुळें, यांचे भक्त १७९
**मार्टिन** १०७

**मॉंटेग्यु** ७५

**माधानकर**, गुलाबराव १०५, १६१

**मुरारजी**, गोकुळदासशेठ ११८

**मुक्तेश्वर** १८९

**मोडक** १६२

**मोदी**, सुंदरलाल नानालाल, डॉ. ४८, १५१

**मोरोपंत**, कवि १८९

**मोहनसिंग**, सरदारसिंगचा मुलगा १०३

**रघुनाथ पंडित** ११

**रमाबाई**, पंडिता १६२

**रानडे**, रावसाहेब महादेव गोविंद. राष्ट्रीय सभेच्या संस्थापकांपैकी एक टिळकांच्या अगोदरच्या पिढीतील राजकीय पुढारी. अर्थशास्त्रज्ञ. हायकोर्ट जज्ज, मुंबई. लेखक आणि ग्रंथकार. प्रार्थना समाजाचे आणि सुधारक पक्षाचे अध्वर्यु–मृत्यु सन १९०२—१०९, १११, ११५, ११८

**रामचंद्र अय्या**, कंचीस्वामी १६५

**रायरीकर**, तात्यासाहेब ४०, १४८

**रुद्र**, नारायणबुवा उर्फ पद्मनाभस्वामी. अण्णासाहेब यांचे गुरुबंधू. धुळे येथे यांची समाधि व संस्थान आहे ४७, ५२, ५३, ६२, ७२

**रुद्र**, पुरुषोत्तमबुवा, सध्याचे धुळे संस्थानचे सरपंच ४८, ५५

**रुद्र**, वासुदेवबुवा, धुळे, पुरुषोत्तमबोवांचे वडील ४८

**लवाटे**, शंकरराव २१, २४

**लष्करी** अधिकारी २९

**लागवणकर**, वैद्य बाळशास्त्री ३३, ११९

**लागवणकर**, महादेवशास्त्री ११९

**लालशंकर** उमियाशंकर ११९
**लिमये**, कृष्णाजी पांडुरंग, कवि राधारमण १२६
**लुई**, तेरावा, फ्रान्सचा बादशहा ११५
**लंबे**, भाऊसाहेब ८८, ९८

**वकील**, व्यंकटराव रामचंद्र ११६
**वर्डस्वर्थ**, इंग्रजी कवि १०७, ११८
**वडोदकर**, यादवबुवा १७२
**वागदरीकर**, का. त्र्यं., उपाख्य बारीक मास्तर, अण्णासाहेब यांचे एकनिष्ठ भक्त. योगायोगाने त्यांचे वास्तव्य अण्णासाहेब यांचे वाड्यांतच आहे १४१, १५०, २००
**वारद**, मल्लाप्पा बसप्पा, रा. ब. ३२
**वासुदेवानंद सरस्वती**, श्री ८८
**वॉरन हेस्टिंग्ज** १९६
**विष्णुबुवा ब्रम्हचारी**, १६२
**विवेकानंद**, स्वामी १५९
**विसोबा खेचर** १६५
**विष्णुशास्त्री**, पंडित ११८
**व्यंकट परमाळ** १२३

**शंकरबुवा**, सोनगीरकर. श्री दत्तोबा आठवले यांचे नंतरचे आणि श्री माधवबोवा गोडबोले यांच अगोदरचे मठाधिपति, श्रीनरसिंव्ह सरस्वती स्वामी महाराज संस्थान, आळंदी ४८, ५२, ५६, ६७, १८५
**शंकराचार्य**, श्री आद्य १६०
**शेख महंमद अल्ली** १२५
**शेंडे**, शास्त्री ११६

**श्रौती,** नारायणराव ७६

**सखाराम अर्जुन** १०८

**सखाराम विठोबा,** डॉक्टर १०८

**सरदारसिंग,** अण्णासाहेब यांचे एक भक्त ८१, ८४, १०३, १८३

**साईबाबा,** श्री १६१

**साठे,** कमलाकर हरी, जुन्नर १५१

**साठे,** डॉ. ४९

**सालारजंग,** दिवाण, हैद्राबाद संस्थान. नामांकित मुत्सद्दी. १८५७ च्या बडांत इंग्रजांची बाजू राखणारा. वऱ्हाडप्रांत परत मिळविण्यासाठी अण्णासाहेब यांच्या सहकार्याने अविश्रांत खटपट–मृत्यू सन १८८३—१११, १२०, १२२, १२३, १६५, १९३, १९४, १९५

**सावरकर,** स्वातंत्र्यवीर ७७

**सिद्धारूढ स्वामी,** श्री १६३

**सीताराम विठ्ठल** १०८

**सोमण,** ॲडमिरल भास्करराव २२

**सोमण,** बाबासाहेब २२

**सोमनाथ,** साप १०४

**सोहोनी,** आशा ७९

**स्टीफन क्रेन,** ( Stephen Crane ) अमेरिकन कवि १५९

**स्मिथ,** डॉ. ११२

**सॅम्युअल रॉजर्स,** इंग्रजी कवि १६५

**होळकर,** श्रीमंत तुकोजीराव १२३

**श्रीज्ञानेश्वर महाराज,** १००, १६५, १८९

---

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ११ | ११ | बुभुक्षित | बुभुक्षितैः |
| ५० | टीप | शेवटची ओळ: | टिंबांच्या पुढे 'असे म्हटलेले आहे' हे शब्द अधिक वाचावे. |
| ६२ | टीप ओळ १ | पद्मनाथ | पद्मनाभ |
| ११४ | टीप | शेवटच्या ३ ओळी: | अवतरण चिन्ह 'दिसते' या शब्दापुढे पुरे करावे. कंसात दिलेला संदर्भ चुकीने पडलेला आहे. त्याऐवजी 'ग. वि. बापट यांची आठवण पृष्ठ ३६. प्रश्नोत्तर क्रमांक ४ पहा' असा मजकूर पाहिजे. |
| १५५ | मथळा | Spiritiul | Spiritual |
| १६२ | टीप ओळ ३ | पदमजी | पदमनजी |
| १६८ | २५ | unconciously | unconsciously |
| १६९ | १७ | Spritual | Spiritual |
| १७५ | ८ | गुणपुले | गणपुले |

---

# क्ष म स्व

कविवर्य कालिदास म्हणतात की एखादाच दोष असला तर तो गुण-सन्निपातांत निमज्जन पावतो. या पुस्तकात गुणांबरोबर ‘ अनेक ’ दोष असतीलहि परंतु वाचकांच्या सहानुभूतीने ते धुवून निघतील असा आमचा विश्वास आहे.

मागाहून आलेल्या आठवणींनी ‘ समारोपा ’ने विनयाने घेतलेले शेवटचे स्थान सोडावयास लावले. समारोपाचीही स्थानच्युति वाचकांस विशेष बोचणार नाही असे वाटते.